UNIVERSAL LIBRARY
OU_192446
UNIVERSAL LIBRARY

# कुंज-विकास

लेखिका

श्री. सौ. आनंदीबाई शिर्के

( भाषांतराचे वगैरे सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन. )

प्रथमावृत्ति–२००० प्रती.

शके १८५६.

किंमत १॥ रुपया.

प्रकाशक—
पारुजी नारायण मिसाळ,
बालसन्मित्र-कार्यालय, मालवण ( रत्नागिरी )

मुद्रक—
गोपाळ बळवंत जोशी,
आनंद मुद्रणमंदिर
१०६/४६ सदाशिव पेठ, पुणें

# प्रस्तावना.

आनंदीबाई शिर्के यांच्या लघुकथा प्रथमतः अनेक मासिकांतून प्रसिद्ध असून १५ लघुकथांचा एक संग्रह " कथाकुंज " नांवाच्या पुस्तकाच्या ननतेपुढें चार वर्षांपूर्वी आलेला आहे व दुसरा एक संग्रह " कुंज-" नांवाच्या प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारें जनतेपुढें येत आहे. त्यांनी ऽ आणखी एक पुस्तक तयार आहे, पण तें गंभीर स्वरूपाचें असून ांकरितां निबंध व व्याख्यानें " असें त्याचें नांव आहे व तेंहि प्रसिद्ध न येणार आहे. लेखांच्या व लघुकथांच्या द्वारें त्यांचें नांव जरी या परिचयाचें झालेलें आहे, तरी त्यांचें चरित्र तितकेंसें परिचयाचे हृणून तें अगदीं थोडक्यांत टांचणरूपानें खालीं दिलेलें आहे.

आनंदीबाईचा जन्म बडोदें येथें झाला. त्यांचें माहेरचें नांव अनसूया; ांनीं आपल्या पहिल्या पहिल्या गोष्टी " कुमारी आनंदी " असें टोपण ऊन लिहिल्या, आणि मौजेची गोष्ट अशी कीं ' कुमारी आनंदी'नें ल्या एका गोष्टीमुळेंच एका व्यक्तीचें लक्ष त्यांच्याकडे वेधलें जाऊन ःनंतर लौकरच "सौ. आनंदीबाई शिर्के" झाल्या. ज्या गोष्टीमुळें 'कुमारी 'ला सौभाग्य प्राप्त झालें ती गोष्ट म्हणजे ' बेगम दिलआरा ' ही ठामित्रांत ' प्रसिद्ध करण्यास पाठविलेली होती, व ती त्या मासिकाचे ादक श्रीयुत शि. स. शिर्के यांचे नजरेस पडून व नजरेंत भरून काला- ( १९१३ मध्यें ) उभयतांच्या विवाहास कारणीभूत झाली ! रा. हे खानदेशांतील जळगांवास डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्डाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर असून आपल्या पत्नीच्या वाङ्मयात्मक संसारास सहानुभूतिपूर्वक करीत असतात.

आनंदीबाईना वाङ्मयाची लहानपणापासून आवड. त्यांना मराठी, । गुजराथी, हिंदी व इंग्रजी या भाषा येतात. तीनहि भाषांतील ग्रंथ त्या ह्पणें वाचूं शकतात. त्यांनीं बेरवाईट अनेक प्रसंग पाहिलेले आहेत; नीं बावरून किंवा गोंधळून न जातां त्यांतील लौकिक भयानकत्व किंवा

अमंगलत्व त्या बाजूला सारूं शकतात. आणि त्यांकडे कलादृष्टीनें पाह त्यांतील रसजनक भागांचा अलौकिक आल्हाद देणारें वाड्मय निर्माण क ण्याचे कामीं त्या उपयोग करतात. त्यांच्या गोष्टींत ‘ कथाकुंजाची ’ प्रस्ताव लिहिणारे गुरुवर्य श्री. कृ. कोल्हटकर म्हणतात त्याप्रमाणें ‘ अनुभवाचा जिवं पणा जसा दिसून येतो तसा प्रसंगांचा, हेतूंचा, वर्णनांचा व भाषेचा स्वाभ विकपणा व साधेपणाहि दिसून येतो. ’ ‘ इतर कथालेखिकांच्या कथांत पवित्र व निरागस वातावरण दिसून येतें तें याहि कथांत दिसून येते. ’ ह गुरुवर्य कोल्हटकरांचा शेरा यथार्थ आहे. हें ‘ कथाकुंजा’वरूनच नव्हे त प्रस्तुतच्या ‘ कुंजविकासा’ वरूनहि दिसून येईल.

इतर कलांप्रमाणें लघुकथालेखनकलेचेंहि एक घटनाशास्त्र किंवा ‘ निय त्रक ’ आहे. ( यालाच इंग्लिशमध्यें Technique म्हणतात; व अलीकडे मराठींत ‘ तंत्र ’ म्हणूं लागले आहेत. पण ‘ तंत्र ’ शब्दाचीं मराठींती साहचर्ये किंचित् ग्राम्य असल्यामुळें तो शब्द टाळून Technique य अर्थी ‘ नियंत्रक ’ हा शब्द रूढ करावासा वाटतो. ) या ‘ नियंत्रका’च्य दृष्टीनें प्रस्तुत कथांपैकीं कांहींमध्यें दोष सांपडतील हे नाकबूल करण्या कारण नाहीं. उदाहरणार्थ, ‘ अमूर्ता मोकिंदा ’ या गोष्टींत अमूर्ता ऊर्फ अमृ हा ‘ जवळ जवळ सहीचा मालक बनला होता ’ ( पान १६० ) असे प्रथ सांगून पुढे ‘ रावसाहेबांनीं दिलेलीं पुस्तकें वाचण्याचें त्यास वेडच लागलें. असे लेखिकेनें म्हटलें आहे. ( पान १७० ) तें ‘ नियंत्रका’च्या दृष्टीनें सदो आहे. ‘ चित्रदर्शन ’ या पहिल्याच गोष्टींत दैवी योगायोग कितीतरी आ आहेत. ते ‘ नियंत्रका’च्या दृष्टीने दोषार्ह आहेत. उदाहरणार्थ, दत्तक मुल जो घ्यावयाचा त्याबद्दल चौकशी न करणें, त्याचप्रमाणें उंबराच्या झाडाल खाच पाडून त्यांत देवांचीं चित्रे ठेवणें, ती खांच बुजून तेथे साल येणें चित्रे आंत रहाणे, हेंच उंबराचें झाड विशिष्ट तऱ्हेनें तोडलें जाणें व तें यु राजांच्या नजरेस पडणें वगैरे गोष्टी वाचून “ असलें अद्भुत आश्चर्य आप जन्मांत ऐकलें नव्हते, देवाची करणी; दुसरें काय ? ” असें तत्कालीन लोक प्रमाणें ( पान ३६ ) हल्लींचे कांहीं वाचक म्हणतील ! ( माझ्यासारखे कांह वाचक “ देवाची करणी, दुसरें काय ! ” असें न म्हणतां “ लेखिकेच करणी, दुसरें काय ? ” असे मनांत म्हणतील हा भाग निराळा ! )

" बांगड्यांवर बहिष्कार " या गोष्टींत कासारणीकडून बांगड्या भरवून घ्याव्यात, कासाराकडून भरवून घेण्यामध्यें चारित्र्यास धोका आहे असें सुचवावयाचें आहे, कां एखाद्या पापी मुसलमान कासारानें जबरदस्तीनें अंगाशीं लगट केल्यास आपण भ्रष्ट झालों अशा समजुतीनें स्त्रीनें जाव देणें वेडेपणाचें आहे असें लेखिकेला सुचवावयाचें आहे हें स्पष्ट नसल्यामुळें ' नियंत्रका'च्या दृष्टीनें मोठाच दोष उत्पन्न झाला आहे. कला-' नियंत्रका'च्या दृष्टीचे हे दोष प्रस्तुत गोष्टीचे बाबतींत शल्याप्रमाणें बोंचक होत नाहींत याचें कारण काय, याचा विचार केला असतां कलेचें आत्मतत्त्व व कलेचें बाह्यांग-नियंत्रक यां मधील फरक ध्यानांत येईल.

' बांगड्यांवर बहिष्कार ' या गोष्टीत लिली नांवाची गोंडस मुलगी, तसेंच तिची आई इन्दिराबाई व तिचे यजमान वसंतराव यांचीं जीं रम्य स्वभावचित्रें थोडक्यांत पण स्पष्ट रीतीनें काढलेलीं आहेत त्यामुळें व मुसलमान फेरी-वाल्यानें स्त्रीचा वेष घेऊन जो एक प्रकारचा कुतूहलजनक प्रसंग उत्पन्न केला आहे त्याचें संयमपूर्ण वर्णन केल्यामुळें वर उल्लेखिलेला दोष असूनहि रसोत्पत्ति होऊं शकते. ' अमूर्ता मोकिदा ' यांतील दोष तर इतका क्षुल्लक आहे कीं, तो दोन चार वाक्यांमध्यें थोडासा फेरबदल केल्यानें दूर होण्या-सारखा आहे. ' चित्रदर्शन ' या गोष्टीतील अस्वाभाविकता अद्भुतरम्यतेमुळें, मातृप्रेमाच्या रसयुक्त वर्णनामुळें व दत्तक घेण्याचे बाबतीशीं ज्यांचा संबंध आला त्यांच्या स्वभावांतील सूक्ष्म छटा नाजूक हातानें दाखविल्यामुळें झांकली गेली आहे. ( किंवा झांकली गेली नसली तरी उपेक्षणीय झाली आहे, असें म्हणणें अधिक यथार्थ होईल. )

या उदाहरणांचा तात्पर्यार्थ असा कीं, ' नियंत्रका 'च्या दृष्टीनें कांहीं दोष एखाद्या कलाकृतींत असले तरी त्यांयोगें थोडीबहुत रसहानि होईल असें जरी असलें तरी रसोत्पादक गुणांचा प्रकर्ष असल्यास व एकंदर कलाकृतींत जिवंत-पणा व सहृदयता असल्यास ते दोष फारसे लक्षांत येत नाहींत; व आल्यास शल्याप्रमाणें बोंचत नाहींत.

कलावंताचें मुख्य कार्य असें असतें कीं, विशिष्ट सौंदर्य नजरेला आणून देऊन अलौकिक असा आनंद उत्पन्न करावा. ही आनंदोत्पत्ति परिपूर्णतेनें व्हावयाची म्हटली म्हणजे कलाकृतींत विशिष्ट दोष नसले पाहिजेत व विशिष्ट

गुण असले पाहिजेत. म्हणजे त्या कलाकृतीमध्यें विशिष्ट नियंत्रणें पाळलीं गेलीं असलीं पाहिजेत. पण हें मान्य केलें म्हणजे त्याचा असा अर्थ नव्हे कीं कलाकृतीचा आनंद विशिष्ट नियंत्रणें पाळण्यावर सर्वस्वीं अवलंबून असतो. कलाकृतीचें आल्हादकत्व तिच्या अंतरात्म्यांतील रसवत्तेवर व स्वाभाविक देहसौंदर्यावर बऱ्याच अंशीं अवलंबून असतें. बाह्य उपकरणीं, पोषाख, अलंकार इत्यादिकांचें अस्तित्व रमणीयतेंत भर घालील व त्यांचा अभाव किंचित् न्यून उत्पन्न करील. पण यांचें महत्त्व फारच कमी. त्याचप्रमाणें त्या त्या कलेचा जो नियमसमूह आहे त्याचें प्रतिपालन हें जरी इष्ट असलें तरी क्वचित् प्रसंगीं नियमभंग उपेक्षणीय व क्षम्य ठरतो. इंग्लिशमधील 'व्हिकार ऑफ वेक्फील्ड' ( Vicar of Wakefield ) हे 'नियंत्रका'-च्या दृष्टीनें किती तरी सदोष आहे, पण तें रमणीय नाहीं–असें कोणी म्हणतें काय? अण्णा किर्लोस्करांचें 'सौभद्र' नाटक, देवलांचो 'शारदा', हरिभाऊंची 'मी' ही कादंबरी, गडकऱ्यांची 'राजहंस माझा निजला' ही कविता किंवा 'भावबंधन' हें नाटक इत्यादिकांमध्यें 'नियंत्रका'च्या दृष्टीनें पुष्कळ सदोषता दाखवून देतां येईल, पण या कलाकृति आल्हादजनक नाहींत असें कोणी म्हणते काय?

उलटपक्षीं एखादी कलावस्तु अशी दाखवितां येईल कीं त्यांत दोष तर दाखवितां येत नाहींत, पण तीपासून रसोत्पत्ति मात्र होऊं शकत नाहीं! व्याकरणाचे किंवा यमकाचे नियम पाळले म्हणजे जसा कवि होऊं शकत नाहीं, किंवा दप्तराची चांगली व्यवस्था ठेवतां आली म्हणजे उत्तम व्यवस्थापक जसा होत नाहीं, किंवा संभावितपणाचे व्यवहारांतील सर्व नियम तंतोतंत पाळले म्हणजे खरें सौजन्य अंगीं बाणलेलें आहे हें जसें सिद्ध होत नाहीं; त्याचप्रमाणें बाह्य 'नियंत्रक' संभाळल्यानें कलाविलासाचा आनंद देण्याचें श्रेय मिळूं शकत नाहीं.

एखादी पगारी दाई आजारी मुलाची खाण्यापिण्याची व औषधपाण्याची व्यवस्था डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणें यथास्थित व मनापासून उत्तम प्रकारें ठेवील, पण आईची कांहीं तिला सर येणार नाहीं, आणि आईनें प्रेमातिशयामुळें किंवा अज्ञानामुळें क्वचित् प्रसंगीं नियमातिक्रम किंवा हयगय केली तरी दाई ती दाई आणि आई ती आई हा भेद जसा कायमच राहील त्या–

प्रमाणेंच कलेचें सर्व ' नियंत्रक ' संभाळणारा यांत्रिक कारागीर आणि कलाविषयक नियमांचें नियंत्रण क्वचित् प्रसंगीं विसरणारा किंवा बाजूला सारणारा जातिवंत कलावन्त यांमधील भेद हा कायमच राहणार. सौ. आनंदीबाई शिर्के यांच्या लेखनामध्यें ' नियंत्रक ' दृष्ट्या कांहीं दोष असले तरी कलाविलासाची स्वाभाविक आवड व शक्ति असल्यामुळें त्यांचें लेखन वर दाखविल्याप्रमाणें कांहीं ठिकाणीं सदोष असलें तरी तें रसिकांना रुचतें, हाच म्हणण्याचा तात्पर्यार्थ.

त्यांच्या लेखनामध्यें हा एक विशेष मला दिसून आला कीं, तें वाचीत असतां आपण नेहमीं सात्त्विक वातावरणामध्यें वावरत असतों व बहुधा त्यांत सदुपदेश आढळतो. सदुपदेशाकरितां किंवा नीति सुधारण्याकरितां ललितवाङ्मयाचा अवतार नसेल, पण अलौकिक आल्हाद देण्याचें अवतारकृत्य साधीत असतां याहि गोष्टी साधल्या तर सौंदर्याला सौजन्याची जोडी मिळाल्यामुळें त्याच्या रमणीयत्वांत व तेजांत-सात्त्विकतेची भर पडल्यास वाईट का होणार आहे ? ' कलाविलासाकरितां कलाविलास ' हें तत्त्व किती जरी खरें असलें तरी कलाविलासाला नीतिविकास आणि सत्यप्रकाश यांची जर साहजिकपणें संगत लाभली तर त्यांत बिघडलें कोठें ? या दृष्टीनें पाहतां 'टी पार्टी,' ' वटसावित्री ', ' हरितालिका, ' ' गौरी, ' ' पद्मेला मिळालेलें फळ, ' वगैरे गोष्टी वाचनीय आहेत. ' टी पार्टी ' या गोष्टींत बायकांना हळदीकुंकवाचे वगैरे समारंभ त्रासदायक न होतां ते स्नेहवर्धक व उपयुक्त कसे होतील हें सुंदर रीतीनें दाखविलें आहे. ' वटसावित्री ' ही गोष्ट तर फारच मार्मिक आहे. पत्नीनें आपला पति आजारी असतां वटसावित्रीची पूजा करण्यांत किंवा वटसावित्रीविषयींचें व्याख्यान ऐकण्यांत वेळ न दवडतां त्याची सेवा केली तर ती त्याला यमाच्या पाशांतून सोडवून आणूं शकेल हें तत्त्व या गोष्टींत रसपरिपोषक प्रसंगांच्या व मार्मिक विधानांच्या कोंदणांत बसवून मधुरतेनें सादर केलेलें आहे. इतर गोष्टींतील सदुपदेशहि असाच मार्मिक व मननीय आहे. असो.

सौ. आनंदीबाई शिर्के यांच्या गोष्टींचा आणखी एक विशेष असा कीं त्यांत ( अलीकडील कांहीं लघुकथांतल्याप्रमाणें ) कृत्रिम भावनोद्रेक नाहीं किंवा नाटकी थाटाचा आततायीपणा नाहीं. बहुतेक सर्व गोष्टींत स्वाभाविक-

तेचें वातावरण असून परिचित भावनांचीं चित्रें रेखाटलेलीं आहेत. त्यांत मार्मिक सूक्ष्मावलोकन आहे, पण विकृतविच्छेदन किंवा छिद्रान्वेषण नाहीं. त्यांत जिवंत भावनांचा उबदारपणा आहे, पण कृत्रिमतेनें प्रज्वलित केलेल्या भावनांच्या मशालींचा तमाशा नाहीं. तथापि कांहीं अपवाद नाहींत असें मात्र नव्हे. उदाहरणार्थ, " विस्तवाशीं खेळ " या गोष्टींत ज्या तरुणाशीं आपल्या मुलीचें लग्न ठरवावयाचें त्याचें लग्न झालेलें आहे किंवा नाहीं या-विषयीं पुष्कळ दिवसांच्या ओळखीनंतरहि आईबापांनीं किंवा त्या प्रौढ व सुशिक्षित मुलीनेंहि विचारपूस न करणें, तसेंच तो तरुण इन्फ्ल्युएन्झाच्या सांथीमध्यें गेला असतां, त्या मुलीनें रस्ता चुकून स्मशानापर्यंत त्याच्या प्रेत-यात्रेबरोबर जाणें, येथील व्याख्यानें ऐकणें व अखेर स्वतःला चितेवर टाकून देणे, हें सर्व अस्वाभाविक आणि नाटकी वळणाचें वाटतें.

' तिने आत्महत्या कां केली ' या गोष्टींतहि आपल्या मुलाकडे त्याच्या आजारांत आपण दुर्लक्ष केलें आणि म्हणून तो मरण पावला याची तीव्र जाणीव होऊन एका मातेने आत्महत्या केली असें दाखविलें आहे तें देखील असेंच आभासात्मक उत्कट भावनेचें उदाहरण आहे. आनंदाची गोष्ट अशी कीं असे अपवाद फारच थोडे आहेत. बहुतेक गोष्टींमध्यें साहजिक स्वानु-भवाचें कलादृष्टीनें रूपान्तर करून संयमपूर्वक वर्णन केलेलें आहे. आणि म्हणून कलाकुशल सृष्टिदेवीनें निर्माण केलेल्या ताज्या फुलांप्रमाणें आल्हाद-कारक झालेलें आहे.

' स्वानुभवा 'चा आतां उल्लेख केला त्यावरून एक मुद्दा सुचला तो येथें लगेच सांगून टाकतों. महाराष्ट्रांत सध्यां भाषांतर किंवा रूपान्तर या स्वरू-पाच्या उष्ट्या वाङ्मयाला विशेष किंमत नाहीं, कारण स्वानुभवाचें स्वतंत्र व जिवंत वाङ्मय थोड्याबहुत प्रमाणांत उत्पन्न होऊं लागलेलें आहे. ही गोष्ट आनंददायक असली तरी ' स्वानुभव ' अधिक गंभीर व विशाल स्वरूपाचा असल्याशिवाय आणि त्याच्या जोडीला सूक्ष्म दृष्टि आणि खोल विचार असल्याशिवाय त्याच्या केवळ स्वतंत्रतेनें व जिवन्तपणानें कोणाचें पूर्ण समा-धान होणार नाहीं हें ध्यानांत धरलें पाहिजे. अलीकडे उच्चतम दर्जाचीं मोठीं काव्यें किंवा मोठ्या कादंबऱ्या वगैरे निर्माण होत नाहींत, याच्या अनेक कारणांपैकीं एक कारण असें देण्यांत येतें कीं, " या धांदलीच्या

काळांत कादंबरी लिहिण्याची लेखकास जशी फुरसद नसते तशी ती वाचण्याची वाचकासहि नसते." हें कारण अल्पांशानें खरें असेल, पण त्याहून बलवत्तर कारण मला असें दिसतें कीं, अलीकडील आपल्या शिक्षणानें व एकंदर परिस्थितीमुळें आपल्या जुन्या सत्यांबद्दलची आपली प्रचीति, सौजन्याच्या आपल्या जुन्या कल्पना आणि सौंदर्याची आपली जुनी दृष्टि, यांमध्यें क्रान्ति झालेली आहे. आणि आपला सर्व मानसिक डोलारा डळमळीत झालेला आहे. अशा स्थितींत सत्यसौजन्यादिकांचीं जीं थोडींबहुत व अल्पस्वल्प स्वरूपें आपणांस दिसतात तींच रेखाटणें व तत्संबंधीं विचार व चर्चा करणें याशिवाय गत्यन्तर राहिलें नाहीं, अशी स्थिति प्राप्त झाली आहे. आपणांला आईन्स्टाईन, एच्. जी. वेल्स, कार्लमार्क्स, महात्मा गांधी इत्यादिकांप्रमाणें उच्चतम वातावरणांत जातां येत नाहीं. आपलें उड्डाण कावळ्यासारखें असतें. आपल्या भावना खऱ्या व जिवन्त आहेत, पण त्यांत आद्य ऋषींच्याप्रमाणें किंवा अर्वाचीन साधुसंतांच्याप्रमाणें गांभीर्य नाहीं व शिवाजी, नेपोलियन इत्यादिकांप्रमाणें तीव्रता नाहीं. आपली दृष्टि स्वतंत्र आहे, पण ती अर्भकासारखी स्थूल स्वरूपाची आहे. दुसऱ्याच्या ओंजळीनें आपण पाणी पीत नाहीं हें खरें, पण आपली ओंजळ मुलाच्या ओंजळीएवढी लहान आहे. आणि जें पाणी आपण पितों तें विविध अनुभवांच्या थरांतून झिरपून व मननाच्या खोल गाभ्यांत कांहीं वेळ आंतल्या आंत फिरून गोड झऱ्याच्या रूपानें बाहेर पडलेलें नाहीं. अशा उथळ स्थितींत लघुकाव्यें, लघुकथा इत्यादिकांचीच वाढ व्हावयाची. कारण आडांतच नसलें तर पोहऱ्यांत कोठून येणार? पण या मुद्द्याचा येथें विस्तार करणें अप्रस्तुत होईल, म्हणून आवरतें घेतों व अल्पस्वल्प कां होईना स्वानुभवाच्या आधारें व स्वतंत्रतेनें रम्य वाङ्मय निर्माण करणाऱ्या महाराष्ट्रांत ज्या थोड्याबहुत व्यक्ति आहेत त्यांमध्यें सौ. आनंदीबाई शिर्के यांची गणना केली पाहिजे एवढेंच येथें सांगतों.

या गोष्टींची भाषा साधी, सरळ व सुलभ आहे. स्त्रीदाक्षिण्यामुळें मी म्हणतों असें म्हणावयाचें असल्यास म्हणावें पाहिजे तर; पण मला आपलें प्रामाणिकपणें असें वाटतें कीं, पुरुषांपेक्षां बायकांची मराठी भाषा सामान्यतः अधिक चांगली असते, आणि सौ. आनंदीबाई शिर्के या सामान्य नियमाला कांहीं अपवाद नाहींत. तथापि 'मोकळे केस' न म्हणतां 'मुक्त केस'

म्हणण्याचा आणि पुरुषी संस्कृतयुक्त अस्वाभाविक भाषा वापरण्याचा मोह त्यांनाहि कित्येक वेळां आवरत नाहीं. पुरुषांना स्त्रियांमध्यें विशेष सौंदर्य दिसतें. आणि बायकांना पुरुषांचें अनुकरण करावेंसें वाटतें हा जो इतर लौकिक व्यवहारांतला सामान्य नियम त्यांतलेंच हें एक भाषेच्या क्षेत्रांतलें उदाहरण आहे कीं काय कोणास ठाऊक !

असो. या प्रस्तावनेंत कांहीं गोष्टींचा उल्लेखहि केलेला नाहीं. व कोणत्याहि एका गोष्टीची सांगोपांग गुणदोषचर्चा केलेली नाहीं. पण प्रस्तावनालेखकानें विस्तृत परीक्षण केलेंच पाहिजे किंवा सगळ्या गोष्टींची सांगोपांग गुणदोष-चर्चा केलीच पाहिजे असें नसून परिचय करून देणें व सामान्य स्वरूपाचें दिग्दर्शन करणें हें काम त्याचें आहे अशी माझी कल्पना आहे.

सौ. आनंदीबाई शिर्के यांचा आणि वाचकांचा परिचय आतां थोडाबहुत झालाच आहे आणि तो प्रस्तुत त्यांच्या वाङ्मयापत्याच्या रूपानें वृद्धिंगत होईल आणि त्या दोघांमध्यें घरोब्याचें नातें उत्पन्न होईल अशी आशा व्यक्त करून ही प्रस्तावना संपवितों.

हिंगणें बुद्रुक,
१८।४।३३　　}　　वा. म. जोशी.

# ' कुंजविकास ' पाहाण्यापूर्वी—

प्रस्तुत कथासंग्रहाच्या लेखिका सौ. आनंदीबाई शिर्के यांचे पति श्री. शिवरामराव शिर्के यांचा-माझा प्रथम परिचय ते विद्यार्थिदशेंत असतां परस्परांच्या लेखनानें होऊन तो उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत गेला. श्री. शिर्के हे उच्च दर्जाचे लेखक व कवि असून अत्यंत मार्मिक, रसिक व विद्वान् गृहस्थ आहेत. त्यांनीं आपल्या विद्यार्थिदशेंत महाराष्ट्रवाङ्मयाची जी सेवा केली ती पुढे सारखी सुरू राहिली असती, तर त्यांच्या हातून महाराष्ट्रवाङ्मयांत अनेक उत्कृष्ट ग्रंथांची भर पडली असती. पण अनेक आपत्तींमुळें व कार्यबाहुल्यामुळें इच्छा असूनही त्यांच्या हातून लेखनव्यवसाय होत नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

श्री. शिर्के यांना आपला लेखनव्यवसाय सुरू ठेवितां न आला तरी आपल्य पत्नीच्या आवडत्या लघुकथालेखनास त्यांनीं उत्तेजन दिलें असून त्याचींच फळें ' कथाकुंज ' व ' कुंजाविकास ' हीं पुस्तकें होत.

सौ. आनंदीबाई व त्यांचा लेखनव्यवसाय यांबद्दलची माहिती श्री. तात्यासाहेब कोल्हटकर व प्रो. वामनराव जोशी यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनांत दिलीच आहे. सौ. आनंदीबाईवर अनेक आपत्ति आल्या तरी तशा प्रतिकूल परिस्थितीसही धैर्यानें तोंड देऊन आपल्या कुटुंबांतील माणसांस आनंदी ठेवण्याचा परोपरीनें प्रयत्न करून त्यांनीं आपलें ' आनंदी ' बाई हें नांव सार्थ केलें आहे. त्याप्रमाणें संसारांत दुःखीकष्टी झालेल्या हजारों बायकांस त्यांनीं आपल्या सुंदर लघुकथांनीं आनंदित करून आपलें नांव सार्थ केलें आहे. त्यांचा ' कथाकुंज ' प्रसिद्ध झाल्यावर अल्पावधींत त्याची प्रथमावृत्ति संपून गेली. बक्षिसाकरितां मागविलेल्या एकुणपन्नास गोष्टींत ' पद्मेला मिळालेलें फळ ' ही त्यांची गोष्ट सर्वोत्कृष्ट ठरून त्यांना बक्षिस मिळालें. आजकालच्या लघुकथालेखनाच्या काळांत सुप्रसिद्ध लघुकथालेखिका म्हणून महाराष्ट्रवाङ्मयांत त्यांचें नांव प्रामुख्यानें झळकत आहे. त्यांच्या लघुकथांवर वाचकांच्या उड्या पडत असून त्यांच्या लघुकथा घरोघर मोठ्या आवडीनें वाचल्या जात आहेत. यावरून श्री. तात्यासाहेब कोल्हटकरांनीं सौ. आनंदीबाईबद्दल कथाकुंजाच्या प्रस्तावनेंत जी सदिच्छा प्रगट केली होती, ती सफल होत आहे, असें दिसून येतें.

सौ. आनंदीबाईच्या कथाकुंजावर पुष्कळ अभिप्राय आले. ते बहुतेक सर्व अनुकूलच होते; तथापि त्यांत ज्या ज्या सूचना केल्या गेल्या व गुणदोषचर्चा केली गेली, त्यांचा उपयोग त्यांनीं पुढील म्हणजे प्रस्तुत पुस्तकांतील कथा लिहिण्यांत केला असल्यामुळें हल्लींच्या कथा पूर्वीपेक्षां जास्त वस्तुस्थितिदर्शक ( Realistic ) व समाजस्थितीला धरून झालेल्या आहेत. ‘ चित्रदर्शन ’ ही गोष्ट पूर्वींच्या वळणाची असली तरी ती वरील अभिप्राय प्रसिद्ध होण्यापूर्वीच लिहिली गेली होती, हें सांगणें आवश्यक आहे.

सौ. आनंदीबाई या आपल्या बहुतेक लघुकथा स्वतंत्र रीतीनेंच लिहितात. त्याप्रमाणें प्रस्तुत कथासंग्रहांतील ‘ चित्रदर्शन ’ या एका लघुकथेखेरीज बाकीच्या सर्व लघुकथा त्यांनीं स्वतंत्रपणें लिहिल्या आहेत. ‘ चित्रदर्शन ’ ही लघुकथा जरी रूपांतरात्मक असली तरी मूळांतील पुष्कळ भाग बदलून इकडील परिस्थितीला जुळण्यासारखा भाग तींत घालावा लागल्यामुळें त्याही लघुकथेच्या सुंदरपणाचें बरेंचसें श्रेय सौ. आनंदीबाईकडेच जातें.

पुढील कथा छापतांना त्या लेखनाच्या व प्रसिद्धीच्या क्रमानें छापाव्या, अशी सूचना श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं केली होती; त्याप्रमाणें या पुस्तकांत क्रम ठेविला आहे. मात्र ‘ गौरी ’ ही गोष्ट ‘ अमूर्ता मोकिंदा ’ या गोष्टीच्या पुढें छापावयाची असतां, छापणाराच्या नजरचुकीमुळें ती पूर्वी छापली गेली आहे. कथा कालानुक्रमानें छापलेल्या असल्यामुळें सौ. आनंदीबाईच्या ‘ कथाकुंजा ’चा ‘ विकास कसकसा होत गेला आहे, हें या ‘ कुंजविकास ’ वरून दिसून येईल.

प्रो. वा. म. जोशी यांनीं या पुस्तकास आपल्या अधिकारयुक्त वाणीनें मार्मिक प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे लेखिका व आम्ही फार फार आभारी आहों. श्री. वामनरावजींनीं ही प्रस्तावना लिहून दिल्यास बरेच दिवस झाले. प्रस्तावना लिहिली त्याच वेळीं हें पुस्तक प्रसिद्ध व्हावयाचें होतें, पण अनेक अपरिहार्य अडचणींमुळें तें प्रसिद्ध होण्यास इतका दिनावधि लागला, याबद्दल दिलगिरी वाटते.

आम्ही शब्द टाकल्याबरोबर कुंजविकासांत प्रसिद्ध करण्यासाठीं आपलेकडील ब्लॉक देऊन श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं आम्हांस साह्य केलें,

श्री. गो. ग. तळवलकर यांनीं कच्चीं मुद्रितें तपासली, श्री. चौगुले, कलादर्शाचे संपादक यांनीं वेष्टणाचित्र सुंदर काढविण्यांत मदत केली, श्री. सौ. मालतीबाई दांडेकर यांनीं आपली गोष्ट पुस्तकांत छापण्यास परवानगी दिली, व आनंद प्रेसचे मालक श्री. गो. ब. जोशी यांनीं योग्य त्या सवलती देऊन पुस्तकाचें काम आमच्या मनाप्रमाणें सुबक करून दिलें, याबद्दल या सर्वांचे लेखिकेप्रमाणें आम्हींहि अत्यंत आभारी आहों.

बालसन्मित्र-कार्यालयातर्फे आजवर खुद्द आमचींच बालोपयोगी पुस्तकें प्रकाशित करण्यांत आलीं आहेत. परंतु एवढ्यावरच न थांबतां यापुढें निरराळ्या लेखकलेखिकांचीं विविध विषयांवरील उपयुक्त पुस्तकेंही प्रसिद्ध करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. या नवीन उपक्रमास अनुसरून सौ. आनंदीबाईचें प्रस्तुत पुस्तक आनंदानें आमच्या प्रियवाचकांच्या हातीं देत आहों. हें त्यांस आवडून उत्तरोत्तर अशींच उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध करण्यास आम्हांस उत्तेजन मिळेल, अशी आशा आहे.

बालसन्मित्र-कार्यालय<br>मालवण. ता. २५।२।३४ } **पारुजी नारायण मिसाळ.**

# अनुक्रमणिका

## व

## कथांच्या प्रथमप्रसिद्धीचा स्थलकालनिर्देश.


| विषय. | | | पृष्ठ. |
| --- | --- | --- | --- |
| १ चित्रदर्शन | यशवंत | १९२९ एप्रिल | १ |
| २ टी-पार्टी | नवा मनु | १९२९ नोव्हेंबर | ४२ |
| ३ वटसावित्री | स्त्री | १९३० सप्टेंबर | ५१ |
| ४ बांगड्यांवर बहिष्कार | ,, | १९३० डिसेंबर | ६१ |
| ५ विस्तवाशीं खेळ | मनोरमा | १९३१ एप्रिल मे | ७९ |
| ६ तिनें आत्महत्या कां केली ? | स्त्री | १९३१ ऑगस्ट | ९५ |
| ७ हरितालिका | ,, | १९३१ ऑक्टोबर | १०९ |
| ८ गौरी | ,, | १९३२ जानेवारी | १३० |
| ९ अमूर्ता मोकिंदा | किर्लोस्कर | १९३१ नोव्हेंबर | १५६ |
| १० पद्मेला मिळालेलें फळ | स्त्री | १९३२ सप्टेंबर | १७३ |
| ११ बांडगूळ | ,, | १९३२ ऑक्टोबर | १८३ |
| १२ परिमार्जन | किर्लोस्कर | १९३२ नोव्हेंबर | २०१ |
| पुरवणी—मिळवती बायको | | | २१६ |

# लेखिकेचे दोन शब्द

लेखिकेच्या नांवाचा जो थोडाबहुत उल्लेख 'वाङ्मयप्रान्तांत' होत आहे त्याला, साहित्यसेवकांचे आदर्शभूत मार्गदर्शक गुरु श्री० तात्यासाहेब कोल्हटकर यांचा आशीर्वादच कारणीभूत आहे ही गोष्ट अभिमानपूर्वक नमूद करतांना मनाला अत्यंत समाधान वाटत आहे.

माझ्या 'कथाकुंजा'वर महाराष्ट्र–वाचकवर्गानें जी कृपादृष्टि ठेविली तिच्या योगानेंहि मला उत्तेजन मिळण्यास साहाय्य झाले आहे याबद्दल वाचकवर्गाचेंहि मी आभार मानते.

साहित्यक्षेत्रांत अत्युच्चस्थानीं विराजमान असणारे सौजन्यमूर्ति प्रो० वामन मल्हार जोशी, यांनीं या पुस्तकाला सहृदयतेनें मार्मिक प्रस्तावना लिहून देऊन मला उपकृत केले आहे याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहें. त्याप्रमाणेंच 'किर्लोस्कर' व 'स्त्री' मासिकांचे संपादक श्री० शंकरराव किर्लोस्कर यांनीं चित्रें काढून व ब्लॉक देऊन या पुस्तकाच्या प्रकाशनाला बहुमोल मदत केली याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतें. तसेंच माझ्या व्यवसायभगिनी सौ. मालतीबाई दांडेकर यांनीं आपली गोष्ट 'मिळवती बायको' या पुस्तकांत घेण्याची मला परवानगी दिली याबद्दल मी त्यांची ऋणी आहें.

शेवटीं पुस्तकाचें प्रसिद्धीकरण केल्याबद्दल प्रकाशक श्री. मिसाळ यांचे व मुद्रक आणि वेष्टन–चित्रकार या सर्वांचे आभार मानून हे दोन शब्द पुरे करितें.

**सौ. आनंदीबाई शिर्के.**

# कुंज-विकास

# कुंज-विकास.

## चित्र-दर्शन.

प्रस्तुत कथा जुन्या काळची आहे. त्या काळीं प्राचीनपुरास प्रतापसिंह महाराज राज्य करीत होते. ते नांवाप्रमाणेच प्रतापी, शूर, न्यायी, कर्तव्यदक्ष व सुशील होते. त्यांच्या सच्छीलाविषयीं विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांना एकच राणी होती. बहुपत्नीकत्वाची चाल रूढ असतां व पोटीं संतान नसल्यामुळें खुद्द राज्ञी आग्रह करीत असतांहि त्यांनीं द्वितीय विवाह केला नव्हता. आपणास यापुढें संतति झाली नाहींच तर आपल्या-पश्चात् दत्तक घेण्याचा अधिकार त्यांनीं राणीसाहेबांस देऊन टाकला होता. राणीसाहेबांच्या कर्तृत्वाविषयीं त्यांना अत्यंत अभिमान वाटत असे; राज्यकारभारांतहि ते त्यांची सल्लामसलत घेत. राज्यकारभारासंबंधीं महत्त्वाचें प्रकरण राणीसाहेबांच्या नजरेखालून गेल्याशिवाय त्यावर राजमुद्रा होत नसे. त्यांची ही योग्यता मंत्रिमंडळाहि जाणून असे. इतक्या गौरवाला त्या पात्र असल्याबद्दल मंडळाची एकवाक्यताच होती. अशा न्यायी, दयाळू व प्रजाप्रिय राजदंपतीच्या छत्राखालीं सर्व प्रजा सुखी असल्यास नवल काय ?

प्राचीनपूरच्या राज्यसत्तेच्या कक्षेंत मोडणारें नवपूर हें एक अगदीं लहानसें खेडेगांव होतें. शेतकऱ्यांची व विणकरांची मिळून तीसचाळीस झोंपडीवजा घरांची वस्ती असेल; त्यांत जमीनदारांचा जुना वाडा हेंच काय तें मोठें घर ! परंतु ह्या क्षुद्र खेड्याला त्यामुळेंच एकप्रकारचें महत्त्व आलेलें होतें.

गांवापासून कांहीं अंतरावर रुक्मावती नदी वहात होती. तिलाच पुढें समुद्राच्याजवळ खाडीचें स्वरूप प्राप्त झालें होतें. नवपूराहून प्राचीनपूरला जलमार्गानें जातां येत असे. नवपूरचे विणकरी आपलीं विणलेलीं वस्त्रें याच मार्गानें इतर गांवीं पाठवीत.

नवपूरगांवाच्या एका टोंकाला थोडेंसें बाजूलाच असें एक लहानसें घर होतें. घराच्यापुढें एक तुलसीवृंदावन असून भोंवतीं कांहीं फुलीचीं झाडें लाविलेलीं होतीं. पलीकडे समोरच औदुंबराचें एक झाड होतें. मागीलदारीं केळीचीं दोनचार झाडें, अळवाचीं खळीं व देवकापशीचीं दोन झाडें होतीं. घर व आंगण असलेल्या स्थितींतहि अत्यंत स्वच्छ ठेवण्याची दक्षता बाळगलेली दिसत होती. असें असूनहि त्या निसर्गरमणीय स्थळावर एकप्रकारची उदासीनतेची छाया पसरून राहिल्याचा भास होई. असें कां बरें व्हावें ?

ह्या प्रश्नाचें उत्तर शोधायला लांब जायला नको. ती पहा त्या घराची मालकीण मानकुंवरबा हातांत नीरांजन घेऊन तुलसीवृंदावनाकडेच येत आहे. तिची चालण्याची गति, शरीराची कान्ति व एकंदर शरीरसौष्ठव मोहक आहेत. असें असूनहि तिचें सुंदर मुखमंडळ म्लान दिसत आहे. तिच्या कुंकुमतिलकविरहित विस्तीर्ण भालप्रदेशाकडे पाहिलें म्हणजे तिच्या व तेथील एकंदर वातावरणाच्या उदासीनतेचें कोडें सहज सुटण्यासारखें आहे.

बिचारी मानकुंवर दुर्दैवानें अल्पवयांत वैधव्याच्या वणव्यांत सांपडून होरपळत होती. उत्तम पति मिळूनहि तिला विवाहसौख्य फार दिवस लाभलें नाहीं. आपल्या प्रेमाचें स्मृतिचिन्ह पत्नीपाशीं ठेवून तिच्या पतीनें परलोकीं प्रयाण केलें, त्या वेळीं कुमारसिंह अवघा अडीच वर्षांचा होता.

" आपण उच्चकुलीन असून वास्तविक आपली योग्यता फार मोठी आहे. भाऊबंदांनीं कपटानें आपले हक्क हरण केले आहेत. परंतु योग्य काल येतांच आपण आपल्या बाहुबलानें आपलें अपहृत सर्वस्व पुन्हा प्राप्त करून घेऊं, " असें विजयसिंह आपल्या पत्नीपाशीं बोलत असे. परंतु दुर्दैवानें योग्य काल येण्यापूर्वीं तो कालवश झाला. हा घाला एकाएकीं आल्यामुळें त्याला आपल्या पत्नीपुत्रांच्या कल्याणाची कांहींच तजवीज करतां आली नाहीं. आपली आवडती ढाल-तलवार आणि राहतें घर एवढीच काय ती ठेव त्यानें त्यांच्यासाठीं ठेविली होती. विजयसिंहाच्या मृत्यूनंतर मानकुंवरच्या भावानें तिला आपल्या घरीं येऊन राहण्यास पुष्कळ आग्रह केला, परंतु तें घर सोडून जाण्यास ती तयार झाली नाहीं. पतीचें स्मरण करीत ती तेथेंच राहिली. घरांतील सामानसुमान विकून त्यावर तिनें जवळजवळ दोनअडीच वर्षें काढलीं. परंतु आतां

कांहींतरी उद्योग केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. जमीनदारांच्या घरीं ती मोलानें काम करूं लागली. कामकाजांत काय वेळ जाईल तेवढाच. नंतर घरीं आल्यावर गतायुष्यांतील स्मृतिचित्रें डोळ्यांपुढें आणून ती अश्रु ढाळीत बसे. अशा स्थितींत असतांना किती वेळ गेला याचें तिला भानही रहात नसे. परंतु तिचा लहान मुलगा अशा वेळीं धांवत येऊन आईच्या गळयाला मिठी मारी. त्याचें सुकुमार मुखकमल आपल्यामुळें म्लान होत असलेलें पाहून ती आपले अनावर अश्रु मोठ्या कष्टानें आवरीत असे. याप्रमाणे दुःखभाराने खचून गेलेली ती अनाथ आई आपल्या एकुलत्या एका अल्पवयी मुलाकडे बघून आयुष्याचे दिवस कंठीत होती.

एके दिवशीं काम करून आल्यानंतर घरांतील नित्यव्यवसायाला न लागतां ती विचार करीत बसली. मधून मधून ती आपल्याशींच कांहीं दुःखोद्गार काढीत होती व डोळ्यांतील अश्रु आवरण्याचा प्रयत्न करीत होती. या वेळीं कुमार घरांत नव्हता, त्यामुळें तिला दुःख करण्यास पुष्कळच मोकळीक मिळाली होती.

" देवा, काय ही तुझी इच्छा ! " मानकुंवरबानें हें वाक्य उच्चारायला व कुमारानें घरांत पाऊल टाकायला एकच गांठ पडली.

हास्य व आनंदाची मूर्तिच असा कुमार धांवतच पुढें आला व आपल्या कोमल हातांचा विळखा आईच्या मानेभोंवतीं घालून ताज्या उमललेल्या गुलाबासारखें आपले मुखकमल आईच्या मुखापुढें नेऊन म्हणाला,

" देवाची इच्छा म्हणजे काय आई ? "

उत्तरादाखल कुमाराच्या गालावर अश्रुबिंदु गळले. मानकुंवरबाचें नक्र-रुदन कुमाराच्या परिचयाचेंच होतें व त्याचा त्या लहानग्यावर परिणामहि फार होत असे.

आपल्या दुःखीकष्टी आईला आपल्या वर्तनानें कसें रिझवावें ही कला त्याला चांगलीच साधली होती. घरांत येतांक्षणीं तिचेंच त्यानें अवलंबन केलें होतें. परंतु आज त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हें पाहून कुमार हिरमुष्टी होऊन केविलवाण्या स्वरानें म्हणाला,

" आई, तूं अशी नेहमीं नेहमीं रडतेस कां ? तुला काय होतें ? "

" काय सांगूं बाळ ? आजवर मी माझ्याच दुःखांत चूर होतें. ईश्वरानें मलाच अतिशय दुःखी केलें आहे असें वाटून रडत होतें; पण आज मी जी बातमी ऐकली तीवरून माझ्यापेक्षांहि अधिक दुःखी माणसें जगांत आहेत या विचारानें या अशा दारुण दुःखांतहि मला कांहीं आधार आहे असें वाटूं लागलें

याप्रमाणें कांहीं कुमाराशीं तर कांहीं आपल्याशीं असें बोलत असतांना आपल्या लहानग्याला हृदयाशीं घट्ट धरून मानकुंवर पुढें म्हणाली,

" माझ्या बाळा, तूं मोठा होशील. तिकडच्यासारखा नांवलौकिक मिळवशील व आपल्या ह्या दुःखीकष्टी आईचे पांग फेडशील, ही आशा तरी मला आहे. तुझा तरी आधार मला देवानें दिला आहे. पण बिचाऱ्या राणीसाहेब—'

कृतज्ञतेनें मानकुंवरबाचें हृदय उचंबळून नेत्रांवाटे अश्रु वाहूं लागल्यामुळे स्वर सद्गदित होऊन तिच्यानें कांहीं वेळ बोलवेना. आपल्यापुढें आपलें अजाण अर्भक नसून प्रत्यक्ष ईश्वरच आहे व त्याच्याशींच आपण बोलत आहोंत अशा भावनेनें ती पुढें म्हणाली—

" देवा, हें अंधकारमय आयुष्य कंठायला तूं मला हा आधार दिला आहेस त्याच्या साह्यानेंच मला पैलतीर गांठायचें आहे. देवा ! माझ्या बाळाला तं उदंड आयुष्य दे. हतभागी बिचाऱ्या राणीसाहेब-त्यांना दासदासी आहेत, हत्तीघोडे आहेत; सगळें ऐश्वर्य आहे. परंतु एक सौभाग्यछत्र नाहींसें झाल्यावर इतर ऐश्वर्याची काय मातबरी ? आणि पोटीं मूलबाळहि नाहीं. बिचाऱ्या कसें आयुष्य कंठतील ? नको नको; देवा, कुणावरहि अशी आकाशाची कुऱ्हाड कोसळवूं नको. अन् तसलें एकाकी आयुष्य तर कुणालाच नको--"

मानकुंवरचें सर्वच बोलणें कुमाराला समजण्यासारखें त्याचें वय नव्हतें परंतु देवबाप्पाच्या घरीं आपले बाबा गेल्यामुळें आपली आई दुःखी आहे, तशीच कोणी बाई दुःखी झाली आहे एवढें तात्पर्य त्यानें काढलें, व अत्यंत करुणवाणीनें त्यानें हांक मारली,

" आई—"

त्या हांकेनें मानकुंवर तंद्रींतून भानावर आली. तिनें पाहिलें तों कुमाराचा चेहरा अगदीं उतरून गेला होता. तिनें चटकन् त्याला जवळ घेऊन त्याचें चुंबन घेतलें. कुमार पुढें म्हणाला,

" आई, तूं भिऊं नको. मी मोठा होईन अन् तुझें सगळें दुःख दूर करीन."

त्याला अधिक जवळ घेऊन अधीरपणें त्याचे मटामट मुके घेत मानकुंवर पुढें म्हणाली,

" होय. माझ्या बाळा, तूं अगदीं तिकडच्यासारखा चांगला हो बरें! देव तुला उदंड आयुष्य देवो."

यावेळीं तिचा स्वर कंपित झाला होता व डोळ्यांतहि अश्रु चमकत होते; परंतु ते आनंद व कृतज्ञता या भावनांचे होते. आईचें हास्य पाहून कुमाराचेंहि गुलाब फुलले. त्यानें प्रश्न केला,

" आई, तूं कोणासाठीं रडत होतीस?"

" राजधानीहून गांवांत बातमी आली आहे कीं आपले प्रतापसिंहमहाराज वारले. बिचाऱ्या राणीसाहेबांवर मोठा कठिण प्रसंग ओढवला आहे. दासदासी, हत्तीघोड्यांचें एवढें ऐश्वर्य. पण काय त्याचा त्यांना उपयोग?"

" दासदासी म्हणजे ग काय आई?"

" मोठ्या लोकांच्या घरीं काम करायला पुष्कळ नोकरमाणसें असतात, त्यांना दासदासी म्हणतात. राजे लोकांच्या घरीं असे नोकर पुष्कळ असतात. धन्याच्या तोंडून शब्द निघतांच ते त्यांचीं कामें वेळच्यावेळीं करतात."

" अन् हत्ती कशाला म्हणतात ग आई?"

" हत्ती हा किनइ फार मोठा प्राणी असतो. जहागिरदारांच्या वाड्यांत ओटीवर मोठमोठे दगडी खांब आहेत ना, तसे हत्तीचे पाय मोठे असतात. अन् त्याचें नाक जमिनीला टेकण्याइतकें लांब असतें; त्याला किनई सोंड म्हणतात. वाड्यांत गणपति बसतो तो तूं पाहिला आहेस ना? गणपतीच्या सोंडेसारखीच हत्तीची सोंड व दांत असतात. हत्तीवर अंबारी घालून राजे लोक तिच्यांत बसतात."

कुमाराला हत्तीचें वर्णन फार मौजेचें वाटलें. आपल्या कल्पनेनें वर्णनासारखी हत्तीची मूर्ति तो मनश्चक्षूंसमोर आणण्याचा प्रयत्न करीत होता. त्यानें पुढें विचारलें,

" मला एक हत्ती आणून देशील आई?"

कुमाराची ही मागणी ऐकून मानकुंवरला मनापासून हंसूं आलें. प्रेमानें त्याला कुरवाळीत ती म्हणाली,

"हत्ती! हा वेडया, हत्ती म्हणजे काय तोंडच्या गोष्टी आहेत? राजेलोक हत्ती बाळगतात. आम्हां गरिबांना हत्तीघोडयांच्या गोष्टी कशाला?"

हत्तीघोडयांच्या गोष्टीहि गरीबांना गैर, ही विचारसरणी कुमाराच्या सरळ मनाला पटेना. जणुं काय हातचाच हत्ती गेला अशा निराशेनें आईकडे पहात तो स्तब्ध बसला. त्याचें मनोगत जाणून ती प्रेमळ माता पुढें म्हणाली,

"बाळ, हत्ती म्हणजे केवढा अजस्र प्राणी! त्याला खायला किनई फार लागतें. आपण गरिबांनीं कुठून बरें तें आणायचें? तूं मोठा हो, विद्या कर, आणि मग बाळग काय हत्तीघोडे बाळगायचे ते. हत्ती हें राजे लोकांचें वाहन आहे. पण घोडा मात्र कोणालाहि बाळगतां येतो. एक दोनच काय, योग्यता असेल त्यामानानें पुष्कळ घोडे माणसाला बाळगतां येतात. तिकडे ती तलवार कमरेला लटकावून जेव्हां घोडयावर बसून जाणें होत असे, तेव्हांची त्यांची ती घोडयावर बसण्याची काय पण ऐट? हाय! आतां तें रूप कुठून दिसायला? ती तलवार आणि मी-सारख्याच हतभागिनी."

बोलतां बोलतां मानकुंवरच्या डोळयांतून अश्रु गळूं लागले. तिच्या अंतश्चक्षूंपुढें गतकाळच्या सुखस्मृतींचें एक एक चित्र उभें राहूं लागलें. त्या चित्रदर्शनानें तिच्या डोळयांतून वाहणारा अश्रुप्रवाह वाढूं लागला; तरी त्या स्मृतींमुळे एकपरीनें तिला सौख्यच होत होतें. बाह्य जगाला क्षणभर विसरून अश्रुपूर्ण नेत्रांनीं ती आपल्या दिवंगत पतीच्या मूर्तीचें दर्शन घेत होती. आईची ती स्थिति पाहून व तीस आपणच कारण झालों असें वाटून कुमार खजील झाला व येथेंच बसून राहिलों तर आईचें दुःख अधिक वाढेल, या भीतीनें तो उठून बाहेर गेला व आपल्या कामाला लागला. अवघें पांच सहा वर्षाचें कोंवळें मूल तें, त्याला काम तें कसलें? खेळणें हाच त्याचा उद्योग असावयाचा; त्याच्यापेक्षांहि मोठ्या वयाच्या मुलांचा तोच धंदा असतो. परंतु ह्याचें तसें नव्हतें. जळणकाटूक व एरंडी वेंचणें हा त्याचा उद्योग होता. त्यांचा चुलीकडे व दिव्याकडे उपयोग होत असे.

तो आपल्या उद्योगास लागला खरा; परंतु त्याच्या मेंदूलाहि एक निराळा उद्योग लागला. तो एकसारखा हत्तीघोडयांचा विचार करीत होता. "बाबांचा एक घोडा होता. कमरेला तलवार लटकावून ते घोडयावर बसत. बाबांच्या-

चार, नव्हे पुष्कळ घोडे बाळगायला आईची परवानगी आहे. परंतु घोडे आणायचे कुठून? तलवार तर घरांत आहे; परंतु घोडा कसा मिळवावा? आईला विचारावे तर असल्या प्रश्नानें तिला दुःख होतें!" कुमार मोठ्या पेंचांत पडला. त्याच्या बालमनाला घोड्याच्या वैभवाची ही नसती हुरहुर लागून राहिली. त्यानंतर आईजवळ त्यानें याविषयीं कधीं गोष्ट काढली नाहीं. परंतु घोडा आपणच मिळवायचा असा त्यानें मनाशीं पक्का निश्चय मात्र करून ठेविला.

यानंतर कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं मानकुंवरचा भाऊ आपल्या मळ्यांतला कांहीं भाजीपाला व उत्तम आंबे घेऊन बहिणीकडे आला. बिचारी अनाथ आई, आपल्या अल्पवयी बालकाच्या भविष्यकालाविषयीं विचार करीत बसली होती. आपल्या लाडक्या लेंकराचें संगोपन आणि शिक्षण कसें होईल याविषयीं तिचे विचार चालले होते. हा अति महत्त्वाचा प्रश्न सोडविण्याची तिच्या मनाची धडपड नेहमीं चाललेली असे; परंतु तो प्रश्न सुटल्याचें समाधान कांहीं तिला लाभत नसे.

अजून माझा बाळ लहान आहे. तथापि तो क्षत्रियकुमार आहे त्याला क्षत्रियोचित युद्धकलेचें शिक्षण कसें मिळेल? मी फार तर शाब्दिक शिक्षण देईन. परंतु तेवढ्यानें ह्या अफाट जगांत उभें आयुष्य कंठायला त्याला कशी मदत होईल? माझा बाळ काबाडकष्ट करणारा गरीब शेतकरीच होणार काय? शेतकी करणें हें सुद्धां वाईट नाहीं. 'उत्तम शेती' अशी म्हणच आहे. परंतु ती शेती करायला स्वतःचें शेत तरी पाहिजे ना? दुसऱ्याच्या शेतांत राबणारा काबाडी किंवा मजूर–असलेंच आयुष्य कंठणें माझ्या बाळाच्या नशीबीं असेल काय?

ज्याची आपण जिवापलीकडे जोपासना करीत आहों तो कुमार दुसऱ्याच्या दास्यांत खितपत रहावा, ही कल्पनाच त्या माउलीला सहन होत नसे. ह्या विचारानें अंगावर आलेल्या शहाऱ्यांमुळें तिचें शरीर कंपित झालें. डोळ्यांतील अश्रु पुसून ती उठणार तोंच आपल्यापुढे आपला भाऊ उभा आहे असें तिला दिसलें. दुःखद विचारामुळें मनाची अनुकंपनीय स्थिति झाली असतांना मायेचें माणूस पुढें आलें असतां दुःख जास्तच दुणावतें. मानकुंवरचेंहि तसेंच झालें.

भावाला पहातांच तिच्या दुःखाला भरतें आलें, ती हुंदके देऊन रडूं लागली. बहिणीची ती स्थिति पाहून भावालाहि फार वाईट वाटलें. तो सांत्वनपर बोलून तिची समजूत करण्याचा प्रयत्न करीत होता. आपल्याकडे येऊन रहाण्याविषयीं नेहमींप्रमाणें आजहि त्यानें तिला अत्याग्रह केला, परंतु तिनें तें नाकारलें.

जेथें आपल्या पतीबरोबर सुखानें संसार केला, जेथें अनेक सुखःदुखांचे अनुभव घेतले व शेवटीं ज्या घरांत पतीचें देहावसान झालें तें घर, सर्व स्मृतींचें संग्रहस्थान, सोडून दुसरीकडे जाणें हा विचारच तिला सहन होत नसे; सर्व गतस्मृति अंतश्चक्षूंपुढें आणून ती निश्चयी स्वरानें म्हणाली,

" नाहीं; हें घर सोडून मी दुसरीकडे कुठेच जाणार नाहीं; माझा बाळ अन् मी इथेंच राहूं. "

भेदरलेला कुमार इतका वेळ स्तब्ध होता. तो पुढें होऊन म्हणाला,

" होय आई, मी मोठा होईतोंपर्यंत आपण इथेंच राहूं. मोठा झाल्यावर मात्र मोठ्या घरांत रहावयाला जाऊं. अन् मामा, मला एक घोडासुद्धां पाहिजे आहे. मी मोठा झाल्यावर पुष्कळ घोडे आणीन-बरें का आई ! "

कुमार मनःपूर्वक बोलत होता. त्याचा हा अकृत्रिमपणा पाहून आईला वास्तविक कौतुक वाटावें, परंतु त्या बिचारीची मनःस्थितीच अशी झालेली होती कीं, या सहज बोलण्यानें तिच्या मनाला वेदना झाल्या. ती दीर्घ श्वास सोडून म्हणाली,

" काय हे विचार! बालमनाला मोठे मनोरे रचणें शोभत नाहीं. "

नंतर अधीरपणें कुमाराला जवळ घेऊन त्याला कुरवाळीत ती म्हणाली,

" असें कांहींच्याबाहीं बोलूं नये बाळ. देवानें तुला उदंड आयुष्य दिलें अन् तिकडच्यासारखा सद्गुणी निपजलास म्हणजे पुरे. दुसरें कांहीं नको. "

" आई, तूं अगदीं रडूं नको; मी बाबांच्या सारखाच होईन. अन्—"

परंतु हें संभाषण अधिक वाढणें इष्ट नाहीं अशा विचारानें मामानें कुमाराला उचलून घेतलें व प्रेमानें त्याचें चुंबन घेत तो बाहेर अंगणांत आला. कुमारानें आपल्या चिमुकल्या डोक्यांत घोळत असलेले अनेक मोठमोठे बेत मामांना नीट समजावून सांगितले. आपण मोठा माणूस होणार आणि आईचें

आस्थेवाईक श्रोत्याची कुमाराला जरूरच भासत होती. त्याच्या त्या इच्छेची अशी पूर्तता झाल्यानें त्याच्या बालमनाला फार संतोष झाला; आणि त्या आनंदाच्या भरांत तो मामाच्या मांडीवर बोलतां बोलतां झोंपीं गेला.

ते शरदृतूंतील दिवस होते. दिवाळीच्या साहित्याची तयारी करण्यांत स्त्रीवर्ग गुंतला होता. जहागिरदारांच्या घरीं रवा पिठी काढण्याचें काम जोरांत चाललें होतें. बिचाऱ्या मानकुंवरला त्यापायीं फार खपावें लागे. नित्यापेक्षां तिचा अधिक वेळ तिकडेच जाई. संध्याकाळींहि परत येण्याला तिला फार उशीर होई. आजहि तिला तिकडे जाण्याची अशीच घाई होती. ओलवलेले गहूं आज दळून–गाळून, रवा, सपीठ वेगळीं करण्याची तिला ताकीद मिळालेली होती. म्हणून घाईघाईनें घरांतलें उरकून तिनें मुलाला जेवावयास बोलाविलें. आईचें घरांतील काम उरकेतोंपर्यंत कुमारहि बाहेर कामालाच गेला होता. घराच्या पलीकडे उगवलेल्या एरंडाच्या झाडांच्या बिया वेंचून आणणें हा त्याचा मोठा आवडता उद्योग असे. पुष्कळशा बिया जमल्या म्हणजे गांवांतल्या घाणीवर नेऊन मानकुंवर त्याचें तेल पाडून आणीत असे. दिव्यासाठीं त्या तेलाचा चांगला उपयोग होई. मोठ्यानें हांक मारतांच कुमार धांवत आला. त्याच्या हातांतील दुरडी बियांनीं भरलेली होती, ती हंसत हंसत त्यानें आईच्या हवालीं केली. हातपाय धुवून तो पाटावर येऊन बसला. दूध आणि भाकरी हेच कुमाराचे जेवणाचे पदार्थ होते. इतर चवीचीं व चैनीचीं निरनिराळीं पक्वान्नें मुलाला घालणें तिच्या सामर्थ्याबाहेरचें होतें. भरपूर दूध घालण्यास तरी तिला सामर्थ्य होतें असें नाहीं; परंतु लहान मुलांना थोडें तरी असावें म्हणून स्वतःची आबाळ करून त्याला ती पुरवीत असे. कुमाराला समाधानानें जेवतांना पाहून तिला अपरिमित आनंद होई. व ‘ हेहि दिवस जातील, ’ असें ती मनांत म्हणे.

जेवण उरकल्यावर तिनें कुमारास झोंपावयास सांगितलें. आंगणांत मोठें थोरलें औदुंबराचें झाड होतें. सर्व आंगणभर त्याची दाट छाया पसरली होती. त्याच्याखालीं लहानशी खाट टाकलेली होती. तीवर सतरंजी आंथरून दिल्यावर कुमार जाऊन निजला.

“ झोंप घेऊन उठल्यावर नदीकडे जाऊं नको, ” वगैरे बजावून ती आंत गेली. जेवण व कामधाम उरकून ती बाहेर येऊन पहाते तों कुमार गाढ

झोंपलेला. त्याचे कुरळे केस वाऱ्याच्या झुलुकीनें मधून मधून उडत होते. कांहीं कुरळ्या जटा विस्तीर्ण कपाळावर आलेल्या होत्या. किंचित् विलग झालेल्या पोंवळ्यासारख्या ओंठांआडून शुभ्र मोत्यांच्या जोडीसारखे दोन बारीक दांत दृग्गोचर होत होते. त्यामुळें झोंपेंतसुद्धां तो हंसतच आहे असें भासत होतें. प्रसन्नता आणि विमलता यांचा सुंदर मिलाफ कुमाराच्या मुखावर झाल्यामुळेंच कीं काय तें प्रफुल्ल चंद्रासारखें मोहक दिसत होतें. त्याकडे पहातांच आईच्या हृदयाला प्रेमाचें भरतें आलें, व त्याचें एक गोड चुंबन घेण्याचा तिला मोह झाला. परंतु त्यामुळें त्याची झोंपमोड होईल या भीतीनें तिनें तो आवरला. क्षणभर त्याच्या मोहक मुखाकडे पहात ती तेथेंच थांबली. आपल्या लाडक्या लहानग्याला सोडून जाऊं नये असेंहि तिला वाटलें. परंतु गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. बिचारी मोठ्या कष्टानें जड पावलें टाकीत तेथून निघाली. आपलें हृदयच तेथें काढून ठेविलें आहे व शून्य हृदयानें आपण जात आहों असेंच तिला वाटलें.

जहागिरदारांच्या घरीं कामकाजांत केव्हां दिवस संपला तें तिला कळलें सुद्धां नाहीं. कामांतून मुक्त होतांच जवळजवळ धांवतच ती घराकडे निघाली. आत्मा केव्हांच घरीं पोंचला होता, जडदेहाला जावयास जरा उशीर लागला. घराजवळ येतांच तिची दृष्टि आधीं औदुंबराच्या झाडाखालील खाटेकडे गेली. जवळ जाऊन पहाते तों तीवर कुमार नाहीं! ‘ माझें गुणी बाळ तें. एरंडी वेचायला गेलं असेल, ’ असें ती मनाशीं म्हणाली. ‘ आतां दमून तो येईल. त्याला भूक लागलेली असेल, थोडा भात आधीं टाकतें, ’ असें म्हणून ती त्या उद्योगाला लागली. भात होईतोंपर्यंत सरपण जमविणें, झाडलोट, तेलवात इत्यादि कामें तिनें झटकन् उरकलीं. भात व तोंडीलावणें झालें व दिवेही लागले, परंतु कुमार आला नाहीं. मानकुंवर फार अस्वस्थ झाली. तिला आतां राहवेना. तिनें तीन चार हांका मारून पाहिल्या. खालीं उतरून पलीकडच्या घरांतून चौकशी केली व ती शेवटीं रानाच्या व नदीच्या बाजूकडे इकडे तिकडे फिरून मुलाला मोठमोठ्यानें हांका मारूं लागली. तिच्या आरोळ्यांनीं व प्रतिध्वनींनीं तो प्रदेश दणाणून गेला. परंतु कुमाराचें प्रत्युत्तर कांहीं ऐकूं आलें नाहीं.

तिच्या मनांत भलभलत्या शंका-कुशंका येऊं लागल्या.

" रानांत जाऊं नको, नदीकडे जाऊं नको, हें मी त्याला नेहमीं बजावून सांगत असें, तें तो विसरला तर नाहीं? तो पाण्यांत तर शिरला नसेल? एखाद्या हिंस्र पशूनें तर त्याला—"

बिचारीला पुढील विचार मनांत आणणें दुःसह झालें. भयानें तिचा थरकांप झाला. वेडी माया तिला झाडांझुडपांतून व जमिनीवर हातानें चाचपून पहावयास लावूं लागली. परंतु हाय ! ते सर्व निष्फळ झालें.

तिचें हृदय पिळवटून गेलें; मोठमोठ्यानें आक्रोश करून ती हृदय व मस्तक पिटून घेऊं लागली.

थोड्याच वेळांत गांवकऱ्यांचा मोठा घोळका तिच्या सभोंवतीं जमला. एकजण तिच्या भावाला बातमी कळविण्यासाठीं गेला. कोणी नदीकडे, कोणी या दिशेला, कोणी त्या दिशेला, याप्रमाणें सर्वत्र जारीनें शोध सुरू झाला. पुरुषवर्ग याप्रमाणें मुलाच्या शोधाला गेला असतां बायका मानकुंवरजवळ बसून तिचें परोपरीनें सांत्वन करीत होत्या. त्या माउलीचें अशानें कसें सांत्वन व्हावें? ती स्फुंदून स्फुंदून रडत होती. तिचे पंचप्राण कानांत कोंडून बसले होते. " कुमार सांपडला, " अशीं अमृताक्षरें कधीं कानीं पडतात असें तिला झालें होतें. परंतु त्या बिचारीचें एवढें भाग्य नव्हतें. तिचा भाऊ आला व शोधास गेलेलीं सर्व माणसें आलीं. बाळाचा कोठेंच पत्ता लागला नाहीं.

शोधास गेलेल्यांपैकीं एक म्हातारा कोळी म्हणाला, " मूल जर नदींत पडलें असेल तर त्याचें प्रेत उद्यां खात्रीनें सांपडेल. पाण्याच्या ओढीची मला चांगली माहिती आहे, त्यावरून म्हणतों-प्रेत उद्यां त्या अशोकाकडच्या कांठाला लागलेंच पाहिजे. "

आपण अगदीं बिनचूक अंदाज सांगत आहों असेंच त्या म्हाताऱ्याला वाटत होतें. परंतु गरीब बिचारी आई, तापलेल्या तेलाप्रमाणें ते शब्द तिचे कान जाळीत कानांत शिरले. दुधारी सुरी काळजांत खुपसावी तसे ते शब्द तिचें हृदय चिरीत गेले. तिच्या शोकाला सीमा राहिली नाहीं. लोकांनीं धरून तिच्या संज्ञाशून्य शरीराला घरीं आणिलें. तिचा प्राण त्या जंगलांत अगर नदींत कोठें तरी लुप्त झाला होता.

पहांट होतांच तिच्या शरीरांत चेतना संचारली. सर्व शक्ति एकवटून त्या कोळ्यानें सांगितलेल्या नदीकांठच्या अशोकाकडील भागाकडे ती धांवत गेली.

आपल्या लाडक्या बाळाचा मृत देह तरी सांपडेल अशी तिला आशा होती. परंतु व्यर्थ; बाळाचा देह सांपडला नाहीं. तिचा भाऊहि पाठोपाठ आला. तो व कोळी आणि इतर लोकहि आले. लगेच पाण्यांत बुड्या मारून मृत शरीराचा शोध सुरू झाला. परंतु फुकट ! कुमाराचा मृत देह किंवा त्याच्या शरीराचा एखादा भाग, फार काय त्याच्या अंगावरील वस्त्र किंवा त्याची दुरडी तरी सांपडेल अशी त्या माउलीला फार आशा होती. बाळाची सांपडेल ती वस्तु हृदयाशीं घट्ट धरून तिला त्याची बातमी विचारण्यास ती माउली किती अधीर झाली होती ! परंतु दुर्दैबानें तें समाधान तिला लाभूं दिलें नाहीं. कुमाराची एखादी वस्तुहि तेथें सांपडली नाहीं.

दोनप्रहर होण्याची वेळ आली तशी मंडळी परतूं लागली. त्या भग्नहृदय माउलीला तिच्या भावानें इतर बायांच्या मदतीनें जवळजवळ ओढूनच घरीं आणिलें. भावानें व शेजारीपाजारी स्त्री-पुरुषांनीं सांत्वनाची पराकाष्ठा केली, परंतु कशानेंहि तिचें दुःख तिळमात्र कमी झालें नाहीं. भावानें आपल्या घरीं येण्याविषयीं पुन्हां तिला आग्रह केला; परंतु तिचें मन मुळींच वळलें नाहीं. अत्यल्प काळांत ज्या ठिकाणीं अत्यंत प्रिय अशीं दोन माणसें गेलीं, तेथेंच आपलाहि देह पडावा व जिवांत जीव असेतोंपर्यंत तें ठिकाण दृष्टीआड करूं नये अशा भावनेनेंच कीं काय, तिनें भावाकडे किंवा चार दिवस शेजाऱ्यापाजाऱ्याकडेहि जाण्याचें साफ नाकारलें. न जाणों, आपण घर सोडून गेलों आणि नंतर आपला चुकलेला बाळ आला तर पुन्हां त्याची आपली चुकामुक व्हावयाची, अशी तिला भीति वाटत असावी.

घरच्या अडचणींमुळें शेवटीं चार दिवसांनीं तिचा भाऊहि परत गेला. बिचारी मानकुंवर सकाळीं व संध्याकाळीं दुःखावेग असह्य झाला कीं त्या अशोकाखालीं जाऊन उभी राही. शेतकरी जेव्हां सकाळीं शेतावर जात तेव्हां ती अशोकाखालीं शोक करीत असलेली त्यांना आढळे. दुपारीं शेतकऱ्यांचें जेवण नेणाऱ्या बायांनाहि ती तेथें कांहीं गुणगुणत उभी असलेली दिसे. आणि संध्याकाळीं गुरें घेऊन घरीं परतणाऱ्या गुराख्यांनाहि ती नदीकांठीं शोधक नजरेनें इकडेतिकडे पहात फिरतांना किंवा अशोकाला टेकून शून्यदृष्टीनें नदीच्या पात्राकडे पहात असलेली आढळे. बाळ नाहींसा झाल्यापासून तिचा हा नित्यक्रमच होऊन गेला होता.

तिची ही स्थिति पाहून शेजारीपाजारी आपापसांत म्हणत,

" गरीब बिचारी मानकुंवरबा, नवरा आणि मुलगा एकामागून एक तिला सोडून गेल्यामुळें वेडी झाली आहे. '

खरोखरच तिला वेड्यासारखें झालें होतें. खाण्यापिण्याकडे किंवा कपड्यालत्त्याकडे तिचें बिलकूल लक्ष नव्हतें. घरीं किंवा नदीकांठीं कोठेंहि ती असली तरी स्वतःशीं पुटपुटत, गुणगुणत, स्वतःचे हात चोळीत व अश्रु ढाळीत असलेली आढळे. ती आपल्याशीं म्हणे—

" देवा, तूं अत्यंत दयाळु आहेस, तूं सर्वांचें रक्षण करणारा आहेस अशी तुझी कीर्ति, आणि तूंच मला असे दुःखोकष्टी कसें केलेंस? देवा, तूं मला अल्पवयांत वैधव्याच्या वणव्यांत होरपळायला लावलेंस, तरी बाळाकडे पाहून मी दिवस लोटीत होतें. परंतु तेंहि तुला पहावलें नाहीं. माझें बाळ माझ्या हृदयावरून ओढून नेलेंस! एक घाव पुरेसा वाटला नाहीं म्हणून का हा दुसरा घाव घातलास? तुला तरी दोष कसा लावूं? माझेंच दैव खोटें! मींच माझ्या बाळाची हयगय केली! मीं जर त्याची नीट काळजी घेतली असती तर तो आज मला कां अंतरला असता? बाळ कुमार, मीच तुझ्या नाशाला कारण झालें रे! कामाच्या ओढीनें मीं तुझी आबाळ केली, हयगय केली—म्हणून का बाबा मला टाकून गेलास? ह्या पोटासाठीं—ह्या टीचभर पोटासाठीं—लोकांचीं मुलें वेळेवर न्हावूं माखूं घालण्यासाठीं माझ्या सोनुकल्याला मीं नीट न्हायलादेखील घातलें नाहीं. त्याच्या टाळूवर थेंबभर तेलसुद्धां माखलें नाहीं. लोकांचीं खरकटीं उष्टीं वेळेवर उचलण्यासाठीं बाळा! या पापिणीनें तुला ओलें कोरडें अन्न घाईनें खायला लावलें. देवा, तूं दिलेलें रत्न नीट जतन केलं नाहीं म्हणून का तें तूं हिरावून घेतलेंस? पण माझ्यासारख्या अनाथ गाईचा एकच एक आधार नाहींसा झाल्यावर हें अंधकारमय जीवित मी कसें कंठूं?

शेवटीं दुःखभार असह्य होऊन ती ओक्साबोक्शीं रडूं लागे. तिचा रुदनस्वर ऐकून शेजारच्या बायांपैकीं कोणी तिच्याकडे आल्यास त्यांना ती रडत रडत म्हणे—

" माझा बाळ, पाण्यांत जलचरांच्या भक्ष्यस्थानीं पडला, कीं रानांत खडेकांटे त्याच्या सुकुमार पायाला बोचल्यामुळें थकून पडला असतां हिंस्र पशूंच्या भक्ष्यस्थानीं पडला, कोण जाणे! बायांनो! माझ्यापासून तुम्ही तरी धडा घ्या.

आपल्या तान्हुल्यांची हयगय करूं नका. माझ्याप्रमाणें आपलीं बाळें वाऱ्यावर विसंबूं नका. ''

अत्यंत शोकानें स्वतःची निर्भर्त्सना करीत जेव्हां ती याप्रमाणें बोलत असे, तेव्हां मध्येंच कोणीं सांत्वनपर उद्गार काढले तर तिचें दुःख कमी न होतां उलट अधिक वाढे. ती दोन्ही हात जोडून देवाला म्हणे—

" देवा, तुला मी दोष कसा देऊं ? तूं जें करतोस तें बऱ्याकरितांच करतोस असें म्हणतात. तूं दयाळु आहेस अशी तुझी कीर्ति ! परंतु काय–माझेंच दैव खोटें–" असें म्हणून ती इतकी रडूं लागे कीं समजूत करण्याच्या उद्देशानें आलेल्या बायासुद्धां तिच्या दुःखानें कळवळून रडूं लागत.

दिवसांमागून दिवस व आठवडे लोटत चालले तरी तिचें दुःख कमी झालें नाहीं. पुत्रशोकानें ती झुरणीस लागून अगदीं कृश झाली. लोक म्हणूं लागले कीं—" नवरा आणि मुलगा यांच्यामागून मानकुंवरबा पण लवकरच जाईल."

अशा तऱ्हेनें आणखी कांहीं दिवस गेले. नित्यक्रमाप्रमाणें मानकुंवर आपल्या मनाशीं विचार करीत बसली होती. इतक्यांत, ' माई, थोडा पानी मिलेगा ? ' असा शब्द तिच्या कानीं आला. पांथस्थाचा शब्द ऐकून मानकुंवर चपापून बाहेर आली. तों आंगणांतील औदुंबराखालीं एक वृद्ध पुरुष उभा असलेला तिला दिसला. त्याची जटाजूट व दाढी पांढरी शुभ्र होती. मूर्ति भव्य, मुद्रा शांत व तेजःपुंज होती. आपल्या दारुण दुःखाचा परिहार करण्यासाठीं प्रत्यक्ष ईश्वरच आपल्या दारीं धांवून आला अशा भावनेनें मानकुंवरनें खालीं वांकून नमस्कार केला. दोन प्रहरच्या वेळीं अतिथि पाणी मागत असतां तें नुसतेंच कसें द्यावें अशा विचारांत ती पडली. बरें, कांहीं खावयास द्यावें तर अद्याप आपण चूलहि पेटविली नाहीं. कसें झालें तरी तें आर्यस्त्रीचें अंतःकरण होतें. अतिथीला दोनप्रहरीं विन्मुख जाऊं देणें म्हणजे आपलें सत्त्वच घालविण्यासारखें आहे असें वाटून ती खावयास देण्यासारखा जिन्नस घरांत पाहूं लागली. कुमार गेल्यापासून या बाबतींत लक्ष दिलें असा हा पहिलाच दिवस होता.

क्षणभर दुःख दूर सारून तिचें मन कर्तव्यतत्पर झालें; परंतु इतक्या दिवसांच्या अनास्थेमुळें घरांत देण्यासारखा किंवा चटकन् करतां येण्यासारखा जिन्नस तिला आढळेना. शेवटीं गुळाचा खडा व पाण्याचा तांब्या त्याच्यापुढें

्न ती खिन्नपणें उभी राहिली. तिची ती फिक्कट मुद्रा व अश्रूंनीं डबडबलेले ळे पाहून ती कोणी दुःखीकष्टी बाई आहे हें अतिथीला कळून चुकलें. प्रथम ापली तृषा भागवून नंतर चौकसपणें सभोंवतीं नजर टाकून त्यानें प्रश्न केला,

" बाई, तूं येथें एकटीच रहातेस काय ? तुम्हीं कोणी मुलेंमाणसें—"

अतिथीचें वाक्य अर्धवटच राहिलें. मुलांमाणसांचें नांव निघतांच आतां· ंत कोंडून राहिलेले हुंदके जोरानें बाहेर पडूं लागले. ती मटकन् खालीं ाली. जखमेवरची खपली काढल्यानें जो परिणाम होतो तसाच आतिथीच्या ील वाक्याचा तिच्यावर परिणाम झाला. त्या गडबडीनें शेजारच्या कांहीं या तेथें आल्या. त्यांच्याकडून मानकुंवरचा इत्थंभूत वृत्तांत अतिथीला सम- ला. ती करुणकहाणी ऐकून त्या सत्पुरुषाला फार कळवळा आला. थोडा वेळ ब्ध राहून नंतर तो अत्यंत प्रेमळ परंतु अविकारयुक्त वाणीने मानकुंवरला देशून म्हणाला,

"बेटा, तुझी हकीगत दुःखदायक तर खरीच. पण थोडी शान्त होशील तर ान शब्द तुला सांगावे अशी इच्छा आहे."

तिनें संमति दर्शवितांच आतिथि पुढें म्हणाला,

" बाळे, तुझी एकंदर हकीगत ऐकतां ती पाषाणालाही पाझर फोडील अशी ाहे, परंतु मानवी आटोक्याबाहेरच्या गोष्टीकरितां तूं हा दारुण शोक सतत रीत रहावेंस हें मात्र गैर आहे. अशानें ईश्वरी इच्छेला तूं विरोध करीत आहेस. श्वरी इच्छेनेंच सृष्टीचे सर्व व्यापार चाललेले आहेत. दुःख आणि सुख हीं ्यानेंच निर्माण केलेली आहेत. असें जर आहे तर तुझ्या अशा वर्तनानें तूं ाच्याशीं त्राग्यानें वागत आहेस, त्याच्या कृत्यांचा, त्याच्या सत्तेचा निषेधच रीत आहेस, असें नाहीं का होत ! म्हटलें आहे, " सुखदुःखांचा बांधा । जेंवी ोड फळांचा सांधा । आमंत्रण दिलिया अंधा । सवें येती दोघे ॥ ". आंधळ्या ाणसाला जर भोजनाचें आमंत्रण दिलें तर दोन पात्रांची सिद्धता करायला ाहिजे. कारण त्याला हातीं धरून आणणारा दुसरा त्याच्याबरोबर येणारच. सेंच सुखदुःखांचें आहे. सुख भोगीत असतांनाच दुःख सहन करण्याचें ामर्थ्य अंगीं आणणें जरूर आहे. कारण तें सुखापाठोपाठ येतच असतें. शी स्थिति कांहीं तुझीच झाली आहे असें नव्हे. मागेंहि अशा गोष्टी अनेक ाडल्या आहेत, हल्लींही घडत असतील, व पुढेंहि घडतील. आपण दूर

सामान्य माणसेंच आहोंत, परंतु मोठमोठ्या सत्त्वशील स्त्रीपुरुषांवरही अत्यंत कठिण प्रसंग आलेले तुझ्या ऐकिवांत असतीलच. सीतारामांचें उदाहरण, नलदमयंती किंवा हरिश्चंद्र–तारामती यांचीं चरित्रें तुला माहीत असतीलच. परंतु अगदीं तुझ्याच स्थितीला पटण्यासारखें उदाहरण म्हणजे देवकी आणि कृष्णाचें आहे. पहा, ती राजकुमारी व राजभगिनी असून प्रत्यक्ष भावानें बंदींत ठेविली होती. एकामागून एक अशीं तिचीं सात अपत्यें त्यानें निर्दयपणानें मारून टाकिलीं होतीं. प्रत्यक्ष पोटच्या मुलांचे निर्दयपणानें प्राण घेतले जात असतां त्यांना वांचविण्याचें सामर्थ्य आंगीं असूं नये, यापरतें दुर्दैव कोणतें ? आठवा मुलगा कृष्ण मात्र गुप्तपणें गोकुळांत पोंचविला आणि तेथें तो वांचला. हें पहा त्याचें चित्र ! यावरून तुला चांगलें कळून येईल."

असें म्हणून त्यानें आपल्या पडशींतून एक लहानसें चित्र तिच्या हातीं दिलें. नुकतेंच जन्मलेलें बालक वसुदेवाच्या हातीं देवकी देत आहे व तो तें घेऊन जाण्याच्या तयारींत असतां अश्रुपूर्ण नेत्रांनीं तीं दोघेंहि त्याच्याकडे पहात आहेत, पुन्हां हें बालक दृष्टीस पडेल कीं नाहीं अशी साशंक वृत्तीची छटा चित्रकारानें त्यांच्या चेहऱ्यावर चांगली चित्रित केली होती.

त्या चित्राचें मर्म तिच्या हृदयाला चांगलें पटलें. आपला बाळ नाहींसा होण्याच्या दिवशीं आपण अगदीं अशाच अधीरपणें त्याच्याकडे पहात होतों. पुन्हां पुन्हां त्याला पहाण्याचा आपणांस मोह पडत होता. त्याच्याशीं संलग्न असलेलें आपलें हृदय जणुं फाडून चिरूनच घेऊन आपण कामाला गेलों. हाय हाय ! आपला सोनुला आपल्याला पुन्हां दिसणार नाहीं अशी त्या वेळीं आपणास शंकासुद्धां आली नाहीं. एक दीर्घ निश्वास टाकून तिनें तें चित्र खालीं ठेवलें.

अतिथि म्हणाला, "हें दुसरें चित्र पहा. हा राजकुमार आपली नवप्रसूता पत्नी आणि अजाण अर्भक टाकून व सुखोपभोगाचा त्याग करून वनांत जाण्याच्या तयारींत आहे. त्याची ही प्रिय पत्नी पहा, कशी गाढ झोंपलेली आहे. मूल तर काय जन्मून थोडेच दिवस झालेले. तें कुशींत घेऊन बिचारी स्वस्थ झोंपलेली आहे. आपल्या मस्तकावर दुर्दैवाचें वज्र कोसळण्याचे बेतांत आहे याची तिला थोडीतरी जाणीव आहे का ? पहा कशी शांत, निष्पाप

असलेला हा राजपुत्र पहा, किती हलकेच त्यांचें शेवटचें दर्शन घेत आहे! जागृतीनंतर पति सोडून गेल्याचें कळले तेव्हां तिला किती दुःख झालें असेल बरें? पतीचा आधार नाहींसा झालेला तिला कळल्यावर तोडलेल्या केळी-प्रमाणें तिची स्थिति झाली नसेल काय?"

मानकुंवरनें ते चित्र नीट निरखून पाहिलें. त्या प्रसंगाचें कल्पनाचित्र मनश्चक्षूपुढें आणण्याचा तिनें प्रयत्न केला. त्या कल्पनेनें तिच्या अंगावर शहारे आले. कंपित स्वरानें तिनें प्रश्न केला, "अशा सुशील साध्वीचा त्या राजपुत्रानें काय म्हणून त्याग केला?"

"केवळ ईश्वरी इच्छेनें. ईश्वरी प्रेरणेशिवाय त्यागाचें कांहींच कारण दाखवितां येणार नाहीं. या राजपुत्रानें राजैश्वर्याचा व पत्नीपुत्रांचा त्याग करून जें अलौकिक कार्य केलें आहे त्याला तोड नाहीं. त्यानें सुखैश्वर्याला लाथ मारली, स्वसुख हातानें दूर लोटलें, तें केवळ लोककल्याणासाठीं! बाळे, जर तो राजवाड्यांतील सुखोपभोग भोगीत राहिला असता तर त्याला कोणी नको म्हणणारें होतें काय? परंतु त्यामुळें त्याचें नांव असें अजरामर होऊन राहिलें नसतें. त्याच्या हातून जगाचें कल्याण व्हावयाचें होतें म्हणूनच राजैश्वर्य सोडून जाण्याची त्याला बुद्धि झाली. वाईटांतून चांगलें होतें तें असें. तुझा मुलगा नाहींसा झाला आहे; परंतु त्याचा देह नष्ट झाल्याचें कांहींच चिन्ह तुला आढळलेलें नाहीं. कदाचित् ईश्वरी कृपेनें तो जिवंतही असूं शकेल. कोणीं सांगावें? कांहीं जरी असलें तरी ईश्वरी इच्छेला मान वांकविणें हा आपला मर्त्यांचा धर्म आहे. जी गोष्ट आपल्या स्वाधीनची नाहीं तिच्यासाठीं किती शोक करणार? ईश्वरानें दिलेल्या ह्या देहाला आणखी दंड देऊन तूं त्याच्या आज्ञेचा भंग कां करीत आहेस? ईश्वरानें दिलेल्या शरीराला दंड देण्याचा तुला काय अधिकार आहे? बाळे, तूं हा वेडा विचार सोडून दे. राहिलेलें आयुष्य ईश्वराच्या चिंतनांत घालीव. तो दयाळु परमेश्वर तुझ्या मनाला शांति देईल. 'ईश्वर जें जें करितो, तें बऱ्याकरितांच असतें,' ही खूणगांठ मनांत बांध. हीं दोन्ही चित्रें तुला घे आणि जेव्हां जेव्हां तुझें मन दुःखानें व्याकुळ होईल तेव्हां तेव्हां तूं त्याजवर नजर टाक. माझी खात्री आहे कीं, हीं चित्रें दृष्टीसमोर असलीं तर विवेकानें दुःख आवरण्यास तुला बरेंच सांपें जाईल. प्रत्येक गोष्ट ईश्वरी इच्छेनें घडते, ईश्वरी इच्छेला मान वांकविणें हें आपलें

कर्तव्य आहे हें तत्त्व लक्षांत ठेवलें पाहिजे. बरें, आतां ऊन कमी झालें आहे. येतों मी."

अतिथीला उठतांना पाहून मानकुंवर पुढें आली व अत्यंत भक्तिभावानें तिनें त्यास नमस्कार केला; व सद्गदित स्वरानें ती म्हणाली,

"महाराज, आपण माझे गुरु झालांत. आपण जें ज्ञान सांगितलें त्यामुळें माझ्या हृदयांत बराच प्रकाश पडला. आपण केलेल्या उपदेशाप्रमाणें मी वागण्याचा प्रयत्न करीन. हीं चित्रें त्या कामीं मला साह्यकारी होतील. तीं सतत दृष्टीसमोर रहातील अशींच मी ठेवीन. ईश्वरा! तूं सर्वसत्ताधीश आहेस. तुझ्या इच्छेला ही मी मान वांकविली. दयाघना! आजपर्यंत तुला दोष देण्याचा जो मीं अपराध केला आहे त्याबद्दल तूं मला क्षमा कर."

असें म्हणून भक्तिभावानें तिनें हात जोडले. ती मनांत ईश्वराला आळवूं लागली. भक्ति आणि श्रद्धा यांनीं तिचें अंतःकरण द्रवून डोळयांतून अश्रु वाहूं लागले. तिची ती अनुतप्त स्थिति पाहून आपल्या बोलण्याचा तिच्यावर चांगला परिणाम झाला असें अतिथीला वाटलें. त्यानें मनःपूर्वक तिचें कल्याण चिंतून आपला मार्ग सुधारला.

मानकुंवर डोळे उघडून पहाते तों तेथें अतिथि नाहीं! या गोष्टीचा तिच्या भोळ्या भाविक मनावर अतिशय परिणाम झाला. तिला वाटलें, "आतांपर्यंत आपणांस उपदेश करीत होता तो कोणी सामान्य साधु नसून प्रत्यक्ष ईश्वरच आपल्यासाठीं धांवून आला व आपल्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश पाडून तो येथेंच गुप्त झाला! अहाहा! केवढें आपलें भाग्य! प्रत्यक्ष ईश्वरानें दर्शन देऊन कर्तव्याचा मार्ग दाखविला! हे प्रभो! तुझी लीला अगाध आहे!"

तिनें तो ईश्वरी प्रसाद–तीं दोन चित्रें–अत्यंत भक्तीनें उचललीं व समोरील औदुंबराच्या रुंद खोडाला खांच पाडून तींत तीं सहज नजरेस पडतील अशा तऱ्हेनें बसविलीं. त्या झाडाखालीं जाणें यापूर्वी तिला अवघड वाटत असे. त्या खाटेकडे नजर टाकतांच तिचें हृदय पिळवटून निघत असे. परंतु आतां तें स्थान दुःखावेग हलका करून मनाला एक प्रकारची शांतता देणारें झालें! त्या झाडाखालीं त्या चित्राकडे टक लावून ती नेहमीं बसे. तेथें बसून ती आपल्या लाडक्या बाळाच्या आत्म्याला शांति देण्याविषयीं देवाला विनवी. शेवटीं दीर्घ निश्वास टाकून व दोन्ही हात जोडून ती म्हणे, "सर्वशक्तिमान्

प्रभो ! तुझी सत्ता प्रबळ आहे. तूं करशील तें खरें." प्रथम प्रथम हा क्रम तिला कठिण वाटला. परंतु कालांतरानें हळूहळू तिच्या मनाला एक प्रकारची निराशायुक्त शांति वाटूं लागली.

बिचारी मानकुंवर पुत्रशोकानें छिन्नभिन्न झालेलें आपलें हृदय स्थिर करण्याचा वरीलप्रमाणें प्रयत्न करीत होती, त्यावेळीं कुमार कोठें होता व त्याची काय स्थिति होती हें जाणण्याची जिज्ञासा वाचकांना असेलच. करितां त्या हकीगतीकडे वळणें जरूर आहे. कुमाराला झोंपलेला ठेवून मानकुंवर गेली त्यानंतर बऱ्याच वेळानें तो जागा झाला. उठल्यानंतर त्यानें पिकून खालीं पडलेलीं उंबराचीं कांहीं फळें आपल्या दुरडींत वेंचून घेतलीं, व नंतर तो एरंडीच्या बिया वेंचण्यासाठीं निघाला. उंबराचीं फळें मधून मधून खात तो चालला असतांना एक म्हातारी उडतांना त्याला दिसली. तिला धरण्यासाठीं चिमुकले हात उंच उभवून, धांवून व उड्या मारून त्यानें बराच प्रयत्न केला; परंतु म्हातारी हातीं लागली नाहीं. तिच्यामागून इकडे तिकडे धांवण्यानें त्याचा नेहमींचा रस्ता सुटून तो निराळ्या मार्गानें घरापासून बराच दूर गेला. शेवटीं म्हातारीहि दृष्टीच्या आटोक्यांतून गेली. कुमार इकडे तिकडे पाहूं लागला, तों पाण्याच्या कांठाशीं एक लहानसें पांखरूं पंख फडफडवून धडपडत उडत आहे, थोडेंसें उडून पुन्हां खालीं फडफडत पडत आहे व तोंडानें टी टी टी असा उच्चार करीत आहे असें त्याला दिसलें

त्या धडपडणाऱ्या पांखराला आपण सहज धरूं असें कुमाराला वाटले. तो उंच उडणाऱ्या म्हातारीला विसरून जमिनीवर फडफडणाऱ्या पांखराच्या पाठीस लागला ती एक लहानशी टिटवी होती. रानांतल्या आपल्या घरट्याजवळ आलेल्या त्या मुलाला पाहून तिला आपल्या पिलांवर संकट आलेसें वाटलें व तें टाळण्यासाठीं, त्याला दूर घालविण्यासाठीं तिनें जमिनीवर धडपडून कुमाराला हुलकावण्या दाखविण्यास सुरुवात केली. थोडें उडावें, पुन्हां जमिनीवर सरपटावें व तो आतां धरणार इतक्यांत चटकन् उडून पुन्हां जवळच पंख फडफडवून खालीं पडावें. या क्रमानें तिनें त्याला आपल्या घरट्यापासून बरेंच दूर व त्याच्या स्वतःच्या घरापासून अतिशय दूर आणिलें आतां आपल्या पिल्लांना त्याच्यापासून भय नाहीं, अशी मनाची खात्री होतांच तें धूर्त पाखरूं भुर्कन् उंच उडालें। क्षणांत दिसेनासें झालें. कुमार चोहोंकडे

पाहूं लागला. परंतु पाखरूं तेथें नव्हतें. दूरवर टी टी टी असा बारीक आवाज मात्र ऐकूं येत होता. तो घाबरून सभोंवार पाहूं लागला तों आपण अगदीं अनोळखी प्रदेशांत आहोत असें त्यास आढळून आलें. भयानें तो गांगरून गेला. कोणत्या मार्गानें घरीं जावें? कोणाला वाट विचारावी? या विचारानें चोहोंकडे पहात असतां दूरवर पाण्यांत कांहींसें तरंगत असलेलें व जमिनीवर कांहीं मुलें माणसें उभीं असलेलीं त्याला दिसलीं. तो धांवतच तिकडे निघाला. आणि थोड्याच वेळांत त्या मुलांच्या घोळक्याजवळ जाऊन पोंचला. निरनिराळ्या आकाराचे दगड–गोटे गोळा करण्याच्या उद्योगांत तीं मुलें गर्क झालीं होतीं. ह्या आगंतुक पाहुण्याला पाहून ती मंडळी उठून उभी राहिली व त्याच्याकडे जिज्ञासेनें पाहूं लागली. औपचारिक शिष्टाचाराची कृत्रिमता बालकांच्या विमल हृदयाला ठाऊक नसते, त्यांचे आचारविचार अकृत्रिम व शुद्ध असतात. तीं निष्पाप मुलें हंसत हंसत त्याच्याजवळ गेलीं व त्याला आपल्याकडे बोलावूं लागलीं. कोणीं आपल्याजवळचे गुळगुळीत दगड त्याला दिले, कोणी त्याच्या हातांत अडकविलेल्या दुरडींत काय आहे तें हातानें दावून व तोंडानें चाखून पाहूं लागले. एकानें प्रश्न केला,

“ काय रे, तुझे हे अंजीर असे काय लागतात? ”

“ अंजीर? ” कुमारानें आश्चर्यानें विचारलें. “ अंजीर म्हणजे काय? हे तर उंबर आहेत. ”

“ उंबर! उंबर! ” म्हणून सर्व मुले हंसून टाळ्या वाजवूं लागलीं. त्यांतील एक लहान मुलगी म्हणाली, “ असले उंबर मीं साऱ्या जन्मांत कध्धीं पाहिले नव्हते! अंजीर मात्र आम्हीं नेहमीं खातों. ”

“ मग हे अंजीरच आहेत. अंजीरालाच तो उंबर म्हणतो,” तिच्याहून जरा मोठ्या मुलानें उत्तर केलें. बोलतां बोलतां कुमाराची दुरडी पार रिकामी झाली.

मुलें इकडे फलाहार करीत होतीं, त्यावेळीं कुमाराचें सारें लक्ष पाण्यांत तरंगत उभ्या असलेल्या त्या नौकेकडे होतें. पाण्यांत तरंगणारें हें एक घरच आहे असें त्यास वाटून त्यानें आपल्या नवीन मित्रांना प्रश्न केला, “ हें तुमचें घर असे पाण्यांत कसें रे ठेवलें? ”

“ अहा रे! तें घर का? ती तर आमची प्रभावती! तिच्यांत बसलें म्हणजे कशी पण मौज वाटते! ”

" अन् आंत आमच्या किती तरी जमती जमती आहेत. नाहीं ग रतन ? " दुसऱ्या एका मुलानें त्या बोलणाऱ्या मुलीला उद्देशून वरील वाक्य उच्चारिलें. रतन आनंदानें टाळी वाजवून म्हणाली,

" हो हो, खरेंच तूं येतोस का आमच्या त्या घरांत ? "

कुमाराच्या उत्तराची वाटसुद्धां न पहातां ती त्याचा हात आपल्या चिमुकल्या हातानें धरून त्याला ओढीतच नौकेकडे घेऊन गेली. बाकीचीं सर्व मुलेंहि तिच्या मागोमाग आलीं. कुमाराचें लक्षहि नौकेकडेच असल्यामुळें तोहि आढेवेढे न घेतां आनंदानें आपल्या नवीन मित्रांबरोबर नौकेंत गेला. त्याच्या मित्रांनीं त्याला आपलीं खेळणीं दाखविलीं. तीं घेऊन तीं मुलें आनंदानें नौकेत चोहोंकडे फिरलीं. कुमाराला त्या पाण्याच्या लाटा, नौकेचें तें हेलकावणें पाहून फार मौज वाटली. आंतील माणसांकडे लक्ष न देतां तो ती मौज पहात आनंदानें हंसत खेळत होता. इतक्यांत मोठी शिट्टी होऊन नौकेचा नांगर उचलला गेला. नौकेचा भोंगा ऐकून मुलें टाळ्या वाजवून हंसूं लागलीं तसा कुमारहि हंसूं लागला. परंतु दैव आपणांस आपल्या मातेपासून दूर नेत आहे, असा इषारा भोंगा वाजवून ही नौका देत आहे, अशी कल्पना त्याच्या बालमनाला शिवणेंहि शक्य नव्हतें. मंद मंद हालणाऱ्या झोंपाळ्यावर आपण बसलों आहों असें त्याला वाटलें. तो आश्चर्यानें उद्गारला—

" वाः ! तुमचें हें घर कसें चालतें रे ? "

" अझून हळूच चालतेंय, " रतन म्हणाली, " आतां थोड्या वेळानें बघ कसें झपाट्यानें चालेल तें ! "

पाण्याच्या लाटा जोरानें उसळत होत्या, त्यांच्यामधून नौका आपला मार्ग आक्रमीत होती. तो कधीं न पाहिलेला देखावा पाहण्यांत कुमार रंगून गेला त्याला वाटलें हें घर स्थिर असून पाणीच वेगानें मागें वहात आहे !

थोड्याच वेळांत नौकेचा वेग जास्त वाढला. कारण तिनें आतां नदीच्या मुखांतून समुद्रांत प्रवेश केला होता. ती वेळ सूर्यास्ताची होती. भगवान् सविता नारायण सर्व दिवसाच्या परिश्रमानें आरक्त होऊन हळूहळू समुद्राच्या पृष्ठभागापर्यंत आला. आणि एखादा चेंडू पाण्यांत पट्दिशीं पडून नाहींसा व्हावा त्याप्रमाणें चटकन् पाण्याच्या पोटांत गडप झाला. ज्याप्रमाणें एखाद्या प्रेमळ मातेनें खेळून दमलेल्या बालकाला दोन्ही हातांनीं पोटाशीं धरून अंगाई

करायला घेऊन जावें त्याप्रमाणें जलदेवतेनें लाटारूपी आपले प्रचंड बाहु पसरून दिवसभराच्या श्रमानें दमून आरक्तमुख झालेल्या आपल्या लाडक्या तान्हुल्यास मोत्यांच्या झालरी लावलेल्या चंदेरी पदराखालीं झांकून अंगाई करण्याकरितांच जणुं काय अंतःपुरांत नेले !

कुमाराला तें दृश्य पाहून मौज वाटली. तथापि त्याच्या बालमनांत ज्या अव्यक्त भावना उद्‌भूत झाल्या त्यांमुळें त्याची वृत्ति कांहींशी खिन्न झाली. त्याला तो देखावा भयप्रद वाटूं लागला. त्याला तो पहावेना. त्यानें आंत दृष्टि वळविली. परंतु तेथेंहि त्याची वृत्ति उल्हसित झाली नाहीं. तो चोहोंकडे चौकसपणे पाहूं लागला. त्याला आपली आई कोठेंच दिसेना.

गरीब बिचारें लेंकरूं ! घरट्यापासून दूर गेलेलें पाखरूं ज्याप्रमाणें संध्याकाळीं अस्वस्थपणें इकडे तिकडे उडून किलबिलाट करतें, त्याप्रमाणें तो इकडे तिकडे हिंडून केविलवाणें रडूं लागला, तेव्हां कोठें आंत बसलेल्या लोकांचें लक्ष त्याच्याकडे लागलें. इतका वेळ तो आपल्यापैकींच कोणाचा तरी मुलगा असेल अशीच त्या सर्वांची कल्पना होती. हां हां म्हणतां त्याच्यासभोंवतीं लोक जमले; व सर्वजण " तूं कोणाचा कोण ? " " कोठून आलास ? " " कधीं आलास ? " अशी आपापल्यापरी चौकशी करूं लागले. इतक्यांत नौकावाहकहि तेथें आला. त्यानें त्यास लोकांच्या गर्दीतून सोडवून आपल्या ताब्यांत घेतलें आणि चौकशीस सुरुवात केली. परंतु कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तो कोठून कधीं नौकेवर आला या गोष्टीकडे कोणाहि मोठ्या माणसाचें लक्ष नव्हतें. ज्या लहान मुलांच्याबरोबर तो आला त्यांना कोणीं विचारलें नाहीं व विचारलें असतें तरी तीं इतकीं गांगरून गेलीं होतीं कीं, त्यांना कांहीं सांगतांहि आलें नसतें.

शेवटी त्यालाच विचारून कांहीं पत्ता लागल्यास पहावें, म्हणून नौकावाहकानें त्यास प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

" बाळ, तूं कोणत्या बंदराहून आलास, सांग पाहूं ? "

" बंदर ! बंदर म्हणजे काय ? "

" अरे, तूं कोणत्या गांवाहून आलास ? "

" गांवाहून आलों नाहीं. माझ्या घरून आलों. "

" हं ! बरें तुझें घर कुठें आहे ? "

" माझें घर गांवाबाहेर शेतांत आहे. "

" वाः छान ! पण तें शेत अन् तुझें घर कोणत्या गांवांत आहे तें सांगशील का ? "

" आमच्या गांवांत. "

" आमच्या गांवांत ? " त्रासून नौकावाहक म्हणाला. " काय पोपटासारखा बोलतो आहे ! पण तुमच्या गांवाचें नांव काय तें सांगशील का ? "

" गांवाला नांव असतें वाटतें ? "

" नसतें का ? बरें, तुझ्या आईबापांना तरी नांव आहे का ? "

" हो, माझ्या आईला मी आई म्हणतो, अन् दुसरीं माणसें मानकुंवरबा म्हणतात.

यावरून काय पत्ता लागणार ?

" तुझा बाप काय धंदा करतो ? त्याचें नांव काय ? "

" त्यांचें नांव बाबा. ते देवाकडे गेले आहेत. "

वरील उद्‌गार ऐकून पुष्कळांना त्या चुकलेल्या लेंकराची कींव आली. त्याच्या हतभागी अनाथ आईच्या स्थितीची करुण कल्पना मनांत आल्यामुळें कोमल मनाच्या स्त्रियांचे पदर डोळयांकडे गेले. सर्व मंडळी त्या दीन मुलाच्या व त्याच्या आईच्या स्थितीविषयीं सहानुभूतीचे उद्‌गार काढूं लागली. परंतु इतका कळवळा दाखवायला कर्णधाराला वेळ नव्हता. बाळाकडे अंगुलिनिर्देश करून तो गंभीर मुद्रेनें आंतील उतारूंना म्हणाला, " या पोपटाला पोंचविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आतां इथेंच मुक्काम होणारसें दिसतें. तें देवळाच्या शिखरावरचें निशाण दिसतें आहे, त्या गांवीं याला उतरवून योग्य तजवीज केली पाहिजे. तेथील अधिकारी मग खुशाल त्याच्या आईचा शोध करतील. आमचा वेळ किती मोडेल कुणाला ठाऊक, नसती ब्याद पाठीस लागली आहे. "

आपल्या सुरळीत गतीला अडथळा करणाऱ्या यःकश्चित् पोरासाठींहि आपण मोठा स्वार्थत्याग करीत आहोंत अशा आढ्यतेनें कर्णधारानें वरील उद्‌गार काढले. परंतु ते बहुतेकांना आवडले नाहींत. शिवाय साक्षीपुरावे होऊन त्या गांवांतील अधिकारी त्या मुलाला ताब्यांत घेईतोंपर्यंत आपणांस येथेंच अडकून पडावें लागणार, अशा स्थितींत किती वेळ जाईल याची कांहींच कल्पना

नसल्यामुळेंहि कित्येक लोक अस्वस्थ झाले होते. विशेषतः सरदारी थाटाचे एक सद्गृहस्थ आंत बसलेले होते, त्यांना पुढें जाण्याची विशेष घाई होती. ते म्हणाले,

" तुम्हांला स्वतः जाण्याची मुळींच जरूर नाहीं. तुमच्या एखाद्या माणसा-करवीं मुलाला गांवांत पोंचवा. तो सर्व व्यवस्था करील. एवढ्यासाठीं सर्वांना येथें थांबून राहण्याचें कारण नाहीं. मला तर शक्य तितक्या लौकर राज-धानीला पोंचलेंच पाहिजे. "

यावर नौकावाहक चिडून म्हणाला,

" तुम्ही मोठे सरदार असाल. तुम्हांला राजदरबारीं महत्त्वाचें कामकाज असेल, तशीं दुसऱ्यांनाहि कामें असतील. मीं काय करावें हें मला कोणी शिकवायला नको. मला माझीं कर्तव्यें नीट कळतात. "

" याबद्दल शंका नाहीं. तथापि हा मुलगा कुठून बसला हें कोणीच पाहि-लेलें नाहीं. तेव्हां तेथें याला कोणाच्याहि स्वाधीन केला तरी तो त्याच्या आई-कडे पोंचविला जाईलच याबद्दल मात्र शंका वाटते. "

हा वादविवाद चालला असतां त्या सरदाराची कन्या रतन आपल्या आईच्या मांडीवर बसून सर्व ऐकत होती. बाळसुद्धां क्षणभर हुंदके आवरून गोंधळलेल्या स्थितींत नौकावाहकाच्या जवळ उभा होता. त्या लहानशा अर्भकाच्या दंडाला धरून त्याने जोरानें हालविलें व वस्कन् ओरडून तो म्हणाला,

"थांब रे पोरा इथेंच. आतां तुला कोणातरी शेतकऱ्याच्या स्वाधीन करतों."

असें म्हणून तो पुढें चालता झाला.

बिचारा बाळ एकंदर प्रकारानें अगदीं भेदरून गेलाच होता. काय झालें किंवा होत आहे याचें आकलन करावयाला तो अगदीं असमर्थ होता. इतक्या माणसांनीं गजबजलेल्या त्या ठिकाणीं आईशिवाय आपण एकटे अनाथ आहोंत असेंच त्याला वाटलें. तेथें कांहीं स्त्रियाहि होत्या. परंतु त्यांतली एकहि आपल्या आईसारखी मायाळु नाहीं असें त्याला वाटलें. तो मटकन् खालीं बसला; आणि फुलून फुलून रडूं लागला.

त्याची ही स्थिति पाहून रतन आपल्या आईच्या मांडीवरून चटकन् उठून त्याच्याजवळ गेली व त्याच्या खांद्यावर हात ठेवून अत्यंत मृदु स्वरानें म्हणाली

" तुला त्यानें मारलें का रे? रडूं नको; चल माझ्या आईला सांगूं. म्हणजे ती त्याजवर रागवेल हं. "

त्या लहानशा मुलीची ती कोमल मनोवृत्ति व ती व्यक्त करण्याची तत्परता पाहून सर्वांना मोठें कौतुक वाटलें. आपणांस त्या मुलाची कींव वाटत असूनहि नुसता सहानुभूतीचा शब्दहि न उच्चारल्याबद्दल कित्येकांना स्वतःची लाज वाटली. कोणत्याहि वयांत स्त्रीजातीच्या ठिकाणीं मातृवात्सल्याचा अंकुर असतो याचा सर्वांनाच प्रत्यय आला. आपल्या मुलीची दयाशील वृत्ति पाहून तिच्या आईबापांनाहि तिच्याविषयीं प्रेमाचें भरतें आलें. तिची आई स्वतः पुढें होऊन त्या दोन्ही मुलांना घेऊन आली व त्यांना जवळ बसवून प्रेमानें त्यांचीं मुखें कुरवाळीत मृदुस्वरानें आपल्या पतीस म्हणाली,

" कशाला वाद वाढवावयाचा? हें मूल आपणच आपल्याबरोबर नेऊं. त्याची आई भेटली तर तिच्या स्वाधीन करूं. नाहींतर रतनबरोबर त्याला वाढवूं. "

पत्नीचा सल्ला त्या सरदारांनाहि मानवला. त्यांनीं आपला बेत नौकावाहकाला सांगितला. तो त्यास पटून वादाचा निकाल लागल्यामुळें पुढील प्रवास निर्वेधपणें सुरू झाला. रतनचे आईबाप दोघेंहि फार चांगलीं माणसें होतीं. मुलांची त्यांना अत्यंत आवड होती. परंतु इतरत्र आढळणारें ईश्वराचें या बाबतींतलें औदार्य त्यांच्या बाबतींत अत्यंत मर्यादित होतें. रतन हें एकुलतें एक अपत्य त्यांना लाभलें होतें. त्यामुळें व इतक्या लहान वयांत तिच्याठायीं दृग्गोचर होणाऱ्या अनेक सद्गुणांमुळें ती त्यांना अत्यंत प्रिय वाटे. परंतु ' कन्या हें परक्याचें धन. कधीं तरी तें परका हिरावून नेईल, ' हा विचार मनांत आला म्हणजे आपणांस मुलगा नाहीं या गोष्टीचे दुःख त्यांच्या मनाला जाणवत असे. आपली ही पुत्राची उणीव भरून काढण्याकरितांच ईश्वरानें या अनाथ अर्भकाला आपल्या आश्रयाला पाठविलें असें वाटून रतनच्या आईनें तो ईश्वरी प्रसाद अत्यंत वात्सल्यानें जवळ केला. बाळहि दिवसभराच्या मानसिक व शारीरिक श्रमानें त्रासून गेला होता व भुकेनेंहि व्याकुळ झाला होता. प्रेमाचा आधार मिळतांच तो बाह्यतः शांत झाला. तथापि रात्रीं झोपेंतहि आपल्याला जवळ घेण्याविषयीं तो आपल्या आईला उद्देशून बोलत होता व रतनच्या आईला घट्ट बिलगत होता.

ती मंडळी योग्य वेळीं राजधानीला पोंचली. कारण एक दोन दिवसांतच प्रतापसिंह महाराजांच्या निधनानिमित्त दुखवट्याचा दरबार भरणार होता. त्यावेळीं दरबारचा एक मानकरी व महाराजांचा निकटचा आप्त या नात्यानें रतनच्या वडिलांना—मानसिंहांना हजर रहावयाचें होतें, तो त्यांचा हेतु सफळ झाला. दुखवट्याचा दरबार भरला त्या वेळीं राणीसरकार ज्यास मांडीवर घेतील त्यास आपला राजा मानून राजनिष्ठ रहाण्याबद्दल सरदार मानकऱ्यांनीं पडद्याच्या आंत बसलेल्या राणीसाहेबांसमोर जाऊन प्रतिज्ञा केल्या. संध्याकाळीं स्त्रियांचें मोठें मंडळ राणीसरकारांना भेटावयास गेलें. रतनच्या आग्रहामुळें रतनबरोबर बाळालाहि नेण्यांत आलें. या वेळीं बाळाचा पोषाख दरबारी पद्धतीचा होता. पायजमा, पायघोळ आंगरखा, डोक्याला फेटा व यापूर्वी चर्मपादुकांचा स्पर्शहि न झालेल्या पायांत चढाव, या एकंदर थाटाला बाळ जरी अनभ्यस्त होता तरी त्याबद्दल त्याला विशेष वाटलें नाहीं परंतु एक चिरवांछित वस्तु त्याला लाभली होती, तीमुळें त्याला विशेष आनंद वाटत होता. ती वस्तु म्हणजे त्याच्या कमरेला लटकविण्यांत आलेली चिमुकली तरवार ही होय. यावेळीं आपल्या आईबरोबर कांहीं दिवसांपूर्वी झालेलें संभाषण त्याला आठवलें. वडिलांसारखें आपण व्हावें ही आईची आत्यंतिक इच्छा, घोडे बाळगण्यास नसलेली आईची आडकाठी वगैरे गोष्टी त्याच्या मनांत उभ्या राहिल्या व वडिलांसारखें होण्यास साह्यभूत होणाऱ्या साधनांपैकीं एक आपणांस आज साध्य झालेलें पाहून त्यास आनंद होणें साहजिक होतें. अभिमानानें मस्तक उन्नत करून तो ललितकुंवरबाई व रतन यांच्याबरोबर स्त्रियांच्या दरबारांत गेला.

यापूर्वी त्यानें आपल्या गांवच्या सीमाहि पाहिलेल्या नव्हत्या. परंतु ज्या दिवशीं त्यानें सीमोल्लंघन केलें त्या दिवशीं त्याच्या पायावर कोणतें नक्षत्र पडलें होतें न कळे; तेव्हांपासून त्याच्या पायांना जी गति मिळाली होती तीमुळें प्रत्येक दिवशीं तो कल्पनातीत अशा नवनव्या परिस्थितींत पाऊल टाकीत होता.

त्याची महत्त्वाकांक्षी माता त्याच्या भविष्याविषयीं निरनिराळया महत्त्वाकांक्षांचे जे मनोरे मनांत उभारीत असे त्यांची मजलसुद्धां या वस्तुस्थितीपर्यंत पोंचलेली नव्हती. तेव्हां खुद्द कुमाराच्या विमल मनाला त्या स्थितीची कल्पना शिवणें तर केवळ अशक्यच. रतनच्या आग्रहामुळें ललितकुंवरबाईनीं त्याला

बरोबर घेण्यास संमति दिली व तोहि बालोचित कुतूहल व उत्साह या भावनांनीं त्यांच्याबरोबर गेला. या वेळीं रतन व कुमार यांना फार आनंद वाटत होता; परंतु मूर्तिमंत आनंद व उत्साह दोहों हातांला असूनहि ललितकुंवरबाईची वृत्ति मात्र खिन्न झालेली होती. आपली लाडकी मुलगी जर मुलगा असती तर किंवा हा मुलगा आपला असता तर? अशासारखे विचार मनांत आल्यामुळें त्या उदास झाल्या होत्या.

उलटपक्षीं तेथें आलेल्या कित्येक स्त्रियांच्या मनांत आनंदाच्या ऊर्मि उठत असतांहि बाह्यतः त्यांनीं कृत्रिम खिन्नता धारण केली होती. आजच्या प्रसंगीं उदासीनतेच्या देखाव्याचीच फार जरूर असल्यामुळें साहजिकपणेंच आलेली खिन्नता लपविण्याचा कृत्रिमपणा रतनच्या आईनें केला नाहीं.

एका विस्तीर्ण व भव्य दालनांत बैठकांची योजना केली होती. सरदार मानकऱ्यांच्या स्त्रिया आपली वैभवप्रदर्शनाची हौस क्षणभर बाजूला ठेवून अगदीं साध्या वस्त्रानिशीं आल्या होत्या. मात्र ज्यांना ज्यांना साधारण लहान मुलगे होते, त्यांनीं ते बरोबर आणले होते. रतन ही एकच मुलगी तेथें हजर होती. आपल्यासारखीं अनेक मुलें तेथें आलेलीं पाहून कुमाराला मौज वाटली. तेथील विविधता, भव्यता व स्तब्धता तो चौकसपणें पाहूं लागला. थोड्या वेळांत एकामागून एक ज्या विविध घटना घडत होत्या त्यांमुळें एखादा मोठा मनुष्यहि स्तंभित झाला असता. परंतु मातेच्या महत्त्वाकांक्षेचे कांहीं संस्कार त्याच्या मनावरहि घडलेले असल्यामुळेच कीं काय, हृदयावर उमटणाऱ्या अनेक प्रश्नचिन्हांना मनांतच दडपून बाह्यतः गंभीरपणें तो सर्व देखावा पहात होता.

इतक्यांत रिकाम्या मध्यासनाच्या बाजूला दोन दासी येऊन उभ्या राहिल्या. त्यांच्यामागून मंदमंद पावलें टाकीत राणीसाहेबांची स्वारी आली. त्यांनीं बिनकांठाचे वस्त्र परिधान केलें होतें. विस्तीर्ण ललाटावरील सौभाग्यचिन्ह दैवानें हिरावून नेल्यामुळें शून्य झालेला भालप्रदेश झांकेतोंपर्यंत त्यांनीं डोक्यावरून पदर घेतला होता. ढग आडवे आल्यामुळें पूर्ण चंद्रहि ज्याप्रमाणें तेजोहीन दिसतो, त्याप्रमाणें अर्धवट झांकलेलें त्यांचें सुंदर वदन म्लान दिसत होतें. त्या येतांक्षणींच सर्वांनीं त्यांना उत्थापन दिलें व त्या आसनस्थ झाल्यावर प्रत्येकीनें पुढें येऊन त्यांना नमस्कार केला. त्यानंतर मुलांची पाळी आली.

रतनचा नमनविधि आटोपल्यावर प्रत्येक मुलानें पुढें होऊन आपली चिमु-
कली समशेर राणीसाहेबांपुढें त्रिवार टेंकून आपलीं मस्तकें लवविलीं. अनभ्यस्त कुमाराला घरींच सूचना मिळालेली होती. त्यानेंहि इतरांच्या वागण्याची नक्कल हुबेहुब केली. राणीसाहेबांनीं त्याच्या मुद्रेकडे पाहिलें आणि सर्वत्र पसरलेल्या स्तब्धतेचा भंग करून त्यांनीं हळूच प्रश्न केला,

" बाळ तुझें नांव काय ? "

" माझें नांव कुमारसिंह ! "

हें उत्तर ऐकून ज्याप्रमाणें आच्छादित आकाशांत हलुच वीज चमकून नाहींशी व्हावी त्याप्रमाणें राणीसाहेबांच्या मुखावर बारीक हास्यरेषा उमटून गेली. त्यांनीं ललितकुंवरबाईकडे वळून प्रश्न केला—

" हा तुमचाच मुलगा ना ? "

परंतु हा अनपेक्षित प्रश्न ऐकून ललितकुंवरबाई अगदीं गोंधळून गेल्या. काय उत्तर द्यावें हें न सुचून त्या खालीं पाहूं लागल्या. आपल्या मानेनें होकारार्थी उत्तर दिलें आहे किंवा तसा अर्थ राणीसाहेबांनीं गृहीत धरला आहे हें त्यांना कांहींच समजलें नाहीं. त्या स्तब्ध राहिल्या, त्यावर राणी-साहेबही कांहीं बोलल्या नाहींत. इतर बायांनीं मात्र ती स्तब्धता फारशी भासूं दिली नाहीं. अशा प्रसंगीं बोलण्यासारखीं मामुली वहिवाटीचीं कांहीं वाक्यें पोक्त स्त्रियांनीं बोलून दाखविलीं; कोणीं दुःखाचे सुस्कारे सोडले व कोणीं निमूटपणें श्रोत्यांचें काम केलें. यानंतर लौकरच ही मुलाखत संपली.

हजर सभासदांपैकीं ज्यांचा राजवंशाशीं थोडा तरी संबंध होता अशा स्त्रियांना ह्या मुलाखतीचें विशेष महत्त्व वाटत होतें. कदाचित् आपलाच मुलगा राणीसरकारांच्या मनांत भरून गादीसाठीं त्या त्याचीच निवड करतील अशी आशा त्यांना वाटत होती. प्रत्येकीला आपल्या मुलाच्या ठायीं यापूर्वीं कधीं न दिसलेले अनेक सद्गुण आज दिसत होते व त्यांपैकीं एक तरि सद्गुण राणी-साहेबांच्या नजरेंत प्रामुख्यानें भरेलच अशीही त्यांना खात्री वाटत होती. आणि कोणाचा भाग्योदय होणार आहे हें जाणण्याची उत्कंठा इतर स्त्रियांना कांहीं कमी नव्हती.

राणीसाहेबांनीं कुमाराला व ललितकुंवरबाईनाच आपण होऊन जे प्रश्न केले त्यामुळें इतर स्त्रियांना थोडें वैषम्य वाटलें. ललितकुंवरबाई आपल्या जहा-

गिरींच्या गांवीं राहून क्वचित्प्रसंगीं प्राचीनपूरला येत असल्यामुळें त्यांच्याविषयीं कोणालाच फारसें ठाऊक नव्हतें. दोन्ही मुलें त्यांचींच असतील असाच सर्वांचा समज झाला. त्यांच्याच मुलाची राणीसाहेबांनीं चौकशी केली यावरून तोच त्यांच्या पसंतीस उतरतो कीं काय अशा भीतीनें सर्वांचीं मनें व्यग्र झालीं व त्यांची मत्सरग्रस्त दृष्टि ललितकुंवरबाईकडे वळली.

सर्वांच्या वैषम्याचा विषय झालेल्या ललितकुंवरबाईना वास्तविक आनंद व्हावयास पाहिजे होता; परंतु तसें न होतां त्यांना दुःख मात्र झालें. "ह्या मुलाची राणीसाहेबांनीं चौकशी केली, पण तो आपला नाहीं. हाय! तो आपला असता तर—" अशा विचारमग्न स्थितींत असल्यामुळें कोणाशीं औपचारिक बोलणेंहि त्यांना सुचलें नाहीं, तें पाहून इतर स्त्रियांना वाटलें,—"गर्वानें ललितकुंवरबाईना आकाश ठेंगणें झालें आहे. त्यांना आतांपासूनच आम्ही सरदारमानकरणी कस्पटासमान वाटूं लागल्या आहेत."

घरीं आल्यावर घडलेली हकीकत मानसिंहांना सांगण्याविषयीं ललितकुंवरबाई फार अधीर झाल्या होत्या; परंतु ते राजवाड्यांत गुंतलेले असल्यामुळें त्यांची गांठ पडली नाहीं. दुसऱ्या दिवशीं राणीसाहेबांकडून त्यांना मेणा आला. मुलांसह त्याहि राजवाड्यांत गेल्या.

सरदार, मानकरी व प्रजाजनांपैकीं प्रतिष्ठित सद्गृहस्थांनीं दरबारचें विस्तीर्ण दालन चिकार भरलें होतें. पडद्यापलीकडे स्त्रियांची व्यवस्था केलेली होती. रतनसह ललितकुंवरबाई येथें येऊन बसल्या. कुमाराला पुरुषमंडळींत पोंचविण्यांत आलें होतें.

सर्व निमंत्रित मंडळी आलेली पाहून मुख्य मंत्री उठले व पडद्याजवळ येऊन त्यांनी त्रिवार प्रणाम केला. नंतर सभाजनांकडे वळून त्यांनीं राणीसरकारचें फर्मान वाचून दाखविण्यास सुरुवात केली. सर्वांचीं हृदयें कानांत एकवटून आतां कोणाचें भाग्य उदयास आलेलें ऐकावयास मिळतें, या उत्कंठेनें अगदीं एकाग्र झालीं होतीं. आपल्या मुलाचें नांव निघतें कीं काय असें प्रत्येकाला वाटत होतें. मानसिंग मात्र या आशेला बळी पडले नव्हते. आपल्याला अशी आशा करण्याला जागाच नाहीं अशी त्यांची भावना होती; परंतु काय आश्चर्य! "आम्हीं पूर्ण विचारांतीं सरदार मानसिंगजी यांचे चिरंजीव कुमारसिंह यांना विधिपूर्वक दत्तक घेऊन राज्याभिषेक करण्याचें ठरविलें आहे.

आमच्या या योजनेला आपण सर्व सरदार, मानकरी आणि समस्त प्रजाजन संमति देऊन काल रोजीं गादीपाशीं घेतलेल्या राजनिष्ठेच्या आणाशपथा पूर्ण-पणें पाळाल अशी आम्हांस खात्री वाटते—"

पुढील वाचनाकडे कोणाचेंहि लक्ष्य नव्हतें. आपली हृदयस्थ आशा एका शब्दासरशीं विफल झाल्याचें ऐकून बहुतेकांस वाईट वाटलें. सर्वांची वैषम्य-युक्त नजर मानसिंह व कुमार यांच्याकडे आळीपाळीनें लागून राहिली. देवानें आपणांस केवढ्या वैभवगिरीवर चढविण्याचें योजिलें आहे या गोष्टीची कुमा-राला कल्पनाहि नव्हती. परंतु त्याच्यामुळें आपल्यापुढें केवढा मानमान्यतेचा सोपान खडा राहिला आहे या गोष्टीची जाणीव होऊनहि मानसिंहाची वृत्ति अस्वस्थ झाली. " हा आपला मुलगा ? " मानसिंहाचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. केवळ सांपडलेलें पोरकें पोर ! परवां ज्याचा प्रतिपाळ करा-यला कोणी नव्हतें, तो आज प्रजेचा प्रतिपालक ठरत आहे ! परवां नौकेंत बसायला ज्याला जागा नव्हती तो आज राज्यासनावर अधिष्ठित होणार ! केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन आपण ज्यास बरोबर आणलें, त्याच्या दयेची अपेक्षा आतां सर्वजण करणार ! आपणास मुलगा नाहीं म्हणून मुलाप्रमाणें वाढविण्यास आणलेलें हें मूल ! त्याच्याकडे आम्हां सर्वांची मालकी ईश्वर देत आहे. पुरुषाचें दैव केव्हां कसें उदयास येईल याचा नेम नाहीं असें म्हणतात, त्याचेंच हें प्रत्यंतर म्हणावयाचें.

ह्या अकल्पित प्रकारानें त्यांचें मन इतकें आश्चर्यचकित झालें कीं, ज्यांना मुलगा नसल्यामुळें राज्यतृष्णाहि नव्हती अशा निःस्पृह सरदारांनीं त्यांचें अभि-नंदन केल्याबद्दल नुसते औपचारिक आभार मानण्याचें त्यांना भान राहिलें नाहीं. इतरांना " काय डौल आला आहे पहा, आतांपासून इतका गर्व, मग पुढें कसें काय वागणार ? " सर्वांची दृष्टि आपणाकडेच लागलेली पाहून सर-दार मानसिंहांना स्वस्थ रहावेना. मानमान्यतेच्या लोभाला बळी पडून आपण घेतलेल्या राजनिष्ठेच्या आणाशपथा मोडीत आहोंत; आम्हां सरदारांच्या सचे-पणावरच जिचें सामर्थ्य अवलंबून आहे, त्या सात्त्विक माउलीच्या अनाथ स्थितींत तिच्याशीं प्रतारणा करीत आहोंत. किती हा आपला अधःपात ! आपल्या हिडीस हृदयाचाच हे लोक तीव्रतेनें धिक्कार करीत आहेत. सरदार मानसिंह उठले व पडद्याजवळ जाऊन हात जोडून म्हणाले,

" सरकार-" त्यांच्या घशाला कोरड पडली होती. विचारांची वावटळ इतकी जोराची सुरू होती कीं, त्यामुळें त्यांना जें बोलावयाचें होतें तें संगतवार उच्चारतां आलें नाहीं. अडखळत अडखळत ते म्हणाले, " सरकार, माझी विनंति-मी आपला अपराधी आहें. " हे शेवटचे दोन शब्द स्पष्ट उमटलेच नाहींत. ते पुढें म्हणाले—" अकल्पित रीतीनें हा मुलगा-" परंतु राणीसाहेबांनीं त्यांना पुढें बोलूंच दिलें नाहीं. त्यांना स्तुतीचा अत्यंत कंटाळा होता. आतां हे आपली अवास्तव स्तुति करतील असें वाटून त्या म्हणाल्या,

" समजलें, मला सर्व समजलें. आपण शांत व्हा. " राणीसाहेबांच्या आश्वासनानें मानसिंहजी खरोखरीच शान्त झाले. त्यांना वाटलें आपल्या पत्नीनें राणीसाहेबांना सर्व हकीकत सांगितली, आपला नैतिक अधःपात टळला, प्रतारणेच्या पातकापासून आपण मुक्त झालों या भावनेनें त्यांचें मन स्वस्थ झालें. फर्मान वाचून झाल्यावर राणीसाहेबांच्या आज्ञेनें कुमाराला गादीवर बसविण्यांत आलें. त्याच्या हातीं मृत-महाराजांची तलवार देण्यांत आली, मस्तकीं मुकुट ठेवून कपाळाला तिलक लाविला. त्या वेळीं राणीसाहेबांच्या आज्ञेनुसार थोरल्या महाराजांचें-मृतमहाराजांच्या वडिलांचें-जसवंतसिंह हें नामाभिधान कुमाराला देण्यांत आलें. लगेच सर्वांनीं उठून महाराज जसवंतसिंह यांचा जयजयकार केला. एकएकानें पुढे येऊन मस्तक लववून त्रिवार प्रणाम केला, व राजनिष्ठेची शपथ घेतली.

हा सर्व प्रकार चालला असतां त्यावर ललितकुंवरबाईच्या कानांचा व डोळ्यांचा विश्वास बसेना. आपण जागृत आहोंत कीं स्वप्नांत हेंच त्यांना कळेना. विचारांतीं आपल्या पत्नीनें केलेले स्पष्टीकरण त्यांना अपुरेंच वाटलें. राज्याभिषेक होऊन गेल्यानंतर जेव्हां राणीसाहेब अंतर्गृहांत गेल्या तेव्हां त्यांच्याबरोबर त्याहि गेल्या. गेल्यावर सद्गदित कंठानें त्या म्हणाल्या,

" सरकार, मघांशीं सांगणें होत होतें तेव्हां तें आपण पुरतेपणीं ऐकून घेतलें नाहीं. मला वाटतें सरकारांना सर्व समजलें नाहीं. आम्ही अपराधी आहोंत-" अशी प्रस्तावना करून त्यांनीं कुमाराचा सर्व वृत्तांत निवेदन केला. तो अद्‌भुत इतिहास ऐकून राणीसाहेबहि थक्क झाल्या. बराच वेळ विचार केल्यानंतर त्या गंभीरपणानें म्हणाल्या,

" आमची जरी दिशाभूल झाली तरी ईश्वरी इच्छेनेंच त्याचे पाय गादीला

लागले. श्रीकुलस्वामिनी स्वतः गादीचें रक्षण करीत असतां भलत्यासलत्याचे पाय गादीला कसे लागतील ? अजाणतेपणीं जरी गादीला पाय लागला तरी अंधत्व आल्याचीं उदाहरणें ऐकिवांत आहेत. त्याची तेजस्वी शांत मुद्राच तो उच्चकुलोत्पन्न असल्याची साक्ष पटविते. एवढ्याशा वयांत तलवार धरण्याची त्याची ऐट तरी कशी आहे पहा ! आम्हांला तर वाटतें तुम्हीं आम्हीं निमित्तमात्र झालों. तो स्वतः तर निर्मल बालक आहे. तुम्ही सुद्धां सर्व प्रकार आपणांकडून सांगत असतां आमच्याकडून ईश्वरानें त्याचीच निवड करविली. नुकताच ह्या हातांनीं त्याला गादीवर बसवून आशीर्वाद दिला. मामंजींचें नांव धारण करून आम्हीं त्याला राजा केलें. ते सर्वांना मान्यहि झालें. आमची कोणीही बुद्धिपुरःसर फसवणूक केलेली नाहीं. सर्व गोष्टी एकामागून एक अतर्क्य रीतीनें घडत गेल्या. यांत आम्हांला ईश्वरी सूत्रच दृढ दिसतें. इतक्या गोष्टी घडल्यानंतर आतां या पवित्र सिंहासनावरून त्याला ओढून काढून आम्हीं ईश्वरी इच्छेशीं विरोध करूं इच्छित नाहीं. तुम्हीं जसें आम्हांला सर्व स्पष्ट सांगून टाकलें तसेच आम्हींहि आमच्या मंत्रिमंडळाला ही गोष्ट जाहीर करूं."

प्रतापसिंह महाराजांनीं दत्तक घेण्याचा अधिकार सर्वस्वीं राणीसाहेबांना दिलेला होता. ही गोष्ट सर्वांना माहितच होती. त्यामुळें राणीसाहेबांच्या इच्छेला कोणींहि विरोध केला नाहीं.

यापुढें राणीसाहेब जसवंतसिंह महाराजांचे नांवानें राज्यकारभार पाहूं लागल्या. बालराजाच्या शिक्षणाची व्यवस्थाही उत्तम प्रकारें करण्यांत आली. निरनिराळे शिक्षक ठेवून प्रत्येक विषयाचें पद्धतशीर शिक्षण देण्यांत येत होतें. त्याच्या मातेनें आधींच त्याच्या मनोभूमीची चांगली मशागत केलेली होती. त्यामुळें प्रत्येक सुविचारबीज तेथें दृढमूल होऊं लागलें. तो तैलबुद्धीचा बालक प्रत्येक विद्या व कला थोडक्या वेळांत आत्मसात् करूं लागला. सर्व वेळ विद्याराधनांत जात असल्यामुळें व राणीसाहेबांच्या मातृवत् प्रेमामुळें त्याची आईच्या वियोगदुःखाची तीव्रता कमी कमी होऊं लागली. आईवेगळा झाला असतां त्याच्या दुःखानें जी समदुःखी झाली त्या रतनच्या सान्निध्याचें या कामीं अत्यंत सहाय्य झालें.

अशा रीतीनें वर्षामागून वर्षे निघून गेलीं व जसवंतसिंह महाराज वयांत

आले. योग्य वधू पाहून राणीसाहेबांनीं त्यांना चतुर्भुज केलें राणीसाहेब आतां विश्रांति घेत असून जसवंतसिंह महाराज राज्यकारभार पाहूं लागले.

जसवंतसिंह महाराज ज्या वेळीं सुखशैलाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान होऊन पत्नीसह आनंदानें कालक्रमणा करीत होते, त्या वेळीं त्यांची अनाथ आई दुःखाच्या दरींत खितपत पडली होती. ज्या काळांत तिच्या पुत्राचा झपाट्यानें भाग्योदय होत होता त्याच काळांत बिचाऱ्या मानकुंवरवर संकटांची परंपरा कोसळत होती. अत्यंत प्रिय अशीं दोन माणसें ज्या ठिकाणीं गेलीं त्याच ठिकाणीं आपलाहि देह पडावा या तिच्या आत्यंतिक इच्छेला दुर्दैव आडवें आलें. अवर्षण, दुष्काळ व सांथीचा ताप या तापत्रयीमुळें नवपूर गांव ओस पडलें. दुष्काळामुळें, उपासमारीनें व सतत सांथीमुळें नंतर गांव काळाच्या भक्ष्यस्थानीं पडला. गांव सोडून गेलेले थोडे लोक मात्र वांचले. मानकुंवरहि त्यांपैकींच एक होती. शेवटपर्यंत तेथेंच राहून शेवटीं तेथेंच देह पडूं देण्याचा तिचा निश्चय होता. परंतु पुष्कळ दिवसांत पोटांत अन्न नसल्यामुळें विकल होऊन पडलेल्या संज्ञाशून्य अवस्थेंत तिच्या भावाने तिला आपल्याकडे नेलें, व तिची चांगली जोपासना केली. त्यामुळें ती वांचली.

परंतु तेथेंहि राहून निभाव लागण्यासारखा नसल्यामुळें तीं बहिणभावंडें मोलमजुरी करून पोट भरण्यासाठीं दुसऱ्या गांवीं निघून गेलीं. तेथें त्यांना अत्यंत हालअपेष्टांत दिवस काढावे लागले. अशा रीतीनें बरींच वर्षे गेलीं. हार्दिक दुःखानें व इतर हालअपेष्टांनीं ती वास्तविक वयापेक्षां वृद्ध दिसू लागली. तिचा भाऊहि अगदीं थकल्यामुळें त्याला आपल्या गांवीं जाण्याची इच्छा झाली. तीं दोघे बहीणभावंडें त्यांच्या गांवीं परत आलीं, तेव्हां आधीं मोठ्या उत्कंठेनें मानकुंवर आपल्या घराकड धांवत आली परंतु हाय! तेथें तिचें घर कोठें होतें? बरींच वर्षे गांव ओस पडून राहिल्यामुळें तेथील सर्व देखावा अगदीं बदलून गेला होता. गांवांतून घराकडे जाण्याची चिरपरिचित वाट बुजून गेल्यामुळें तिला सांपडली नाहीं. जेथें मोकळी जमीन होती तेथें आतां दाट झाडी झाली होती. आपल्या हृदयाप्रमाणेंच भग्न झालेल्या घराचे कांहीं अवशेष इतस्ततः पडलेले तिला आढळले. त्यावरून या जागीं आपलें घर होतें असें तिला वाटलें. तिला घराची आतां कांहींच जरूर नव्हती. एवढ्या आतुरतेनें धांवत येण्याचें कारण तिला तीं चित्रें—ज्यांच्या योगानें दुःखाच्या वेळीं तिच्या मनाला शांति

लाभ होत असे तीं-पाहिजे होतीं. कुमार नाहींसा झाल्यानंतर जितक्या कसो-शीनें तिनें त्याचा शोध केला होता तितक्याच एकाग्रतेनें ती आतां तीं चित्र चिकटविलेलें झाड शोधूं लागली. परंतु हाय! याहि खेपेस तिच्या वांट्यास दारुण निराशाच आली. कांहीं केल्या तिला तें झाड व चित्रें सांपडत ना. कुमार पुन्हां नव्यानें नाहींसा झाल्याप्रमाणें तिला दुःख वाटलें. अत्यंत दुःखित मनानें परंतु ईश्वरावर भरिभार टाकून त्या भयाण जागेंतून ती परत घरीं आली.

सरदार मानसिंहांना व ललितकुंवरबाईना जसवंतसिंह महाराज आईबापां-प्रमाणें मानीत, आणि राजकुमारीवर त्यांचें लाडक्या बहिणीप्रमाणें प्रेम होतें. आपल्या जहागिरीच्या गांवीं सरदार मानसिंह सहकुटुंब रहात असतां तिक-डील रानांत शिकारीकरितां येण्याविषयीं रतनकुमारीनें एकदां महाराजांना आग्रहाचें निमंत्रण पाठविलें. त्याप्रमाणें मानसिंहांकडे महाराज येऊन राहिले.

तेथें असतांना निरनिराळ्या जंगलांत ते शिकारीस जात असत. एके दिवशीं सावजाच्या पाठीमागें लागून ते फार लांब दाट जंगलांत आले व तेथें त्यांची शिकार आटोक्यांतून नाहींशी झाली. त्यामुळें चिडून तें जंगल तोडून साफ करण्याविषयीं त्यांनीं हुकूम फर्माविला. ज्या दाट अरण्यांत आपण उभे आहोंत तें आपल्या जन्मभूमीचें रूपांतर आहे ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींही नव्हती. तथापि त्यांना असें वाटूं लागलें कीं, येथें जर एखादा किल्ला बांधला तर तो अनेक दृष्टींनीं सोईस्कर होईल. त्यांची ही कल्पना बरोबर आलेल्या मंडळीं-नाहि पसंत पडली. ती मंडळी म्हणाली, " असेंच झालें पाहिजे, सरकार. कित्येक वर्षांपूर्वी येथें एक लहानसें खेडें होतें. दुष्काळानें त्याची अशी दशा झाली. " आपल्या राज्यांतील एका गांवाची वस्ती उठून कित्येक वर्षे तेथें दाट जंगल माजावें या गोष्टीचें त्यांना फार वाईट वाटलें व आपल्या कल्पनेला मूर्तस्वरूप देण्याचा निश्चय कायम करून आपल्या कारभाऱ्याला त्यांनीं जरूर ते हुकूम दिले. त्यांत एक कलम असें होतें कीं, " जंगल तोडतांना इमारतीस उपयोगी असें लाकूड राखून ठेवून बाकीचीं जळाऊ लांकडें शेजारच्या गरीब गांवकऱ्यांना वांटून द्यावीं. " किल्ल्याच्या कामाला लौकर सुरुवात करण्याचा हुकूम असल्यामुळें जंगल तोडण्यास ताबडतोब सुरुवात झाली.

नेमलेल्या दिवशीं लांकडें नेण्यास शेजारच्या गांवचे लोक आले होते. त्यांत मानकुंवरही आपल्या भावाच्या वतीनें आली होती. आपला भाऊ फार आजारी

असल्यामुळें त्याला येतां आलें नाहीं, याबद्दल ती तेथील कामगाराची क्षमा मागत होती व त्याच्या वांटणीचीं लांकडें आपणांस देण्याबद्दल विनंति करीत होती. तिच्या केविलवाण्या शब्दांकडे दुर्लक्ष करून तो कामगार उर्मटपणें म्हणाला,

" तो आला नाहीं त्याअर्थी तुला कांहीं मिळणार नाहीं. "

परंतु तेथें पहाणी करीत फिरत असलेली महाराजांची स्वारी त्याच बाजूकडे येतांना पाहून कामगारानें जीभ आवरती घेतली. तरी महाराजांना त्याचें उर्मट उत्तर ऐकूं आलेंच होतें. जवळ आल्यावर मानकुंवरची ती दीन मुद्रा व दरिद्री वेष पाहून त्यांना तिची फार दया आली. आपण जिची कींव करतों ती आपली आईच आहे हा विचार त्यांच्या मनांत येणें शक्यच नव्हतें. त्यांनीं कामगाराकडे वळून प्रश्न केला,

" त्या बाईला लांकडें कां देत नाहीं ? "

यावेळीं आपली धडगत नाहीं हें त्याला कळून चुकलें; परंतु तितक्यांत त्याच्या सुपीक मेंदूतून एक बचावाची युक्ति निघाली, तिचा अवलंब करून तो म्हणाला,

" सरकार ! ह्या बाईला फार हांव आहे. मी तिला हीं लाकडें देत असतां ती हें सबंध झाड मागते. सर्पणाला तिला हीं लांकडें बरीं आहेत. एवढें मोठें झाड तिला कशाला ? " असें म्हणून त्यानें एका अतिशय मोठ्या वठलेल्या वृक्षाकडे अंगुलिनिर्देश केला.

यावर महाराज म्हणाले,

" काय हरकत आहे ? तें झाड कांहीं इमारती लांकडाचें नाहीं. देऊन टाका तिला. "

" एवढें मोठें झाड ता नेणार तरी कशी ? "

परंतु महाराजांनीं आपली भ्रुकुटि वक्र करून सत्तादर्शक आवाजांत म्हटलें, " चूप, तें झाड तिलाच द्या. कापून चिरून तिच्या घरीं पोंचतें करा. " असें म्हणून ते पुढें निघाले.

आपली युक्ति आपल्याच अंगाशीं आलेली पाहून कामगारहि मनांत चरफडत हुकुमाची अंमलबजावणी करण्यास गेला. बिचारी मानकुंवर एकंदर प्रकारानें अगदीं स्तंभित झाली होती. तिच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रु गळत

होते. तोंडांतून आशीर्वचनें निघत होतीं. अत्यंत नम्रभावानें तिनें हात जोडले व आपल्या दयाळु राजाला दीर्घायुषी करण्याबद्दल अंतःकरणपूर्वक ईश्वराची करुणा भाकली.

गरीब बिचारी मानकुंवर ज्याच्या भेटीसाठीं आज इतकीं वर्षे सारखी ईश्वराला आळवीत होती, ज्याच्या दर्शनसुखासाठीं व सुधामधुर वाणी ऐकण्यासाठीं तिचे नेत्र व कर्ण आज कित्येक वर्षें हपापलेले होते, तो तिचा हृदयाचा ठेवा सन्मुख उभा असतांना, तिचें तें हरपलेलें पुत्ररत्न दृष्टीच्या आटोक्यांत आलें असून व त्याचे अमृततुल्य शब्द कानीं पडत असूनहि ती त्याला ओळखूं शकली नाहीं ! आपल्यासारख्या दीन दरिद्री स्त्रीसाठीं ज्यानें इतके श्रम घेतले त्या आपल्या दयाळु राजाचें ती पुन्हां पुन्हां अभीष्ट–चिंतन करीत होती.

इकडे तें मोठें झाड तोडण्याचें काम झपाट्यानें चालू झालें. झाडाचे चिरण्याजोगे तुकडे कापून झाले व अगदीं खालचा तुकडा चिरण्याच्या उद्देशानें त्याच्यावरील साल काढीत असतां आंतून दोन चित्रें बाहेर पडलीं. मानकुंवरनें झाडाला खांच पाडून आंत बसविलेलीं तीं चित्रें होतीं. इतक्या दीर्घ कालांत झाडाच्या विस्ताराप्रमाणें सालहि चोहोंबाजूंनीं वाढत जाऊन चित्रावर पसरत पसरत शेवटीं खांच बुजून जाऊन सालीच्या आच्छादनाखालीं तीं चित्रें झांकलीं गेलीं. मायलेंकरांना परस्परांची ओळख पटावयास महत्त्वाचा पुरावा म्हणून तीं उपयोगीं पडावीं याकरितांच जणु काय तीं चित्रें निसर्गानें इतक्या काळजीपूर्वक सुरक्षित ठेवलीं ! वास्तविक प्रकार कोणालाच माहित नसल्यामुळें तीं चित्रें पाहून ते लोक निरनिराळे तर्क करून आपापसांत बोलूं लागले.

‘ काय आश्चर्य आहे ! झाडाच्या आंत देवांचीं चित्रें कशीं आलीं ? इथें ईश्वराचें वास्तव्य असलें पाहिजे खास ! महाराजांनीं चांगलें मंदिर बांधून त्यांत देवाची स्थापना करावी म्हणून या रूपानें त्यानें दर्शन दिलें असावें. असलें अद्भुत आश्चर्य आपण जन्मांत ऐकलें नव्हतें. देवाची करणी, दुसरें काय ? ”

ही बातमी महाराजांनीं ऐकल्यावर ते तेथें आले, आणि तीं चित्रें हातांत घेऊन बारकाईनें पाहूं लागले.

‘ खरोखरच फार सुंदर चित्रें आहेत हीं. कृष्णजन्माच्या वेळचा देखावा दिसतो. बाळकृष्णाला सुरक्षित स्थळीं पोंचविण्यासाठीं ही देवकी त्याला वसु-



देवाच्या हातीं देत आहे, त्यावेळचे मनोविकार तिच्या मुद्रेवर किती हुबेहुब उमटविले आहेत. कृष्णाचें बाळसेदार रूप आणि मस्तकावरील हें तेजोवलय तरी किती प्रमाणबद्ध आहे! कलेच्या दृष्टीनें खरोखरच हीं अत्युत्कृष्ट चित्रें आहेत. कोणा भाविक माणसानें तीं ह्या झाडांच्या खांचेंत ठेविलीं असावींत. कालांतरानें ती खांच मिटून आंत हीं चित्रें झांकलीं गेलीं इतकेंच. यांत अद्भुत असें कांहींच नाहीं."

इतकें बोलून होतें न होतें तोंच महाराजांच्या तोंडून एकदम आश्चर्योद्गार निघाला! स्वर कंपित झाला. हाताला, नव्हे सर्व शरीराला, कंप सुटला. यावेळीं ते चित्राची मागील बाजू पहात होते. मागच्या बाजूस त्यांना एक लेख आढळला. त्याच्या वाचनानेंच त्यांची अशी स्थिति झाली. तो लेख पुढील-प्रमाणे होताः—

> "माझ्या लाडक्या कुमारसिंहा—बाळा, तुला या झाडाखालीं मी डोळे भरून पाहिलें होतें, त्यानंतर आतां तूं कुठें आहेस तें मला माहीत नाहीं; पण जिथें तूं असशील तिथें देव तुझा पाठीराखा असो. देव-कीच्या बाळाचें जसें रक्षण झालें तसें तो माझ्या बाळाचें रक्षण करो!
>
> तुझी दुःखी आई
>
> **मानकुंवर.**"

सदरील लेख वाचून विजेच्या वेगानें एक विचार त्यांच्या मनांत चमकून गेला. मीच तो हरवलेला मुलगा. माझें नांव कुमारसिंहच होतें. माझ्याच आईनें हीं चित्रें येथें ठेविलीं काय? माझी दुःखी आई आतां कोठें असेल?

मानकुंवरबा आपल्याबरोबर आलेल्या मंडळींबरोबर नदीवर पाणी प्यावयास गेली होती, ती या वेळीं परत येत होती. झाडाच्या गर्भात चित्रें सांपडल्याचें अद्भुत वर्तमान लोकांच्या तोंडून तिनें ऐकलें, त्याबरोबर वायूच्या वेगानें ती पुढें आली व महाराजांच्या हातीं तीं चित्रें पाहून सद्गदित स्वरानें म्हणाली, "महाराज, तीं चित्रें माझीं आहेत. त्यांच्या मागें पहा; माझें अन् माझ्या बाळाचें नांव तिथें लिहिलेलें आहे. ह्या इथेंच माझा बाळ मला अंतरला, तें दुःख हलकें व्हावें म्हणून हीं चित्रें मीं झाडाला खांच पाडून तींत ठेवलीं होतीं. माझा कुमार इथें झाडाखालीं झोंपला होता तसा टाकून मी गेलें. तीच त्याची माझी शेवटची भेट. हाय हाय! बाळ, तुझी माझी जिथें ताटातूट झाली

ती जागा मला पुन्हा सांपडली, तसा लाडक्या, तूं मला पुन्हा सांपडणार नाहींस का रे? वेडें मन, उगाच आशेला गुंततें. आतां ह्या जन्मीं —"

असें बोलून ती फुलून फुलून रडूं लागली. एकदम पुष्कळ बोलल्यामुळें व रडल्यामुळें तिला ग्लानि आली. तोल जाऊन आतां ती पडणार इतक्यांत स्वतः महाराजांनीं पुढें होऊन तिला सांवरून धरलें. तिचा हृदयद्रावक विलाप ऐकून व तिची ती स्थिति पाहून त्यांच्या हृदयाचे शतशः तुकडे झाले क्षणांत तिचें दुःख नाहींसें करणारे शब्द त्यांच्या अगदीं जिभेवर आले होते. परंतु त्यांनी ते ओंठाबाहेर येऊं दिले नाहींत. कदाचित् त्या शब्दाघातानें विपरीत परिणाम होईल असें त्यांना वाटलें. त्यांनीं आपल्या हातांनीं तिचे अश्रु पुसले व तात्पुरत्या उभारलेल्या तंबूंत तिला नेऊन बसविलें. नंतर मृदु स्वरानें ते म्हणाले,

"बाई! तुझा मुलगा जिवंत असून तो माझ्या चांगला परिचयाचा आहे। त्याला बोलावून लौकरच तुला भेटवितों."

याप्रमाणें अत्यंत प्रेमळपणानें तिच्याशीं बोलून स्वतःच्या भेटीविषयीं तिचें मन त्यांनीं तयार केलें. नंतर हळूच पुढें होऊन अश्रुपूर्ण नेत्रांनी व सद्गदित कंठानें ते म्हणाले,

"आई! मीच तुझा अपराधी कुमार. मींच तुला दुःखांत लोटून दिलें होतें."

"काय? तूं माझा बाळ! मी स्वप्नांत तर नाहीं?" असें म्हणून तिनें त्याला घट्ट हृदयाशीं धरलें.

"नाहीं; आई, तूं स्वप्नांत नाहींस."

दोघांच्याहि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. हुंदक्यांमुळें त्यांना पुढें बोलवेना. तो देखावा पाहून सर्वांचे डोळे अश्रूंनीं ओले झाले. शेवटीं महाराज म्हणाले,

"आई, तुला मीं फार कष्टविलें. परंतु शेवटीं ईश्वरानें आपली भेट करविली. आतां तुझीं सगळीं दुःखें दूर होतील. खरेंच आई, तुझ्या आशीर्वादानें व ईश्वराच्या कृपेनें आजचा हा दिवस दिसला. ह्याच जागीं आपली ताटातूट व्हावी आणि तेथेंच पुन्हां भेट व्हावी हा ईश्वरी योगायोग नव्हे काय! आणि ईश्वरानें आम्हीं एकमेकांना ओळखण्याचें साधन-तीं चित्रें-सहसा कल्पना

करतां येणार नाहीं-इतक्या कुशलतेनें सुरक्षित ठेवलें व योग्य वेळीं प्रकट केलें हें त्याचें केवढें कौशल्य ! ' ईश्वरी लीला अगाध आहे ' हेंच खरें. "

" ईश्वरी लीला अगाध तर खरीच ! पण ' तो जें जें करतो तें आपल्या बऱ्याकरितांच असतें ' या साधूच्या वचनावर माझी आतां श्रद्धा बसली. त्या वचनाच्या सत्यतेचा आज मला पूर्ण प्रत्यय आला. मी मोहवश होऊन त्याला दोष देत होतें-पण तुला माझ्यापासून दूर करण्यांत त्याचा चांगलाच हेतु होता. माझ्याजवळच त्यानें तुला ठेविलें असतें तर लाडामुळें कदाचित् मी तुला बिघडवून टाकलें असतें. म्हणून त्यानें तुला माझ्यापासून दूर केलें. तुझी सर्वतोपरी उन्नति करून आतां माझ्या असहाय स्थितींत त्यानें माझा आधार मला परत दिला. त्याच्या योजनेचा जों जों विचार करावा तों तों मति कुंठित होते. किती कुशलतेनें त्यानें हा योग घडवून आणला बरें ! "

कृतज्ञतेनें तिचें हृदय उचंबळत होतें. तिचे हात आपोआप जोडले गेले. तिनें ईश्वराला नमस्कार केला.

महाराजांच्या मातेचा शोध लागल्याचा वृत्तांत जेव्हां सरदार मानसिंग यांना समजला, तेव्हां ते स्वतः त्या ठिकाणीं आले. एकंदर वृत्तांत ऐकून त्यांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. ते म्हणाले,

" काय ? महाराजांच्या वडिलांचें नांव विजयसिंह ? हें नांव तर माझ्या धाकट्या चुलतभावाचें आहे. गरीब कुळांतील मानकुंवरबाईबरोबर माझ्या वडिलांच्या संमतीशिवाय त्यानें विवाह केल्यामुळें त्यास त्यांनी घरांतून हांकून लाविलें होतें व त्याचा जमीनजुमला आमच्या जहागिरीला जोडून टाकला होता. ही गोष्ट जरी मला आवडली नव्हती तरी ती मी स्वतः केलेली नाहीं अशा समजुतीनें तें अपहृत ऐश्वर्य आजपर्यंत मी उपभोगीत आलों. ईश्वरा, खरोखर तुझी लीला अगाध आहे ! तुझ्या इच्छेशिवाय एक पानहि हालूं शकत नाहीं. तुझी सत्ताच प्रबळ आहे. माझ्या क्षुद्र मनाला एक प्रकारचा अहंकार वाटत होता. होय, कबूल करणें भाग आहे कीं, महाराजांना हल्लींचें पद प्राप्त करून देण्यास मी कारण झालों असा मला खरोखर मोठा गर्व वाटत होता; तो किती अस्थानी आहे तें ईश्वरानें अशा प्रकारें सिद्ध करून दाखविलें. आजच्या प्रसंगीं एकच रहस्य उजेडांत आलें नसून दोन कोड्यांचा उलगडा झाला आहे. बाळ कुमारसिंह !-महाराज ! क्षमा करा; आपुलकीनें बोलल्याशिवाय आज

मला रहावत नाहीं. आपल्या मातुःश्रीचे वास्तविक हक्क बुडवून जो मी नैतिक अधःपात करून घेतला होता, त्यांतून माझ्या रतननें मला वांचविलें. आपणांस बरोबर घेण्यास तीच कारण झाली. नाहीं तर या पापाचें क्षालन या जन्मीं माझ्या हातून झालें असतें कीं नाहीं ईश्वर जाणे. ”

ही हकीगत ऐकून सर्वांचे डोळे कृतज्ञतेच्या अश्रूंनीं भरून आले. इतक्यांत रतनहि विजयकुमारी राणीसाहेबांसह तेथें आली. प्रत्यक्ष प्राचीनपूरची राज्ञी, आपली सून, आपल्या पायांवर मस्तक ठेवीत आहे हें दृश्य पाहून राजमाता मानकुंवरबांना ईश्वरी लीलेचे कौतुक वाटलें. आणि बाळ युवराजांना जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. आनंदानें त्या म्हणाल्या—

“ देवा, मला दीर्घकालपर्यंत दुःखाच्या गर्तेत खितपत ठेवलें होतेंस. माझें दुःख जितकें मोठें होतें त्या मानानें मला आतां सुखहि फार मोठें दिलें आहेस. अहाहा ! देवा, तूं किती दयाळु अन् उदार आहेस ! ज्या जागीं आमचा वियोग झाला त्याच जागीं आमची भेट करविलीस ! ”

“ खरेंच, हा एक विलक्षण योगायोगच म्हणायचा. ”

रतनकुमारी मध्येंच म्हणाली, “ मला वाटतें, या विलक्षण योगायोगाचें कांहीं तरी स्मारक करावें. महाराज जो किल्ला बांधणार आहेत, तो या जागींच बांधावा आणि त्याला ‘ यशवंत ’ असें नांव द्यावें. ”

या सूचनेला कोणींच विरोध केला नाहीं. सद्गदित स्वरानें राजमाता मानकुंवरबाई म्हणाल्या,

“ होय. माझा कुमार यशस्वी होऊन आला, माझ्या आशा महत्त्वाकांक्षांची पूर्तता करून मला भेटला. माझ्या यशस्वी बाळामुळेंच मी धन्य झालें. खरेंच, कुमार ! जग तुला महाराज म्हणो, मी माझ्या बाळाला यशवंतच म्हणणार. देवा, माझ्या बाळ यशवंताला उदंड आयुष्य दे. ”

सर्वांच्या तोंडून एकच उद्गार निघाला—

“ तथास्तु. ”

# " टी–पार्टी. "

निरनिराळ्या सुधारणा, पक्षोपपक्ष, नवीन मतें या विषयांची मला जितकी माहिती होती तितकीच ' पार्टी ' या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या संमेलनाची होती. अर्थात् पार्टी, टी-पार्टी हीं नांवें मला ऐकूनच ठाऊक होतीं. इकडच्या बरोबर मलाही कधीं कधीं पार्ट्यांचीं आमंत्रणें येत. परंतु तिथें मी कधीं गेलेंच नव्हतें. देवाच्या कृपेनें मला चार मुलं बाळं आहेत. त्यांना टाकून रिकामटेकड्यासारखं लोकांच्या घरीं चहा उकळायला जायला मला कुठली सवड ?

इकडून मला नेहमीं म्हणायचं–" तूं एक शतक मागें आहेस. सुशिक्षित समाजांत गेल्याआल्याशिवाय तुझ्यांत सुधारणा होणार कशी ? "

परंतु मी कांहीं ऐकलं नाहीं, अन् सभापार्ट्यांनाही गेलें नाहीं. परंतु परवां अगदीं असं एक कारण झालं कीं त्यामुळें माझा इतक्या वर्षांचा क्रम सोडून मला पार्टीला जाण्याचं अतिशय अगत्य वाटलं. त्याचं कारण अन् त्या वेळचा अनुभव मी आतां सांगणार आहें.

लग्न झाल्यापासून पहातें मीं, इकडचा संध्याकाळचा कार्यक्रम म्हणजे शाळेंतून क्लब अन् तिथून थेट घरीं असा असायचा. साडेआठांपुढें रात्रीं बाहेर असायचं नाहीं. ह्या क्रमांत एके दिवशीं अंतर पडलें. रात्रींचे दहा वाजतां येणें झालें. मीं चौकशी केली तेव्हां म्हणायचं–"......ते प्रान्तसाहेब आले आहेत ना ? त्यांची बायको माझी विद्यार्थीण होती. त्यांच्याकडे भेटायला गेलों होतों. "

हा क्रम नित्याचा झाला. रोज उशीर होऊं लागला. तेव्हां मी म्हटलें " रोज रोज तिकडे काय जायचं ? " तेव्हां उत्तर दिलें " विद्वानांच्या सहवासांत वेळ केव्हां जातो तें कळतच नाहीं. मी लौकर परतण्याचा बेत करून जातों. परंतु बोलण्यांत वेळेचें भानच रहात नाहीं. प्रांतांची बायको एम्. ए झालेली आहे. पूर्वीं ती ***संस्थानांत लेडी सुप्रिन्टेन्डेन्ट होती. दोन वर्षां पूर्वीं तिचें लग्न झालें. तिच्या पूर्वींच्या आणि हल्लींच्या स्वभावांत किती तरी अंतर पडलें आहे. हायस्कूलमध्यें शेवटपर्यंत मी तिचा शिक्षक होतों. तेव्हा ती व्रात्यपणा करून कितीतरी त्रास देत असे; आणि आतां किती तरी भार

दस्त झाली आहे! पण मनाचा मोकळेपणा पूर्वीसारखाच आहे. " हे माझे गुरुजी " असें म्हणून तिनें माझी प्रांतसाहेबांशीं प्रथम ओळख करून दिली. तेही फार विनोदप्रिय आहेत. त्यांच्याबरोबर आमचे अनेक विषयांवर वादविवाद होतात. सरलाबाईचीं मतें आणि तीं प्रतिपादन करण्याची शैली पाहून मला फार धन्यता वाटते. प्रत्येक गोष्टींत त्यांची विशाल बुद्धिमत्ता दिसून येते. परवां असें झालें. बोलतां बोलतां सरलाबाईनीं माझीं कांहीं मतें कशीं चुकीचीं आहेत तें सप्रमाण सिद्ध केलें. अगदीं चूक कबूल करायला लावलेंच मुळीं. तेव्हां प्रांत साहेब म्हणाले " गुरूसे चेला सवाई म्हणतात तसेंच झालें हें! " मी म्हणालों-" शिष्याकडून पराभव करून घेण्यांत गुरूचाच गौरव असतो!"

हें प्रवचन ऐकून मी तर अगदीं थक्कच होऊन गेलें. विद्यार्थीण म्हणजे एक बायको माणूस ती काय? अन् ती पुरुषांशीं वादविवाद करते काय? तिच्या नवऱ्याला तरी कसं खपतं हें! मीं अशी वागलें तर इकडे कांहीं आवडणार नाहीं खास. आणि मीं हें बोलूनही दाखविलें. त्यावर म्हणणें झालें,

" वा, कां नाहीं आवडायचें! तूं वादविवाद करूं लागलीस, असे सर्व विषय जर तुला बुद्धिगम्य झाले तर मला कां नाहीं आवडणार? आवडलेंच पाहिजे. म्हटलें आहेना? " गुणाः पूजास्थानं "

" पुरे, पुरे झाली थट्टा. मी कुठं एवढी विद्वान् आहें? पण इकडे एवढ्या परीक्षा दिल्या अन् बायकोमाणसाकडून पराजय करून घेतला, कांहीं अपमान वाटला नाहीं? "

" छेः, त्यांत कसला अपमान अन् पराजय! आपलीं मतं जर चुकीचीं असलीं आणि ती चूक जर कोणी सप्रमाण दाखविली तर नको का कबूल करायला! अन् बायको माणसाचं म्हणतेस, परंतु विद्वत्तेशिवाय योग्यता येत नसते. बायको असो, पुरुष असो, विद्वत्तेला मान हा दिलाच पाहिजे. नाहींतर मूर्खांत गणना व्हावयाची! "

इकडे शहाणपणाचा म्हणून पत्करलेला मार्ग मला तरी मूर्खपणाचा वाटला. परंतु बोलून दाखविण्याचा अमर्यादपणा मीं केला नाहीं. मला स्तब्ध राहिलेली पाहून पुढें म्हणायचें,

" कां? चूप कां? सरलाबाईना पहाण्याची इच्छा आहे का? खरेंच सांगतों. एकदां तरी चल त्यांच्याकडे. अन् शिक्षणानें किती बहुश्रुतपणा येतो तें पहा.

तुला आणायला सरलाबाई नेहमीं सांगतात. प्रांतसाहेबही म्हणत होते, " तुमची हरकत नसेल तर एकदां घेऊन या कुटुंबाला. "

' आमची हरकत नाहीं. पण तुमची असणार हें मला ठाऊकच. म्हणून परवां त्यांच्याकडे स्त्री-पुरुषांची मिश्र पार्टी झाली तेव्हां तुला त्यांचें आग्रहाचें आमंत्रण होतें. पण तूं येणार नाहींस ही खात्री. तेव्हां तुला मी सांगितलें नाहीं. पण तेथें मात्र खोटें बोलावें लागलें थोडें. बाळयाला ताप आला म्हणून येतां आलें नाहीं. असें सांगितले कांहीं तरी ! "

" छिः, शेवटीं खोटंहि बोलायचं ना ! "

मीं स्वगत म्हणालें—" इडापिडा टळो. माझ्या बाळाला कां ताप आणायचा. मनुष्य एकाद्या नादीं भरलं म्हणजे लाडक्या लेकराचंहि त्यास कांहीं वाटेनासं होतं. स्वारी किती सरळ अन् शहाणी मी आजवर समजत होतें ! पुरुषांच्या मनाला कांहीं बंधन नसतं म्हणतात तेंच खरं. "

वरीलप्रमाणें माझे विचार चालले असतां मला इकडचा राग तर आलाच. पण असूयेच्या वाऱ्यानें माझें डोकें कमी भडकलें नव्हतें. त्यामुळें माझ्यानें कांहीं बोलवलें नाहीं. हें एका अर्थी बरेंच झालें. मला स्तब्ध पाहून स्वतः म्हणायचं,

" काय रुचलें नाहीं वाटतें आमचें बोलणें ? बरें बुवा ! परत घेतों आम्हीं कांहीं अधिक उणें झालें असेल तें. पण खरेंच सांग, एकदां येणार कीं नाहीं तूं सरलाबाईकडे ! त्यांचा मुक्काम आतां थोडेच दिवस आहे. पुढील रविवारीं त्यांच्याकडे पार्टी आहे. मागच्याप्रमाणें मिश्र नाहीं. वेगवेगळी आहे. तूं आलीस तर भेटीचा योग येईल. नाहीं तर अशी संधि आणूं म्हटल्या यायची नाहीं. "

नेहमींचें बोलणेंच रसाळ असायचें, व कितीहि राग आला असला तरी तो त्यांत विसरून जावयाचा हा नेहमींचाच अनुभव होता. परंतु आजचा प्रसंग अपवादरूप ठरला. असूयेच्या आगीनें माझें मन पोळत होतें. शिकस्तीच्या प्रयत्नानें मनोविकार दडपून पार्टीला जाण्याचें मीं कबूल केलें. मला वाटलें मीं येणार हें ऐकून बरें वाटणार नाहीं. परंतु उलट ' मी येणार ' हें ऐकून आनंद झालेला दिसला. तेव्हां मात्र मला आश्चर्य वाटलें.

* * *

शेवटीं तो अपूर्व आदित्यवार उजाडला. " बरोबरच जाऊं " असें स्वतः म्हणायचं. परंतु ' रमाबाईबरोबर मी येईन ' असें सांगितल्यावर शेवटीं स्वारी गेली व मीहि निघण्याच्या तयारीस लागलें. मुलें शेजारच्या काकूंच्या स्वाधीन केलीं; व मी रमाबाईकडे गेलें. त्या चांगल्या शिकल्या सवरलेल्या होत्या. सुशिक्षित व श्रीमंत समाजांत वागलेल्या मैत्रिणीच्या सोबतीची आज मला जरूरच होती.

त्या म्हणाल्या, " पांचाला जायचं मग इतकी घाई कां ? " परंतु मीं तें ऐकलें नाहीं. थोडें आधीं गेलेलें बरें असें मला वाटलें. आम्हीं गेलों तेव्हां शिपायानें आम्हांस दिवाणखान्याची वाट दाखविली. तेथें एक मुलगी होती तिनें आम्हांस बसावयास सांगितलें. आम्ही सरलाबाईंची चौकशी केली तेव्हां ती म्हणाली, " माईसाहेब फराळाचं करीत आहेत. इतक्यांत येतील " हें ऐकून मला आश्चर्य वाटलें. शिकलेली व श्रीमंत बाई स्वतः फराळाचें करीत आहे हें ऐकून कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं ?

थोड्याच वेळांत दारावरचा रेशमी पडदा दूर सारून एक सुस्वरूप तरुणी हास्यमुखानें दिवाणखान्यांत आली. तिच्या पायांत गवती सपाता होत्या आणि ती इंदुरी लुगडें नेसलेली होती. तिचा एकंदर पोषाख अगदीं साधा होता. दागदागिने तर कांहींच नव्हते असें म्हटलें तरी चालेल. तरी सुद्धां ती सुंदर दिसत होती. विशेषतः तिची मुद्रा फार तेजस्वी होती. ह्याच त्या सरलाबाई ऊर्फ माईसाहेब हें आम्हीं सहज ओळखलें. त्यांनीं आम्हांस हात जोडून नमस्कार केला व आम्हींहि प्रतिनमस्कार केला. मला थोडा वेळ थांबावें लागलें याबद्दल त्यांनीं माझी क्षमा मागितली. सुशिक्षित व श्रीमंत बाईची माझ्याशीं ही आदराची व मोकळेपणाची वागणूक पाहून मला फार कौतुक वाटलें.

इतक्यांत इतर आमंत्रित स्त्रियाहि आल्या. प्रत्येक येणाऱ्या बाईचें त्या हास्य-मुखानें स्वागत करीत व दुसऱ्या स्त्रियांना तिचा परिचय करून देत. प्रत्येक बाईला त्यांनीं कांहींना कांहीं माहिती विचारली. प्रत्येकीशीं त्या मोकळेपणानें बोलत. जणूं काय त्यांचा पूर्वीपासून परिचय आहे असेंच ऐकणाऱ्यास वाटावें.

प्रत्येक बाईच्या मुलाबाळांची त्यांनीं चौकशी केली. ज्यांना मुली होत्या त्यांना, मुलींना शिक्षण कोणत्या प्रकारें देतां ? मुलींच्या शिक्षणांत कसा काय फरक करावा असें तुम्हांला वाटतें ! येथें स्त्रियांनीं एकत्र जमून विचारविनिमय

करण्याचीं काय साधनें आहेत? इत्यादि प्रश्न त्या सारख्या विचारींत होत्या. त्यांच्या ह्या प्रश्नांना खरोखर नकारार्थींच उत्तर देणें भाग होतें. परंतु कमलिनी-बाईनीं बाजू सांवरली. त्या म्हणाल्या,

" मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देतों तर काय झालं? माझ्या सर्व मुली मीं कन्याशाळेंत घातल्या आहेत. त्यांनीं फक्त जेवावं अन् शाळेंत जावं. घरांतलं काम त्यांच्याकडून अगदीं करवून घेत नाहीं. म्हटलं, आहे बायकांचाच जन्म; पुढें आहेतच सगळीं गृहकृत्यें करायचीं. आतांपासूनच कशाला ताप! शिवाय गायनाला मास्तर ठेवले आहेत. हल्लींच्या पद्धतीनं सर्व झालं पाहिजे ना? नाहींतर लग्न होतांना पंचाईत! "

सरलाबाई म्हणाल्या, " गृहशिक्षणाचं महत्त्व सर्वांत जास्त आहे. मुलांच्या आचारविचारांकडे लक्ष देणें विशेषत: मुलांचं शील बनविणं ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. " यावर नलिनीबाई म्हणाल्या,

" खरंच तें, शिवाय नुसतं मुलांच्या शिक्षणाकडेच लक्ष देऊन नाहीं भागा-यचं. त्यांच्या शरीरप्रकृतीकडेहि लक्ष द्यावयाला हवं. त्यांच्या वयाच्या मानानें भरपूर व योग्य अन्न त्यांना दिलं पाहिजे, तें त्यांना चांगलं पचतं कीं नाहीं हेंहि पाहिलं पाहिजे. शिवाय त्यांचं न्हाणं, धुणं, कपडे वगैरे स्वच्छ ठेविलें पाहिजे. ह्या कामीं मी एक स्वतंत्र बाईच ठेविली आहे. म्हटलं आपल्या हातून इतकी खटपट व्हावयाची नाहीं आणि मग मुलांचे हाल कशाला? ह्या कामीं निराळं मनुष्य असलेलंच बरं. "

यावर मालिनीबाई म्हणाल्या, " खरं आहे तुमचं म्हणणं. मुलांची व्यवस्था दुसऱ्या माणसाकडे असली म्हणजे सभाबिभांना जायला बायकांना कांहीं तरी वेळ मिळेल. आतां आपली गोष्ट सोडून द्या, पण सगळ्यांनाच कशीं निराळीं माणसं ठेवतां येतील? अशा घरच्या अडचणींमुळेंच बायकांना कांहीं म्हणतां कांहीं करतां येत नाहीं. सारा जन्म रांधा, वाढा, उष्टीं काढा! यांतच जातोय. आणि सभा-संमेलन कधीं करणार? नाहीं म्हणायला हळदीकुंकवाचे दोन चार समारंभ होतात वर्षाकांठीं. तेव्हां एकमेकींच्या गांठी पडतातच.

" अशा वेळींच विचारविनिमय करायला बरें. " सरलाबाईचें वाक्य तित-केंच राहिलें. शालिनीबाई हंसून म्हणाल्या,

" तेव्हां बोलायला कसला वेळ? बांगड्याकडचं हळदकुंकं घेतलं त्यांच्या

कडचं कधीं घेईन अन् माझ्याकडचं कधीं देईन असं होऊन जातं! धांवपळ करून एकदां दहा घरचं हळदकुंकूं घेऊन संध्याकाळ होतांच घरीं परत येतां आलं म्हणजे मिळवली असं वाटतं. सबंध चैत्र महिना अशा धांवपळींत जातो."

" आपल्या हळदीकुंकवाच्या पद्धति चुकीच्या आहेत. त्यांत बदल केला पाहिजे असें नाहीं का आपल्याला वाटत? "

सरलाबाईच्या वरील प्रश्नानें चकित होऊन सर्वजणी त्यांच्याकडे पहातच राहिल्या.

" आपली हळदीकुंकवाची पद्धत म्हणजे एकच समारंभ एकाच दिवशीं अनेक घरीं असतो. दहाजणी आपणाकडे सवडीप्रमाणें येतील; व आपणहि सवडीप्रमाणें जावें. वेळाकाळाचें मुळींच बंधन नाहीं. जावें, हळदकुंकूं काय मिळेल तें घ्यावें अन् निघून यावें. ओळखपाळख, विचारविनिमय या कशाचीच जरूर नाहीं. आमंत्रण असून गेलों नाहीं तर पाप लागेल एवढी मात्र दृढ समजूत असते. परंतु अशा कोत्या समजुती तुमच्यासारख्या सुज्ञ बायकांनीं टाकल्या पाहिजेत. हळदीकुंकवाच्या द्वारें पुष्कळ सुधारणा करतां येण्यासारख्या आहेत. दहाजणींनीं दहा घरीं निरनिराळ्या दहा वेळां जाण्यापेक्षां एकाच वेळीं एकाच स्थळीं दहाजणींनीं एकत्र जमणें अधिक सुलभ व सोयीचें नाहीं काय? आपणच सांगा, तिसऱ्या प्रहरापासून रात्रींचे आठ वाजेपर्यंत वाटेल तेव्हां बायकांनीं यावें व हातचें काम टाकून हळदकुंकूं द्यावें, किंवा येणाऱ्या बायांची वाट पहात तिष्ठत बसावें ही पद्धत चांगली सोईची आहे काय? पुरुषांना तर त्या दिवशीं घरीं येण्याची बंदीच असते. आपली व आपणांमुळें पुरुषांची सबंध दिवस गैरसोय होत आहे असें आपणांस कधीं वाटत नाहीं. पण सर्वांत वेळेची किंमत अधिक आहे— "

" आम्हीं आपलीं जुन्या वळणाचीं माणसं. " पोक्तपणाच्या आविर्भावानें कमलिनीबाई म्हणाल्या,

" चालत आलेल्या चालींत बदल करण्याची बुद्धिच कधीं झाली नाहीं. हळदकुंकवाच्या कामीं दगदग अन् श्रम झाले तरी तोंडावाटे ब्र काढायचा नाहीं एवढं बरीक ठाऊक आहे आम्हांला. आपल्या सौभाग्यासाठींच ना हें करायचं असतं? मग त्रास मानून कसं चालेल? "

यावर सरलाबाईंना फारसें बोलतां येईल असें मला वाटेना. इतक्यांत त्या पुढें म्हणाल्या,

" अशीच समजूत सर्वत्र आढळते! आमच्याकडेसुद्धां अशीच पद्धत होती. पण आम्हीं कांहीं जणींनीं एक विचारानें तींत बदल केला. आमच्या गांवीं बायकांचा एक वर्ग आहे. त्यांत आम्ही असे समारंभ समाईक पद्धतीनें करितों. त्यामुळें वेळ व श्रमही वांचतात. शिवाय समारंभ मोठा प्रेक्षणीय होतो.

" आमची चैत्राची गौर म्हणजे स्त्रियांच्या हस्तव्यवसायाचें एक प्रदर्शनच असतें. स्त्रियांनीं स्वतः तयार केलेल्या वस्तु किंमतीसह सर्वांना सहज दिसतील अशा गौरीपुढें व्यवस्थित तऱ्हेनें मांडून ठेवतों. त्यांतील वस्तु कोणाला पसंत पडल्या तर त्या विकत दिल्या जातात. आलेली किंमत संस्थेच्या शिलकेंत जमा केली जाते. एखाद्या वस्तूला बक्षीस सुद्धां मिळतें. तें ती वस्तु तयार करणाऱ्या बाईला दिलें जातें. अशानें कुशलतेचीं कामें करण्यास स्त्रियांना हुरूप येतो. ' गप्पाष्टकें झोडण्याचा क्लब ' अशी जी आमच्या वर्गासंबंधानें इतर स्त्रियांत समजूत होती ती ह्या उपायानें दूर झाली आहे. पुष्कळ स्त्रिया आमच्या वर्गात येऊन फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग करायला शिकत आहेत."

सरलाबाईंचें बोलणें मीं अगदीं लक्षपूर्वक ऐकलें. मला तें फार आवडलें. त्यांची मार्मिकता, स्त्रियांच्या उन्नतीसंबंधानें कळकळ व स्वतः त्या कामीं झटण्याची आवड हें पाहून मला त्यांच्याविषयीं फार आदर वाटला. तो व्यक्त करण्याकरितां कांहीं तरी बोलावें अशी इच्छा होऊन मी म्हणालें, " मोठ्या बायकाही येतात का आपल्या वर्गात ? "

" होय, " सरलाबाई हंसून म्हणाल्या,

" ज्यांना कांहीं तरी शिकण्याची इच्छा आहे अशा स्त्रिया व प्रौढ मुली येतात. एक अस्पृश्य जातीची मुलगीहि येते आमच्या वर्गात—"

" काय अस्पृश्य ? " एकदम चमकून मीं म्हटलें. इतर बायाहि प्रश्नार्थक मुद्रेनें सरलाबाईकडे पाहूं लागल्या. सरलाबाई शान्तपणानें म्हणाल्या,

" होय, पुण्याच्या अहिल्याश्रमांत शिकलेली ती मुलगी आहे. आमच्या वर्गांत पेटी वाजवायला ती शिकविते. त्याशिवाय पारशी, मुसलमान या जातींच्या बायाही आहेत आमच्या वर्गात. त्यांचा विटाळ मानला जात नाहीं.

मग त्याच मुलीचा कां मानावा? तिचा आमचा देश, धर्म एक नाहींत का? मुख्य गोष्ट जी स्वच्छता ती तिच्याकडून नीट राखली जात आहे. मग अवांतर गोष्टीला नसतें महत्त्व कशाला? ”

सरलाबाईचें बोलणें आम्ही निमूट ऐकत होतों. त्या पुढें अधिक बोलल्या असत्या; पण चहाचीं उपकरणीं वाजूं लागलीं त्यामुळें त्यांना उठावेंच लागलें.

पांढरा स्वच्छ सद्रा व तोकडी इजार अशा वेषानें एक तरतरीत मुलगा चहाचें साहित्य घेऊन आला व सरलाबाईनीं सांगितल्याप्रमाणें चहा व फराळाचें त्यानें आम्हां सर्वांस दिले.

मी कधींच अशा मिश्र मंडळींत गेलें नव्हतें. आतां काय करावें असा मला मोठा विचार पडला. मी रमाबाईच्या तोंडाकडे पाहूं लागलें. इतक्यांत पलीकडे बसलेली एक बाई म्हणाली, “ मला आज उपास आहे. हुश्श, काय उकडतं पण ! ”

रमाबाई तिला दुजोरा देत म्हणाल्या—

“ खरंच. अशा वेळीं चहा घेणं म्हणजे—” सरलाबाई जवळच बसल्या होत्या. त्या सर्वांना आग्रहानें फराळाचें वाढायला सांगत होत्या. आमचा संवाद त्यांच्या कानीं पडला तेव्हां त्या म्हणाल्या,

“ चहा नको असेल तर दूध घ्या. पण आधीं कांहीं खाल कीं नाहीं? ” मला स्तब्ध बसलेली पाहून त्या म्हणाल्या, “ हें काय? आपण कांहीच घेतलें नाहीं? उपास आहे का? सर्व जिन्नस उपासाला चालण्याजोगेच आहेत. भजीं, चिवडा, वगळलीं म्हणजे झालं !

मला उपासही नव्हता आणि मीं चहाही सोडलेला नव्हता. त्यामुळें माझ्यानें खोटेंच सांगवेना. परतु उत्तरोहि देववेना. मी स्तब्धच होते. रमाबाईनीं व आणखी दोघीतिघींनीं माझेंच अनुकरण केलें. आमचें हृद्गत सरलाबाईनी लौकर ओळखलें. त्या म्हणाल्या, “ ब्राह्मणाला सांगूं का चहा करून आणायला? ” आम्हीं नको नको म्हणत असतां त्यांनीं ब्राह्मणाला वर्दी दिलीच.

मळकासा पंचा नेसलेली व तसलेंच एक फडकें खांद्यावर टाकून ब्राह्मणाची स्वारी आमचा चहा घेऊन आली. खांद्यावरच्या फडक्यानें पेले पुसून त्यानें आम्हांला चहा ओतून दिला.

बैठकीखालीं बसून मी तो कोरडा चहा घेत असतां शेजारच्या दालनांतून स्वतःचा जोराचा हास्यध्वनि ऐकूं आला.

त्या दालनांत पुरुषमंडळींची बैठक होती. खानपानाच्या जोडीला कडाक्याचा वादविवाद व जोराचे हास्यविनोद यांशिवाय पुरुषांच्या बैठकीची पूर्तता व्हावयाचीच नाहीं. या नियमाला अनुसरूनच ते हंसणें होतें. तरी पण मन जरा चपापलेंच.

सरलाबाई प्रेमानें आम्हांला हवें नको विचारीत होत्या. त्यांची ती प्रेमादराची वागणूक व आदरातिथ्याबद्दलची तत्परता पाहून मला फार आनंद झाला. पार्टीला येण्यापूर्वींचे पूर्वग्रह पालटून त्यांची जागा आदरानें घेतली.

घरीं आल्यावर मला सरलाबाईविषयीं वाटत असलेला आदर मोठ्या आनंदानें मीं जवळ व्यक्त केला. त्यांचा मनमोकळेपणा, निगर्वी स्वभाव, अगत्याचें आदरातिथ्य इत्यादि सद्गुण वर्णन करायला मला तेथील सर्व हकीकत सविस्तर सांगावी लागली. हकीकत ऐकून आधीं आधीं संतोष वाटल्याचीं चिन्हें दिसलीं. परंतु लवकरच मुद्रा पालटली. गंभीरपणें विचारलें,

" काय ? तूं निराळा चहा करून घेतलास ? वाः छान आहे तुमचें सोंवळें. शेजारच्याच दिवाणखान्यांत आम्ही पुरुष मंडळी तेंच चहा फराळाचें घेत असतां तुम्ही सोंवळें संभाळून होतांना ? "

" पुरुषांना काय ? सर्व चालतं ? आम्हांला मुळापासून स्वच्छतेची संवय जडलेली—"

" स्वच्छास्वच्छतेचा निवाडा तर तुमच्याच तोंडून झालेला आहे. आधीं आलेला चहा अस्वच्छ होता कीं नंतर आलेला तें तुम्हीच सांगा बरें ! तुझ्या वागणुकीनें त्यांना काय वाटलें असेल ? "

" तें खरं. पण पूर्वीपासून—"

मला मध्येंच थांबवून म्हणायचें,

" हल्लींच्या नव्या मनूंत समता, सुधारणा इत्यादि तत्त्वांचा सर्वत्र प्रसार करण्याची प्रवृत्ति वाढत असतांना रूढीचें पालुपद गात बसणाराला काय म्हणावं ? पूर्वीं तरी एक वेद, एक धर्म आणि एक देव व एकच वर्ण होता. "

याप्रमाणें पुष्कळच बोलणें झालें. तें ऐकत असतां मला वाईट वाटून माझ्या डोळ्यांत अश्रु आले. परंतु ते संतापाचे नसून अनुतापाचे होते एवढें मात्र इथें सांगितलें पाहिजे.

# वटसावित्री.

पावसाची सर नुकतीच पडून गेली होती. आकाश निरभ्र होऊन स्वच्छ ऊन पडलें होतें. कमलेनें तें पाहिलें आणि स्वयंपाक घरांतील काम आटोपून लगबगीनें ती बाहेर आली. ती फार घाईत होती असें दिसत होतें. तिनें झटकन् पेटी उघडली आणि दागिन्यांचा डबा व वस्त्रांचें गांठोडें बाहेर काढिलें. सुंदर जरीबुट्यांची बादली चोळी तिनें अंगांत घातली व केशरी रंगाचा शालू ती नेसली व जवळच असलेल्या चौरंगावर बसून तिनें दागिने घालण्यास सुरवात केली. नुकतेंच न्हाल्यामुळें ओलसर तुकतुकीत केस तिनें पाठीवर मोकळे सोडले होते. पाय किंचित् लांब करून ते सहज एकावर एक ठेविले होते. मान किंचित् कलती करून ती कुड्यांचें मळसूत्र बसवीत होती.

कमला जात्याच सुंदर होती. नीटनेटकेपणाची, सौंदर्यसंवर्धनाची तिला फार आवड होती. तिच्या या हौशीची पूर्तता होण्यास साधनांचीहि अनुकूलता होती. ईश्वरानें तिला सुंदर रूप दिलें होतें आणि तें खुलविण्यास उत्तमोत्तम वस्त्रालंकारांची तिला वाण नव्हती. वडीलधाऱ्या माणसांच्या सहवाससौख्यास ती अकालीं आंचवल्यामुळें अवेळीं—अल्पवयांत—प्राप्त झालेल्या कर्तेपणाबरोबरच अलंकारांची पेटीहि तिच्या ताब्यांत आली होती. तिचा मढळ हातानें उपयोग करून आपल्या मैत्रिणींना दिपविण्यांत तिला मोठें सौख्य वाटत असे.

तिच्या पुष्कळ मैत्रिणी तिच्या रूपाचा त्याचप्रमाणें तिच्या वैभवयुक्त अलंकारांचा मनांतून हेवा करीत. तिला या गोष्टीची पुरती जाणीव होती. परंतु त्यामुळें तिला विषाद न वाटतां उलट फार आनंद होई. आपल्या बरोबरच्या मैत्रिणींनीं या बाबतींत नेहमीं आपला हेवा करावा असें ती मनापासून इच्छीत असे. याकरितां वेणीफणी आणि नेसणें सवरणें या गोष्टी ती फार काळजीपूर्वक करी. आजहि तिनें त्या बाबतींत कसूर केली नव्हती. लांब मडक काळ्या तुळतुळीत मुक्त केशकलापानें तिच्या सौंदर्यांत आधिकच भर पडली होती. ती अशा मोहक रीतीनें बसली होती कीं क्षणभर तिच्याकडे पहात राहण्याचा मोह कोणालाहि आवरला नसता.

समोरच एक कॉट होती. तीवर माधवराव डोळे मिटून पडले होते. ते आज पांच सहा दिवस आजारी होते. त्यांना झोंप लागली आहे तोंवर बाहेर जाऊन यावें या उद्देशानें कमला घाईघाईनें कामें उरकीत होती आणि त्यांची झोंपमोड होऊं नये म्हणून आपल्या परीनें जपत होती. पण चुकून तिचा पाय पेटीला लागला व फरशीवर खडखड असा आवाज झाला. त्या आवाजानें माधवराव जागे होऊन कुशीस वळले व समोर पाहतात तों आपली पत्नी छान सजून बसलेली. त्यांना तें दृश्य मोहक वाटलें. क्षणभर आपल्या आजाराचा त्यांना विसर पडला. उत्कंठित नेत्रांनीं ते तिच्याकडे पहात राहिले. तिनें आपल्याजवळ यावें व आपल्या तापलेल्या मस्तकावरून आपला कुसुमकोमल हात फिरवावा असें त्यांना मनांतून वाटलें. परंतु कमला सावकाश आपल्या बाजूबंदाची खीळ बसवीत होती. तिचें त्यांच्याकडे लक्ष नव्हतें. लक्ष ओढण्याकरितां ते मोठ्यानें म्हणाले, ‘ पाणी, थोडें पाणी पाहिजे. हुश्श, काय तहान लागली आहे. ’ कमला चटकन् उठली आणि पेल्यांत पाणी ओतून तो तिनें स्टुलावर ठेविला व पुन: पूर्ववत् शरीर शृंगारण्यांत ती गढून गेली. माधवरावांचा विरस झाला. त्यांना तें पाणी कढत वाटलें. दोन घोट घेऊन ते पुढें म्हणाले “ घाम आला आहे का पहा जरा ! ”

कमला म्हणाली, “ मी आतां सोंवळयांत आहें. मला वडाला जायचंय. तो पहा उशाला नॅपकिन. नाहीं तर तसं नको, रामालाच सांगतें घाम आला असला तर पुसायला. रामा, ए रामा–”

“ नको, कोणी नको ” असें अस्फुट उद्गारून त्यांनीं कपाळावरून हात फिरविला. नंतर पत्नीकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पहात ते पुढें म्हणाले, “ वडाला जायचं? कशाला ? वडाचं काय काम आहे ? ”

मान मुरडून कमला उद्गारली, “ हें काय विचारणं ? आज वटपौर्णिमा नाहीं का ? सावित्रीचं व्रत आहे. मला वडाची पूजा करायला जायचंय आतां. त्या रमाबाई खोळंबल्या आहेत माझ्यासाठीं. ”

“ असं ! ”

“ उशीर झाला तर भटजी मिळणार नाहींत ना ? ”

“ मरूं दे तो भटजी अन् तो वड ! ”

" हें काय असं ? " कानावर हात ठेवून ती म्हणाली, " असं अभद्र बोलूं नये गडे ! सौभाग्यव्रत असतं हें. "



" आज वटपौर्णिमा नाहीं का "

शुष्कपणें हंसून ते म्हणाले, " बरं असूं दे ! पण हें पहा, मघाशीं डॉक्टर काय म्हणाले होते ? घाम यायला पाहिजे म्हणून, नाहीं का ? "

" हं. "

" मग अझून कांहीं घाम आला नाहीं. तेव्हां मला वाटतं स्पंज करावं डॉक्टरनीं सांगितल्याप्रमाणें. "

" आल्यावर करीन. मला आधीं पूजा करून आलं पाहिजे. वर्षाचा दिवस आणि त्यांत हें सौभाग्यव्रत. "

कमलेनें आपल्या मोकळ्या केसांचा आंबाडा बांधिला. हातांत पूजेचें घेतलें आणि हंसत परंतु ती घाईनें म्हणाली, " मी जाऊन येतें हं. "

उत्तराची वाट न पाहतां आंतल्या खोलींत जाऊन ती रामाला म्हणाली, " ते आंबे तुला ठेवले आहेत. पोळीबरोबर खा. भांडीं बाहेर टाक अन् तें झांकलेलं अन्न मोलकरणीला दे बरं का. बाहेरची आली तर तिलाहि दोन पोळया अन् दोन आंबे दे. अन् इकडे लक्ष्य ठेव जरा बरं कारे ? " इतके हुकूम देऊन कमला बाहेर पडली.

बिचारे माधवराव ! पत्नीचा तो थाट, तिचे ते हुकूम आणि बाहेर जाण्याची त्वरा या सर्व गोष्टींनीं ते आश्चर्यचकित झाले. त्यांची प्रकृति बरी नव्हती. चार दिवस तर ते अगदीं अंथरुणाला खिळून होते. त्यांना किती वाटत होतें कीं आपल्या पत्नीनें आपल्याजवळ येऊन बसावें, आपला घाम पुसावा, तापानें रसरसलेलें आपलें मस्तक तिनें आपल्या स्निग्ध हातांनीं हळूहळू थोपटावें आणि असें करीत असतां तिनें तिचें आवडतें गाणें गुणगुणावें. त्या गुणगुणण्यानें आणि तिच्या शीतल करस्पर्शानें आपला डोळा लागला तर अंगांत खिळून बसलेला ताप आणि तदनुषंगिक सर्व व्यथा अगदीं झटकन् दूर होतील अशी तिच्या मृदु हस्तांत जादू आहे अशी त्यांची जवळजवळ खात्री होती. आजारी माणूस, मग तें लहान असो अगर थोर असो, वात्सल्याची त्यास अशा वेळीं जरूर असते. स्त्रीच्या ठायीं नैसर्गिकपणेंच हें वात्सल्य गुप्तपणें वास करीत असतें आणि कोणतीहि व्यक्ति रुग्णावस्थेंत तिजकडून त्याची अपेक्षा करीत असते. रुग्णाची अपेक्षा सफल झाली तर तिचा सुपरिणाम त्याच्या प्रकृतीवर झाल्याशिवाय रहात नाहीं. परंतु उलट झालें तर त्याचा दुष्परिणामहि तितक्याच तीव्रतेनें होतो.

बिचारे माधवराव ! पत्नीचें आपणावर उत्कट प्रेम आहे, आपल्यासाठींच ती व्रतें, उपोषणें करीत असते हें माहीत असूनहि तिच्या अशा तऱ्हेच्या वर्तनामुळें त्यांना अतिशय वाईट वाटलें, आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यांचा ताप अधिक वाढला हा होय.

" आज टेंपरेचर कमी होण्यासाठीं शक्य तर दोन तीन वेळां स्पंज करा " असें डॉक्टरनें सांगितलें होतें. परंतु तसें करण्यापेक्षां प्रत्यक्ष यमाशीं झुंजून जिनें आपल्या पतीचे प्राण परत आणिले त्या साध्वी सावित्री देवीची मनोभावें पूजा करून करुणा भाकिली तर तें अधिक सुफलदायी होईल, अशी कमलेची कल्पना असल्यामुळें कीं काय तिनें दसराच मार्ग अंगीकारिला.

कमला आपल्या एक दोन मैत्रिणींबरोबर वडाला गेली. तेथें बायकांचा एवढा मोठा थवा जमला होता कीं, त्यामुळें वडाखालीं बसलेल्या भटजींचें अस्तित्व पार लोपून गेलें होतें.

आधीं आलेल्या बायकांचा आधीं पूजा करून घेण्याचा हक्कच असल्यामुळें त्यांचें आटोपेतोंपर्यंत पाय भाजत व डोकें तापवीत स्वस्थ रहाणें कमलेला भागच होतें. शेवटीं बऱ्याच वेळानें तिची पूजेची पाळी आली. तिनें मनो-भावानें पूजा केली. ' आपल्याला जन्मोजन्मीं हाच पति लाभावा ' असें तिनें देवी सावित्रीजवळ मागणें मागितलें. भटजींना वायन दक्षिणा दिल्यानंतर तिनें पांच सात बायकांना वायनें दिलीं आणि घरीं परतणार इतक्यांत जवळच एका बाईकडे कोणी बाहेरगांवची बाई सावित्रीचें गाणें म्हणून दाखविणार आहे असें तिनें ऐकिलें. बऱ्याचशा बायका तें ऐकण्याला निघाल्या होत्या. कमलेला घरीं जाण्याची जरी घाई होती तरी एक दोघी मैत्रिणींनीं आग्रह करतांच, विशेषत-' आजचा वर्षाचा दिवस आहे ' असा इषारा देतांच तिचेहि पाय त्या दिशे, कडे वळले.

तें जुन्या चालीचें गाणें होतें. लांबच्या लांब कडवीं संपतां संपेनात श्रोत्यांपैकीं कोणी वाती करतांना चकाट्या पिटीत, तर कोणी कोणी डुलकी घेतः तर कोणी जांभया देत, सावित्री-आख्यान श्रवण करण्याचें पुण्य संपादन करीत होत्या. अवधानयुक्त श्रोत्या त्यांत फारच थोड्या होत्या असें म्हटलें तरी चालेल. कारण सावित्रीची कथा सर्वांनाच ठाऊक होती. कुणीं कुणाला सांगावी अशी गरज नव्हती. परंतु आज वर्षाचा दिवस म्हणून त्या दैवी साध्वीचें पुण्यचरित्र वर्षभरासाठीं कर्णसंपुटांत सांठवून ठेवावयाचें होतें. परंतु या सांठवणीच्या कामांत मन दुसऱ्या गोष्टींत व्यग्र असल्यामुळें किंवा हातांनीं दुसरें एखादें काम करीत असल्यामुळें व्यत्यय येण्याचें मुळींच भय नव्हतें.

अशा तऱ्हेनें आख्यानश्रवणाचें काम चाललें होतें. मध्येंच एकाद्या कड-व्याला सर्व बायका हात जोडीत, मधूनच पदराच्या शेवटांत कुंकवाची चिमुट बांधून ठेवीत, आणि एखादें विशिष्ट कडवें सुरू होतांच ती गांठ झटकन् सोडून तें कुंकू आपापल्या कपाळाला मोठ्या श्रद्धेनें लावीत. ही कवाईत सर्व-जणी इतकी एकदम करीत कीं, तिच्यापुढें शिकविलेल्या पलटणींची कवाईत फिक्की वाटावी. शेवटीं श्रोत्यांच्या पोटाचा विचार करूनच कीं काय गाणाऱ्या

बाईनीं गाणें संपविलें; संपवितांना त्या म्हणाल्या, ' चांगलं गळयावर गाणं म्हटलं तर तीन दिवस लागतात संपायला. आतां तुम्हांला फराळाला होतोय उशीर तेव्हां म्हटलं—'

वाक्य पूर्ण करावयास अवसर न देतां एक भाविक श्रोत्या हंसत म्हणाल्या ' देवादिकांचं चरित्र ऐकावं तेवढं थोडं. आज वर्षाचा दिवस. जेवढं कानांत पडलं तेवढंच पावित्र्य वाढलं ! ' या बाबतींत सर्वांची एकवाक्यता असल्याचें प्रमुख श्रोत्यांनीं माना डोलवून दर्शविलें. कमला आतां उठलीच. एक-दोघींच्या कपाळाला कुंकवाचें बोट टेकवीत व टेकवून घेत ती जाऊं लागली. इतक्यांत तिला दोघी-चौघींनीं हटकलें.

" काय ग कमल, इतकी अगदीं घराची ओढशी? मुलं का रडतात घरीं? "

" अग मुलं नसलीं म्हणून—" तिला पुरतें बोलूंहि न देतां एक पोरवयी मैत्रीण म्हणाली " दुसरं कोणीच का नसतं घरीं? सत्यवान् तर—"

" चल, चहाटळ कुठली ! खरंच मला जाऊं द्याग. घरीं आजारी असायचं अन् दूध घेणं झालं नव्हतं. आतां किती दुपार झाली बघ. "

" समजलं. जा परती पण आज व्याख्यान आहे पुण्याच्या बाईचं. येशील का तूं? "

मैत्रिणींचा अतिशय आग्रह पाहून व तूर्त त्यांच्या हातून लौकर सुटका करून घेण्याच्या उद्देशानें येण्याविषयीं कमलेनें संमति दर्शविली.

कमला घरीं आली तेव्हां माधवराव निजलेलेच होते. तिनें चौकशी केली तेव्हां ' आतांच डोळा लागला ' असें रामा म्हणाला; परंतु अद्यापि त्यांनीं कांहींच घेतलें नव्हतें. कमलेनें फराळ संपविला; नंतर ओंवळी होऊन तिनें त्यांच्या मस्तकावर हळूच हात ठेवून पाहिला. मस्तक तापलेलेंच होतें. नक्की किती ताप आहे हें थर्मामिटर लावून पहातां येणें शक्य नव्हतें. कारण ' कोणत्याहि सबबीवर झोपमोड होतां कामा नये ' असें डॉक्टरांचें निक्षून सांगणें होतें. आणि याच कारणास्तव स्पंज करणेंहि अशक्य झालें होतें. नुकताच डोळा लागला आहे अन् इतक्या शांतपणें लागला आहे; यावरून अर्धा-तास तरी गाढ झोंप लागेल असें दिसलें. इतका वेळ जवळ स्वस्थ बसावयाचें? तिची घड्याळाकडे दृष्टि गेली, आणि व्याख्यानाची ठरलेली वेळ झाल्याचें तिला दिसून आलें. तिच्या पोरबुद्धीनें उचल खाल्ली आणि तिनें व्याख्यानास जाण्याचें

ठरविले. ती हळूच घरांत गेली व रामास म्हणाली, " हें बघ रामा, मी आतां जाऊन येतें महिला-समाजांत बरं का. उठायचं झालं अन् सोडा मागितला तर बाटली उघडून दे. नाहीं तर साबुदाण्याची पेज करून ठेविली आहे ना, ती कपभर दे. घट्ट झाली असली किनई तर थोडं कढत पाणी अन् थोडं दूध घालून ढवळून दे. बरं का. मी अगदीं आत्तां आलेंच बघ. त्या पुण्याच्या बाईचं व्याख्यान आहे म्हणून जातें. इथून अगदीं हलूं नको बरं. प्रकृति बरी नाहीं. जवळ बस हं. डॉक्टर काय म्हणाले ठाऊक आहे ना ? "

रामानें होकारार्थी मान डोलविली व कमला त्यावर विसंबून बाहेर पडली.

× × × ×

व्याख्यान सुरू झालें. श्रोत्यांनीं दिवाणखाना गच्च भरला होता. मुलांचें रडणें, खेळणें वगैरे गडबड असतांहि सर्व स्त्रिया एकचित्तानें व्याख्यान ऐकत होत्या. विषय " सावित्रीच्या चरित्रापासून घ्यावयाचा बोध " असा होता. व्याख्यात्या बाईची वाणी अधिकारयुक्त होती. विषय-प्रतिपादनाची शैली अत्युत्तम असल्यामुळें श्रोत्यांच्या मनावर फार परिणाम झाला. वर्षानुवर्ष सावित्रीचें व्रत आचरणाऱ्या व चरित्र श्रवण करणाऱ्या सर्व स्त्रियांना सावित्रीच्या चरित्राकडे पाहण्याची निराळी दृष्टि लाभली.

व्याख्यात्या बाईनीं प्रथम सावित्रीचें चरित्र विशद करून सांगितलें. नंतर त्या म्हणाल्या—

" सावित्रीच्या चरित्रापासून आपणांस पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे, सावित्रीनें आपल्या पातिव्रत्याच्या जोरावर यमापासून पतीचे प्राण परत आणिले. ती साध्वी होती, देवता होती, म्हणून तिला यम दिसला आणि मोठ्या चातुर्यानें तिनें त्याची मति कुंठित करून त्याला पतीचे प्राण परत द्यायला लाविलें. त्या देवतेसारखी दैवी शक्ति आपणांस कशी असणार ? तेव्हां तिनें आपल्या पतीला आयुरारोग्य द्यावें म्हणून वर्षाकाठीं एकदां तिचें आणि त्या वडाचें आपण पूजन करितों. ती देवता आपली आशा सफल करील अशी आपली श्रद्धा असते. श्रद्धा कांहीं वाईट नाहीं. परंतु कर्तव्य म्हणूनहि कांहीं असतेंच. त्याकडे डोळेझांक करून चालत नाहीं.

" सूक्ष्मतेनें पाहिलें तर आपल्यालाहि सावित्रीसारखें आचरण करतां येईल. या संसारांत अशा कांहीं यमस्वरूपी आपत्ति असतात कीं, त्यांच्याशीं सावित्री-

प्रमाणें झगडून आपणांस पतींचेच काय परंतु आपल्या लेंकरांबाळांचे, आप्त-स्वकीयांचेहि प्राण प्रसंगीं परत आणतां येतील. परंतु केवळ अज्ञानामुळें आपणांस तसें करतां येत नाहीं. थोडीशी सुस्थिति अन् अर्धवट शिक्षण असलें म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वाविषयीं भ्रामक समजूत होऊन गृहव्यवस्थेकडे बघण्यास सवड होईनाशी होते. अर्थात् ती व्यवस्था गडीमाणसांकडे सोपविली जाते. मोलाच्या माणसांवर चांगली देखरेख नसली तर अन्नपाण्यांतून, भांड्याकुंड्यांतून आणि वस्त्रप्रावर्णांतून जीवजंतु आणि घाण पोटांत व त्वचेंत किती जाईल याचा नेमच नाहीं.

" थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अशा स्थितींत यमाच्या एजंटांना आमंत्रण द्यावें लागत नाहीं. ते विनावेतन घरांत वावरत असतात आणि कावळा ज्याप्रमाणें व्रणांत चंचुप्रवेश करण्यासाठीं टपून बसलेला असतो, त्याप्रमाणें ते मनुष्याच्या शरीरांत प्रवेश करण्यासाठीं टपलेले असतात. यांपासून आपल्या माणसांना वांचविणें म्हणजे यमापासून वांचविणे नव्हे काय ? योग्य वेळीं योग्य शुश्रूषा करून मोठें दुखणें टाळणें म्हणजेच यमाच्या जबड्यांतून प्राण परत आणणें होय. तसेंच मानसिक अधःपातापासून पतीस परावृत्त करणें ही गोष्टसुद्धां त्यास पुनर्जन्म प्राप्त करून देण्यासारखीच आहे. परंतु केवळ अज्ञानामुळें हलगर्जीपणा होतो.

" पुष्कळदां पुजावें काय व भजावें कोणाला हेंच स्त्रियांना कळत नाहींसें होतें. एखादी भाविक बाई वटपूजेला निघण्याच्या घाईत असली अन् नवऱ्यानें जर थोडी कपाळावर घालायला सुंठ उगाळून मागितली तर बाईच्या तोंडून चटकन् " मेलं जरा कुठें वडाच्या पुजेला निघालें होतें तर मध्येंच हा त्रास. आतां आल्यावर देईन उगाळून " अशीं मुक्ताफळें बाहेर पडायचीं. घरच्या देवाला लाथा मारून घोड्याची चाकरी करण्यासारखं नाहीं का हें ? ज्यांच्या आयुष्यवर्धनासाठीं एवढीं हीं व्रतं-उद्यापनं करायचीं त्यांच्याशीं असें वर्तन ! मग ज्यांचें यांच्या पतीशीं कांहींच नातं गोतं नाहीं तो वड अन् ती सावित्री यांना कशी काय पावणार ? "

व्याख्यात्या बाईचे शब्द कमलेच्या हृदयाशीं जाऊन भिडत होते. शेवटीं शेवटीं वाक्यागणिक तिचें हृदय कंप पावत होतें. तिच्यानें आतां थांबवेना. व्याख्यान अपुरें टाकून ती तशीच उठली. तिनें कोणाचाहि निरोप घेतल

नाहीं. ती तडक घराकडे निघाली. आपल्या पायांना जलद चालवत नाहीं, पंख असते तर उडून घरीं जातां आले असतें असें तिला वाटूं लागलें. भलभलत्या कल्पना मनांत येऊन तिला भीति वाटूं लागली. " हाय ! आतां तिकडचं कसं असेल ? सकाळपासून कांहींसुद्धां पोटांत गेलं नाहीं–मी दिलं नाहीं. अगबाई ! तो रामा कां बरं धांवत येतो आहे ? "

रामाला घाबऱ्या घाबऱ्या येतांना पाहून तिचें काळीज करपून गेलें. तो जवळ येतांच प्रश्नार्थक मुद्रेनें तिनें त्याच्याकडे पाहिलें. बोलण्याचें तिच्यांत त्राणच नव्हतें. इतक्यांत तो घाईनें म्हणाला—

" वहिनीबाई चला. चला लौकर, कसंसं करताहेत दादासाहेब. दाक्तरसाहेबांनी तुम्हांला लवकर बोलावलं आहे. "

विचारी कमला ! वज्र कोसळावें तसें त्या बातमीनें तिला झालें. आपले निर्जीव जड पाय ओढीत कशीबशी धडपडत ती घरीं आली. घरांतील देखावा पाहून तिचें हृदय फाटून गेलें. डॉक्टर आणि एक नर्स उपचार करीत होती, डोक्यावर आइसबॅग आणि शरीराला थंड पाण्यानें स्पंज असे उपचार चालू होते. माधवराव असंबद्ध बडबडत होते. " तुला आंबे घे–तिला पोळी दे–बाहेरचीलासुद्धां दे–पूजा झाली पाहिजे–भटजी वडाची पूजा–संपली का पूजा ? ' याप्रमाणें ते असंबद्ध बडबडत. इतर मंडळींना त्यांच्या बडबडीचा तापांतील बडबड या पलीकडे कांही बोध होत नव्हता. परंतु बिचारी कमला ! शब्दागणिक तिचें हृदय पिळवटून निघत होतें. डॉक्टरची सूचना अमान्य केली, त्यामुळें अशी स्थिति ओढवली. पतीच्या अशा अवस्थेंत आपण वस्त्राभरणांनीं नटून सजून बसलों आहोंत–नव्हे नुकत्याच बाहेरून आलों आहों--हीं परकी माणसें आपणांस काय म्हणत असतील या जाणिवेनें तिला अतिशय लज्जा वाटली. हतबुद्धपणें ती डॉक्टर व पति यांच्याकडे पाहूं लागली. " स्पंज केलें नव्हतें काय ? " असा डॉक्टरनीं जेव्हां प्रश्न केला तेव्हां मलुलपणें नकारार्थी मान हलवितांना तिला मरणप्राय दुःख झालें. " त्यामुळेंच इतका ताप वाढला " डॉक्टर नर्सला उद्देशून हलकेच पुटपुटले. आपण नुसतें जवळ बसलों असतों तरी इतकी प्रकृति बिघडली नसती असें आतां कमलेला वाटूं लागलें होतें.

जें व्रत आचरून सावित्रीनें सत्यवानाचा प्राण परत आणिला तेंच व्रत अंधपणें आचरून आपण पतीला यमाच्या जबडयाकडे ढकललें. या नर्सबाई त्यांचें

आपणांशीं कांहीं नातें नसतां आपल्या पतीला यमाच्या जबड्यांतून ओढीत आहेत. योग्य वेळीं आपण औषधोपचार केले नाहींत आणि आतां इच्छा असूनहि कांहीं करण्याचें त्राण नाहीं. धिक्कार असो आपल्याला ! याप्रमाणें मनांतल्या मनांत ती स्वतःला दोष देत असतां माधवरावांचे चार पांच मित्र त्यांच्या समाचाराला आले. माधवरावांची बेशुद्धींतलि बडबड, डॉक्टर नर्सची धांदल आणि अशा वेळीं माधवरावांच्या उशाशी नटून सजून बसलेली कमलेची अधोवदन मूर्ति पाहून प्रत्येक येणाऱ्या व्यक्तीस आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नसे.

आश्चर्ययुक्त मुद्रेनें जो तो आपणाकडे रोखून पहात आहे-आपला तिरस्कार करीत आहे-असेंच तिला वाटलें. गुजराथेंत कांही जातींत नवऱ्याचा अंतकाळ समीप आला अशी खात्री झाली असतां, आप्तस्वकीय त्याच्या बायकोला पुढें केव्हांहि सौभाग्यलेणे ल्यावयास मिळणार नाहीं अशा विचारानें वस्त्रालंकारांनीं तिला शेवटचीं अशीच सजवीत असतात, ही गोष्ट कमलेला या वेळीं आठवून एक अमंगल कल्पना तिच्या मनांत इतक्या जोरानें आली कीं, त्यासरशीं मूर्च्छा येऊन ती धाडकन् खालीं पडली.

ती जेव्हां सावध झाली तेव्हां रात्र पडलेली असून माधवरावांची बडबड थांबली होती. टेम्परेचर बरेंच उतरलेलें असून त्यांना झोंप लागली आहे असें नर्स म्हणाली.

* * *

माधवरावांचा ताप ३६ दिवसांच्या मुदतीचा ठरला. ताप वाढला म्हणजे ते बेशुद्धींत बडबडत. " पूजा झाली का ? " " वडाहून आली का ? " त्यांचें हे शब्द कमलेचें काळीज कापून काढीत. अशा स्थितींत जवळ जवळ एक महिना गेला. ज्या दिवशीं ते पूर्णपणें शुद्धींत आले तेव्हां त्यांनीं पत्नीला पहिला प्रश्न केला " केव्हां आलीस ? आटोपली पूजा ? "

कमलेचें हृदय पिळवटून निघालें. अश्रु ओघळत असतां बळेंच स्मितयुक्त मुद्रा करून ती म्हणाली " आतांच आटोपली. सावित्रीनं एक दिवस केली असेल पूजा, पण मी एक महिनाभर केली तेव्हां कोठें आतां माझा सत्यवान् मला परत मिळाला. "

# बांगड्यांवर बहिष्कार.

'दो आनेमें लेव, दो आनेमें लेव, कोईबी चीज उठाव. दो आनेमें कोईबी चीज उठाव.' दोनप्रहरीं फेरीवाल्याची कर्कश आरोळी ऐकून इंदिरेच्या मांडीवर लिलीची धडपड चालली होती. आपणांस झटकन् बाहेर न्यावें याकरितां एका हातानें आईच्या मानेभोंवतीं विळखा घालून दुसऱ्या हातानें तिला उठविण्याचा ती प्रयत्न करीत होती. परंतु इंदिरेला या वेळीं उठण्याचा अगदीं आळस आला होता. नुकतेंच जेवण झालेलें होतें. घरांतील आवराआवर आटोपून सकाळीं घाईनें बांधून ठेवलेले ओले केंस ती या वेळीं वाळवीत बसली होती. न्हातांना काढून ठेवलेलीं कुडीं ब्रशनें धुवून पुनः कानांत घालण्याचा उद्योग ती या वेळीं करीत होती, परंतु फेरीवाल्याचा शब्द ऐकल्यापासून तो सिद्धीस जाऊं द्यावयाचा नाहीं असा जणूं लिलीनें बेतच केला.

ती पाय झाडून व आईचे हात ओढून आपणास बाहेर नेण्यास सांगत होती. या गडबडींत एक मळसूत्र हातांतून दूर जाऊन पडलें. जेमतेम एक कुडें घालून झालें होतें. दुसरें हातांत घेऊन इंदिरा तशीच उठली व लिलीला घेऊन खिडकींत उभी राहिली. तिचा लांबसडक केशभार इतस्ततः पसरला होता. त्या मोकळया केंसांतून कानांतील तें एकच कुडें चांदणीप्रमाणें चमकत होतें. गर्द ढगांतून चपलेची नागमोडी चमक दृग्गोचर व्हावी त्याप्रमाणें गळयांतील एकदाणी कचभारांतून मधून मधून डोकावत होती. एकाच डहाळीवर एक पूर्ण विकसित पुष्प व एक अस्फुट कलिका असावी त्याप्रमाणें इंदिरा व तिच्या कडेवरील लिली दिसत होती. तें एक अतिशय सुंदर व मोहक दृश्य होतें. एखादा कुशल चित्रकार तेथें असता तर त्यानें तें दृश्य चित्रफलकावर चित्रित करून चिरंजीव केलें असतें. एखाद्या कवीच्या दृष्टिपथांत तें चित्र आलें असतें तर तें काव्यांत गुंफून चिरस्थायी करण्याचा मोह त्यास खचित आवरतां आला नसता. तें दृश्य होतेंच तसें मनोहर !

इंदिरा दारीं जावयाला आणि फेरीवाला दाराशीं यावयाला एकच गांठ पडली. ढकलगाडी घेऊन आलेला फेरीवाला तें मनोहर दृश्य पाहून म्हणा किंवा

एक तरी खेळणें विकलें जाईल या खात्रीमुळें म्हणा ढकलगाडी उभी करून तेथेंच थांबला. तोंडानें वरीलप्रमाणें कर्कश ओरडणें व निरनिराळीं लोभनीय खेळणीं हातांत उंच धरून त्यांच्या आकर्षक हालचाली करणें असें त्याचें सारखें चाललें होतें. गाडीला टेकून तो उभा राहिला होता व एकएक खेळणें हातीं घेऊन सहजगत्या तो तें खालींवर करीत होता. आधीं एक रंगीबेरंगी गोळ्यांचा खुळखुळा त्यानें वाजविला. नंतर एक सुंदर रंगीत चेंडू सहज हवेंत दोनतीनदां उडवून त्यानें दाबला. तेव्हां जो चिवचिव आवाज झाला तो ऐकून लिलीला अगदीं रहावेना. आपल्या हातापायांनीं आईला दाबीत–ढकलीत खेळण्यापाशीं न्यावयास ती सांगूं लागली. इंदिरेचा नाइलाज झाला. ती दार उघडून बाहेर गेली व विविधवस्तुसंग्रहाच्या त्या गाडीजवळ येऊन उभी राहिली. लिलीला धीर कुठला ? गाडीपाशीं जातांच तिनें खेळण्यावर झेंप टाकली. इतक्यांत चटकन् इन्दिरा मागें सरली व मुलीला दटावीत म्हणाली,

" कार्टे, आतां विटाळ झाला असता ना ? "

नंतर गाडीवाल्याला उद्देशून म्हणाली " जरा दूर तरी होशील ? अगदींच कांहीं नाहीं जसं–"

किंचित् तिरस्कारयुक्त कठोर आवाजानें तिनें वरील शब्द उच्चारले. मुलीवर व फेरीवाल्यावरहि ती रागावली होती. परंतु त्या रागाचा परिणाम तिच्या उज्ज्वल मुखमंडलावर होऊन तें अधिकच आरक्त दिसूं लागलें. फेरीवाला हंसला व गाडीपासून थोडा दूर झाला. इन्दिरा व लीला खेळणीं पाहूं लागल्या. खेळणीं पहाण्यांत त्या इतक्या तल्लीन झाल्या कीं अनिमिष नेत्रांनीं फेरीवाला आपणाकडे पहात राहिला आहे हें इन्दिरेच्या ध्यानांत मुळींच आलें नाहीं.

निरीक्षण संपल्यावर लिलीनें घट्ट धरून ठेविलेला खुळखुळा व बाहुली घेण्याचें शेवटीं ठरलें. ठरलें म्हणण्यापेक्षां भागच पडलें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. इन्दिरा घरांत गेली. परंतु दोन्ही खेळण्यांच्या किंमतीइतके पैसे आपल्याजवळ शिल्लक नाहींत असें तिला आढळून आलें. तेव्हां एका खेळण्याचे पैसे व एक खेळणें परत देण्याच्या विचारानें ती लिलीकडून तें घेऊं लागली. परंतु हा विचार लिलीला मुळींच मानवण्यासारखा नव्हता. तिला आणखी अधिक खेळणीं मिळालीं असतीं तर हवीं होतीं. मग मिळालेल्या केवळ दोनच खेळण्यांतून एक परत करणें तिला कसें रुचावें ? तिनें 'पूर्ण सत्याग्रह


करण्याचा बेत केला. मायलेकींची ती ओढाताण पाहून गाडीवाला म्हणाला " राहूं द्या काकू. " आपल्यावर हा अकालीं वार्धक्याचा आरोप झालेला ऐकून इन्दिरा तशा स्थितींतहि चमकली. आश्चर्यानें ती त्याच्याकडे पाहूं लागली. तिच्या दृष्टींतील कठोरता पाहून गाडीवालाहि जणूं उमजला. अत्यंत लीनतेनें हंसत हंसत तो पुढें म्हणाला—

" नाहीं ताईसाहेब, राहूं द्या. पैसे कुठें पळून जातात ? उद्यां नेईन. ठेवा ती बाहुली. "

ही तडजोड मान्य करणें इन्दिरेला भाग पडलें. ती म्हणाली—" तसं नको. एकच आणा कमी आहे, तेवढा संध्याकाळीं घेऊन जा. "

" बरं ताईसाहेब " असें म्हणून त्याने गाडी पुढें ढकलली.

* * *



'कोईबी चीज उठाव, दोई आनेमें लेव.'

संध्याकाळीं पैसे नेण्याकरितां फेरीवाला आला नाहीं. दुसऱ्या दिवशीं तो आला. परंतु पैसे घेऊन ठेवण्याची इंदिरेला आठवण न राहिल्यामुळें फेरीवाल्याचा राहिलेला एक आणा तिला देतां आला नाहीं. " उद्यां आठवणीनं घेऊन ठेवीन. " असें ती म्हणाली. त्यावर " कांहीं हरकत नाहीं. पैसे कुठं पळतात ? " असें तो उद्गारला आणि ढकलगाडी तेथेंच थांबवून 'कोईबी चीज उठाव, दोई आनेमे लेव' इत्यादि कर्कशपणें ओर-

डत गाडीला टेकून उभा राहिला. आळींतलीं मुलें गाडीभोंवतीं जमलीं. बाहेर जाण्यासाठीं लिलीचीहि विलक्षण धडपड सुरू झाली होती. इन्दिरेनें तिला बाहेर जाऊं दिलें असतें तर ती केव्हांच बाहेर गेली असती. लिलीची ती धडपड पाहून फेरीवाल्यानें एक बुडकुलें पुढें केलें. तें घेण्यासाठीं लिलानेंहि आपला चिमुकला हात पसरला. परंतु इंदिरेला मुलीचें हें वर्तन मुळींच आवडलें नाहीं. त्याचा एक आणा अद्यापि द्यावयाचा तसाच आहे तो दिल्याशिवाय मुलगी आणखी देणें करून ठेवण्यास भाग पाडते या गोष्टीचा तिला राग आला. आपपरभावाची जाणीव अज्ञान मुलांच्या निष्पाप मनाला नसते या गोष्टीचा तिला विसर पडला. तिनें रागानें लिलीच्या हातावर जोरानें चापटी मारली आणि ती फेरीवाल्याला म्हणाली " तुझे पैसे उद्यां घेऊन जा, पण माझ्या दारापुढें गाडी उभी करीत जाऊं नकोस. "

फेरीवाला हंसला, परंतु पुढें गेला नाहीं. इंदिरेनें धाडकन् दार लावून घेतलें आणि रडणाऱ्या लिलीला निजविण्याच्या प्रयत्नास ती लागली. संध्याकाळीं आठवणीनें इंदिरेनें पैसे घेऊन ठेविले व दुसऱ्या दिवशीं फेरीवाल्याचें कर्कश ओरडणें कानीं पडतांच लिलीच्या हातीं आणेली बाहेर पाठवून दिला.

दोनप्रहरीं फेरीला निघण्याचा त्या फेरीवाल्याचा नित्यक्रमच झाला होता. बारा साडेबाराच्या सुमारास त्याची ढकलगाडी नेमकी इंदिरेच्या घराजवळ थांबे. तोंडानें मालाचें वर्णन व किंमत कर्कशपणें ओरडत गाडीला टेकून तो मोठ्या ऐटीनें एका पायावर उभा राही. आळींतील लहान मुलें गाडीभोंवतीं जमत; तरी म्हणण्यासारखी विक्री होत नसे. मनोहर खेळणीं पहावयास मिळतात, हीच मुलांना गंमत. तींत लिलीहि दररोज भाग घेई. गाडी दाराशीं आली कीं तिला घेऊन इंदिरेला खिडकींत किंवा दारांत जावेंच लागे. मधून मधून कधींतरी एखादें हलकेंसें खेळणें विकत घेणेंहि तिला भाग पडे. कारण लिलीला नुसतीं खेळणीं पाहून कसें समाधान वाटणार ! मधून मधून एखादें खेळणें हवेंच म्हणून ती हट्ट करी. अशा वेळीं मोठ्या तत्परतेनें फेरीवाला तें खेळणें किंवा चित्र पुढें करी आणि मग तें इंदिरेला विकत घ्यावेंच लागे !

" माझ्या दाराशीं गाडी उभी करीत जाऊं नको " असें ती फेरीवाल्याला बजावी. तेव्हां तो मोठ्या लीनतेनें म्हणे " बाईसाहेब, तुम्हांला वाटलें तर



**इंदिरा तशीच उठली व लिलीला घेऊन खिडकींत उभी राहिली.**

ध्या, नाहीं तर नको. जबरी थोडीच है ? मै तो बेच रहा. चाहे लेव चाहे मत लेव." या उत्तरानें तो तिला सहज निरुत्तर करी. विक्री होवो अथवा न होवो, अर्धा तास तरी तो तेथें थांबल्याशिवाय पुढें जात नसे आणि घेणें असो अथवा नसो, लिलीसाठीं एकदां तरी खिडकींत आल्याशिवाय इंदिरेला गत्यंतर नसे. अननुभवी अल्लड मुलगी ! अशानें आपण एखाद्या संकटांत सांपडूं अशी त्या बिचारीला कल्पनाहि नव्हती !

× × × ×

एके दिवशीं लिलीला खिडकींत बसवून इंदिरा घरांत कांहीं उद्योग करीत राहिली. इतक्यांत फेरीवाल्याचा फेरा नित्याप्रमाणें आला. त्यानें खिडकीशीं येऊन लिलीच्या हातांत सेल्युलॉइडच्या बारीक व नाजुक चार बांगड्या घातल्या. बिचारी लिली ! त्या दिवसाच्या त्या चमचमीत चापटीचें सुख ती अद्यापि विसरली नव्हती. त्या आठवणीनें तिला प्रथम थोडें भय वाटलें. भेदरलेल्या नजरेनें इकडे तिकडे पाहून चटकन् तिनें त्या बांगड्या वर चढ-

विल्या व स्वेटरच्या बाहींत लपविल्या; आणि घरांत येऊन मुकाट्यानें ती खेळूं लागली. लिलीनें एवढी खबरदारी घेतली खरी; तथापि कांहीं वेळानें इंदिरेच्या नजरेस बांगड्या आल्याच. मुलीच्या गौरवर्ण गोंडस हातांत त्या सुंदर बांगड्या फारच शोभून दिसत होत्या. इंदिरेलाहि त्या फारच आवडल्या, परंतु ह्या आल्या कोठून हा प्रश्न राहिलाच. मुलीला जवळ घेऊन तिनें चौकशी केली, तेव्हां फेरीवाल्यानें तिला त्या भरल्याचें कळून आलें. आपल्या संमतीशिवाय मुलीला बांगड्या भरल्या याबद्दल तिला थोडा राग आला. एक प्रकारें त्यानें लोचटपणाच केल्यासारखें तिला वाटलें, परंतु बांगड्या मुलीला फारच खुलून दिसत होत्या. अद्यापि बांगड्या भरण्याचें तिचें वय नव्हतें खरें; तरी पण गोऱ्या गुबगुबीत चिमुकल्या हातांना त्या डाळिंबी कापीव बांगड्या फारच शोभून दिसत होत्या हेंहि तितकेंच खरें. तिला त्या काढूनें टाकवेनात. ' उद्यां बांगड्यांचे पैसे देऊं ' असा बेत करून ती आपल्या गृहकृत्यांत गढून गेली.

*　　　*　　　*

आज वसंतरावांना घरीं येण्याला चांगलीच रात्र झाली. कोणा मित्राकडे आज चहापार्टी होती त्यामुळें हा उशीर झाला होता. लिली तर केव्हांच जेवून निजली होती. इंदिरा एकटीच जागत बसली होती. वसंतराव येतांच तिनें पान मांडलें; तें पाहून वसंतराव म्हणाले " एकचसें पान मांडलें ? रात्र झाली आहे. तुझेंहि वाढून घे. " इंदिरा स्मितपूर्वक म्हणाली,

" नको, मागाहून जेवीन मी. "

" मागाहून कां ? आतां कांहीं लिलीला भरवायचें नाहीं. "

" नाहीं, पण इकडे वाढणं पुरेसं झालं म्हणजे मग बसतेंच. "

" कांहीं नको पुन्हां वाढायला. फराळाचें चापून खाल्लें आहे, त्यामुळें भूक फारशी नाहींच; चल ऊठ. "

असें म्हणून त्यांनीं तिला हाताला धरून उठविलें. त्यांनीं सहज हात धरिला; परंतु त्यामुळें इंदिरेची एक रेशमी बांगडी गेली. ती कृत्रिम कोपानें म्हणाली, " हें काय ? बांगडी वाढवलीना माझी ? " इतकें बोलून ती वाढून घेण्याच्या तयारीस लागली. वसंतराव म्हणाले " आमचा काय दोष ? सहज हात लागला तर तुमच्या बांगड्या जातात. असल्या तकलादी बांगड्या भरतां कशाला ?



“ हें काय ? बांगडी वाढवली ना माझी ? ”

त्यापेक्षां एखाद्या धातूच्या बांगड्या भरल्या तर अशा सहज अन् वारंवार फुट-णार तरी नाहींत. अन् फुटल्या तुटल्याच तर ते तुकडे कामास तरी येतलि. ”

हातांतला घांस तसाच धरून इंदिरा म्हणाली “ कांहींच्या बाहीच बोलणं इकडचं; म्हणे धातूच्या बांगड्या भराव्या. धातूच्या म्हणजे काय तांब्यापित-ळेच्या का भरायच्या आहेत ? सोन्याच्या बांगड्या, गोठपाटल्या तर घालतोंच आम्ही; पण तेवढ्यानं कसं भागेल ? ”

“ न भागायला काय झालं ? सोन्यापेक्षां ह्या भिकारी बांगड्यांची किंमत अधिक आहे कीं काय ? फुटल्या कीं गेला पैसा पाण्यांत. परदेशाची भर; दुसरें कांहीं नाहीं. कांचेच्या बांगड्यांपायीं किती पैसा परदेशीं जातो याची कांहीं कल्पना तरी तुम्हां बायकांना आहे का ? ”

“ तें आम्हांला कांहीं माहित नाहीं; परंतु कांचेच्या बांगड्यांशिवाय सवाष्ण बायकांचं मुळींच चालत नाहीं एवढं मात्र पक्कं माहीत आहे. विधवांचं चालेल एक वेळ; पण आमचं नाहीं चालणार. ”

“ कोणत्या शास्त्रांत सांगितलं आहे असं ? ”

“ मला नाहीं ठाऊक शास्त्रबिस्त्र. पूर्वापार चालत आलेली चाल आहे ही; एवढं बरीक आम्हांला माहीत आहे. उगाच आपलं हिणवूं नये लोकाला. ”

असें म्हणून ती खालीं पाहून जेवूं लागली. प्रकरण चिडीस जात आहे असें पाहून किंचित् विनोदानें पण समजुतीच्या स्वरानें वसंतराव पुढें म्हणाले–

“ लोकांना मी कांहींच म्हणत नाहीं. मी आपला तुला सांगतों—ही तुमची पूर्वापार चाल कोणीं पाडली असेल ती असो. पण ती तितकीशी चांगली मात्र नाहीं. ‘ मी कांहीं बांगड्या भरल्या नाहींत ’ असे उद्गार प्रसंगीं आम्ही पुरुष काढतों. आमच्या मतें बांगड्या ह्या निर्बलतेच्या द्योतक आहेत. निर्बलतादर्शक चिन्ह हातांत वागवून ‘ आम्ही अबला आहोंत, दुर्बल आहोंत ’ असें स्त्रियांनीं जगाला दर्शवावें असाच बांगड्या भरण्याची चाल पाडणाऱ्याचा उद्देश होता कीं काय कळत नाहीं. ”

“ तसं नव्हे कांहीं. उलट मला असं वाटतं कीं, स्त्रियांची अब्रू ही कांचे-सारखी आहे, तिला फार जपलं पाहिजे. कांचेची बांगडी एकदां गेली कीं गेली, पुनः जुळायची नाहीं. तशी बायकांची अब्रू एकदां गेली कीं गेली; पुनः म्हणून जुळायची नाहीं. म्हणून शीलाला बायकांनीं फार जपावं एवढ्याकरि-

त्यांच ही चाल पाडली असावी. अब्रूला किती जपलं पाहिजे, कसं जपावं हें अहोरात्र बायकांच्या लक्षांत रहावं म्हणून गोठपाटल्यांनीं भरलेल्या जड अन् कामसू हातांत कांचेच्या बांगडया भरण्याची चाल पडली असावी. ”

* + *

इंदिरेचें तें आवेशपूर्ण वक्तृत्व ऐकून वसंतराव फार खुष झाले. आपल्या पत्नीच्या अंगीं बहुश्रुतपणा यावा, शहरांतील निरनिराळया प्रचलित विषयांचें तिला ज्ञान व्हावें अशी त्यांची फार इच्छा होती. तिची पूर्तता ह्या खेडेगांवांत शहरांतील साधनांच्या अभावीं होणें अशक्य असल्यामुळें फुरसतीच्या वेळीं ते अशा तऱ्हेच्या निरनिराळया विषयांवर पत्नीशीं वादविवाद करीत. इंदिरेच्या शिक्षणाची मजल जरी प्राथमिक शिक्षणापलीकडे गेलेली नव्हती तरी अशा वादविवादांत उत्सुकतेनें भाग घेण्याइतका विचारविकास तिचा झालेला होता. तिचें आजचें उत्तर व तें नीट पटावें म्हणून पुढें मांडलेलें प्रमाण ऐकून वसंतरावांना फार समाधान वाटलें.

ते हंसत म्हणाले “ ठीक आहे तुमचें म्हणणें; पटला आम्हांला हा मुद्दा. परंतु तुम्ही जें साधन दृष्टीपुढें ठेवून शील संभाळणार तें साध्य करतांनाच तुमच्या शीलाला धोका पोंचण्याचा संभव असला तर त्याची वाट काय ? ”

भ्रुकुटी चढवून इंदिरा उद्गारली “ म्हणजे ? ”

“ म्हणजे असें कीं, तुमच्या ह्या बांगडया भरायला बायकाच असत्या तर हरकत नव्हती; परंतु आपल्या ह्या खेडेगांवांत हिंदु कासार नाहीं, तर कासारीण कुठली ? मुसलमान कासाराकडून बांगडया भरावयाच्या; हे फेरीवाले लोक ज्या वेळीं घरांत पुरुषमाणसें कोणी नसतील अशा वेळीं यायचे. आणि आमच्या स्त्रिया तरी काय ? सहसा पुरुषांच्या वाऱ्यासहि उभ्या रहायच्या नाहींत, परंतु परधर्मीय कासाराच्या हातांत हात देतील. इतकेंच नव्हे तर त्याच्या पायावर डोकेंहि ठेवतील ! परवांच एक बातमी वाचनांत आली, ती सांगायला विसरलों. नवापूर गांवीं एका बाईनें दुपारच्या वेळीं घरांत कोणी नसतांना मुसलमान कासाराला हांक मारून बांगडया भरून घेतल्यानंतर नमस्कार करायला म्हणून ती वांकली तों त्यानें ती संधि साधून कांहीं अयोग्य वर्तन केलें. त्यामुळें त्या बाईला इतकें वाईट वाटलें कीं तिनें विहिरींत पडून जीव दिला ! पहा, कसे अनर्थ ओढवतात ते. म्हणून म्हणतों बांगडया भरायच्याच

तर त्या कासारणीकडून भराव्या किंवा स्वतः भरायला शिकावें. असे अनर्थ ओढवून घेण्यापेक्षां तसेच हात राहिलेले काय वाईट ? "

ही बातमी ऐकून तर इंदिरेच्या अंगावर शहारेच आले. एक प्रकारें ती मनांत दचकली. विवक्षित तऱ्हेनें मान हालवून ती मनांत म्हणाली, " या पुरुष कासारांजवळून मी आतां कध्धींच बांगड्या नाहीं भरणार. " आजच सकाळीं तिच्या न कळत फेरीवाल्यानें लिलीला बांगड्या भरल्या होत्या; ती गोष्ट तिला आतां आठवली. " काय तरी मेले लोंचट असतात हे लोक. अशा लोकांपासून सावध असायला हवं. "

असे विचार मनांत चालले असतां हातांत एकच उरलेल्या रेशमी बांगडी-कडे तिची नजर गेली; आणि गोठपाटल्यांच्या वजनाखालीं ही किती दिवस टिकेल हाहि विचार डोक्यांत आला. " पतिराज म्हणतात त्याप्रमाणें हात ठेवायचे ? छेग बाई ! ही कल्पनाच असह्य होते. "

बोलत असतांनाच तिनें आवराआवर केली होती. ही नवीन बातमी ऐकल्यापासून तिचें मन अस्वस्थ झालें होतें. एक प्रकारची अनाहूत हुरहुर तिला वाटूं लागली. आपल्या हातून कांहीं तरी चुकलें आहे असें तिला वाटूं लागलें. " लिलीला त्यानें बांगड्या भरल्या यांत आपला दोष कांहींच नाहीं. उद्यां आपण त्याबद्दल पैसे दिले म्हणजे झालें. " अशी ती आपल्या मनाची समजूत करी. परंतु ती कांहीं केल्या पटेना.

पत्नीची ती निस्तब्ध व किंचित् बावरल्यासारखी स्थिति पाहून वसंतराव म्हणाले " काय ? कसला विचार चालला आहे ? बांगड्यांवर बहिष्कार घाल-ण्याचाच ना ? "

इंदिरा अस्फुट स्वरांत म्हणाली " बांगड्यांवर बहिष्कार घालणं बोलण्या-इतकं सोपं नाहीं कांहीं. बांगड्यांपासून इतकं भय जरी असलं तरी त्यांशिवाय चालण्यासारखं मात्र नाहीं. "

" प्राणावर येऊन बेतली—नव्हे, प्राणापेक्षां बहुमोल अशा अब्रूवर येऊन बेतली तरीसुद्धां चालण्यासारखं नाहीं काय ? न चालायला झालं काय ? "

जास्त वाद वाढविण्यांत हांशील नाहीं अशा विचारानें इंदिरा चूप राहिली. तिचें मन अगदीं द्विधा झालें होतें. पत्नीची स्तब्धता पाहून वसंतराव पुढें म्हणाले—

" बरं, पैसे देऊन जर बांगड्या भरायच्या तर त्याबद्दल नमस्कार करायला हवा कशाला ? मोल देऊन माल घ्यायचा आणि वर व्यापाऱ्याचे पाय धरायचे हा एक स्त्रीराज्यांतील चमत्कारच म्हणायचा ! "

" चमत्कार कसला ? बांगड्या भरण्याचं भाग्य सगळ्याच बायकांच्या नशिबीं असतं का ? हें सौभाग्यलेणं जन्मभर भरण्याचं भाग्य लाभावं असा आशीर्वाद मिळविण्यासाठींच सवाष्ण बायका नमस्कार करीत असतात हो. "

" वाः छान ! चांगलंच भाग्य लाधेल अशानं-" पत्नीच्या खिन्न मुखाकडे नजर जातांच हेटाळणीचा स्वर बदलून ते पुढें म्हणाले-" पहा बुवा, तुमचं बांगड्यांशिवाय अगदींच भागण्यासारखं नसेल तर निदान त्या बायकांकडून तरी भरा. "

इंदिरेला तें पटलें. पुरुष कासाराकडून कधींच बांगड्या भरावयाच्या नाहींत अशी तिनें मनांतल्या मनांत प्रतिज्ञासुद्धां केली. बायकांचा उजवा हात अतिशय कामाचा असतो. डाव्या हातापेक्षां उजव्या हातांतल्या बांगड्या अधिक वाढवतात, असा अनुभव आहे. इंदिरेचेंहि तसेंच झालें. एके दिवशीं तिच्या उजव्या हातांतली एकुलती एक रेशमी बांगडी वाढवली. हातांत गोठपाटल्या होत्या. परंतु संवईमुळें बांगडीशिवाय हात बरा दिसेना. कोणीं पाहिलें तर काय म्हणेल ही धाकधूक. शिवाय मनांत एकसारखी अमंगळ कल्पना घोळत राही. त्यामुळें हात तसाच ठेवणें तिला बरें वाटेना. डाव्या हातांत तीन बांगड्या होत्या. त्यांतली एखादी उतरून उजव्या हातांत घालावी म्हणून तिनें बरेच प्रयत्न केले. परंतु त्यांत यश न येतां उलट डाव्या हातांतील दोन बांगड्या वाढवल्यामुळें एकीला अधिक जपणें भाग झालें. आपलें संकट तिनें पतीला सांगितलें व सैलशा चार सहा बांगड्या बाजारांतून आणून देण्याची विनंति केली. विनंति करीत असतांची तिची ती केविलवाणी मुद्रा पाहून वसंतरावांस गंमत वाटली. ती जसजसें गंभीरपणानें बांगड्या आणावयास विनवी तसतसें त्यांना हसूं येई. केवळ गमतीखातर त्यांनीं बांगड्या आणून देण्याचें पुढें ढकललें. इंदिरेनें गळ्यांतल्या गळसरींतील एक सर काढून हातांत बांधला. वसंतराव इंदिरेच्या-त्यांच्या मतें-कोत्या समजुतीला हंसत राहिले; परंतु त्यांनीं बांगड्या आणून दिल्या नाहींत. असेच कांहीं दिवस गेले.

* + *

एके दिवशीं इंदिरा तांदूळ निवडीत बसली असतां ' बांगड्या भरतां का बाईऽऽअ ? ' असा सवाल तिच्या कानीं आला. इंदिरा धांवतच दाराशीं गली, तों काय ? ' आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन ' अशीच तिची गत झाली. दाराशीं कासारीण उभी ! पुरुष कासार असता तरी तिनें आज प्रतिज्ञा मोडली असती. कारण तिच्या दोन्ही हातांत लहान मुलांसारख्या मण्यांच्या मणगट्या शोभत होत्या. त्यामुळें तिला देवाला जाणेंसुद्धां अशक्य होऊन गेलें होतें. तेव्हां ती मुसलमान कासारीण पाहून प्रतिज्ञा मोडण्याचें पातक अनायासें टळलें या विचारानें तिला आनंद झाल्यास नवल काय ? आनंदानें व कांहींशा अधीरतेनें तिनें कासारणीला घरांत येण्यास सांगितलें. ती आंत आल्यावर इंदिरेनें दार लोटून घेतलें व जवळचा पाट ओढून त्यावर ती बसली. कासारणीनें नाकापर्यंत नव्हे खालच्या ओठापर्यंत ओढणी पुढें ओढलेली होती, व साधारणपणें ती बरीच उंच दिसत होती. तिची ती उंची इंदिरेला चमत्कारिक वाटली. परंतु खरोखर ती तितकी उंच नसून इजारीमुळें कदाचित् तिची उंची किंचित् अधिक भासत असेल अशी तिनें आपल्या मनाची समजूत घातली. कासारणीनें तिचे हात हातांत घेऊन अजमावून पाहिले, आणि तिच्या हाताचा वीड काढून दिला. इंदिरेनें रंग वगैरे पसंत केला, भाव ठरविला आणि ती म्हणाली—

" अगदीं घट्ट बांगड्या भर बाई, सैल लौकर वाढवतात." कासारीण अगदीं मुखजड दिसली. तिनें मानेनेंच संमति दर्शविली. इंदिरेचा हात दाबून चोळून तिनें मऊ केला आणि एक जोडी घेऊन ती हातांत चढवूं लागली. वीड बराच लहान होता; इंदिरेच्या हाताला कळ लागली. डोळे झांकून ती कशीबशी कळ सोशीत होती. कासारणीनें तिचा हात आपल्या गुडघ्यावर टेकविला होता व आपल्या पदराचें टोंक हातीं धरून ती बांगडी चढवीत होती. इंदिरेला कळ कमी भासावी म्हणून ती तोंडानें तिच्या हातावर फुंकर घालीत होती. एवढ्या परिश्रमानें शेवटीं ती जोडी हातांत गेली. कासारणीनें ती मनगटांत सैल होते कीं घट्ट हें एकदां दोनदां हळूच फिरवून पाहिलें व आपल्याशींच ती किंचित् हंसली. इंदिरा तिला उद्देशून म्हणाली —

" पुरे ह्या हातांत. आतां कळ नाहीं सोसणार. दुसऱ्या हातांत भर; पण जरा सैल भर. "

कासारणीनें बांगड्या हातांत घे, खालीं ठेव, अशी थोडी चाळवाचाळव केली आणि त्याच विडांतील जोडी दुसऱ्या हातासाठीं घेतली. इंदिरेला आतां कळ सोसवत नव्हती. ती हुंः हुंः करूं लागली. तरी कासारणीनें आपला क्रम पूर्ववत् सुरूच ठेविला. इंदिरा रडकुंडीस आली. कळ असह्य झाल्यामुळें तिनें हात मागें ओढला आणि बांगडी अर्ध्या हातावरच पिचली. हाताला कांचा लागूं नयेत म्हणून फार काळजीपूर्वक कासारणीनें बांगडीचे तुकडे काढले, बारीक सारीक आपल्या पदरानें पुसून व तोंडानें फुंकून काढले. हें चाललें असतां साहजिकच इंदिरा पुढें वांकली. तिचें सर्व लक्ष हाताकडेच होतें. इतक्यांत जडशा हाताचा विळखा तिच्या गळ्याभोंवतीं पडला व राकट ओंठ तिच्या मृदु गालावर टेंकले गेले, आणि अनपेक्षित ध्वनि कानीं आला !

\+ * +

या आकस्मिक हल्ल्यानें ती हतबुद्ध झाली. भयानें गांगरून गेली. मस्तकावरून कढत ओघळ वहात आहेत असें तिला वाटलें. कांपऱ्या हातानें तिला झिटकारीत अडखळत अडखळत ती म्हणाली, ' अग हें काय ? वेड का लागलंय तुला ? '

यावर ' हां प्यारी ! तुझंच वेड लागलं आहे. ' असें उद्‌गारून कासारीण खदखदा हंसली. तें हंसणें इतकें भेसूर होतें कीं तें ऐकून इंदरा दोन हात मागें सरून भयचकित हरिणीप्रमाणें थरथर कांपूं लागली. मोठ्यानें ओरडावें असें मनांतून वाटत असतांहि तिच्या तोंडून शब्द उमटेना. भयानेंच तिची बोबडी वळली. तें भेसूर हास्य स्त्रीचें नव्हतें. त्या छद्मवेशी कासारणीनें बुरखा मागें सारला, तेव्हां आपणापुढें तो नेहमींचा फेरीवाला मुसलमान बसला आहे, हें इंदिरेला दिसून आलें. ती होतें नव्हतें तेवढें बळ एकवटून त्वेषानें ओरडली " मेल्या, चांडाळा ! " तो हंसतच राहिला. त्याचा तो निर्लज्जपणा पाहून रागानें दांत–ओंठ खात ती म्हणाली, ' चांडाळा, चालता हो इथून, नाहींतर बोलावीन कोणाला तरी. ' ' हां जातों बाईसाहेब ! पण आतां तुमी मुसलमीन झाले हें याद ठिवा. ' असें बजावून तो हंसत हंसत गेला.

हाय ! वज्राघात झाला ! ! इंदिरा इतकी भांबावून गेली होती कीं, एकाकी स्थितींत आलेल्या ह्या संकटाचें वास्तविक स्वरूप ओळखण्याचें त्राण तिच्या

मनाला राहिलें नव्हतें. " **तुमी मुसलमीन झाले.** " हें वाक्य तप्ततैल-प्रमाणें तिच्या कानांत शिरतांच तिच्या बुद्धीला जागृति आली. आपला कसा घात झाला ? आतां आपलें काय होणार ! आपण शीलाला, धर्माला मुकलों, पतित झालों. ह्या विचाराचें ज्ञान होतांच ताडकन् तिनें आपलें डोकें आपटून घेतलें. तिनें पुष्कळ शोक केला. तिला मागील सर्व गोष्टी आठवल्या. आपल्याला फेरीवाल्याकडून खेळणें घेण्याची प्रथम दुर्बुद्धि कशी आठवली, खिडकीशीं उभें राहण्याची चूक आपण अजाणपणें पुनःपुनः कशी केली, पतीनें आपणास त्या दिवशीं एका बाईची हकीकत सांगून पुरुषांकडून बांगडया न भरण्याविषयीं विनोदानेंच परंतु किती मनःपूर्वक सांगितलें. आपणहि किती मनःपूर्वक प्रतिज्ञा केली हें सर्व तिला आठवलें. आपण प्रतिज्ञा मोडून पतीच्या आज्ञेची अवज्ञा केली. त्याच्या इच्छेशीं प्रतारणा केली, त्या पापाचें फळ म्हणूनच हें पतितत्व आपल्या वांट्यास आलें ! हाय ! हाय ! आतां हें पापी पतित मुख पतीला कसें दाखवावें ? बसल्या जागीं इंदिरा विचार करीत राहिली. मुलीला मधल्या वेळीं दूध किंवा खायला घालण्याचेंहि तिला भान राहिलें नव्हतें. आईच्याभोंवतीं खेळून व शेवटीं रडून आतां लिलीला झोंप लागली होती. मांडीला कळ लागली आहे किंवा लिलीचें डोक्याशिवाय सर्व शरीर जमिनीवर आहे या गोष्टीकडे इंदिरेचें लक्ष नव्हतें. वात्सल्यालासुद्धां या वेळीं वाव नव्हता !

संध्याकाळ होत चालली, वसंतरावांची घरीं येण्याची वेळ जवळ येत चालली, तसतशी इंदिरा जास्तच अस्थिर झाली. शेवटीं तिनें कांहीं तरी निश्चय केला. मांडीवर डोकें टेकून झोंपलेल्या लिलीला हळूच उचलून तिनें आंतल्या खोलींत निजविलें आणि एका चिटोऱ्यावर दोन ओळी लिहून तें तिनें टेबलावर पेपरवेटखालीं ठेविलें. नंतर बाहेर जाण्याच्या उद्देशानें तिनें ओचे पदर नीट सांवरले. इतक्यांत तिची नजर निष्पाप लिलीकडे गेली आणि तिला भडभडून आलें. मुलीचें चुंबन घेण्यासाठीं ती वांकली असतां सळकन् तिच्या डोक्यांत विचार आला. ' हाय, हाय, मी बाटलें. माझ्या आयुष्याचा नाश झाला ! माझी सांवलीसुद्धां माझ्या बाळेला नको ! ' अश्रु झिरपत असतां मूकपणेंच तिनें मुलीचा निरोप घेतला.

× × ×

ऐन तिन्हीसांजच्या वेळेला घराच्या बाहेर पडून ती नदीच्या दिशेनें झपाट्यानें निघाली. नदीवर अगदी एकीकडे कमी वर्दळीच्या बाजूला जाऊन ती उभी राहिली. प्रथम चोहोंकडे नजर टाकून तेथें कोणी नाहीं अशी खात्री झाल्यावर तिनें प्रिय पतीला व कन्येला सुखी राखण्याविषयीं देवाची करुणा भाकली. ज्या गंगामातेच्या उदरांत आतां आपल्याला अक्षय ठाव मिळणार तिचीहि तिनें मनोभावानें प्रार्थना केली. ती करितांना आपण हें साहस कां करीत आहों, आपल्या अमूल्य प्राणांवर आपल्याच हातानें तिलांजली देऊन प्रिय जनांना दुःखांत कां लोटीत आहों या गोष्टींचा तिनें मोठ्यानें उच्चार केला. अखेर ती म्हणाली, " गंगामाते, जर माझ्या हातून पाप घडलें असेल तर तूं मला आपल्या पवित्र उदरांत स्थान देऊन पावन कर. " वरील वाक्य उच्चारून तिनें नदींत उडी घेतली. ती उडीसरशीं तळाशीं जाते न जाते तोंच तिच्या पाठोपाठ दुसरी उडी पडल्याचा धप्कन आवाज झाला. खोल पाण्याच्या जागीं इन्दिरेनें उडी टाकिली होती. ती जेव्हां वर आली तेव्हां मागाहून उडी टाकणाऱ्या व्यक्तीनें पोहत पोहत बाहु लांबवून तिला धरण्याचा प्रयत्न केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. दुसऱ्यांदा जेव्हां ती वर आली, तेव्हां मात्र चपळाईनें तिचे केश घट्ट पकडून तिला पुन्हां खालीं जाऊं दिलें नाहीं. एका हातानें घट्ट धरून दुसऱ्या हातानें पाणी कापीत त्या व्यक्तीनें तीर गांठलें. ही व्यक्ति मुंबईहून त्या गांवीं पाहुणा आलेला एक नवखा गृहस्थ होता. तो या श्रमानें फार दमला होता; तरी हळूच इन्दिरेला उचलून त्यानें कांठावर ठेविलें. ती या वेळीं शुद्धीवर नव्हती. त्यानें तिचें पोट वगैरे दाबून पाहिलें. श्वास पाहिला तो अगदीं मंद चालत होता. ती फारसें पाणी प्यालेली नाहीं असें त्यास आढळून आलें. भेदरल्यामुळें ती बेशुद्ध झाली असावी, असें त्यानें अनुमान केलें. काळोख वाढत चालला होता, जवळपास कोणी दिसत नव्हतें. अशा स्थितींत तिला टाकून जाणें अशक्य. परंतु घेऊन तरी कसें व कोठें जाणार ? त्यानें तिचीं कानशिलें व तळवे घांसून उष्णता आणण्याचा व हात वर खालीं करून श्वासोच्छ्वास सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्यांतहि यश येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां शेवटीं त्यानें जवळपास फिरून पानपाचोळा व काटक्या जमवून त्यांचा जाळ केला, व त्या उष्णतेनें

तिचे तळवे व तळपाय शेकून काढले. या प्रयत्नाला शेवटीं यश आलें. इंदिरा शुद्धीवर येण्याचें चिन्ह दिसूं लागलें.

*  *  *

इकडे वसंतराव घरीं आल्याबरोबर टेबलावरील इंदिरेची चिठी त्यांना मिळाली. तींत इंदिरेनें आपणावरील संकट, त्याकरितां देहान्त प्रायश्चित्त घेण्याचा निश्चय व प्राणाधिक कन्येला आणि स्वतांला जपण्याबद्दल केलेली कळकळीची विनंति इत्यादि लिहिलेल्या मजकुरावर झरझर दृष्टि फिरवून वसंतराव नदीकडे तीराच्या वेगानें धांवत गेले. इंदिरा असलेल्या जागीं नेमकें येण्याला त्या गृहस्थानें केलेल्या जाळाचें त्यांना साह्य झालें. पत्नीला तशा स्थितींत पाहून त्यांना अतिशय दुःख झालें. त्या गृहस्थाला मात्र त्यांच्या आगमनानें पुष्कळ धीर आला. इंदिरा शुद्धीवर येत होती अशा वेळीं तिच्या मनावर एकदम परिणाम होऊं नये अशा उद्देशानें ती पूर्णपणें शुद्धीवर येईतोंपर्यंत वसंतरावांना तिच्या उशाच्या बाजूला पलीकडे बसावयास त्यानें सांगितलें. जागृत होत असलेल्या इंदिरेला उद्देशून तो गृहस्थ म्हणाला—

" बाई, उठूं नका; थांबा, थोडया शान्त पडून रहा. नंतर मी तुम्हाला घरीं पोंचवीन. "

हे त्या गृहस्थाचे उद्‌गार ऐकून तिला रडें कोसळलें. ती म्हणाली,

" हाय, आतां कसलं घर ? मला पापिणीला गंगामाईनंहि ठाव दिला नाहीं. आतां या जगांत मला कुठंच जागा नाहीं ! "

" छे छे. रडूं नका बाई. तुमची हकीगत सर्व मला समजली. तुम्ही पापी नाहीं म्हणूनच गंगामाईनें तुम्हांला तारलें. तुम्ही उडी घेतांना म्हणालांच होतां कीं, " मी पापी असेन तर मला पोटांत घे. " तुम्हाला तारून तुह्मी पापी नाहीं हें गंगामाईनेंच सिद्ध केलें आहे. " इंदिरा हुंदके देत म्हणाली, " खरोखरच मी मनानें वाचेनें शुद्ध आहें. पतित नाहीं. परंतु त्या पाप्यानें माझ्या देहाला स्पर्श केला. ' तुह्मी मुसलमान झालां ' असें म्हणाला. अशा वाटलेल्या—"

" समजलों. बोलण्याचे श्रम घेऊं नका. आणि विनाकारण मनाला इतकें लावून घेऊं नका. जरा शांत व्हा. तुमची गैरसमजूत झालेली आहे. ती प्रथम दूर केली पाहिजे. तमची समजूत झाली म्हणजे तुमच्या पतीचीहि

आपोआप होईल. असें पहा, त्या कासारानें तुमची जी आगळीक केली ती-बद्दल त्याला चांगले लत्ताप्रहार करून पुन्हां तो असली आगळीक कधीं कोणाची करायचा नाहीं असें वास्तविक तुह्मीं करायचें; तें सोडून त्याच्या पापाबद्दल तुह्मी स्वतः देहान्त प्रायश्चित्त घेण्याला प्रवृत्त झालां होतां, याला काय म्हणावें ? तिकडे उत्तर हिंदुस्थानाकडे असाच मूर्खपणाचा प्रकार चालला आहे. तिकडे हिंदु न्हावी नाहींत, आणि न्हाव्याच्या ताब्यांत आमच्या तरुण विधवा मुली देण्याची तर आमची सनातनी चाल. तेव्हां त्या लबाड न्हाव्यानें एकांतांत आपल्या तावडींत सांपडलेल्या त्या गाईला तोंडांत थुंकून आपण " बाटविले " असें खुशाल घरांतील मंडळींना जाहीर करावें; आणि या त्याच्या कबुलीजबाबाबद्दल त्याला योग्य शासन करण्याचें सोडून आमचे लोक करतात काय ? तर आपली ती असहाय पोर आपलें निर्दोषित्व जीव तोडून सांगत असतां तें असत्य मानून, त्या बिचारीला भ्रष्ट समजून घरांतून घालवून देतात. पर्यायानें त्या पाप्यालाच ती बक्षीस देतात म्हणाना. चोर सोडून संन्याशाला सुळी देण्यासारखेंच नाहीं का हें ? तुमचें आत्तांचें वर्तन अगदीं असेंच होतें. याच आमच्या प्रवृत्तीनें हिंदुधर्माचा ऱ्हास होत आहे. परधर्मीयांचे हल्ले मुकाट्यानें सहन करण्याच्या वृत्तीमुळेंच आम्ही अधिकाधिक अधोगतीला जात आहोंत.

" त्याचप्रमाणें आमच्या कोत्या समजुतीहि आम्हीं घालविल्या पाहिजेत. मी तुम्हांला पाण्यांतून काढलें. तुमचा श्वास, नाडी पाहिली. यामुळें तुम्ही पतित झालां काय ? तुमचे पति तसें मानतील काय ? जर नाहीं, तर त्या मूर्खाच्या वर्तनानें ' आपण पतित झालों ' असें तुम्हीं कां मानिलें ? तुमचे पति तुमचें हृदय जाणतच असतील. तुमच्या सहवासानें त्यांना तुमची पारख झालेली असेलच. दुसऱ्याच्या दोषाबद्दल ते तुम्हांला प्रायश्चित्त घ्यायला लाव-तील असें मला वाटत नाहीं. "

इतक्यांत वसंतराव पुढें झाले आणि दुःखभारानें खचून गेलेल्या इंदिरेचे हात आपल्या हातीं घेऊन सद्गदित स्वरानें म्हणाले, " इन्दू ! चल. घरीं चल. लिली रडत असेल. "

* * *

वरील घटनेनंतर कित्येक आठवडे इंदिरेनें बांगड्यांवर बहिष्कार घातला होता. कारण तितके दिवस ती आजारी होती. पुढें बांगड्यांचें नांव काढण्याचें धैर्य जरी तिला करवत नव्हतें तरी असे हात पहाणेंहि तिला असह्य होई. ही स्थिति वसंतरावांच्या लक्षांत आली तेव्हां त्यांनीं घोडगेरीहून स्वदेशी बांगड्यांचें पार्सल मागवून तें तिच्या स्वाधीन केलें. परंतु इंदिरेच्या हाताला हाड असल्यामुळें बांगड्या चढविण्याची कामगिरी जेव्हां त्यांच्यापर्यंत येऊं लागली तेव्हां त्यांनीं बांगड्यांचीं अर्धवर्तुळें सोन्यानें सांधून मळसूत्राच्या कायमच्या कांचेच्या बांगड्या करवून सौभाग्यवतीला खरोखरीच वज्रचुडेमंडित केलें !

# विस्तवाशीं खेळ.

आज कुसुम फारच चिडली होती. कुसुमला हिंदु संस्कृतीचा फार अभिमान होता. त्याला धक्का लागण्यासारखे उद्गार बेजबाबदारपणें कोणीं काढले, कीं तिला मोठा राग येत असे. पारशी मैत्रिणी पिरोज व फ्रेनी यांच्यांशीं कांहीं विषयांवर वादविवाद करतां करतां भिन्न संस्कृतींचा विषय निघून हिंदु संस्कृती-संबंधीं त्यांचे विचार तर तिला पसंत पडले नाहींतच; पण त्यांनीं विनोदानें काढलेले कांहीं उद्गारही तिला झोंबले.

" आम्ही व्यापाऱ्याच्या मुली आहों बरं. आमचं धोरण तुम्हांला कुठून येईल! म्हण आहेना? आगम बुद्धि वाणिया ने पश्चात् बुद्धि बामणिया."

परंतु तिला विशेष चिडविण्याला कारण झाली मालू. ती बाह्यतः विनोदानें म्हणून जेव्हां पारशी मैत्रिणींचीच री ओढूं लागली तेव्हां तर तिच्या रागाचा पारा अधिकच चढला. तिचें चरफडणें पाहून मालू हेटाळणीनें म्हणाली,

" एवढं चरफडायला नको कांहीं! पुष्कळ पुरावे आहेत; अगदीं सप्रमाण सिद्ध करून देईन."

मालूचें हें आगींत तेल ओतणें चाललें होतें व विमल, कमल याहि तिला कांहींशा विनोदानेंच साह्य करीत होत्या. परंतु यानें कुसुमचा राग धुमसून धुमसून अगदीं पेट घेण्याच्या बेतास आला होता. ती ओरडून म्हणाली—

" कर पाहूं सिद्ध, म्हणे पुरावे आहेत. मोठी पंडिताच कीं नाहीं!"

" खरोखरच पुरावे आहेत. एकच ताजा दाखला देऊन तुला चीत करीन. पण तूं हरलीस तर आम्हांला काय देशील?"

" देईन एक एक तोंडांत!"

" छान! आम्हांला तरी तोंडांतच पाहिजे; परंतु चांगलं गोडसं अन् तोंड-भर पाहिजे बरं का."

विमल आणि कमल अर्थपूर्ण दृष्टीनें तिच्याकडे पहात एकदमच उद्गारल्या.

" बरं. आतां तुमचं पांडित्य पुरें करा जरा. हं, मालू, तुझं काय तें येऊं दे आतां पुढें."

" अग, काय पुन्हां पुन्हां अशी आव्हान करतेस ? मी आपली खरं तेंच सांगतें. अशी संतापू नकोस बाई. फ्रेनी अन् पिरोज म्हणाल्या त्यांत बरंच तथ्य आहे. कोणत्याही बाबतींत आमच्या लोकांना मुळीं आधीं धोरणच नसतं. त्यामुळें मागाहून पश्चात्ताप करण्याची पाळी येते. हेंच पहाना परवांचं. तो तुमच्या समाजांतील कोणी विलायतेहून बॅरिस्टर होऊन आला त्याचं बंदरावर स्वागत करायला तुमच्या समाजांतील कितीसे लोक गेले होते ग ? स्वपराक्रमानें परदेशीं जाऊन विद्वद्वर्गांत पहिलें पद प्राप्त करून परत आलेल्या पहिल्या पदवीधराचा तुम्हीं काय गौरव केला आहे ? तेंच पारशी पहाना तो त्यांच्या ना जातीचा ना गोताचा पण केवळ त्यांच्या त्या + + + संस्थेचा मेंबर, म्हणून त्या संस्थेमार्फत आमचा ओल्ड बॉय Great man होऊन आला याबद्दल बंदरावर जाऊन पहिला पुष्पहार घालून आपला आनंद त्यांनीं व्यक्त केला. आणि तो बिचारा सरदारगृहांत जात होता, त्याला भाड्याच्या व्हिक्टोरियांतून त्यांनीं आपल्या बोर्डिंगमध्यें आग्रहानें आणिले. कालचीं अभिनंदनपर सभा भरून त्याचा जो गौरव झाला तो याच संस्थेमार्फत. यांत तुमचे लोक होते. कॉलेजांतील १०१५ तरुण यांत सामील होते, परंतु ही कांहीं मोठी अभिमानास्पद गोष्ट आहे असें मला वाटत नाही. वास्तविक त्याचा गौरव करण्यांत तुझ्या साऱ्या कुटुंबानें भाग घ्यायचा. कां विमल, मी म्हणतें हें वावगं आहे का ग ? शिरीन, फ्रेनी इच्या सारख्या स्वस्थ राहिल्या असत्या का अशा वेळीं ? "

विमल ही अद्यापपर्यंत तटस्थ होती. ती पुढें सरसावून म्हणाली, " नाहीं. यांत कांहीं वावगं नाही. त्यांच्या जातींत जर असा पहिला पदवीधर झाला असता तर त्यांनीं असा थंडपणा दाखविला नसता. त्यांचे लोक फुलांच्या परड्या अन् फळांच्या करंड्या, अन् मोटारी घेऊन बंदरावर धांवत गेले असते; पहिला हार घालण्यासाठीं रेटारेटी केली असती; उपाहार, चहापार्ट्या, गार्डनपार्ट्या, पक्वान्नांचा घमघमाट, काट्याचमच्यांचा आवाज, भाषणांची रेलचेल, एक ना दोन. अशा अनेक परींनीं त्यांनीं आपला स्वजनाविषयींचा अभिमान व्यक्त केला असता, यांत संशय नाहीं. आणि हिच्या लोकांनीं हें केलं नाहीं म्हणून तुला गैर वाटून तूं बोलतेस हें अगदीं बरोबर आहे. परंतु त्याबद्दल इतक्या शिरा तुटेतों हिच्याशीं तूं कां भांडतेस हें मला समजत नाहीं. "

" कां भांडतेस म्हणजे ? बाबासाहेब आणि माईसाहेब यांच्यासारख्या पुढारलेल्या सुविद्य सुधारकाग्रणी जोडप्याच्या गळ्यांतील केवळ ताईत अशी ही त्यांची सुशिक्षित, अविवाहित कन्या इतकी मुग्ध पाहून कोणाला त्वेष येणार नाहीं ? त्यांचा समाज इतका थंड असायचाच नाहीं. पण, जर का त्यानें अशी कधीं कोठें थोडीशी उदासीनता दाखविली असती तर त्यांच्या मुलींनीं चळवळ करून चोवीस तासांत ती सोडून देणें समाजाला भाग पाडलें असतें ! "

" वा: तें काय विचारावं ? बोलघेवडेपणा म्हणतात तो हाच ! म्हणे असं केलं असतं अन् तसं केलं असतं. सर्व सुधारणांनीं संपूर्ण असाच त्यांचा समाज आहे आणि आतां बोललीस त्याप्रमाणें थंडपणा, अप्पलपोटेपणा, उदासीनता, दुराग्रह इत्यादि दुर्गुणांविरुद्ध चळवळ करायला त्यांना जागाच नाहीं अशी तुझी समजूत आहे वाटतं ? "

" जाऊं दे ग विमल, " मालूच्या प्रारंभीच्या भाषणानें चिडलेली कुसुम शान्त होऊन हंसत हंसत म्हणाली.

" जाऊं दे. तिचा स्वभाव तुला काय माहीत नाहीं ? तिच्या तोंडाळपणा-पुढें टिकाव धरणं आपल्याला कांहीं व्हायचं नाहीं. ती पक्की दुराग्रही आहे. हे मला माहीत आहे. "

" सत्याग्रही म्हण. म्हणे दुराग्रही ! दुराग्रही म्हणायला काय ग आधार आहे ? आपली उचलली जीभ —"

" अग, एका जिभेनं किती बोलशील माले ? " कमलेनें मध्येंच प्रश्न केला.

" मी तरी तेंच म्हणते. " कुसुम पुढे म्हणाली—" मालती, तुझा हा वाद संपणार तरी केव्हां बाई ? "

" तुझ्या लग्नाचे लाडू मिळतील तेव्हां ! " मोठमोठ्यानें हंसत मालतीनें उत्तर दिले. ते ऐकून सर्वजणी हंसूं लागल्या. हंसत हंसतच कुसुम म्हणाली,

" माझ्या कसले ? कमलच्या लग्नाचे लाडू माग. तिचं लग्न ठरलेलं आहे."

" अन् तुझं ठरवायचं आहे. "

तिला पुढें बोलूं न देतां कमल पुढें होऊन म्हणाली--

" वा: वा: ! हा वाद अगदीं हेतुपूर्वक उपस्थित झालेला दिसतो आणि ही

अरसिक म्हणते 'वाद संपणार केव्हां ?' अग, तुझ्या लग्नाची भद्रेश्वरी करायचं हिनं मनावर घेतलेलं दिसतंय ! "

या थट्टेनें कुसुमचे गाल जरी लाल झाले होते तरी रागाचें उसने अवसान आणून ती म्हणाली—

" काय ही थट्टा मांडली आहे आणि हंसतां तरी केवढ्यानं ? तिकडे माई अन् बाबा आहेत. तीं म्हणतील तरी काय आम्हांला ? "

" काय म्हणणार ? म्हणतील मुली मोठ्या पाणीदार आहेत. आतां त्यांनीं लग्नासारखा महत्त्वाचा प्रश्न हातीं घेतला आहे हें सुचिन्ह आहे ! आतां राष्ट्राचा भाग्योदय जवळ आला असेंच त्यांना वाटेल. " मालती ठांसून म्हणाली.

" जणूं काय सर्व प्रश्न यापूर्वीच सुटले आहेत ? " कमलेनें पृच्छा केली.

" म्हटलं ते तुमच्यासारख्या पंडिताबाईसाठीं राखून ठेविले आहेत बरं का ? "

" छे बाई, हिच्यापुढें बोलून निभाव लागायचा नाहीं. हिच्या घशांत गरम चहाचे निदान दोन कप तरी ओतलेच पाहिजेत. त्याशिवाय कांहीं ही थंड व्हायची नाहीं. "

* * *

मुलींचा वरील संवाद आपआपल्या दिवाणखान्यांत बसून माईसाहेब व बाबासाहेब लक्षपूर्वक ऐकत होतीं. दोघांनाही तो संवाद अगदीं मनापासून आवडला. मालतीनें केलेली कानउघाडणी व नंतर तिनें सुचविलेली गोड कल्पना त्यांना अतिशयच पसंत पडली. त्यांच्या विचाराचा विषय आज तो तरुणच होता. आपापल्या ठिकाणीं तीं दोघे आज त्याचाच विचार करीत होतीं. एवढा थोर विजय संपादन करून आलेल्या आपल्या ज्ञातींतील ह्या पहिल्या वीराचा मालती म्हणते त्याप्रमाणे ज्ञातीतर्फे जंगी सन्मान होऊं नये ही खरोखरच शरमेची गोष्ट आहे असें माईना वाटलें. स्वतः पुढाकार घेऊन पुष्कळ परिश्रमानें आतां झालेल्या गोष्टींचा वचपा भरून काढावयाचा असा त्यांनीं मनाशीं निश्चय केला; निश्चयाच्या भरांत जोरानें पावले टाकीत त्या बाबासाहेब बसले होते त्या दिवाणखान्यांत गेल्या.

ह्या गृहस्थाशीं स्नेह जोडून शक्य तर आपली लाडकी कन्या कुसुम त्यास

अर्पण करावयाची अशा गोड कल्पनेवर स्वतःशींच विचार करीत एका आराम-खुर्चीवर रेलून बाबासाहेब बसले होते. माईसाहेब आंत येतांच ते हंसत हंसत म्हणाले.

" वाः! एक चांगली कल्पना मनांत यावयाला व आपलें दर्शन व्हायला एकच गांठ पडली. प्रारंभीं शकुन तर चांगला झाला—कल्पनेला मूर्तस्वरूप यायला—"

" पुरे पुरे. सर्व चांगल्या गोष्टी माझ्याच पायगुणामुळें होतात वाटतं ? अन् शकुनावर विश्वास तरी केवढा ? कुणी ऐकलं तर खरंच वाटेल अगदीं. "

" म्हणजे ? आम्ही नेहमीं खोटेंच बोलतों वाटतें ? एऱ्हवीं शकुनावर विश्वास नसला तरी आपल्या पायगुणाच्या शकुनावर आमचा पूर्ण विश्वास आहे. मघाशीं आमची शब्दरचना जरा चुकली. दर्शनाऐवजीं–"

" पुरे कीं, हे शकुन आणि शब्दरचना जरा राहूं द्या बाजूला. त्याशिवाय आतांच कांहीं अडलं नाहीं. "

" बरें तर, राहूं द्या आमचें. आपलें काय म्हणणें तें पुढें येऊं द्या. "

" मघांचपासून चाललेलं मुलींचं बोलणं ऐकायचं नाहीं वाटतं ? "

" ऐकलें. त्याबद्दल विचार करीत होतों. "

" अस्सं. बरं मग ? "

" मग काय ? मुलींनीं फार छान मुद्दा सुचविला. 'साठींत नाहीं तें आठींत' असें म्हणतात ना ? तेंच खरें ! झाली चूक यापुढे तरी दुरुस्त करूं या. त्याला आपण दोघेही जाऊन आमंत्रण देऊं. परिचय वाढून आमची कुसुम जर त्याच्या पसंतीस उतरली तर–आणि खात्रीनें उतरणारच ! कारण हे विचार मनांत यायला आणि आपलें दर्शन व्हायला एकच गांठ पडली. म्हणून म्हणतों प्रारंभींच शुभशकुन झाला आहे तेव्हां परिणामहि चांगलाच होईल. "

पतीचें शकुनपुराण ऐकून माईसाहेबांना हंसू आलें. बाबासाहेबांच्या बंगल्यांत बॅरिस्टरसाहेबांच्या सन्मानार्थ एक जंगी पार्टी झाली हें निराळें सांगायला नकोच.

* * *

बॅ. मुकुंदरावांनीं मुंबईतच प्रॅक्टिस करण्याचें बहुमतानें ठरलें. ओळखीदेखी वाढवून धंद्याचा जम बसविण्याच्या कामीं बाबासाहेबांची त्यांना फार

मदत झाली. क्रमाक्रमानें बॅ. मुकुंदरावांशीं बाबासाहेबांच्या घरांतील एकूण एक मंडळीचा परिचय अतिशय वाढला होता. बाबासाहेब, माईसाहेब आणि कुसुम या त्रयीबरोबर सभा-समारंभाला, नाटक-सिनेमाला आणि फिरायला जाणें ह्या गोष्टी नित्याच्या झाल्या होत्या. इतकेंच नव्हे तर मधून मधून ‘ आपणांस वेळ नाहीं. ’ असें बाबासाहेबांनीं म्हटलें कीं, माईसाहेबहि– “ माझं डोकं दुखतंय भारी. तुम्हीच जाऊन या आज. ” असें मुद्दाम सुचवीत. ती पडत्या फळाची आज्ञा मानून कुसुमहि मोठ्या तत्परतेनें बॅ. मुकुंदरावांबरोबर फिरावयास जाई. त्यावेळीं तिच्या हृदयसागरावर आनंददायक कल्पनांच्या असंख्य ऊर्मी उठत.

आतां तिला कमल, विमल आणि मालू या मैत्रिणींच्या घरीं जावयास वेळ मिळत नसे. कारण एक तर त्या मैत्रिणी तिची थट्टा करून तिला अगदीं पुरे-पुरेसें करीत. अशा बाष्कळ थट्टेंत वेळ घालविण्यापेक्षां बॅ. साहेबांचे इंग्लंडांतील अनुभव ऐकणें, त्यांची निरनिराळ्या विषयांवरील विद्वत्तापूर्ण चर्चा ऐकणें तिला अधिक बरें वाटे.

बॅ. साहेब येण्याच्या वेळीं शक्य तें करून घरींच रहाण्याचा ती आटो-काट प्रयत्न करी. त्यांच्या उपाहारासाठीं एखादा नवीन पदार्थ मुद्दाम करवी.

बॅ. साहेबसुद्धां घरीं येतांच दिवाणखान्यांत जर कुसुम दिसली नाहीं तर चौकसदृष्टीने सभोंवार पाहून लगेच तिची चौकशी करीत. त्यावेळीं कुसुम हंसत हंसत पुढें येऊन संभाषणांत किंवा खाद्यपेयांत आनंदानें भाग घेई. बॅ. साहेब आपली आठवण किती मिनिटांनीं करतात हें अजमावून पाहण्यासाठीं कधीं कधीं ती मुद्दाम आंतल्या बाजूला बाह्यतः कांहीं तरी करीत राही, आणि त्यांनीं स्मरण करतांच पुढें येई. अशा वेळीं माईसाहेब आणि बाबासाहेब एकमेकांकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहून हंसत असत. हा लपंडावाचा खेळ, हें वाढतें आकर्षण पाहून माई आणि बाबासाहेब यांना फार आनंद आणि समाधान वाटे यांत आश्चर्य तें काय ?

परंतु आश्चर्य वाटण्यासारखीच ती गोष्ट होती ! चार सहा महिने निघून गेले. इतक्या अवधींत त्या दोघांमध्यें इतकें आकर्षण वाढलें असूनहि बॅ. साहेबांनीं अद्यापि कुसुमला मागणी घातली नव्हती. ते नियमानें तिच्या घरीं येत, तिच्याशीं वादविवाद, थट्टा, विनोद करीत, फिरावयास जात; या क्रमांत तसेंच

कांहीं कारण असल्याशिवाय सहसा ते खंड पडूं देत नसत. कुसुमसुद्धां शाळेंतून सुटतांच मैत्रिणींच्या तडाक्यांतून आपली सुटका करून घेऊन तडक घरीं येई, व मोठ्या उत्सुकतेनें त्यांच्या आगमनाची वाट पहात, परंतु बाह्यतः कांहीं तरी करीत राही. या सर्व वर्तनाचें परिणत स्वरूप म्हणजे विवाह, त्याविषयीं मात्र बॅ. साहेबांनीं ब्रहि काढूं नये या गोष्टीचें वृद्ध माणसांना आश्चर्य वाटल्यास नवल काय ? पुष्कळदां त्यांच्या मनापुढें असा प्रश्न उभा राही कीं—

" बॅ. साहेबांच्या मनांत तरी काय आहे ? आपण इंग्लंडमध्यें असून तेथील समाजांतच वावरत आहोंत असें तर त्यांना वाटत नाहीं ना ? हें हिंदुस्थान असून आमची कुसुम हिंदु कुमारिका आहे. हिंदु मुलीची अब्रू कांचेसारखी—नव्हे शुभ्र स्वच्छ कापरासारखी असते. दूषित वातावरणाचे यत्किंचित् रजःकण जरी तीवर उडून आले तरी तिचा शुभ्ररंग मलिन झाल्याशिवाय रहाणार नाही. "

हे विचार त्यांनीं एकदा व्यक्त केल्यावर माईसाहेब मान मुरडून म्हणाल्या—

" मी तरी तेंच म्हणतें. हा विस्तवाशीं खेळ आहे. लौकर मोक्षमोक्ष झालेला बरा. नाहींतर विस्तवावर जळण्याची कापसालाच भीति फार ! "

इतकें बोलून गेल्यावर काय ही अभद्र कल्पना आपण बोलून गेलों ! शुभ संभाषणाला असला अभद्र दृष्टांत आपणास सुचला तरी कसा, असें वाटून त्यांनीं आपला अधरदंश केला. नंतर खिन्नपणे त्या म्हणाल्या—

" मला त्यांच्या वर्तनाचा अर्थच कळत नाही. किती का उशिरां लग्न करीनात परंतु निश्चित अगदीं करणारच असं तरी नक्की असलं म्हणजे झालं. त्यांच्याकडून बोलणं निघेना. तेव्हां पोरीकडे खडा टाकून पाहिला; पण ती सुद्धां थांग लागूं देईना. नुसती हंसूं लागली. पण डोळ्यांत मात्र गंगायमुना होत्या. त्यावरून काय समजायचं माणसानं ? आपलं ठीक आहे, पण माझं आईचं हृदय. अनिश्चित वातावरणांत माझा जीव गुदमरून जातो. " बोलतां बोलतां माईंच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. बाबासाहेब कळवळून म्हणाले—

" खरें आहे. मला सुद्धां या गोष्टीचा निकाल लौकर लावावा असेंच वाटतें. मी आतां प्रत्यक्षच विचारीन त्यांना. "

वरील संभाषण अगदीं गुप्त म्हणून चाललें होतें तरी त्यांतील कांहीं शब्द

कुसुमच्या कानावर पडलेच. ‘ अभ्र ’ ‘ विस्तव ’ ‘ कापूस ’ ‘ विस्तवावर जळण्याची कापसाला भीति ’ हे त्यांतील मुख्य शब्द होते.

कुसुमच्या अंगावर कांटा उभा राहिला. भयप्रद विचारांनीं तिच्या हृदयाला कंप सुटला. धडधडणाऱ्या हृदयानें ती विचार करूं लागली.

“ मैत्रिणींनीं थट्टेनें त्यांच्याशी माझें नांव जोडलें तेव्हांपासून त्यांच्याविषयीं मला आपलेपणाची भावना वाटूं लागली. मनांतल्या मनांत–मनाच्या अगदीं गुप्त दालनांत–कल्पनेनें मीं जी एक मूर्ति कोरून ठेविली होती तीच ही, असें प्रत्यक्ष दर्शनांत प्रत्ययास आलें. वागणें, वर्तणूक तरी किती गोड ! सर्वांना हवे हवेसें वाटायला लावण्याइतकी मोहिनी आहे जवळ. एकमेकांसाठींच ईश्वरानें आम्हांला निर्माण केलें आहे, म्हणूनच इतक्या सहजपणें आम्हांला त्यानें एकत्र आणिलें. परंतु आमचें मधुर मीलन तो कधीं घडवील ? ”

हा प्रश्न मनांतल्या मनांत उच्चारितांना सुद्धां ती लज्जेनें लाल झाली. जणूं काय कोणी तरी तें ऐकत असावें. आपल्या हृदयस्थ मूर्तीलाच आपणें हा प्रश्न केला आहे आणि ती मूर्ति आपल्या अधीर उतावळ्या वृत्तीला हेटाळणीनें हंसत आहे; अत्यंत आदरानें हृदयसिंहासनावर ज्या मूर्तीची आपण स्थापना केली ती आपली हेटाळणी करणार ? आपणास हंसणार काय ? कशाबद्दल हंसणार बरं ? आपणास असं मानायला आधार काय ? लगेच मनाच्या अगदीं खोल गाभाऱ्यांतून ध्वनि निघाला. ‘ आणि असं न मानायला तरी आधार काय ? ”

कुसुम चांगलीच चमकली. खरंच असं मानायला आपलं मन अगदीं निश्चित ठेवायला तरी काय आधार आहे ? त्यांचे विचार, त्यांच्या भावना शब्दानें व्यक्त झाल्या आहेत का ? माझ्याजवळ नाहीं, वडिलांजवळही नाहीं. कशाच्या आधारावर मी निश्चित रहायचं ? परस्पर-विरोधी विचारमालिकांनीं कुसुमचें मस्तक भ्रमण करूं लागलें. तिच्या मैत्रिणी मालती, इंदु आणि विमल आयत्या वेळीं तिला बोलवावयाला आल्या म्हणून बरें; नाहीं तर त्या विचारमालिकांतून तिची मुक्तता झाली नसती.

नेहमीप्रमाणें बॅ. मुकुंदराव जेव्हां आले तेव्हां कुसुम घरीं नव्हती. माईसाहेबांनीं अत्यंत अगत्यानें त्यांचें स्वागत केलें आणि बाबासाहेब सुद्धां हातांतील पुस्तक पलीकडे ठेवून ईझिचेअरवर जरा नीट बसले. चहापानाच्या

वेळींही कुसुम दिसली नाहीं तेव्हां बॅ. साहेबांनीं तिची चौकशी केली. ही संधि सूतउवाच करायला बरी आहे असें जाणून माईसाहेब हंसत हंसत म्हणाल्या,

" ती गेली आहे विमलबरोबर कमलच्या लग्नाला. पण खरंच बाळासाहेब! तुमच्या लग्नाचा बेत कधीं करतां ? कुसुमच्या मैत्रिणींचीं भराभर लग्नें होताहेत. एकदां तिच्याही मस्तकावर अक्षता पडल्या, एकदां तिला तुम्हीं पदरांत घेतली कीं सुटलों आम्ही एकदाचीं ! "

आपल्या प्रश्नाचें उत्तर आपल्या मनाप्रमाणें आनंददायकच येणार, असें गृहीत धरून माईसाहेब बोलत होत्या. त्यांचें बोलण्याकडे लक्ष नसून उत्तराकडे लागून राहिलें होतें. कुसुम घरीं येतांच तिला आपण एकदम चकित करूं इत्यादि मनोराज्यांत त्या गढून गेल्या होत्या. बाबासाहेब सुद्धां हृदयाचे कान करून उत्तर ऐकण्याच्या उत्सुकतेने बसले होते. चटकन् इंग्रजी पद्धतीप्रमाणें ' थँक यू ' असें किंवा हिंदुपद्धतीप्रमाणें ' मी आपल्या बाहेर नाहीं. ' असें उत्तर येईल अशी त्या दोघांची अपेक्षा होती. परंतु उत्तराला जेव्हां इतका वेळ लागला तेव्हां इंग्लंडला जाऊन आला तरी हिंदु मुलगा लग्नाच्या प्रश्नाला लाजल्याशिवाय कसा राहील ? असें वाटून माईसाहेब म्हणाल्या-" इतकं लाजायला नको कांहीं. आम्ही सारं समजलों-"

बाबासाहेब उठून उभे राहिले आणि हंसत हंसत म्हणाले- " बरें तर आम्हीं आपले जातों. आतां कुसुम येईल. तिलाच द्या उत्तर म्हणजे झालें ! "

बिचारे बॅ० साहेब ! मोठ्या कष्टानें घसा साफ करीत अडखळत अडखळत म्हणाले-" आपल्या अनुग्रहाबद्दल मी-काय सांगूं, माझा विवाह पूर्वीच झालेला आहे ! "

" म्हणजे ? " दोघांच्याहि तोंडून एकदमच उद्‌गार निघाला. बॅ. साहेबांचा खुलासा ऐकून वज्राघात व्हावा असें त्या दोघांना झालें. त्यांचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. बॅरिस्टर स्वप्नांत बरळतात की आपणच झोपेंत आहोंत अशी त्यांना क्षणभर भ्रांति पडली. कांहीं वेळ तेथे अगदीं भीषण स्तब्धता पसरली. ती तिघांनाहि अगदीं असह्य झाली होती. तथापि एकाच्याहि तोंडांतून अक्षर निघेना.

त्यांच्या वृत्ति अंतर्मुख झाल्या होत्या. या घटनेला अधिक जबाबदार कोण आहे, याचें संशोधन आपापल्या मनाशीं त्यांनीं चालविलें होतें. दोन तीन

मिनिटांतच आपली केवढी हानि झाली आहे हें माईसाहेबांना स्पष्ट कळून चुकलें. आपली लाडकी कुसुम हा आघात कसा सहन करील ? ह्या सुशिक्षित संभावितानें तिचा केसानेंच गळा कापला !

या विचारानें त्यांना इतकें वाईट वाटलें कीं त्यांनीं चटकन् आपला हातरुमाल डोळ्यांना लाविला, तें पाहून बाबासाहेबांनाहि वस्तुस्थितीची बरोबर कल्पना आली. दुःख आणि संतापानें त्यांचे डोळे लाल झाले होते. ओंठ थरथर कांपत होते. त्वेषानें ओरडून ते म्हणाले,

" आतां ह्या घटकेस हें सांगतां काय ? तुम्ही काय समजलांत ! आमची भाबडी पोर तुम्हांला खेळणं वाटली होय ? दुष्ट, कृतघ्न कुठले ! "

हुंदके देत देत माईहि पुष्कळच बोलल्या. कुसुमच्या पुढील स्थितीचें त्यांनीं जें वर्णन केलें तें ऐकून बॅ. साहेबांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.

बाबासाहेबांना ते नक्राश्रु वाटले. हें दांभिकतेचें सोंग पुरें करून चालतें होण्याबद्दल त्यांनीं सुचविलेंहि; परंतु माईसाहेबांना ते पसंत पडले नाहीं. बॅ. साहेबांचे अश्रु पाहून कळवळल्यामुळें म्हणा किंवा त्यांच्या इत्थंभूत हकीगतीची माहिती करून घेण्याच्या उद्देशानें म्हणा त्यांनीं त्याचें म्हणणें ऐकून घेण्याचें ठरविलें. कदाचित् मुलीच्या सुखाचा एखादा मार्ग त्यांतूनच सांपडेल, असें आईच्या वेडया मायेला वाटलें असावें. बॅ. साहेबांच्या कैफियतींतून निष्कर्ष निघाला:—

" बालपणींच त्यांचा विवाह झाला होता. त्या विवाहामुळेंच त्यांचें इतकें शिक्षण झालें. ते इंग्लंडला गेल्यावर त्यांची पत्नी क्षयानें आजारी पडली. ती माहेरींच असते. तेथें तिला बरी करण्यासाठीं वैद्यकीय ज्ञान व साधनें आपली शिकस्त करीत आहेत. ती पूर्णपणें बरी होणार नाहीं; तथापि १०।१५ वर्षें तिच्या जीविताला तसा धोका नाहीं असें तज्ज्ञांचें प्रामाणिक मत आहे. रोगानें अधिकच पोखरलेल्या तिच्या हृदयावर द्वितीय विवाह करून आपण आघात करूं इच्छित नाहीं. "

" आपण मला मायेनें जवळ केलें व पोरकेपणामुळें मातृप्रेमाला पारख्या असलेल्या हृदयाला मातृप्रेमाची ओळख पटवून दिली. आपण माझ्यावर करीत असलेल्या अनुग्रहाचा मला स्वीकार करतां आला असता तर माझ्यासारखा भाग्यवान् मीच असें झालें असतें. माझ्या मनांत हा विचार अलीकडे डोका-

वृत होता ही गोष्ट, आई, मी आपल्यापासून या प्रसंगीं लपवून ठेवीत नाहीं. परंतु यापूर्वी कधींहि कुसुमताईशीं वागतांना मी कोणत्याहि तऱ्हेनें ती गोष्ट व्यक्त होईल असें वर्तन केलेलें नाहीं. आपण सर्वांनीं ममतेला पारखा झालेल्या मला मायेनें जवळ केलें आणि मी आपल्या सहवासांत माझें दुःख विसरलों."

पुढें त्यांना बोलवेना. त्यांच्या डोळयांतून अश्रु वाहूं लागले. माईसाहेबहि रडूं लागल्या.

"खरेंच, यांत आमचाच दोष आहे. आम्हींच यांची पुरती चौकशी केली नाहीं. आमचे मनोगत त्यांना स्पष्ट सांगून त्यांची संमति आहे कीं नाहीं हें पाहिलें नाहीं. आपल्या मनांतील आशेची पूर्तता त्यांनी करावी अशी अपेक्षा करण्यांत आमचीच चूक अधिक झाली आहे. योजिलेले सर्व बेत तडीस जातील असें गृहीत धरून वागण्याचा मूर्खपणा आम्ही करून बसलों; आणि त्याचीं कटु फळें चाखण्याचें पोरीच्या नशिबीं आलें!"

"एक बायको जिवंत असतांना अशा वेळीं दुसरी काय करीत नाहींत? पण सुशिक्षित अन् सुधारक ही कीर्ति–हा मोठेपणा–मध्यें आडवा येतोना!"

त्यांनीं जडान्तःकरणानें बॅ. साहेबांना निरोप दिला. बिचारे बॅ. साहेब! या घरांतून शेवटचें पाऊल टाकतांना कुसुमचें दर्शन होईल अशी त्यांना फार आशा होती. परंतु ती सफळ झाली नाहीं.

रात्रीं कुसुम फार उशिरां घरीं आली. त्यामुळें आपल्यापुढें दैवानें कसलें ताट वाढून ठेविलें आहे हें तिला कळलें नाहीं. सकाळीं मात्र सर्वत्र भीषण खिन्नता भरून राहिली आहे, असें तिच्या प्रत्ययास आलें. तिच्या हृदयांतहि सर्वत्र अंधकार पसरला होता. संध्याकाळीं मोठ्या उत्सुकतेनें ती बॅ. साहेबांची वाट पहात होती. परंतु तिची निराशा झाली. 'कामामुळें आपल्याला यायला व्हायचें नाहीं.' अशी त्यांची चिठ्ठी आली आहे कीं काय म्हणून तिनें चौकशी केली तेव्हां—"ह्या घरांत पुन्हां पाऊल ठेवण्याची त्यांस आपण बंदी केली आहे." हें बाबासाहेबांचें उत्तर तप्ततैलाप्रमाणें तिच्या कानांत शिरलें. ती मटकन् खुर्चीवर बसली. जिज्ञासा तीव्रतेनें टोंचीत असूनहि कारण विचारण्याचें धाडस तिला करवेना. ती तडक आपल्या आईपाशीं गेली आणि तिच्या कुशींत तोंड लपवून रडूं लागली. मुलीची हृदयव्यथा मातृहृदयाला न सांगतांच समजली. मायेनें तिला पोटाशीं धरून त्या दुःखाश्रु ढाळूं लागल्या. शब्दांनीं

सान्त्वन करणें त्यांच्या शक्तीपलीकडचें होतें. कुसुमला सर्व घटना कळून चुकली. तिनें स्तब्धपणें तें सर्व ऐकलें. त्या वज्रतुल्य आघाताचा तिच्या हृदयावर इतका परिणाम झाला कीं, ती फार आजारी पडली. नित्यक्रमाप्रमाणें बॅरिस्टरांना एकदां भेटण्यासाठीं तिचें मूक हृदय व्याकुळ झालेलें होतें. ताप वाढून मनावर ताबा चालेनासा झाला म्हणजे आपली ही आत्यंतिक इच्छा ती व्यक्त करी. अशा माणसाची सांवली यापुढे आपल्या पवित्र कन्येवर पडूं नये अशी बाबासाहेबांची इच्छा होती; परंतु माईसाहेबांनी फार गळ घातल्यामुळें व कदाचित् तसें केलें तर मुलीच्या दुखण्याचें पाऊल मागें परतेल अशी आशा वाटल्यामुळेंच कीं काय बाबासाहेबांनीं बॅ. साहेबांना एकदां येण्याची परवानगी दिली.

त्याप्रमाणें ते रुग्ण कुसुमच्या कॉटजवळ येऊन उभे राहिले. या भेटींत कोणत्या मुद्द्याचा खल झाला तें कळण्यास मार्ग नाहीं. परंतु त्यानंतर कुसुमच्या दुखण्याला हळूहळू उतार पडूं लागला. कांहीं आठवड्यांनीं ती पूर्ववत् बरी झाली; परंतु पूर्वीची ती हंसरी कुसुम राहिली नाहीं. या क्षोभजनक प्रसंगामुळें तिचा उत्साह पार मावळला.

या गोष्टीला एक वर्ष लोटलें. त्या अवधींत कोणी चुकूनहि त्या गोष्टीचा उल्लेख केला नाहीं. परंतु आतां ती गोष्ट जुनी झाली त्यामुळें स्मरणांतून गेली; जणुंकाय मध्यें कांहीं घडलेंच नाहीं; अशा समजुतीनें बाबासाहेब कुसुमसाठीं स्थळें पाहूं लागले. याच सुमारास कोणी नवीन तरुण बॅरिस्टरची पदवी धारण करून इंग्लंडहून नुकतेच आले होते. त्यांचे येणें-जाणें बाबासाहेबांकडे फार वाढलें होतें. एके दिवशीं "ही आमची मुलगी कुसुम मॅट्रिकच्या क्लासमध्यें आहे." असा तिचा नवीन बॅ. साहेबांशीं त्यांनीं परिचय करून दिला. कुसुमला अशा गोष्टी आवडत नसत. तथापि कुटुंबांत अवघीं तीनच माणसें असल्यामुळें घरी आलेल्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करणें तिला भाग पडे. परंतु या पाहुण्यांचें बुद्धिपुरःसर स्तोम माजविलें जात आहे असें तिच्या लक्षांत येतांच ती त्यास टाळूं लागली. आईबापांच्या तें लक्षांत यावयाला उशीर लागला नाहीं. त्यांनीं मुलीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

"बाळ, हे सुद्धां त्यांच्यासारखे बॅरिस्टरच आहेत. शिक्षण, शरीरसंपत्ति सर्व

काहीं त्यांच्यासारखेंच. शिवाय घरचे संपन्न आणि लग्नविघ्न कांहींएक झालेलें नाहीं. ती चौकशी आम्ही आधींच केलेली आहे ! ”

विचारी कुसुम ! तिला हंसावें कीं रडावें हेंच कळेना. डोळयांत अश्रु उभे राहिले असतां खिन्नपणें हंसून ती तेथून उठून गेली. आईबापांना वाटलें, मुलगी विचार करायला गेली. आणि तें खरेंच होतें ! ती आपल्या खोलींत जाऊन विचारच करीत होती.

“ काय ह्या वडील माणसांना म्हणावं ?. मुलींना मन असतं, असं यांना वाटतच नाहीं काय ? म्हणे हेहि बॅरिस्टरच आहेत ! नगाला नग असला म्हणजे झालें, अशीच यांची समजूत दिसते. मुलीचें मन म्हणजे जणुंकाय निर्बुद्ध, निर्विकार, दगडालांकडासारखें आहे ! ‘ याच्यावर प्रेम कर ’ म्हटलें कीं तिनें करावें, नको म्हटलें कीं लगेच थांबवावे, अशी तर या अनुभवी वडील मंडळींची समजूत नाहींना ?

हृदय ! हृदय ही वस्तु एकदां–फक्त एकदांच–दान करतां येते ! आणि एकदां दिल्यावर त्यावर आपली मालकी रहात नाही. ही साधी गोष्ट सुद्धां यांना कशी कळत नाही ?

गत गोष्टीच्या स्मरणानें कुसुमचें हृदय भरून आलें. हृदयांत कोंडून ठेविलेल्या दुःखाला तिनें नेत्रावाटे वाट करून दिली, तेव्हांच तिला थोडेंसें हलकें वाटलें.

“ माईग, मला यापुढें लग्नच करायचं नाहीं. मी जिवंत रहावं असं तुम्हांला वाटत असेल तर हा प्रश्न पुन्हां माझ्याकडे काढूं नका. ”

मुलीनें विचार करून दिलेलें हें निर्वाणीचें उत्तर ऐकून आईबापांना परमावधीचें दुःख झालें. “ दहा पंधरा वर्षे अंथरुणावर खितपत राहून दुसऱ्याच्या सुखाचा मार्ग बंद करणारी प्रभावशालिनी बया मुकाट्यानें मेली असती तर काय बिघडलें असते ? आपण सौभाग्य घेऊन स्वर्गी गेली असती अन् दुसऱ्यांना सुखी केल्याचें पुण्य पदरीं पडलं असतं. दैवीं नाहीं दुसरें काय ? ”

असे विचार त्यांच्या मनांत आल्याशिवाय राहिले नाहींत. तथापि त्यांनीं तिला या बाबतींत पुन्हां त्रास दिला नाही. तिच्या इच्छेप्रमाणें तिच्या पुढील शिक्षणाची तजवीज त्यांनीं करून दिली. तरीहि ‘ बॅ. मुकुंदरावांच्या पत्नीला लौकर दुःखमुक्त करावें, ’ अशी मनोभावें देवाची प्रार्थना करायला माईसाहेब चुकत नसत.

१९१८ चें साल. जगद्विख्यात इन्फ्लयुएन्झाची सांथ सर्व जग व्यापून उरली होती. शहरें, गांवें, खेडीं–पाडीं, सर्व ह्या वणव्यांत होरपळत होतीं. असें एकहि घर नव्हतें, कीं त्यांत कोणींना कोणी या सांथीनें पछाडलेलें नाहीं.

यावेळीं कुसुम कॉलेजच्या शेवटच्या वर्षांत असून आपल्या मैत्रिणीच्या गांवीं गेली होती. गांवांत जिकडे तिकडे हाहाःकार चाललेला होता; त्यामुळें पुष्कळ दिवसांत त्यांना फिरावयाला जावयास मिळालें नव्हतें. त्या गांवीं या सुमारास जरा सांथीचा जोर कमी होत आला होता. रोजच्या मृत्युसंख्येचा आंकडा बराच कमी होत आला होता. म्हणून एके दिवशीं सायंकाळीं त्या दोघी फिरावयास निघाल्या. मैत्रिणीच्या आईनें सूचना दिली असूनहि तिकडे दुर्लक्ष करून त्या नदीकांठाकडेच निघाल्या. पुलापर्यंत त्या पोंचल्या नाहींत तोंच माणसांचा मोठा घोळका मागाहून येत असल्याचें त्यांना आढळून आलें. त्या घोळक्यांत सर्व जातींचीं आणि सर्व दर्जाचीं वृद्ध आणि तरुण माणसें होतीं. ती कोणातरी श्रेष्ठ, संभावित व्यक्तीची प्रेतयात्रा आहे हें त्यांच्या ध्यानीं आलें; कारण खांदा देण्यासाठीं सर्व लोकांची मोठी अहमहमिका लागलेली होती.

हा घोळका जाऊं द्यावा, असें त्यांना वाटलें; बाजूला थांबण्यासाठीं त्या दूर होत होत्या; इतक्यांत घोळक्यांतले कांहीं लोक पुढें आले, त्यामुळें त्या दोघींची फाटाफूट झाली. त्यांच्याबरोबरचा गडी मागें राहिला कीं पुढें गेला हें दोघींनाहि कळलें नाहीं. कुसुम मात्र त्याच जागीं थबकून राहिली.

ती मिरवणूक जायला सुमारें अर्धातास लागला. पुढील प्रेतवाहक खालीं स्मशानभागांत जाऊन पोंचले होते, तरी पुलावरून माणसांच्या मालिका चालल्याच होत्या. एवढी ही लोकप्रिय व्यक्ति कोण आहे हें जाणण्याची कुसुमला भारी जिज्ञासा लागली. ‘ मरावें परी कीर्तिरूपें उरावें ’ अशी ही व्यक्ति दिसते. एवढ्या प्रचंड जनसमूहाला आपलें गुणगान करीत चालविलें आहे असें प्रभावशाली कोण असेल बरं हें ? ”

कुसुम याप्रमाणें विचार करीत असतां खालील मंडळींत भाषण चाललेलें अर्धवट तिला ऐकूं आलें.

त्यामुळें तर तिची जिज्ञासा फारच वाढली. परंतु दुर्दैवानें उघड्या मैदानातलि तें भाषण वरपर्यंत स्पष्टपणें समजण्यासारखें ऐकूं येत नव्हतें. प्रेत भरजरी शालीखालीं आच्छादिलेलें होतें आणि त्यांवर गुलाबांच्या फुलांची जाळी

दाट पसरलेली होती. लांबीरुंदीवरून तें पुरुषाचें प्रेत आहे एवढें तिनें अनुमान केलें; परंतु एवढी भाग्यवान् व्यक्ति कोण? तिचें नांव गांव काय? हें जाणण्याची तिची इच्छा पराकोटीला पोंचली. स्थळकाळाचें भान तिला मुळींच राहिलें नाहीं. जणूं काय 'जगण्याची जरूर असतांनाच मरण्यांत मौज असते.' हें तत्त्व ओळखून वागणारी ही व्यक्ति कोण आहे हें जाणल्याशिवाय तेथून हलायचेंच नाहीं असा तिनें निश्चयच केला होता.

खांदा देण्याच्या वेळेप्रमाणेंच भाषणाच्या वेळींहि मंडळींत स्पर्धा लागलेली होती. वृद्ध, तरुण, दुःखी मुद्रा करून अश्रु झिरपत असतां सद्गदित कंठानें भाषण करीत होते, " हाय हाय ! आमचा श्रेष्ठ पुढारी गेला.' 'आमचा नेता आम्हांला सोडून गेला.' " आमचा आधारस्तंभच नाहींसा झाला." अशीं आवेशानें उच्चारलेलीं वाक्यें कुसुमच्या कानांवर आदळत होतीं. शेवटीं भाषणांची चढाओढ संपली, आणि मंडळी पुढील व्यवस्थेला लागली. प्रथम कांहीं मंडळींत थोडेंसें हलक्या आवाजाचें बोलणें झालें; कांहींतरी एकमतानें ठरलें. नंतर त्या प्रेतावरील बहुमोल भरजरी शाल वर उचलली. त्या व्यक्तीचें सर्व शरीर उघडें झालें. ती भरदार छाती, ते पिळदार दंड, सर्व अनाच्छादित होतें. फक्त कमरेला एक वस्त्र होतें.

झोंपेंत एखादें सुखस्वप्न पहात असल्यासारखी ती शान्त हंसरी मुद्रा सर्वांच्या दृष्टीस पडली. कुसुमची दृष्टि तीवर जातांच 'हाय रे दैवा ! हें काय ?' असा दुःखोद्गार तिच्या तोंडांतून नकळत निघाला. तिच्या डोळ्यांवर दाट काळोख पसरला. तिनें कठड्याचा आधार घेतला म्हणून बरें; नाहीं तर ती खालींच कोसळली असती. ती व्यक्ति-तें शव-बॅरिस्टर मुकुंदरावांचें-कुसुमच्या हृदयस्थ देवाचें होतें.

पुन्हां त्यांच्यावर दृष्टि टाकण्याइतकी कुसुम शुद्धीवर आली तेव्हां तिनें पाहिलें तों तें सुंदर शरीर धडधडणाऱ्या अग्नीच्या हिंदोळ्यांत निश्चल पहुडलेलें होतें. नेत्याच्या, पुढाऱ्याच्या अकाली मृत्यूमुळें कधींहि भरून न येणारी हानि झाली असें समजणाऱ्या समाजानें, दुःखी अंतःकरणानें परंतु हलक्या हातानें त्यावरील बहुमोल भरजरी तांबडी शाल नाश पावूं नये अशा सद्हेतूनें काढून घेतली होती. त्यामुळें उघडें पडलेलें तें सुंदर शरीर प्रत्यक्ष अग्नि आपल्या सोनेरी शेल्यानें जणूं काय झांकीत होता !

कुसुमला तें दृश्य पहावेना. दुसऱ्याच दृष्टिपाताला तिनें आपली थरथर कांपणारी शरीरयष्टि त्या धडधडणाऱ्या चितेंत वरून झोंकून दिली ! अग्नीचा स्पर्श होण्यापूर्वी तिला माईसाहेबांचे शब्द आठवले. ' विस्तवाशीं खेळतांना कापसालाच जळण्याची भीति ! ' तशा स्थितींतहि तिला हसूं आलें. हंसत हंसतच तिनें बॅरिस्टर साहेबांच्या शवाला कवटाळिलें ! !

याच वेळीं दूर कोणी गात होतें:—

" पाकी प्रीत पतंगनी पावकपर दे प्राण । धन जीवन तुज जिवडा हैयें न धरी हाण ॥ "

# तिनें आत्महत्या कां केली ?

" अरेरे ! फारच कनवाळू बिचाऱ्या ! लोण्यासारखं मृदु त्यांचं अंतःकरण ! त्यांना दैवी घाव सहन झाला नाहीं ! आपल्या हातांनीं आपला या दुःखांतून शेवट करून घेतला त्यांनीं ! भारीच त्यांचं मुलावर प्रेम ! देवानं ताटातूट केली पण तें सहन न होऊन त्या गेल्या धांवून त्याच्या भेटीला !!"

शान्ताबाईच्या आत्महत्येची बातमी ऐकून समाचारसांत्वनासाठीं आलेल्या मंडळीच्या तोंडून वरील उद्‌गार बाहेर पडले. ह्या दारुण दुःखाचे आपणहि संविभागी आहोंत हें दाखविण्यासाठीं वरीलप्रमाणें सहानुभूतिपर उद्‌गार मंडळींनीं काढले असतील. परंतु त्यानें आमचें समाधान न होतां मनाला चरकाच बसला. गरीब बिचारे ! जगरहाटीप्रमाणें सांत्वन करण्याचा प्रयत्न करण्यापलीकडे त्यांनीं तरी काय करावें ? त्यांना जर परलोकविद्या अवगत असती, मृतांच्या हालचाली व आशा, इच्छा जाणण्याचें साधन त्यांना उपलब्ध असतें तर आपल्या ह्या सहानुभूतिपर उद्गारांनीं तिच्या मृतात्म्यास शांतिलाभ होण्याऐवजीं दारुण यातनाच होत असल्याची जाणीव त्यांना झाली असती. कारण तिनें आत्महत्येपूर्वी लिहून ठेविलेल्या पत्राच्या वाचनानें आम्हांला हें कळून चुकलें होतें कीं, अशी सहानुभूति व आप्तेष्टांचा कळवळा असह्य होऊनच तिनें आत्महत्या केली होती. लोकांच्या व पत्रवाचनापूर्वी आमच्याहि समजुतीप्रमाणें अपत्यविरह दुःसह झाल्यामुळें केली नव्हती.

आमची शांताबाई—आपण जगांत पुष्कळदां पहातों त्याप्रमाणेंच—आपल्या नांवाच्या विरुद्ध स्वभावाची होती. तिला अतिशय कोपायला अगदीं क्षुल्लक कारणहि पुरत असे; परंतु गंमत अशी कीं, तिचा एवढा मोठा राग जायला वेळहि लागत नसे ! एवढी ही एक बाब सोडली तर तिच्यासारखी सुशील, सुविद्य, बहुश्रुत आणि कार्यतत्पर स्त्री विरळा ! कितीतरी सभासमित्यांशीं तिचा संबंध असे. कोणत्याहि लहानमोठ्या सभासमारंभांत शांताबाई हजर नाहीं असें बहुधा होत नसे. शिस्तीची तर ती अतिशय भोक्ती होती. ह्या एका गुणामुळेंच तिची लोकांमध्यें किती तरी वाहवा होत असे; आणि हें पाहून

आम्हां माहेरच्या माणसांना तिच्याविषयींच्या अभिमानानें अस्मान ठेंगणें वाटत असे. असें असतां अशा कोणत्या गुणाच्या अतिरेकामुळें कीं कमतरते-मुळें तिच्यावर आत्महत्येसारखा दारुण प्रसंग ओढवला? तर्कवितर्क करीत बसण्यापेक्षां तिनें आत्महत्येपूर्वी लिहून ठेविलेलें व नंतर आमच्या हातीं आलेलें तिचें पत्रच मी 'स्त्री'–वाचकांपुढें ठेवितें.

"........अपत्यविरह असह्य झाल्यामुळें मीं आत्महत्या केली असें वाटून आपण सर्व सहानुभूतीचा वर्षाव कराल, परंतु असें केल्यानें माझ्या जिवाला यातनाच होतील. तरी तसें होऊं नये म्हणून व या माझ्या हकीगती-पासून कोणाला धडा घेतां आला तर घेतां यावा म्हणून मी हें सत्यकथन करीत आहें.

माझा लाडका बाळ जन्माला येण्यापूर्वींच मी ठरविलें होतें कीं तो राष्ट्राला भूषणभूत–आधारभूत–होईल असेंच शिक्षण त्यास द्यावयाचें. याकरितां त्याच्या जन्मापूर्वींच 'बालसंगोपन' या विषयावरील बरींच पुस्तकें मीं वाचून टाकिलीं होतीं; आणि या प्रचंड ज्ञानसागरांतून मी कांहीं सिद्धांतरत्नें निवडून काढिलीं होतीं. 'मूल एकसारखें आईच्या अंगावर असतां कामा नये. वाढत्या मुलास पौष्टिक अन्न दिलें पाहिजे; विशेषतः कवचीचीं फळें उत्तम. मुलांना स्वतःचीं कामें स्वतःच करावयास लहानपणापासून शिकविलें पाहिजे. राष्ट्राच्या ह्या भावी आधारस्तंभांना प्रारंभापासूनच स्वावलंबनाचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. इत्यादि.

माझा बाळ तीन चार वर्षांचा असतांनाच त्याच्या शिक्षणाला मीं प्रारंभ केला. 'इथें उभा रहा.' 'तिथें बस.' 'याला हात लावूं नको.' 'हें मागूं नको.' 'तें खाऊं नको.' 'मध्येंच बोलून गडबड करूं नको.' 'अकारण हसूं नको.' असे शिस्तीचे व नकारात्मक साधे व सोपे पाठ मी त्याला प्रथम देत असें. शिक्षणाबरोबर खाण्यापिण्याकडेहि लक्ष देत असें. दररोज संध्या-काळीं त्याला छोकऱ्याच्या ( बॉय प्यूनच्या ) स्वाधीन करून मीं आमच्या स्त्रीसमाजांत जात असें; तेव्हां बदाम, बेदाणा व भाजलेले पिस्ते भरून एक लहानसा डबा, चार सहा बिस्किटांची पुडी आणि दुधाचें तांमलें असे जिन्नस त्याच्या स्वाधीन करून, काय, केव्हां कसें द्यावयाचें हें सर्व नीट समजावून सांगून मगच जात असें. मी जावयास निघें तेव्हां माझा बाळ केंविलवाण्या

नजरेनें मजकडे पहात खिडकीच्या गजांना धरून उभा राही. दूर गेल्यानंतर जरी मी मागें वळून पाहिलें तरी तो तेथें तसाच उभा असलेला दिसे. त्याच्या बालहृदयांत त्या वेळीं कसली तरी मोठी खळबळ उडत असावी; परंतु त्या अस्फुट हृदयांतील मूक भावनांकडे लक्ष देण्यास मला सवड कोठं होती ?

मी जेव्हां परत येई तेव्हांहि तो तसाच तेथें उभा असे. मी आंत जातांच पटकन् तो माझ्या अंगावर झेप टाकी. जणूं काय मी पुन्हां कोठें जाऊं नये म्हणून मला बाहुबंधनांत ठेवूं पाही. तो किती हलकाफूल वाटे ! बदाम पिस्त्यांसारखीं कवचीचीं फळें खाऊन आणि निर्भेळ गाईचें दूध पिऊनही अशी काय ह्याची प्रकृति ! या गोष्टीचें मला कित्येक दिवस गूढ पडलें होतें. परंतु कांहीं महिन्यांनीं तें उमगलें. मी जेव्हां आमच्या स्त्रीसमाजांत जाऊन " बाल-संगोपन " " स्त्री-जीवन " अशा विषयांवर व्याख्यानें देऊन वठलेल्या खोडांना पाणी पाजून टवटवी आणण्याचें महत्कृत्य करीत असें त्या वेळीं माझें कोवळें अर्भक आपल्या कर्तव्यच्युत मातेच्या वाटेकडे डोळे लावून गजांना धरून अधीरपणें उभें राहिलेलें असे; आणि त्याला खावयास ठेविलेलीं फळें वगैरे तो छोकरा जणुं काय आपल्या " ओव्हर ड्यूटी " बद्दल वेतन म्हणून गट्ट करीत असे ! हा प्रकार तरी तिकडून माझ्या नजरेस आणला तेव्हांच आला.

मोलाच्या माणसांवर विसंबून राहण्यापेक्षां मुलाची व्यवस्था स्वतःकडेच घेण्याचें मीं ठरविलें. परंतु सर्वच भार स्वतः उचलणें एकटीला शक्य नसल्या-मुळें ती जबाबदारी मीं विभागून टाकिली. शिक्षणासाठीं त्याला शाळेच्या स्वाधीन केला आणि आहारविहाराकडे मी पाहूं लागलें. याच सुमारास तिक-डची प्रकृति अतिशय बिघडली. आमच्या फॅमिली डॉक्टरांनीं मला निक्षून सांगितलें कीं,

" आतां तुम्ही यांच्याकडे संपूर्ण लक्ष दिलें पाहिजे. दुसऱ्या सर्व गोष्टी गौण माना, आणि प्रकृति सुधारणें हेंच मुख्य कर्तव्य समजा. नाहीं तर गोष्ट हातांतून जाईल. "

इतकें स्पष्ट सांगितल्यावर एखाद्या अडाणी बाईनेंसुद्धां हयगय केली नसती. मग मी तर चांगली शिकलेसवरलेली होतें. मी एक टाईमटेबलच तयार केलें. त्याप्रमाणें रुग्णपरिचर्या सुरू केली. या गोष्टीकडे माझें संपूर्ण लक्ष वेधल्यामुळें

इतर गोष्टींना गौणत्व येणें अपरिहार्यच होतें. औषधोपचाराकडे माझा सकाळचा सर्व वेळ गेल्यामुळें बाळाच्या शाळेच्या वेळीं स्वयंपाक तयार करणें मला शक्य नव्हतें. पोळी, बिस्किटें, शेव, शंकरपाळीं अशासारखें अन्न घालून त्याला मी शाळेंत पाठवीं. मधल्या सुटींत जेव्हां तो येई त्या वेळीं आमचीं जेवणें झालेलीं असून आम्ही विश्रांति घेत असूं. त्याच्यासाठीं झांकून ठेविलेलें अन्न तो स्वतःच घेऊन खाई. मधून मधून तो म्हणत असे—

" आई, माझे पाय वळतात ग, चालवत नाहीं. "

" पायांना भरपूर व्यायाम नाहीं म्हणून असें होतें. संध्याकाळीं मी तुला दूरवर फिरायला घेऊन जाईन. पायांचा अशक्तपणा वेळींच नाहींसा केला पाहिजे. " असें मी त्या वेळीं त्याला उत्तर देई.

संध्याकाळीं फिरून आल्यावर तो इतका दमून जाई कीं भात होईतोंपर्यंत जागें रहाणें त्याला अशक्य होऊन जाई. त्यामुळें बिस्किटें किंवा सकाळची शिळी पोळी अशासारखें कांहीं तरी देऊन त्याला निजवावा लागे. ताजें व उनउन्हीत अन्न त्याला या मुदतींत मिळालेंच नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, त्याला वारंवार बद्धकोष्ठ किंवा आमांश असे विकार होऊं लागले. इतक्या लहान वयांत त्याचें पोट पार बिघडून गेलें. एकंदर परिस्थितीचा परिणाम शरीर व शिक्षण या दोहोंवरही चांगला झाला नाहीं. चौथींत असतांना तो परीक्षेंत नापास झाला. परंतु त्याचें वर्ष असें विनाकारण फुकट दवडणें माझ्या हिशोबाप्रमाणें मला इष्ट वाटत नव्हतें. १४ व्या वर्षीं त्यानें मॅट्रिक व्हावें, म्हणजे पुढें आय. सी. एस्. ला बराच वाव राहील असें माझें धोरण होतें. म्हणून सहा महिन्यांनीं त्याला पुन्हां परीक्षेला बसविला. पुढील मुदतींत मास्तर ठेवून त्याचा अभ्यास करवून घेतला. या व्यवस्थेनें एका वर्षांत दोन इयत्तांचा अभ्यास होऊन परीक्षेंत यशही आलें; परंतु प्रकृति ? प्रकृतीचें मान यथातथाच होतें. उंच वाढल्यामुळें मूळची अशक्तता अधिकच भेसूर दिसे. मृदु कोमल आवाज बदलून बेसूर झाला होता. डोळे खोल गेले असून नाक व गालांचीं हाडें किंचित् वर आलेलीं दिसत, आणि पाठीला सुद्धां थोडा बांक आल्याचा भास होई. १४ व्या वर्षींच चष्मा ही वस्तु त्याच्या डोळ्यांना आवश्यक होऊन बसली.

* * *

आतां बाळ चांगलाच स्वावलंबी झाला होता. आपलीं सर्व कामें तो स्वतःच करी. खाण्यापिण्यांत कपड्यालत्यांत तो कसलीच आवड नावड व्यक्त करीत नसे. कोणाकडे गेलें तर त्याच्या वयाच्या मुलांची कितीतरी धडपड चाललेली दिसे. मला तर त्या मुलांचें वर्तन केवळ उद्दामपणाचें व बेशिस्तच वाटे. आमच्या बाळाचें तसें कांहींच नव्हतें. घर, अभ्यास आणि शाळा या पलीकडचें जग त्याला माहीत नव्हतें म्हटलें तरी चालेल. माझ्या कदरीच्या शिस्तीमुळें सुतासारखें सरळ त्याचें वर्तन होतें; आणि या गोष्टीचा मला मोठा अभिमान वाटे. त्याचे सहाध्यायी सुटींत त्याला आपल्या बरोबर ट्रिपला पाठविण्याचा आग्रह करीत. परंतु ठराविक पद्धतींत बदल झाल्यास त्याच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होईल असें वाटून मी त्याला कधीं कोठें जाऊं देत नसें. अन्न, हवा यांची प्रकृतीला जितकी गरज असते तितकीच किंबहुना त्याहून अधिक स्वच्छंदी, मोकळया व आनंदी वातावरणाची असते हें तत्त्व फार उशीरां माझ्या ध्यानीं आलें !

या क्रमानें कॉलेजमध्यें त्यानें प्रवेश केला. आतां मी त्याच्या पुढील आयुष्यासंबंधानें मनांत मोठे मनोरे बांधीत होतें. त्याचा आर्टस् कोर्स संपण्यापूर्वीच त्याला मुली सांगून येऊं लागतील; परंतु अशा अशक्त प्रकृतींत आणि इतक्या लहान वयांत त्याच्या लग्नाला हरकत करणें हें आई या नात्यानें माझें कर्तव्यच होतें. तथापि इंग्लंडला पाठवून तेथील शिक्षणाच्या खर्चाचा बोजा आपल्या शिरावर घेणाऱ्या सधन गृहस्थाच्या कन्येशीं वाङ्निश्चय करण्यास कांहीं हरकत नव्हती. अशानें शरीर आणि शिक्षण हीं दोन्हीहि सुधारलीं असतीं. कारण, पूर्वी सुदामदेव असलेल्या कितीतरी लोकांना इंग्लंडहून भलेलठ्ठ भीमकाय होऊन आल्याचें मीं पाहिलें होतें. तो इंग्लंडला गेल्यानंतर त्याच्या भावी श्वशुरानें आपल्या कन्येकडून एखादा कोर्स पूर्ण करून घेतला असता व ती एक उदाहरण घेण्यासारखी गोष्ट झाली असती. मीहि प्रसंगोपात्त बाळाच्या आवडी नावडी, त्याचा स्वभावधर्म यांचा परिचय करून देऊन त्याच्या भावी वधूची मनोभूमि त्याच्याकरितां तयार केली असती. एक ना दोन अशीं किती तरी मनोराज्यें मी मनांत योजीत होतें. परंतु दैवाला तें रुचलें नाहीं.

ज्याच्यावर माझ्या एवढ्या मोठमोठ्या आशा आधारलेल्या होत्या तो माझा लाडका बाळ निर्घृण काळानें अकालीं ओढून नेला !

दुखण्याची सुरवात झाली तेव्हां नेहमींचेंच अशा समजुतींत पहिले तीन चार दिवस गेले. नंतरचे दोन तीन दिवस साध्या सर्दीच्या तापाखालीं मोडले. त्यानंतर दुखण्यानें एकदम अतिशय भयंकर स्वरूप धारण केलें. त्याच्या उग्र स्वरूपाचें ज्ञान होतांच औषधोपचारांची अगदीं शिकस्त झाली. परंतु यश म्हणून आलें नाहीं.

या अपघातानें मला किती दुःख झालें तें सर्व तुम्हां सर्वांस माहित आहेच. तेव्हां त्याच्या वर्णनांत वेळ घालवीत नाहीं. मात्र या वज्राघातानें माझ्या डोळ्यांवरील भ्रमपटल नाहींसें झालें! आपल्या कडक शिस्तीचे मार्ग अपत्यसंगोपनाच्या दृष्टीनें कसे चुकले होते हें आतां माझ्या तीव्रतेनें ध्यानांत आलें. परंतु त्याचा आतां काय उपयोग होता? निर्घृण निसर्गाचें पुढें पडलेलें पाऊल कधींच मागें येत नाहीं!

सर्व आप्तेष्ट आले आणि माझ्या दारुण दुःखाचा मला थोडा तरी विरंगुळा पडावा म्हणून त्यांनीं परोपरीनें माझें सांत्वन केलें. जो तो म्हणे, "शान्ताबाईनीं फार कष्ट केले हो! सेवाशुश्रूषा तरी किती उत्तम केली? पण देवानें यश दिलें नाहीं. इ."

एखाद्या दाहक जखमेवर लहानशी फुंकर घातली असतां जितकी शीतलता लाभेल, तितकीच दुःखाग्नीनें पोळलेल्या माझ्या हृदयाला लोकांच्या वरील उद्गारांनीं लाभत असे. दुःखानें वृत्ति बधिर झाली होती, त्यामुळें वरील उद्गारांनीं अल्पसें सांत्वन झाल्याचा भास होई. परंतु माणसांची गर्दी कमी झाल्यावर कर्तव्यपराङ्मुखतेची जाणीव पोळलेल्या हृदयावर स्मृतीच्या डागण्या देण्याचें काम करीत असे.

* * *

एके दिवशीं अशाच मनःस्थितींत मी बाळाच्या मोठ्या फोटोकडे पाहून स्फुंदत स्फुंदत म्हणत होतें 'बाळ, मीं जिवापाड श्रम केले; पण देवानें यश दिलें नाहीं रे! लाडक्या, त्यामुळेंच तूं मला अंतरलास. बाळ, तुझे ते हंसरे डोळे माझ्या दृष्टीस पुन्हां कधींच पडणार नाहींत का? तुझ्या मधुर ओंठांतून 'आई,' अशी गोड हांक माझ्या कानीं यापुढें कधींच येणार नाहीं का? तुझे सहाध्यायी सुट्टींत घरीं येतात. बाहेर असले तर पत्ररूपानें आपल्या मातापितरांस भेटतात. परंतु दुर्दैवानें मला तशी कोणतीच आशा राहिली नाहीं ना? हाय हाय!'

शोकातिरेकानें डोळ्यांच्या पापण्या जड होऊन मिटूं लागल्या. अशा तद्रींत असतांनाच " आई " अशी चिरपरिचित हांक माझ्या कानीं आली; आणि दुसऱ्याच क्षणीं मी माझ्या बाळाला आपल्या बाहूंत कवटाळिलें. हृदयें हलकीं झाल्यावर कांहीं वेळानें तो म्हणाला—

" आई, तूं माझ्यासाठीं इतका शोक करशील असें मला वाटलें नव्हतें. "

" लाडक्या, तुझ्यावर माझ्या केवढ्या आशा आधारलेल्या होत्या ? असा तूं अकालीं सोडून गेल्यावर माझ्या शोकाला सीमा कशी रहाणार ? "

" पण आई, याला कारण तूंच नव्हेस का ? "

प्रत्यक्ष वीज कोसळली असती तरी मी इतकी चमकलें नसतें.

" काय ! माझ्या लाडक्याच्या मृत्यूला खरोखरच मी कारण ? बाळा, तुला असं बोलवतं तरी कसं रे ? "

" खरें तेंच सांगतों. आई, हल्लींची आयुर्मर्यादा कमी असली तरीहि तारुण्याच्या दारांत नुकतेंच पडणारें पाऊल एकदम स्वर्गाच्या दारांत पडावें हें चमत्कारिकच नव्हे का ? आणि एवढी लांबची मजल मला केवळ अशक्तपणाच्या जोरावर मारतां आली हें ऐकून आई, तुला अधिकच चमत्कारिक वाटेल. हा अशक्तपणा मीं जन्मतःच आणला होता का ? जन्माच्या वेळीं जवळ जवळ आठ पौंड माझें वजन होतें असें तूंच नव्हतीस का सांगत ? लहानपणीं मी चांगला चपळ, सुदृढ होतों असें तुला बोलतांना मीं अनेकदां ऐकिलें होतें. ती चपळता, सुदृढता वयाबरोबर वाढण्याऐवजीं मध्येंच नष्ट कशी झाली ? त्यांची जर नीट जोपासना झाली असती तर नेहमीं कांहींना कांहीं दुखण्या खुपण्याची संवय मला कां जडती ? आणि त्यामुळें प्राणघातक दुखण्याकडे प्रथम दुर्लक्ष झालें तसें तरी कां झालें असतें ?

" मला आठवतें, ती पहिली आठवण. अगदीं लहानपणीं तुझ्याभोंवतीं भोंवतीं रहावें, असें मला फार वाटे. तुझें मृदु बोट धरून फिरावें, गोष्टी-गाणीं ऐकावीं असें मला वाटे. परंतु त्या ऐवजीं गजाला धरून शून्य दृष्टीनें भिरभिर पहात रहाणें आणि एका धटिंगणाच्या संगतींत काळ कंठणें हेंच माझ्या नशिबीं होतें. माझ्या सर्व मागण्यांना त्याच्याकडून एकच बक्षिस—चापटपोळ्यांचें—मिळे. या रामबाण उपायानें हट्ट हा दुर्गुण मला जडूंच शकला नाहीं.



" काय ! माझ्या लाडक्याच्या मृत्यूला खरोखरच मी कारण ? "

" परंतु एक विचार मात्र माझ्या चिमुकल्या डोक्यांत वारंवार डोकावत असे. एक मूल हरवल्यामुळें त्याच्या आईनें केलेला शोक पुस्तकांत वाचून तुला रडें आलेलें एकदां मी पाहिलेलें होतें. त्या धटिंगणाच्या स्वाधीन करून तूं जशी मला रडत ठेवून जात होतीस, तसेंच आपण तुला सोडून जावें, नाहींसें व्हावें, त्या मुलाप्रमाणें हरवून तुला रडवावें असें दुःखाच्या व रागाच्या भरांत माझ्या बालमनाला वाटत असे. "

" हाय रे दैवा ! ही बाळबुद्धीनें केलेली इच्छा ईश्वर कान लावून ऐकत होता काय ? अरेरे— "

" पुढें मोठा झाल्यावर एकदां मी म्हणालों, ' आई, कांद्याचीं भजीं अन् बटाटेपोहे कर. आज मी माझ्या दोन मित्रांना फराळाला बोलावलें आहे. त्यांच्याकडे गेलों म्हणजे ते मला नेहमीं कांहींना कांहीं खायला देतात.

" तूं रागानें म्हणालीस, ' असले तळलेले अन् पचायला जड पदार्थ खाणें बरें नव्हे. आणि तूं कांहीं स्वतंत्र नाहींस. मित्रांना आमंत्रण देण्यापूर्वी माझी परवानगी घ्यायला पाहिजे होतीस. आणि लोकांच्या घरीं खातोस हें तर फारच वाईट. त्यामुळेंच प्रकृति बिघडते. '

" त्यादिवशीं निमंत्रित मित्रांना ' नका येऊं ' म्हणून सांगतांना मला किती उद्वेग वाटला असेल ? तुझी आणि बाबांची पुष्कळ परिचित मंडळी वारंवार आपल्या घरीं येत, आणि त्यांचें आदरातिथ्य तुम्ही करीत असां. समवयस्क मंडळींशीं हास्यविनोदांत वेळ घालविण्याची इच्छा तुम्हां वडील मंडळींनाच असते. आम्हां मुलांना नसते अशी का समजूत आहे तुमची ? तुमच्याप्रमाणेंच किंबहुना तुमच्यापेक्षांहि अधिक आणि निरपेक्ष अशी इच्छा आम्हां मुलांची असते. "

खरंच, मला आठवलं. एकदां मी श्रीखंडाच्या अन् मेसुराच्या वड्या करीत बसलें होतें, अद्यापि सर्व झालें नव्हतें; इतक्यांत बाळ आला आणि त्यांतील कांहीं मागूं लागला. मी शिस्तीची आणि नेमस्तपणाची मोठी पुरस्कर्ती. मीं म्हटलें, 'थांब, इतक्यांत नाहीं मिळणार. सगळं होऊं दे. आज माझ्या मैत्रिणी येणार आहेत. त्यांच्यासाठीं केलंय हें. ' बाळ तसाच शाळेंत गेला. माझें पाककौशल्य पहाण्यासाठीं माझ्या निमंत्रित मैत्रिणी आणि त्यांचीं मुलें आलीं. तीं गोजिरवाणीं मुलें पाहून माझ्या वात्सल्याला अन् औदार्यालाहि पूर आला

व त्यांत बहुतेक पक्वान्नें वाहून गेलीं ! संध्याकाळीं बाळाला मीं म्हटलें, ' बाळ हा थोडा चुरा उरला आहे तो तुला घे. पुन्हां कधीं तरी वड्या करून देईन तुला ! ' तो योग पुन्हां आलाच नाहीं, अन् आतां येणें शक्य नाहीं. त्या गोष्टीचा उल्लेख करणें बाळानें जरी टाळलें होतें तरी ती चटकन् आठवून डोळ्यांसमोर स्पष्ट उभी राहिली. बाळ पुढें म्हणाला,

" एकदां मधल्या सुट्टींत मी घरीं आलों असतां तुला म्हणालों, ' आई मला फार घाई आहे. खायला दे अन् चहाहि तूंच करून दे. ' तूं म्हणालीस ' वाः ! हें काय आज नवीनच ? मला वेळ कुठं आहे ? मला जायचं आहे शेजारच्या जानकीबाईकडे. उद्यांच्या समारंभाची तयारी करायाची आहे आम्हांला. तेव्हां तूंच घे करून चहा. '

" आणि माझा चहा होतो तोंच तूं परत आलीस. जानकीबाई आपल्या मुलींना कोको तयार करून देत होत्या. कोकोचा कार्यक्रम आटपेपर्यंत तुला थांबणें भाग होतें. कारण नुकत्याच उन्हांतून आलेल्या व पुन्हां लगेच उन्हां-तून जाणाऱ्या मुलींना अल्पोपहारासाठीं उष्णतेपाशीं बसविण्यापेक्षां समारं-भाच्या तयारीसाठीं थोडा उशीर झाला तरी चालेल असें त्यांना वाटलें. परंतु मुलांनीं पूर्ण स्वावलंबी असावें, दुसऱ्यावर भार टाकूं नये, असें तुझें मत होतें ! त्याप्रमाणें मी स्वावलंबीच झालों असें नाहीं, तर आत्मसंयमीसुद्धां झालों !

" कोणत्याही गोष्टीविरुद्ध जाण्याची धाडसी वृत्ति नष्ट होऊन मताविरुद्ध गोष्टीपुढेंसुद्धां नमतें घेण्याची नेभळट प्रवृत्ति वाढीस लागली. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. शाळेंतील सोबती म्हणूं लागले ' तो पहा पुस्तकांतला किडा ' ' अहारे सुदामदेव, कुस्तीला येतोस का ? ' ' अरे, ती भागुबाई कसली कुस्ती खेळणार ? ' इत्यादि हेटाळणीचे उद्गार ऐकून रक्त उसळत असतांहि त्यांच्याशीं दोन हात करून त्यांना सभ्यतेचा धडा शिकविण्याचें सामर्थ्य माझ्यांत होतें कोठें ? कदरीच्या शिस्तीपायीं तें तेव्हांच गमावलें होतें. असला मी. वेळींच गेलों हें बरें झालें. नाहीं तर आई, या पढिक पंगूची तुला पुढें खचित लाज वाटली असती. "

" छे, छे, बाळ नको रे असं बोलूं. "

बाळाच्या बोलण्यानें त्या प्रसंगाचा चित्रपट दृष्टीसमोर उभा राहिला.

लिहिण्याचें तरी काम उरकावें म्हणून मी घरीं आलें, परंतु रागामुळें तें जमेना. मी जानकीबाईंना दोष देत बसलें होतें.

" काय म्हणावं यांना ? चिटणीस झाल्या आहेत; पण कार्याचं महत्त्व कळत नाहीं. चालतं मूल कडेवर घेऊन कुठं सार्वजनिक कामं झालीं आहेत ? आसन्नमरण स्थितींत मुलीला टाकून कोल्हटकर साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष व्हायला गेले होते ! अशी कार्यनिष्ठा असावी लागते. आणि ह्या मुलींना कोको पाजीत बसल्या आहेत ! " हेच विचार जानकीबाई आल्यावर त्यांना सांगितले तेव्हां त्या म्हणाल्या,

" नाहीं हो, कोको नुसता करून दिला अन् तशीच आलें बघा. खाण्यासाठीं आलेल्या मुलींना तशाच टाकून माझ्यानं निघवेना. कोल्हटकरांचं म्हणतां, पण ते बाप होते म्हणून गेले. आईचं पाऊल नसतं पडलं बाहेर. "

जानकीबाईंचें बोलणें मला रुचलें नाहीं. नापसंतीच्या स्वरांत मी म्हणालें,

" तुमच्या मुली किंवा आमचा मुलगा लहान का आहेत आतां ? "

मला पुरतें बोलूंहि न देतां त्या म्हणाल्या,

" लहान असोत किंवा मोठीं असोत. जोंपर्यंत तीं शिकत आहेत, वाढत आहेत, तोंपर्यंत त्यांना जपण्याची जबाबदारी कमी होत नाहीं. आपल्याला त्यांची हेळसांड करून कसं चालेल ? "

जानकीबाईच्या बोलण्यांतील तत्त्व ग्रहण करण्यास माझें मन ठिकाणावर नव्हतें. उद्यां होणाऱ्या अध्यक्षीणबाईंपुढें वाचावयाच्या रिपोर्टांत तें घोळत होतें. या गतस्मृतींचें दुःख मला अनावर झालें, मी रडूं लागलें. बाळ पुढें म्हणाला—

' थांब आई, रडूं नको. मला पुढें सांगूं दे. नाहीं तर बोलण्याचें राहून जाईल. मी मॅट्रिक झालों त्या वेळची आठवण. पहिल्या पांचांत माझा नंबर आला. पुष्कळांनीं माझें अभिनंदन केलें. तुमच्याकडेहि पुष्कळांनीं माझी स्तुति केली. लोकांची पेढ्यांची मागणीहि तुह्मीं पुरविली. परंतु मी जेव्हां प्रथमच तुझ्याकडे येऊन ' आई, मी पास झालों ' असें म्हणालों तेव्हां तूं म्हणालीस–

" अरे, त्यांत काय मोठंसं झालं ? चौथा नंबर म्हणजे कांहींच नाहीं. तो माधव बघ कसा पहिला आला. "

केवढ्या आशेनें व उत्साहानें मी आलों होतों. माझ्या एका मित्राचा नंबर

कितीतरी खालीं आला होता. तरी त्याच्या आईनें आम्हां दोघांचें अभिनंदन गोड शब्दांत केलें. ती मला म्हणाली—

" असेंच पुढेंहि यश मिळवून मोठे व्हा. " आणि मुलाला म्हणाली—

" बाळ. यांचा कित्ता पुढें ठेवून वाग म्हणजे तूंहि पुढें असाच वर नंबर मिळवशील. "

" त्या साध्या भोळ्या अशिक्षित बाईनें अंतःकरणपूर्वक अभिनंदन केल्यामुळें उल्हसितवृत्तीनें मी तुझ्याकडे आलों. मला वाटलें— "

बाळाला मध्येंच थांबवून मी म्हणालें, " अरे बाळ, मी तुझं उत्तेजनपर शब्दांत अभिनंदन केलं नाहीं म्हणून तुझ्या यशाबद्दल मला अभिमान वाटला नाहीं, आनंद झाला नाहीं, असं का तुला वाटलं ? अरे तुझ्या यशाबद्दल किती तरी परींनीं आमचा आनंद आम्हीं मित्रमंडळींत व्यक्त केला ! प्रत्यक्ष तुझ्या तोंडावर स्तुति केली नाहीं. याचं कारण, अशानं मुलं शेफारतात. आहे त्या स्थितींत समाधान मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. यशाच्या मार्गानें पुढें पुढें जाण्याची त्यांची धांव खुंटते, असं माझं मत होतं. एक विद्वान् पंडित होता. त्याचा मुलगा त्याहून विद्वान् होता. त्याच्या विद्वत्तेची सर्वत्र कीर्ति पसरली होती; पण बाप त्याची कधींच वाहवा करीत नसे. त्यामुळें असाच गैरसमज करून घेऊन मुलगा दुःखानें रुसून गवाणींत पडून राहिला. आईबाप रात्रीं चांदण्यांत बसून गोष्टी बोलत होते. बापाच्या तोंडून मुलाबद्दल स्तुतिपर उद्गार निघालेले ऐकून आई म्हणाली ' इतकं जर मुलाचं कौतुक वाटतं तर तसं कधीं दर्शवित कां नाहीं ? ' यावर बाप म्हणाला, " त्यानें स्तुतीनें शेफारून न जातां अधिकाधिक विद्वान् व्हावें म्हणून. '

" बाळा, तशीच मी वागलें. अरे, मांजरीचे दांत पिलाला कधीं लागले आहेत का ? मी उघड तुला दर्शविलें नाहीं म्हणून माझं तुझ्यावरचं प्रेम कमी लेखतां येईल का ? बाळा, तूं गेल्यामुळें मी किती दुःखी कष्टी झालें आहें ! लाडक्या, तुझ्या आवडीच्या सर्व वस्तु मीं वर्ज केल्या आहेत. जे सुखोपभोग तुला पारखे झाले आहेत ते सर्व मीं वर्ज केले आहेत. "

बाळ खिन्नपणें हंसून म्हणाला—

" अरेरे ! आई, उगाच तूं आपल्याला त्रास करून घेत आहेस. सुखोपभोग मला पारखे झाले आहेत असें तुला कोणीं सांगितलें ? जगाच्या कनवाळू माउलीनें मला आपल्याजवळ बोलावून घेतलें आहे, तें दुःख भोगण्याकरितां काय ? नाहीं. आई, ज्या देहानें मला जगांतील सुखें उपभोगण्याचें सामर्थ्य नव्हतें त्या निर्बल देहाचा त्याग करवून सुदृढ, कान्तिमान् देह त्या माउलीनें मला दिला आहे—"

मी अधीरपणें म्हणालें, " बाळा लाडक्या, त्या सुंदर सुदृढ देहानिशींच या आपल्या चुकलेल्या-पश्चात्तापदग्ध-आईच्या पोटीं पुन्हां ये. बाळ, माझे अंतश्चक्षु आतां उघडले आहेत. मागील सर्व चुकांची भरपाई करण्याची संधि मला मिळूं दे. "

हंसत हंसत बाळ म्हणाला—

" नको, पुन्हां विषाची परीक्षा पाहणें नको. आणि तें माझ्या हातींहि नाहीं. "

हाय, हे वज्रतुल्य कठोर वाक्शर सोडून बाळ वाऱ्यासारखा नाहींसा झाला. माझ्या चर्मचक्षूंपुढें दाट काळोख पसरला. बाळाची उपेक्षा केल्याचे अनेक प्रसंग चित्तचक्षूंपुढें उभे राहून डोक्यांत थैमान घालूं लागले. विचारशक्ति बधिर होत चालली. पुढें काय झालें किंवा होत आहे हें कळण्याची शक्ति ज्ञानतंतूंना राहिली नाहीं, भ्रमिष्टासारखी मी पडून होतें.

लोक म्हणत माझं हृदय फारच कोमल. अगदीं लोण्यासारखं मऊ ! त्यांच्या सहानुभूतिपर उद्गारांनीं पूर्वी मला किंचित् विरंगुळा वाटत असे. परंतु आतां ? आतां माझे डोळे खाडकन् उघडले; आणि लोकांचे असले उद्गार जखमेवर मिठाचें पाणी शिंपावें तसे झोंबूं लागले. लोकांनीं माझा धिक्कार केला असता तरी मला बरें वाटलें असतें. परंतु तसें करण्याऐवजीं मला बरें वाटावें या हेतूनें सर्वजण माझ्या मृदु मनाची, मातृप्रेमाची आणि कर्तव्यदक्षतेची एकसारखी वाखाणणीच करीत. ' ईश्वरा ! माझ्या मित्रांपासून माझें रक्षण कर. ' अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणें या स्तुती व सहानुभूतीपासून माझें रक्षण कोण करणार आहे ?

प्रत्यक्ष पोटचें मूल पुन्हां या आईची उपाधि लावून घ्यायला तयार नाहीं. तसें करणें म्हणजे पुन्हां विषाची चव घेण्यासारखें त्याला वाटत असतां त्या मातृवात्सल्याच्या अलौकिकत्वाची या जगांत वाखाणणी व्हावी यापरता वस्तुस्थितीचा विपर्यास तो कोणता ?—शिव शिव. मला ही फसवणूक आतां या पुढें सहन करवत नाहीं. म्हणून मी या देहाचा त्याग करीत आहें."

---

# हरितालिका.

“ हें ग काय सुमे ? एवढ्यांत कसली ग भूक भूक करतेस ? अजून आठ तरी वाजले का ? ”

बिचारी सुमी ! आईच्या गर्जनेनें दचकून नीट बसली. भुकेपेक्षां तिला झोंपच अधिक आली होती. आई पुढें म्हणाली--

“ दोन माणसांचा एवढासा भात, एकदां उपसला कीं गार होतो. आत्तां येणं होईल मग बरोबरच वाढतें म्हटलं तर नाहीं. असल्या गुणानं हरताळकेचा उपास करायला लावीन म्हटलं तर जीव कचरतो. आम्ही तीन वर्षांच्या असल्यापासून उपास करीत आलों आणि ही पांच वर्षांची झाली तरी ठिकाण नाहीं अजून ! ”

बालिकेची झोंप पार उडाली. तिचे चिमुकले डोळे विस्तृत झाले. तिच्या-पुढें ती पूजापत्री, तें कथाश्रवण, तें नाकांत नथ अडकवून आणि सुंदर वस्त्र-भूषणें लेवून इकडे तिकडे हिंडणें, इत्यादि देखावे स्पष्ट उभे राहिले; आणि केवळ भुकेच्या हळवेपणामुळें आपण त्या सर्वांस आजपर्यंत अंतरलों, असे विचार मनांत येऊन तिनें आईला प्रश्न केला—

“ कसला उपास आई ? हरताळकेचा ना ? मी करीन—”

“ हो, नुसत्या तोंडच्या गोष्टी नाहींत कांहीं. मोठं कठिण व्रत आहे तें. त्याला कांऽहीं खायचं नसतं, अन् तुला तर सदान्कदा भुकेनं घेरलेलं ! ”

“ मी आपला नुसता फराळच करीन. मग तर झालं ? ”

“ हो ग, पण फराळालासुद्धां फारसे जिन्नस चालत नाहींत. तिखटा-मिठाचं, शिजलेलं, भाजलेलं कांहीं चालत नाहीं. ”

“ हा पथ्यापथ्यविचार कसला चालला आहे ? कशावर काय चालत नाहीं ? ”

गणपतरावांनीं प्रवेश करून प्रश्न केला.

“ नाहीं, म्हटलं सुमीला सांगतें आहें; हरताळकेच्या उपासाला कांहीं चालत नाहीं म्हणून. ”

" हं ! बरं का सुमे ! तूं नको ह्या भानगडींत पडूं. तो मोठ्या शीघ्रकोपी देवाचा उपास आहे बरं. काकडी खाल्ली तर माकडाचा जन्म येतो. दूध प्यालं तर सापाचा जन्म येतो. आणि साखर खाल्ली तर मुंगीचा येतो. कां ? असंच सांगितलं आहेना पोथींत ? "

शेवटचा प्रश्न सरस्वतीबाईना होता.

" पुरे झालं. अशी हेटाळणी करूं नये व्रताची " त्यांनीं उत्तर दिलें.

" अरे हो, विसरलोंच; जरी हा देव मोठा शीघ्रकोपी आहे तरी पण सुमे ! त्याला प्रसन्न करून घेतला तर एक मोठा फायदा होतो बरं का ! नवरा मात्र छान मिळतो ! नव्हे चुकलों, आपणास हवा असेल तोच मिळतो ! असेंच ना ? "

सरस्वतीबाई कृत्रिम कोपानें म्हणाल्या,

" पुरे झालं हं ! माणसाबरोबर देवाचीसुद्धां थट्टा करूं नये माणसानं ! अन् काय ग पोरी ? अगदीं स्वस्थ ऐकत बसली आहेस ? तुपाचं तांबलं बिमलं आणायचं सुचत नाहीं का तुला ? "

*  *  *

दुसऱ्या दिवशीं उठल्याबरोबर सुमीनें प्रश्न केला—

" आई ! रात्रीं म्हणत होतीस तो उपास कधीं आहे ? अन् तो कशासाठीं करतात ? "

प्रत्येक व्रतउपोषणामागें कांहीं तरी कारणपरंपरा असते हें त्या लहानग्या मुलीलाहि जणुं माहीत होतें. सरस्वतीबाई हंसून उत्तरल्या—

" रात्रीं सांगितलं ना ? नवरा चांगला मनाजोगा मिळायसाठीं करायचा असतो हो हा उपास ! "

" तूं सुद्धां हा उपास केलास म्हणून तुला—"

मुलगी पुढें काय बोलणार हें ताडून सरस्वतीबाईनीं ताडकन् तिच्या तोंडांत दिली आणि त्या म्हणाल्या—

" चल, चहाटळ कुठली. "

बिचारी पोर, अनपेक्षित आघातानें रडूं लागली. कोणत्या अपराधाबद्दल ही शिक्षा झाली तेंच तिला कळेना. आपण निष्कारण मुलीला मारलें याचें सरस्वतीबाईनाहि वाईट वाटलें. तिला जवळ घेऊन कुरवाळीत त्या म्हणाल्या—

" हें बघ सुमे ! असं कांहीं तरी बोलूं नये हं लहान मुलांनीं. तुला किनई ठाऊक नाहीं. ये, मी तुला हरताळकेची गोष्ट सांगतें."

सुमीनें डोळे पुसले आणि गुडघ्यावर हात ठेवून गोष्ट ऐकण्याच्या उत्सुकतेनें ती आईच्या तोंडाकडे टक लावून बसली. असा सावधान श्रोता मिळाल्यामुळें सर्व कथा नीट समजावून सांगण्याला सरस्वतीबाईंनाहि उत्साह वाटला.

चांगल्या रसाळ वाणीनें त्यांनीं हरितालिकेची कथा मुलीला समजावून सांगितली. नुकतेंच आपण निष्कारण मुलीला मारिलें तें शल्य तिच्या मनांतून घालवून तिला पूर्ववत् हंसविण्यासाठीं सरस्वतीबाईंचा हा प्रयत्न होता. त्या कथेचें महत्त्व आणि उद्देश मुलीच्या मनावर बिंबविण्यासाठीं नव्हता. यासाठीं एखादी काऊचिऊची गोष्ट सुद्धां त्यांनीं सांगावयास घेतली असती. परंतु मुलीनेंच आयता विषय पुढें आणला म्हणून ही कथा सुरू झाली. सरस्वतीबाईंचा उद्देश कांहीं असला तरी निर्मल मनाच्या बालिकेवर त्या गोष्टीचा विशेषच परिणाम झाला. तिनें प्रश्न केला—

" आई, विष्णूपेक्षां शंकर चांगला होता का ग ? "

" हो. नव्हे, दोघेहि आपापल्यापरीनें चांगलेच होते. "

" तरी पण विष्णु श्रीमंत होता ना ? "

" हो. "

ह्या उलटतपासणीला वचकून त्यांनीं थोडक्यांत उत्तर दिलें.

" मग श्रीमंत नवरा टाकून असला भिकारी नवरा पार्वतीला कसा ग आवडला ? "

" कसा आवडला म्हणजे काय ? हा ज्याच्या त्याच्या आवडीचा प्रश्न आहे. "

" मग परवां त्या दिवशीं, जत्रेंतली ती बाहुली मला फार आवडली; पण तूं म्हणालीस परदेशी बाहुली नाहीं घ्यायची. तेव्हां मला आवडली तरी तूं सांगितलंस म्हणून मीं नाहीं घेतली. आमच्या बाई नेहमीं सांगतात, वडील माणसांचं ऐकावं. म्हणून मीं तुझं ऐकलं. तसं पार्वतीनं आपल्या बापाचं कां नाहीं ऐकलं ? का देवांच्या मुली आईबापांचं ऐकत नसतात ? "

मुलीच्या चौकसपणाच्या प्रश्नांचें सरस्वतीबाईंना जरी कौतुक वाटलें तरी एखादा खंदा वकिलाप्रमाणें तिनें जी उलटतपासणी चालविली होती तीस सम-

पेक अशीं उत्तरें आपणास देतां येतील कीं नाहीं हा त्यांना प्रश्न पडला होता. मुलांची जिज्ञासा तीव्र असते आणि धारणाशक्ति दांडगी असते हें त्यांना वाचून माहीत होतें. परंतु तें त्यांना तितकेंसें पटलेलें नव्हतें. मुलांचे प्रश्न ते काय असणार ? अन् त्यांना उत्तरें द्यायला एवढें कठिण तें काय वाटणार ? अशी त्यांची समजूत होती. परंतु प्रत्यक्ष उत्तरें देण्याची वेळ आली तेव्हां त्यांची तिरपिट उडाली.

मनांत आपला पराजय कबूल करून त्या म्हणाल्या--

" तसं नव्हे; हें बघ बाळ, तूं माझं ऐकलंस तेव्हां तूं शहाणी आहेस--"

" अन् पार्वती ? "

" तीहि शहाणी ! "

" म्हणजे आईबापांचं न ऐकणारी मुलगीसुद्धां शहाणीच का ? " तिनें फुरंगटून प्रश्न केला.

" थांब सांगतें, मध्येंच बोलूं नको. हें बघ, बाहुलीची गोष्ट नवऱ्यापेक्षां अगदीं निराळी आहे. बाहुली एकदां घेतली अन् नाहीं आवडली, तर ती टाकून दुसरी घेतां येते, पण नवऱ्याचं तसं नाहीं. त्या जन्माच्या गांठी, एकदां बसायच्या त्या कधीं सुटायच्या नाहींत. शिवाय मुलीला नवऱ्याबरोबर जन्म काढायचा असतो; तिच्या आईबापांना नसतो. तेव्हां जन्माचा सोबती निवडायचा हक्क जिचा तिलाच हवा. "

सरस्वतीबाईंचा चेहरा प्रफुल्लित झाला. गतस्मृतीचा एखादा चित्रपट दृष्टीसमोरून सरकत असावा आणि त्याशीं तदाकार वृत्ति व्हावी तशा त्या दिसत होत्या. कारण तसें नसतें तर जीं मोठमोठीं तत्त्वें त्या लहानशा अर्भकाला त्यांनीं ऐकविलीं, तीं समजण्याची पात्रता त्यास आहे कीं नाहीं हा विचार त्यांनीं आधीं केला असता. पार्वतीची तरफदारी करून त्यांनीं जीं उत्तरें दिलीं तीं तिच्या जागीं स्वतःला कल्पूनच दिलीं असावीं अशी जर कोणीं कल्पना केली तर ती फारशी चुकीची ठरणार नाहीं. वरील तत्त्वें मुलीला ऐकवितांना त्यांनीं एक तपाच्या पूर्वीच्या कालांत प्रवेश केला होता.

शिवाय, पार्वतीचा एवढा प्रचंड हक्क कबूल करणाऱ्या आईनें आपला बाहुली निवडण्याचा हक्कसुद्धां हिरावून घेतला होता. मोठ्या माणसांच्या बोलण्यांत आणि वागण्यांत मेळ नसतो, असा मुलीचा गैरसमज झाला असल्यास

तो वेळींच दूर करावा ह्या उद्देशानेंहि त्यांना एवढ्या विस्तारानें सांगावेंसें वाटलें असेल.

" मग पार्वतीनं बापाचं न ऐकतां महादेवाशीं लग्न केलं तें तुला आवडलं?" शेवटच्या शब्दांवर जोर देऊन मुलीनें प्रश्न केला.

" हो, केव्हांहि. मलाच काय सगळ्यांना आवडलं. त्याशिवाय का तिचं हें व्रत आज हजारों वर्षं सगळ्या हिंदु बायका करीत आहेत ? "

" मग आई, आतां मीसुद्धां हें व्रत करीन. मलासुद्धां चांगला नवरा पाहिजे. "

प्रेमभरानें मुलीचें चुंबन घेऊन सरस्वतीबाई सहर्ष उद्गारल्या--

" हो तर, माझ्या बाळेला चांगलाच नवरा पाहिजे, अगदीं मनाजोगता ! "

\+ × +

पुढें लौकरच हरितालिकाव्रत आलें. त्या दिवशीं सुमीनें उत्साहानें उपोषण केलें. पूजेला जेव्हां मुलींखेरीज पुष्कळशा बायकाहि आलेल्या तिनें पाहिल्या तेव्हां तिनें आईला प्रश्न केला—

" आई, ह्या सगळ्यांना चांगला नवरा पाहिजे म्हणून ह्या उपास, अन् पूजा करतात का ? "

" वेडपे, कायग एकच वेड घेऊन बसते आहेस डोक्यांत ? अग, मोठ्या बायका चांगला नवरा मिळाला म्हणून करतात व्रत. अन् मुली चांगला नवरा मिळावा म्हणून करतात, समजलं ? "

" अन् जानकीकाकू रोज तुळशीची पूजा करतात तीसुद्धां एवढ्यासाठींच का ? "

" नाहीं तर काय ? " निष्काळजीपणानें आई उद्गारली,

" सगळं एवढ्यासाठींच ! "

" पण आई ! सगळ्यांनाच चांगला नवरा पाहिजे ? "

" म्हणजे ? हा काय वेड्यासारखा प्रश्न ? अग बायकांची सारी भिस्त नवऱ्यावर. तोच जर चांगला नसेल तर मग काय राहिलं ? सारा जन्मच फुकट जायचा. "

आईचें उत्तर ऐकून मुलीची मुद्रा गंभीर झाली.

स्त्रीजातीच्या साऱ्या जन्माचें भवितव्य ज्या व्यक्तीवर अवलंबून ती व्यक्ति

म्हणजे पति. आपलें सुद्धां भवितव्य अशा एका अज्ञात व्यक्तीच्या हातीं जाणार हें तत्त्व आईच्या बोलण्यावरून तिच्या ध्यानीं आलें आणि त्यामुळें एक प्रकारचें दडपण तिच्या बालमनावर पडलें. मुलगी गंभीरपणें विचारमग्न बसलेली पाहून सरस्वतीबाई म्हणाल्या—

" अग स्वस्थ काय बसलीस ? पूजेला येतेस ना ? "

आईच्या प्रश्नानें ती भानावर आली. जणूं काय आशेला आधार आहे या गोष्टीचीच तिला आठवण झाली. उत्साहानें ती उठली आणि सर्वांबरोबर तिनें हरितालिकेची पूजा केली. ही तिची पहिली पूजा होती. तरीहि वर्षानुवर्षे पूजा करणाऱ्या बायकांच्या पूजेंत आणि तिच्या पूजेंत फार अंतर होतें. संसारांतील इतर गोष्टींत मन गुंतलेलें, हास्यविनोदांत वाणी गुंतलेली आणि हात तेवढे नेहमींच्या संवयीप्रमाणें पूजाविधि उरकीत असलेले, अशा थाटांत त्यांची पूजा चाललेली होती. परंतु त्या अज्ञ समजल्या जाणाऱ्या बालिकेच्या तें गांवींहि नव्हतें. तिचें सर्व लक्ष पूजाप्रार्थनेंत एकाग्र झालेलें होतें. मोठ्या भक्तिभावानें तिनें पूजा केली. आणि अत्यंत श्रद्धापूर्वक देवीजवळ–आयुष्यांत आजच प्रथम–मागणें मागितलें. " देवी ! मला चांगला नवरा दे ! मला आवडेल असा नवरा दे ! " तिच्या प्रार्थनेंत कोणतेंच शाब्दिक अवडंबर नव्हतें. शुद्धांतःकरणानें उच्चारिलेले केवळ साधे शब्द होते. परंतु ते उच्चारतांना तिच्या मुखावर एक प्रकारचा असा भाव प्रतिबिंबित झालेला दिसत होता कीं, त्याकडे दृष्टि जातांच तिचें मागणें ऐकून मोठ्यानें हंसणाऱ्या बायकासुद्धां गंभीर झाल्या.

दुसऱ्या दिवशीं जानकीकाकू तुळशीपूजा करूं लागल्या. तेव्हां सुमीसुद्धां पूजासाहित्य घेऊन लगबगीनें पूजेला गेली. तिला पाहून जानकीकाकू म्हणाल्या—

" वाः; आज काय सुमाताई पूजेला आल्या होय ? "

आदल्या दिवसाच्या आठवणीनें वाड्यांतील एका मुलीनें हंसत उत्तर दिलें,

" तिला कनी चांगला नवरा हवाय म्हणे. म्हणून करते हो ती पूजा. "

" खरं का ग सुमे ? नवऱ्यासाठीं का आत्तांपासनं– '

त्यांना पुरतें बोलूंहि न देतां जोरानें सुमी म्हणाली, " होच मुळीं. तुम्हांलाच तेवढा चांगला नवरा पाहिजे अन् आम्हांला नको वाटतं ? "

" मिळेल बरं, तुलासुद्धां चांगला नवरा मिळेल. "

जानकीकाकूंनीं तिला हंसत आशीर्वाद दिला. तिच्या अजाण वाक्याचें कांहींनीं कौतुक केलें. कोणी निर्भीडपणाचें केलें. आणि कोणी तर आतांपासून ही इतकी फटकळ तर पुढें किती ढालगज होईल, याचें त्रैराशिक मनांत मांडून तिच्या भविष्यकाळाविषयीं चिंता प्रगट केली.

– २ –

आणखी एक तपाइतका काळ लोटला. सुमति आतां चांगली मोठी वाढली होती. तिची शारीरिक वाढ झाली होती असेंच केवळ नव्हे तर मानसिक वाढसुद्धां चांगली झाली होती. लहानपणीं मोठीं माणसें सांगतात म्हणून, ऐकून किंवा वाचून ज्या गोष्टी श्रद्धेनें करण्यास ती प्रवृत्त होत असे ती स्थिति आतां राहिली नव्हती. आतां प्रत्येक गोष्टीस सारासार विचाराची कसोटी लावून पहाण्याची तिची वृत्ति वाढीस लागली होती. प्रातःस्मरणीय पंचकन्यांच्या चरित्राची छाननी ती उघडपणें करीत असे. " अहल्येला अग्रस्थान काय म्हणून ? " " आधुनिक अहल्येला पूजनीय मानणें राहो, पण तिची कींव करून तिच्याबद्दल नुसती सहानुभूति तरी समाज बाळगील काय ? ' " तारेच्या चरित्रापासून काय बोध घ्यावयाचा ? " इत्यादि. मुलीच्या अशा नास्तिक प्रश्नांनीं सरस्वतीबाईना कसेंसेंच होई. इंग्रजी शिक्षणाचा हा परिणाम असें त्यांना शेजारणी मैत्रिणी बजावीत. यावर लौकर लग्न करून टाकणें हाच एक रामबाण उपाय आहे असेंहि त्या सुचवीत. हा उपाय सरस्वतीबाईनाहि संमत होता; परंतु मुलीच्या योग्य स्थळ पहाणें हेंहि तितकेंच अवश्य त्यांना वाटत होतें.

एके दिवशीं आपल्या घरांत आपल्याच मुलीच्या लग्नाची चर्चा ऐकत दोनचार शेजारणींसह त्या बसल्या असतां आपल्या एका मैत्रिणीसह सुमति शाळेंतून घरीं आली. तिच्याकडे कौतुकानें पहात सरस्वतीबाई म्हणाल्या, " आमच्या सुमीचं आपलं जगावेगळंच सगळं ! आतां म्हाताऱ्या बायकासुद्धां जोडा घालीत नाहींत. सगळीकडं चपलांची चाल आहे. अन् ही आपली जुना जोडाच घालते ! अन् हीं साधीं पातळं तरी बरीं दिसतात काहो जानकीकाकू ? म्हटलं, आहेत तेवढीं इंदुरी, अमदाबादी, जरीचीं लुगडीं नेसून टाक, मग हवं तर नको नेसूं. पण नाहीं. डोक्यांत येईल तेंच करील !'

मैत्रिणींनीं माना डोलावल्या आणि आपापलीं मतेंहि व्यक्त केलीं. परंतु सुमतीनें मात्र हंसण्यापलीकडे कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिचें मौन पाहून मैत्रीण म्हणाली—

" सुमति, तुझी आई कितीग हौशी आहे ! तुझ्या जोड्याकपड्यांकडे तरी केती काळजीपूर्वक पहाते ! "

" अन् कोणती आई नाहीं पहात ? अग, आपल्या हिंदुस्थानांतील सधन आईबाप मुलीचे जोडे अन् वस्त्रं–प्रावरणं, मुलींना शोभेशीं, त्यांना आवडतील अशीं आहेत कीं नाहींत या गोष्टीकडे फार बारकाईनं लक्ष पुरवितात. फक्त एकाच गोष्टीकडे त्यांच्याकडून दुर्लक्ष होतं. "

" अहो विदुषीबाई ! कोणती ती गोष्ट ? ऐकूं दे तरी. "

" अग, जन्माच्या जोडीदाराची ! आणखी कोणती ? "

" चल, चहाटळ कुठली ! आहे वाटतं कांहीं तरी ? प्रेमाचं पाणी मुरतंयसं देसतं. बरं आयतंच कळलं ! "

बाहेरच्या दालनांतून ध्वनि उमटले—

" शिक्षणाचं खूळ वाढल्यामुळं मुली तरी केवढाल्या वाढतात ! ही बरोबर आलेली मुलगी लहान का आहे ? चांगली चार लेकरांची आई शोभेल. "

वास्तविक सुमतीएवढीच ती मुलगी होती. परंतु तिच्याच आईपुढें तिच्या [illegible]याची चिकित्सा करण्यापेक्षां दुसरीला मोठ्या वयाची ठरविल्यास अनायासेंच सुमति लहान ठरून तिच्या आईची मर्जी खुष ठेवतां येईल, या हेतूनें हे [illegible]ारे तुटले होते. परंतु ही प्रच्छन्न टीका न समजण्याइतक्या सरस्वतीबाई [illegible]धखुळ्या नव्हत्या. त्या म्हणाल्या,

" अहो, वेळ आली म्हणजे लग्नंहि होतील. न शिकतां घरांत राहिल्यानं [illegible]य वाढायचं तरी रहात नाहीं ना ? मग लग्नाचं जुळेतों चार अक्षरं पद-[illegible]ांत पाडून घेतलीं तर काय वाईट ? "

" वाईट नाहीं. हवंच तें. पण थोडं धार्मिक वाचनहि हवं. रुक्मिणीस्वयं-[illegible]र नेमानं वाचलं म्हणजे होईल लग्न तेव्हांच ! "

" अग, ऐक ऐक. कमे ! रामबाण तोडगा ऐक ! रुक्मिणस्वयंवराचं पारा-[illegible]ण म्हणे लग्न जमायला रामबाण ! "

" आहेच मुळीं रामबाण ! मात्र त्या म्हणतात त्या दृष्टीनं नाहीं इतकंच.

जाऊं दे. त्या बिचाऱ्या श्रद्धावान् बायका. डोळे मिटून श्रद्धा ठेवीत आल्या. आमच्यासारख्यांच्या हातीं हें कोलीत· दिलं, नव्हे पोथी दिली, तर आम्ही काय अर्थ—नव्हे अनर्थ करून सोडूं हें त्यांना कसं कळावं ? ”

“ खरंच. वर्षानुवर्षं सावित्री–आख्यान ऐकत, हरताळकाव्रत करीत अन् रुक्मिणी–स्वयंवर वाचीत आल्या तरी कांहींच प्रकाश पडूं नये म्हणजे काय म्हणतें मी ? ”

“ तूं सारं म्हणतेस. आतां प्रकाश आहे तोंवर फिरायला जाऊन येऊं चल. आजच आपलं या वादाशिवाय अडलं नाहीं. वेळ आली म्हणजे एकादा कृष्ण नाहींतर शंकर किंवा त्याच्या पुढचा तरी येईल धांवून ! ”

“ फिरून येतें ” म्हणून सुमतीनें आईला परवानगी विचारली.

“ जा. पण लौकर येहो. लुगडींवाला येणार आहे. ”

“ आला तर घेऊन ठेव तुला आवडतील तीं. ”

“ तुला नेसायचीं तीं तुझीं तूंच पाहून घेतलेलीं बरीं. माझ्या पसंतीचीं तुला आवडतीलच कशावरून ? खरं कीं नाहीं हो जानकीकाकू ? ”

“अगदीं खरं. आपल्या आवडीचं आतां महत्त्वच उरलेलं नाहीं. परवां काय झालं, सूनबाईच्या अंधेरांतल्या डोहाळेजेवणाला हिरवं लुगडं बघा इंदूरहून आणवलं. अन् म्हणते कशी ‘ हें काय म्हाताऱ्यासारखं गर्द हिरवं आणलं ? हिरवंच आणायचं तर फिक्कट पोपटी आणायचं होतं ! ’ बोला आतां, पोरी-बाळींनीं, पहिलटकरणीनं हिरवं लुगडं नेसायचं नाहीं तर काय आमच्यासार-ख्या म्हाताऱ्यांनीं ? ”

जरा दूर गेल्यावर कमा म्हणाली,

“ सुमे, कांहीं म्हण. तुझ्या आईचीं मतं मला बरीं वाटतात. ”

“ अग, आमची आई फार समंजस आहे. पण ह्या ठमाकाकू–भिमाकाकूं-च्या मात्रेचे वळसे मधून मधून परिणाम करितात तिच्यावर. ”

\+ + +

“ सुमे ! लौकर येहो संध्याकाळीं. ”

“ कां ? कांहीं काम आहे का ? कांहीं आणायचं असलं तर येतांनाच आणीन. ”

" आणायचं कांहीं नाहीं. संध्याकाळीं चार बायका यायच्या आहेत आपल्याकड. "

" मग ? तूं आहेसना घरीं. "

" असलें म्हणून ? तूं सुद्धां असायला पाहिजेस, तुझी ओळख करून देणार आहें. "

संध्याकाळीं घरांत बरीच गडबड असलेली सुमतीला दिसली. तिला पाहिल्याबरोबर आई म्हणाली—

" सुमे ! केंस नीट आहेत ना ? तोंडबिंड धुऊन तें परवां घेतलेलं बदामी लुगडं नेसून ये. ती बघ वेणी घेऊन ठेवली आहे तुझ्यासाठीं. "

सुमीनें प्रश्नार्थक मुद्रेनें आईकडे पाहिलें. परंतु प्रश्नोत्तरें करण्याची ती वेळ नव्हती. दाराशीं दोन गाड्या उभ्या राहिल्या आणि त्यांतून चारपांच स्त्रिया उतरल्या. मोठ्या लगबगीनें सरस्वतीबाई स्वागताला पुढें झाल्या आणि पाहुण्या बायांना बैठकीकडे घेऊन आल्या.

नवीन वेषभूषा करण्यास सुमतीला सवडच सांपडली नाहीं. असलेल्या वेषांतच सरस्वतीबाईनीं मुलीची ओळख करून दिली.

" ही आमची सुमति. सुमन, बाळ ! नमस्कार कर पाहूं सर्वांना. "

आईची आज्ञा शिरसावंद्य मानणें सुमतीला भागच होतें. हा काय प्रकार असावा याचा मनाशीं विचार करीत ती उभी होती. तिची यथास्थित चौकशी केल्यानंतर मुख्य बाईपुढें तोंडपुजेपणा करणाऱ्या दुय्यम बाई आढ्यतेनें उद्गारल्या--

" बाळासाहेब आमचे कबूलच कुठं आहेत लग्नाला ? विलायतेला जाण्याचा हट्ट घेऊन बसलेत. पण सर्वांचं म्हणणं दोहोंचे चार हात करावे म्हणजे आपोआपच नाद सुटेल जाण्याचा. "

सुमति स्तंभितच झाली ! प्रकरण एवढ्या पल्ल्याला आलें तरी आपल्याला दाद नसावी ? लुगडीं पोलकीं पसंत करतांना, फार काय जोडा-चपला घेतांना आगाऊ सूचना मिळाव्या, या बाबी आपल्या सर्वस्वीं आवडीवर अवलंबून असाव्या, क्षणजीवी फुलांची वेणीसुद्धां पसंतीचा शिक्का बसल्याशिवाय घेतली जाऊं नये, आणि या बाबतींत ? आपल्याला अक्षरानेंहि विचारलें नाहीं !

परवां कमूजवळ सहज थट्टेनें काढलेल्या उद्गारांचें प्रत्यंतर इतक्या अनपेक्षित रीतीनें येईल अशी तिची कल्पना नव्हती !

मंडळी गेल्यावर तिनें आईला प्रश्न केला--

" आई कोणग ह्या बायका ? अन् माझं एवढं त्यांना कशाला सांगत होतीस ? "

" अग, त्या शिवापूरच्या जहागीरदारीणबाई. त्यांचा एकुलता एक मुलगा आहे लग्नाचा. अनायासेंच इकडून जात होत्या शिवापुरीं. तेव्हां जातांना मुलगी पाहून जा म्हणून सुचवलं होतं इकडनं. "

काय बोलावें हें तिला सुचेना. उद्वेगानें ती उद्गारली--

" कोण ती मुलगी ? "

आई हंसून म्हणाली, " वाः आम्हांला काय दहापांच मुली आहेत वाटतं ? "

आंवढा गिळून सुमति उत्तरली,

" पण मला लग्न करायचं नाहीं इतक्यांत. "

अशीं उत्तरें अलीकडे मुली देऊं लागल्याचें सरस्वतीबाईंना ऐकून ठाऊक होतें. यांत कांहींच नवीन नाहीं अशा आविर्भावानें त्यांनीं विचारलें,

" तें कां ? "

" परीक्षा झाल्यावर मला कॉलेजांत जायचं आहे. "

" हरकत नाहीं. ते इंग्लंडला गेले तर तुलाहि कॉलेजांत जातां येईल. घरीं बसून तरी काय करणार ? पण तो प्रश्न त्यांचा आहे, त्यांची इच्छा असेल तर जातां येईल कॉलेजांत. "

" ते कोण ? अन् त्यांचा माझा संबंध काय ? माझ्या शिकण्याचा प्रश्न दुसऱ्याच्या इच्छेवर कधींपासून सोपविलास आई ? "

" हें बघ सुमति ! असं वेडयासारखं बोलूं नये. आतां तूं लहान का ? तुझं हित अनहित तुला कधीं कळूं लागणार ग ? परवां त्या जहागिरदारीण-बाई आल्या होत्या ना ? त्यांचा मुलगा येणार आहे हो तुला पाहायला ? "

" मला नको कुणी पाह्यला यायला. काय मेला जुलूम तरी ! "

रागाच्या आवेशांत उत्तर देऊन फणकाऱ्यानें सुमति तेथून उठून आपल्या खोलींत गेली. आतां काय करावें हा तिच्यापुढें मोठा प्रश्न होता.

आपण यांत मुलीचें वाईट तरी काय करीत आहों हा सरस्वतीबाईपुढेंहि प्रश्नच होता. तिला एवढें संतापून जायला कारण तरी काय ? जेवणाच्या वेळींसुद्धां सुमति जेव्हां बाहेर आली नाहीं तेव्हां सरस्वतीबाई स्वतःच तिच्या खोलींत गेल्या. रडून रडून तिनें डोळे सुजविले होते, आणि केस अस्ताव्यस्त झाले होते. प्रेमभरानें मुलीच्या पाठीवर हात फिरवून त्या म्हणाल्या––

"अग, असा त्रागा कां करतेस ? तुझं म्हणणं तरी काय ? तूं कांहीं त्यांच्याविषयीं वाईट बरं ऐकलं आहेस काय ? शोधूं म्हटल्या सांपडायचं नाहीं असं हें स्थळ. अन् त्याचा एवढा तिटकारा काय म्हणून ?"

आईचा मायेचा हात फिरल्यानें सुमति अधिकच रडूं लागली. रडत रडतच तिनें आपलें हृद्गत आणि आपला निश्चय आईला निवेदन केला. आणि एक तपापूर्वींच्या आईच्या मतांची तिला आठवणहि दिली.

मुलीची हकीकत ऐकून सरस्वतीबाई स्तंभितच झाल्या ! क्षणभर त्यांचा गोंधळ उडाला. कुठें इंद्राचा ऐरावत अन् कुठें शामभटाचें तट्टू ! असल्या यःकश्चित् माणसावर आपल्या मुलीचें प्रेम जडावें ? आणि त्यावरून तिनें आपला जीव ओंवाळून टाकण्याची प्रतिज्ञा करावी ?

मुलीनें शब्दांत पकडल्यावद्दल त्यांना राग आला होता. परंतु आधींच तिनें त्रागा करून स्वतःला शिक्षा करून घेतली होती, त्यांत आपल्या रागाची आणखी भर नको अशा विचारानें त्या स्तब्ध राहिल्या. हें सर्व प्रकरण वरिष्ठ कोर्टांत सादर करून न्यायनिवाड्याचें कामहि तिकडेच सोपविण्याचा त्यांनीं बेत केला.

यथाक्रम सर्व केस वरिष्ठ कोर्टांत दाखल झाली आणि त्याबरोबरच घरांतील शांति नष्ट झाली !

गणपतराव अगदीं शांत व आनंदी वृत्तीचे गृहस्थ. पण मुलीची अशी हीन अभिरुचि पाहून त्यांना संताप आल्याशिवाय राहिला नाहीं. विश्वासाचे आपणांवर उपकार झाले होते ही गोष्ट खरी. त्यानें एकटीच फिरायला गेली असतां गुंडांच्या तावडींत सांपडलेल्या आपल्या कन्येला सोडवून आपली अब्रू वांचविली हें जरी खरें असलें, तरी त्याच्या टर्मेची फी भरून, आणि तो एव्हवीं अधिक मदत घेईना म्हणून मुलीला वर्षभर शिकवणी ठेवून त्याला आर्थिक मदत करून आपण त्याच्या उपकाराची परतफेड केली नाहीं काय ? असें असतां त्यानें आपला दर्जा विसरून असें कृतघ्नपणानें वागावें काय ? आणि

आपण जिला शहाणी समजत आलों त्या आपल्या मुलीला बाळासाहेबांसारख्या जहागीरदार आणि विश्वासासारख्या कफल्लकांतील अंतर कळूं नये हें केवढें आश्चर्य ?

घरांतील प्रेमळ वातावरण नष्ट झालें आणि तुफान वावटळींत सांपडल्या-सारखें सुमतीला होऊन गेलें. काय करावें हें तिला सुचेना.

प्रतिकूल परिस्थितीचा तिच्यावर परिणाम झाला. टवटवीत गुलाबासारखें तिचें मुखकमल चिंतेनें काळवंडून गेलें. परंतु त्यामुळेंच पहावयास येण्याचा दिवस पुढें ढकलला गेला. ही एक इष्टापत्तिच तिला वाटली.

– ३ –

अशा स्थितींतच भाद्रपद शुद्ध तृतीयेचा दिवस उजाडला. घरांत आणि बाहेर चोहींकडे आदल्या दिवसापासून पत्रीफुलें गोळा करण्याची आणि हरि-तालिकेच्या पूजेची गडबड सुरू झाली. परंतु सुमतीला त्यांत भाग घ्यावासा वाटेना. उलट तिला माणसांच्या धरसोडीच्या दांभिक वृत्तीचा तिरस्कार वाटूं लागला. ती मनांत म्हणाली, हत्तीचे दाखवायचे व खायचे दांत जसे निर-निराळे असतात तशींच मोठ्या माणसांचीं बोलायचीं आणि वागायचीं मतं निराळींच असतात. कशाला ह्या बायका हीं व्रतं करतात कोणास ठाऊक ? दरवर्षी पहावं तों आपल्या पसंतीचा शिक्का वगैरे ठोकतात. पण त्यांतलं तत्त्व एकीला मान्य असेल तर शपथ. त्यापेक्षां " पार्वती ही पळपुटी पोर होती. तिनें आईबापांची आज्ञा मोडली. म्हणून सर्व कुमारिकांनीं तिचा निषेध करावा " यासाठीं ह्या दिवसाचा उघड उपयोग कां करीत नाहींत ? हें दांभिकतेचें ढोंग तरी कशाला ?

तिला आपल्या पहिल्या हरितालिका–व्रताचा दिवस आठवला. त्या दिवशीं झालेल्या संभाषणाचा शब्दन् शब्द तिला आठवला, आणि आपल्या आईला त्या गोष्टीची अस्पष्ट आठवणहि होऊं नये याचें आश्चर्य वाटलें. तीं आईचीं मतें आज पुन्हां आईला ऐकवावीं असेंहि तिला वाटलें. परंतु मुद्दाम वेड पांघरलेल्या माणसांपुढें कंठशोष करून तरी फायदा काय या विचारानें स्तब्ध राहणें तिला भाग झालें.

जग सुधारत आहे कीं त्याची पिछेहाट होत आहे, अशी तिला शंका

येऊं लागली. “ म्हणे स्वातंत्र्ययुग आलें आणि सुधारणांचा प्रसार होत आहे ! माझ्यासारख्या शिकलेल्या वाढलेल्या एकुलत्या एक लाडक्या मुलीची जर ही स्थिति, तर ज्यांना शिक्षणाचा गंध नाहीं, स्वातंत्र्याचें वारें नाहीं, हक्कांची जाणीव नाहीं अशा असंख्य अभागी मुलींची काय स्थिति होत असेल !—वाघिणीचें दूध पिऊन मुली प्रबला झाल्या म्हणे. मी तर म्हणतें त्या जशाच्या तशा अबला आहेत !. अशासारखे प्रसंग आल्यावर हतबल होऊन त्यांना जीवन नकोसें झाल्यास नवल काय ? ”

“ सुमे ! कसला ग विचार करीत बसली आहेस ? ”

कमूनें एकाएकीं प्रवेश करून विचारलें.

“ हरितालिकेचा. ‘ हरितालिका ’ या शब्दाचा अर्थ लावतें आहें मी. ”

“ मग लागला का ? ”

“ हो, पुष्कळ जणींना मीं अर्थ विचारला. पण कोणाला सांगतां येईना. कोणी म्हणे हरतालिका म्हणजे पार्वती ! एकीनं तर सांगितलं ‘ हरित म्हणजे हिरवीं, अन् तालिका म्हणजे शेतें. शेतें हिरवीं असतांना जें व्रत येतें तें हरितालिकेचें व्रत ! ”

“ वा: छान आहे उपपत्ति ! पण तूं काय अर्थ लावलास ? ”

“ हरित म्हणजे हरण केलेली, आणि आलिका म्हणजे सखी. सखीनें हरण केलेली किंवा मैत्रिणीसह हरवलेली—असं म्हणूं पाहिजे तर—ती हरितालिका. किती सार्थ आहे बरं हें नांव ? माझ्या या संकटांतून सुटायला मलाहि एवढाच मार्ग दिसतो. मात्र पार्वतीच्या मैत्रिणीसारखं तूं मला साहाय्य केलं पाहिजेस. ” “ शाबास ! अग, पार्वतीसारखं पळून जाऊन हल्लींच्या काळीं भागण्यासारखं नाहीं, हें तूं विसरतेस. कंदमुळं खाऊन तिचं भागलं, शिवाय लगेच तिच्या हांकेला शंकर धांवून आला आणि कोणतंहि कायद्याचं कलम त्याला आडकाठी करूं शकलं नाहीं. पण हल्लींच्या काळीं ती स्थिति राहिलेली नाहीं. घरांतून पाऊल बाहेर टाकलं कीं झेंप घालण्यास टपून बसलेलीं आपत्तीचीं गिधाडं चोहोंकडून धांवून येतील अन् तुला, मला नी त्या विश्वासरावांनाहि गिळून टाकतील. समजलं वेडाबाई ? ”

इतक्यांत घरीं जाण्यास निघालेल्या कमाच्या आईनें तिला बोलावल्यावरून ती गेली.

बिचारी सुमति ! एकसारखा विचार करीत खिडकींत बसली होती. तिचे विचार आणखी कितीतरी भडकले असते. परंतु इतक्यांत खालून हांक आली,

" लिट्ल् डॉली ! व्हॉट आर यू डूइंग ? "

सुमतीनें भानावर येऊन उत्तर दिलें—

" कांहीं नाहीं. हरताळकेची पोथी ऐकतें आहे ! "

" म्हणजे माझीच ना ? "

असा हंसत हंसत प्रश्न करून एक उंच धिप्पाड गौरकाय बाई जिना चढून वर आली. ही बाई सुमतीच्या जन्मापासून सरस्वतीबाईची मैत्रीण बनली होती. खुद्द सुमतीनें या पृथ्वीतलावर अवतरतांना या बाईच्या हातांवर आरोहण केलें होतें.

ही बाई डॉक्टर असून तिनें एक मिशन हॉस्पिटल चालविलें होतें. तिला मराठी चांगलें येत असून हिंदु आचारविचारांची माहिती तिनें आपल्या हिंदु पेशन्टकडून करून घेतली होती. एखाद्या समारंभप्रसंगीं ती आपल्या हिंदु मैत्रिणींकडे हिंदु पोषाकांत जात असे; व त्यांनीं कुंकू लावून व वेणी—गजरे घालून केलेलें आदरातिथ्य प्रेमानें स्वीकारीत असे. तिच्या ह्या मिळून मिस- ळून वागण्याच्या प्रवृत्तीमुळें गांवांतील हिंदु स्त्रिया तिला फार मान देत असत. तिचें नांव डॉक्टर ग्रीनफील्ड असें होतें. परंतु गणपतराव व सरस्वतीबाई तिच्या नांवाचें मराठी भाषांतर करून कधीं कधीं थट्टेनें तिला 'हरितालिका' म्हणत. वर येतांना तिनें विनोदानें प्रश्न केला तो याच टोपण नांवाला उद्दे- शून होता.

आईची ही मैत्रीण वडीलपणामुळें सुमतीला मावशीसारखी भासण्याऐवजीं तिच्या सुस्वभावी मोकळेपणामुळें समवयस्क मैत्रिणीसारखी वाटत असे. या- मुळें आईपेक्षां ' ऑन्टी ' शीं ती विशेष मोकळेपणानें वागत असे.

पूजा आटोपून पोथीला प्रारंभ झालेला होता. ' ऑन्टी'चें आगमन भाविक मनांना असह्य होऊं नये म्हणून सुमतीनें तिला आपल्या खोलींत नेलें. एक दोन किरकोळ प्रश्न झाल्यावर सुमतीच्या म्लान मुखाकडे निरखून पाहून डॉक्टरीणबाईनीं आश्चर्य प्रगट केलें. तिच्या आजाराची मोठ्या आस्थेनें चौकशी केली. कोणताहि आजार नसतां ही सुकुमार कळी करपूं लागलेली पाहून तर त्यांना अधिकच आश्चर्य वाटलें. ममतेनें त्यांनीं तिचें मुख कुरवा- ळलें. पुष्कळ दिवसांनीं मायेचे शब्द ऐकल्यामुळें सुमतीला रडें कोसळलें. लहान मुलासारखें तिला समजावीत डॉक्टर म्हणाल्या—



" मला सांग डॉली ! तूं आपलें दुःख मला सांग. "

" मला सांग डॉली ! तूं आपलें दुःख मला सांग. तुझ्यासारख्या कोंवळ्या लेंकरास इतकें असह्य दुःख कसलें ? "

सुमतीला दुःख अनावर झालें. रडत रडतच तिनें आपलें दुःख—मानसिक दुःख—डॉक्टरीणबाईंना सांगितलें. शस्त्राच्या साह्यानें शारीरिक दुःखें हळुवारपणें नाहींशीं करण्यांत निपुण असलेल्या त्या बाईनें तितक्याच हळुवारपणें हें मानसिक दुःख दूर करण्याचा प्रयत्न करण्याचें आश्वासन सुमतीस दिलें. हरितालिकेच्या दिवशीं मिळालेलें हें अभिवचन प्रति-पार्वतीनेंच दिल्यासारखें सुमतीस वाटलें !

सुमतीचें औदासीन्य पूर्णपणें नष्ट झालें नव्हतें. तिच्या मुखावर टवटवी आल्याशिवाय मुलगी पहाण्यास बोलविण्यांत फायदा नव्हता. अद्यापि लग्नाचा मोसम येण्यास जवळ जवळ तीन महिन्यांचा अवकाश होता; तरी तोंपर्यंत प्रकृति पूर्ण बरी करून घेणें अवश्य होतें. सुमतीची प्रकृति डॉ. 'हरितालिका' बाईना दाखवून त्यांच्याकडून एखादें 'पेटन्ट टॉनिक' लिहून घेऊन तें सुरूं करावें या उद्देशानें सरस्वतीबाई आणि गणपतराव सुमतीला घेऊन त्यांच्याकडे आले. कामाच्या घाईतहि डॉक्टर बाईनीं त्यांचें यथोचित स्वागत केलें. त्यांचें म्हणणें शान्तपणें ऐकून घेऊन एक शक्तिवर्धक औषधहि लिहून दिलें. नंतर त्या म्हणाल्या,

" चला, जरा प्रभु येशूचें स्तवन करितें. तें ऐका. तो प्रभु सगळ्यांना तारण देईल. "

सरस्वतीबाईना डॉक्टर बाईचें म्हणणें निमूटपणें ऐकणें भाग झालें. त्या डॉक्टर बाईबरोबर सुमतीसह प्रार्थनाहॉलमध्यें गेल्या. पुरुषांना त्या ठिकाणीं प्रतिबंध असल्यामुळें गणपतरावांना बाहेरच्या व्हरांड्यांत थांबावें लागलें.

एका दालनांत धर्मार्थ दवाखान्यांतून फुकट औषध घेणाऱ्या निरनिराळ्या जातींच्या आर्त स्त्रिया बाकांवर आणि जमिनीवर बसलेल्या होत्या. दालनाचीं दोहों बाजूंचीं दारें लावलेलीं होतीं. प्रभुस्तवन ऐकल्याशिवाय कोणीं जाऊं नये म्हणून ही खबरदारी घेण्यांत आलेली होती. तेथें आंतील द्वारानें सरस्वतीबाई व सुमति यांसह डॉक्टर बाईनीं प्रवेश केला, आणि आपल्या मधुर कंठानें ईश्वराला आळविणारीं आणि करुणरसानें ओथंबलेलीं दोन पदें म्हटलीं. त्यानंतर त्या कसलीतरी कथा कीं आख्यान रसाळवाणीनें सांगत होत्या. सुमतीचें

तिकडे लक्ष नव्हतें. इतर बायका सुद्धां सक्तीनें बसावें लागलें म्हणूनच बसल्या होत्या. त्यांचेंसुद्धां लक्ष नव्हतें.

परंतु श्रोत्यांची इतकी अनास्था स्पष्ट दिसत असतांहि जिचा प्रत्येक क्षण बहुमोल आहे अशी ती श्रेष्ठ दर्जाची बाई शान्तपणें ईश्वराचें संकीर्तन त्यांना ऐकवीत होती.

" प्रभूचें आगमन त्या गांवीं होणार होतें. करितां सर्व मार्ग झाडून स्वच्छ करून त्यावर गुलाबपाणी शिंपडिलें होतें. मार्गावरील कंटक प्रभुचरणांना टोंचूं नयेत म्हणून त्यावर पुष्पें पसरिलीं होतीं. चोहींकडे सुगंधित पुष्पमाळा टांगिल्या होत्या. वाद्यें वाजत होतीं. अशा वेळीं एक गरीब मनुष्य, ज्यास नेत्र नाहींत, अंगावर वस्त्रें नाहींत, जो गलितगात्र आहे असा, तो विचारूं लागला—

" बाबांनो ! हा कोलाहल कसला ऐकूं येतो ? आज कसला उत्सव आहे ? "

त्याला उत्तर देण्याऐवजीं जो तो नाकाला पदर लावून पुढेंच जाऊं लागला. कोणी त्याला नीट उत्तर देईना. शेवटीं एकानें सांगितलें, " अरे आंधळ्या, तुला दिसत नाहीं ? ही सर्व तयारी प्रभूच्या आगमनासाठीं केली आहे. या मार्गानें प्रभु येशू जाणार आहे. प्रभूसाठीं स्वच्छ केलेला मार्ग तुझ्या घाणेरड्या स्पर्शानें दूषित करण्यास तुला दिक्कत वाटत नाहीं ? जा दूर हो. "

बिचारा हीनदीन बाजूला झाला. रडूं लागला, आणि म्हणाला " प्रभो, माझ्यापाशीं माझ्या हृदयाशिवाय तुला द्यावयाला दुसरें कांहीं नाहीं. हें क्षुद्र हृदयपुष्प मी तुला दुरूनच वहात आहें त्याचा स्वीकार कर. प्रभो, मला तारण दे. "

सरस्वतीबाईंना वाटलें, ' कशाला हें भारूड अन् काय हा वेळेचा अपव्यय ? जातां आलें असतें तर त्या उठूनसुद्धां गेल्या असत्या. इतक्यांत सुप्त श्रोत्यांत एकदम चैतन्य संचारलें व उद्गार निघाले " धन्य धन्य ! "

" याला म्हणतात खरी भक्ति. "

" ईश्वर दीनांचा कनवाळू आहे. "

" आमचासुद्धां विठोबा असाच नव्ह का भक्तासाठीं धावून येयाचा ? "

एक दोन ख्रिस्तीधर्म स्वीकारलेल्या बायका होत्या त्या उठून म्हणाल्या, " आमेन, आमेन "

डॉक्टरीणबाईच्या डोळ्यांत आनंदाश्रु आले. त्या पुढें सांगूं लागल्या—

" प्रभु त्या दीनापाशीं गेला. कृत्रिम साधनांशिवाय केवळ शुद्ध हृदयानें तो ईश्वराला आळवीत होता. त्या वस्त्रहीन, नेत्रहीन, गलितगात्र परंतु प्रभु-दर्शनाविषयीं उत्सुक अशा त्या गरीबाला गांवकऱ्यांनीं दूर घालविलें होतें. प्रभूकरितां पुष्पें पसरून तयार केलेला मार्ग त्याच्या स्पर्शानें दूषित होऊं नये म्हणून ज्याला दूर लोटिलें होतें, त्या गरीबापाशीं प्रभु धांवून गेला आणि त्यानें त्या पददलित हीनदीनाला हृदयाशीं कवटाळिलें; व द्रव्यमदानें अंध झालेला श्रीमंत हृदयानें दरिद्रीच आहे व भक्तिमान् व शुद्ध हृदयाचा गरीबच श्रीमंत आहे, असें कृतीनें सर्वांस दाखविलें. "

सरस्वतीबाईंना व सुमतीला आश्चर्य वाटलें. केवढी ही वक्तृत्वशक्ति! जो श्रोतृवर्ग इच्छेविरुद्ध केवळ सक्तीनें बसल्यामुळें अनास्थेनें पेंगत होता, ज्यास ' पुष्पें ' ' पददलित ' ' गलित ' अशासारखे शब्द समजण्याचीहि मारामार अशा श्रोत्यांना खडबडून जागें करून त्यांचें लक्ष आपणाकडे वेधून घेणें आणि त्यांच्या तोंडून धन्यतेचे उद्गार वदविणें ही कांहीं लहानसहान शक्ति नाहीं. दोघींचींहि हृदयें भक्ति व आदरानें भरून आलीं. सर्व गेल्यावर गणपत-रावांनाहि बोलावण्यांत आलें. ते म्हणाले,

" तुमची वाणी मोठी रसाळ आहे. तत्त्वें साधींच, परंतु तीं वर्णन करून सांगण्याची शैली उत्तम आहे. "

सरस्वतीबाई म्हणाल्या, " आपण बाहेर असायचं पण इथं प्रत्यक्ष पाहिलं मीं. ज्यांच्यावर शिक्षणाचे कांहींच संस्कार झालेले नाहींत, ज्या मूळ-च्याच बुद्धिजड आहेत अशा खालच्या जातींच्या बायकांनासुद्धां आपलं आख्यान त्यांनीं चांगलं पटवून दिलं. आळसानं पेंगत असलेल्यांना खडबडून जागं केलं.! '

डॉक्टर बाई म्हणाल्या,

" पेंगत असलेल्यांना जागें करणें सोपें; पण मुद्दाम झोंपेचें सोंग घेणाऱ्यांना जागें करणें कठिण असतें. "

डॉक्टर बाईंचा रोंख कोणीकडे आहे हें लक्षांत न आल्यामुळें सरस्वतीबाई म्हणाल्या,

" तत्त्व तर अगदींच साधंभोळं, आमच्याकडेसुद्धां अशी कायशी एक बुद्धाची कीं कोणाचीशी कथा आहे. "

त्यांना मध्येंच थांबवून डॉक्टर बाई म्हणाल्या,

" आमच्या धर्माचीं तत्त्वें आहेत साधींभोळींच. परंतु तीं आचरणांत आणावयाची आमची खटपट असते. उलट तुमचीं धर्मतत्त्वें असतात अगदीं उच्च दर्जाचीं आणि म्हणूनच तीं आचरणांत आणणें सामान्य जनांना अशक्य, अशी तुमची समजूत असल्यामुळें उच्च तत्त्वाप्रमाणें वागणूक होत नाहीं. पुराणांतलीं वांगीं पुराणांतच रहातात. "

येथें दोघांनींहि प्रश्नार्थक मुद्रेनें हरितालिकाबाईकडे पाहिलें. त्या पुढें म्हणाल्या—

" तुमच्या हरितालिकेचीच कथा घ्या ना. तींतील तत्त्व किती महत्त्वाचें आहे ! किती उच्च दर्जाचें आहे ! तें पूज्य असल्याचें तुम्ही प्रतिवर्षी दाखवीतहि आहां. पण त्याप्रमाणें तुमची वागणूक होत आहे काय ? तुम्हीं जें तत्त्व मान्य म्हणून दर्शवितां त्याप्रमाणें वागण्याची जबाबदारी आपणांवर नाहींच असें तुम्ही कृतीनें सिद्ध करतां. तसें जर नसतें तर या मुलीवर तुम्हीं अशी सक्ति केली असती काय ? हीच का तुमच्या हरितालिकाव्रताची शिकवण ? अगदीं बाळपणीं तुम्हींच ना तिला ती कथा आणि तिचें महत्त्व समजावून सांगितलें ? त्या बोलण्यांत अन् आतांच्या वागण्यांत मेळ आहे काय ? तिच्या हृदयाला जखमी करून वरून मलम लावण्यांत काय फायदा ? येथें टॉनिक काय करणार ? "

" पण आम्ही असं तिचं वाईट तरी काय करीत आहों ? मुलगा चांगला श्रीमान्, विद्वान् असून इंग्लंडला जाणार आहे तो. "

सरस्वतीबाईंना मध्येंच थांबवून हरितालिकाबाई म्हणाल्या—

" विश्वास विद्वान् नाहीं का ? त्याला साधन मिळालें तर तो नाहीं का इंग्लंडला जाणार ? तुम्हांला इंग्लंड–रिटर्न्ड जांवई पाहिजे तर त्याला तुम्ही इंग्लंडला पाठवा. डॉलीशिवाय तुम्हांला तरी कोण आहे ? तिच्या सुखासाठीं एवढें तुम्हीं कां करूं नये ? आपलाच हेका धरून तिला जन्माची दुःखी करणें

तुम्हांला रुचतें ना ? आमच्या बायबलांत एक वाक्य आहे. देवानें जें जोडिलें तें मनुष्यानें तोडूं नये. प्रीति परमेश्वर-स्वरूप आहे. प्रेम म्हणजेच परमेश्वर. म्हणून म्हटलें आहे, देवानें जें जोडिलें तें माणसानें तोडूं नये. ”

सरस्वतीबाईंच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. गणपतराव म्हणाले,

“ डॉक्टर, तुम्हीं चांगलेंच अंजन घातलें डोळ्यांत. डॉक्टर लोक नुसती शारीरिक व्याधि दुरुस्त करतात. पण तुम्हीं तर मानसिक विकृतिहि नाहींशी करण्यांत पटाईत आहांत. सुमीनं त्रागा केला अन् हिनं सूचना केली. पण नीट कोणींच पटवून दिलं नाहीं--”

सरस्वतीबाई मध्येंच म्हणाल्या,

“ सांगितलं पुष्कळ, पण ऐकायचं--”

“ कसं ऐकणार ? कान सोनाराकडूनच टोंचवावा लागतो ! ” डॉक्टर बाई हंसत उद्गारल्या.

चातुर्मासानंतर सुमतीचें लग्न विश्वासबरोबर झालें हें निराळें सांगावयास नकोच.

# गौरी.

माझी पांच वर्षांची धाकटी मुलगी पद्मा हिचा आज वाढदिवस होता. चार पानें अधिक असल्यामुळें स्वयंपाकांत साह्य करण्यासाठीं शेजारच्या आक्कांना मुद्दाम बोलाविलें होतें. आक्का व मी पानें वाढण्याच्या धांदलींत होतो. पद्मा " मला वाढायला दे " " मला वाढूं दे " म्हणून सारखी मध्यें मध्यें लुडबुडत होती; आणि पंधरा वर्षांची प्रेमा पुस्तक घेऊन वाचीत बसली होती. दोन्ही मुलींना उद्देशून मी म्हणालें,

" वाढायच्याच जन्मास आली आहेस. पण वाढायची वेळ येईल तेव्हां नाहीं एवढी हौस उरायची. मग बसशील ताईसारखी पुस्तक घेऊन. "

परंतु पद्मेची चिकाटी दांडगी होती. " मला वाढूं दे " हें तिचें पालुपद सुरूच होतें. तिच्या समजुतीखातर तुपाचें तांमलें व चमचा मीं तिच्याजवळ दिला. तिनें सर्व तूप आपल्याच पानावर ओतून घेतलें. तें पाहून प्रेमा टाळी वाजवून म्हणाली,

" शाबास ! असंच वाढतात वाटतं ? "

सर्वांचें लक्ष पद्मेकडे गेलें. कृत्रिम कोपानें मी म्हणालें,

" वाः ! सगळयांना वाढून मग आपल्या पानावर वाढायचं कीं आधींच सगळं आपल्या पानांत वाढून घ्यायचं ! पहा हो अक्का, भाचीची करामत ! "

आपल्या गंभीर मुद्रेंत किंचित् स्मिताची भर घालून आक्का उद्गारल्या–

" घेऊं द्या हो. अजून लहान आहे ती. तिला काय कळतं ? "

" आपल्या पानावर तूप ओतून घ्यायचं तेवढं कळतं ? "

प्रेमा मध्येंच म्हणाली.

" खरंच, लहान म्हणून कौतुक करायचं पण हीच संवय पुढें राहिली तर आपल्याच पोळीवर तूप ओढायला शिकेल. "

मुलीविषयीं प्रेम व कौतुक वाटत असतांहि मुद्दाम चिन्तेचा स्वर काढून मी म्हणालें.

" ती धास्तीच सोडा रमाबाई. बायका आपल्या पोळीवर तूप ओढतील ही धास्ती तुम्ही अज्जी सोडा. उलट मी असं म्हणेन कीं बायका पिकल्या

झाडाखालीं उपाशी राहतील; पोळीवर तूप ओढण्याऐवजीं पायावर धोंडा मात्र पाडून घेतील– ”

आक्का आवेशानें बोलत होत्या. त्यांचा स्वर चढला होता. मुद्रा उद्वेगयुक्त दिसत होती आणि दृष्टि दुसरीकडेच लागली होती. जणूं काय गतकालचा एखादा चित्रपटच त्या पहात असाव्या.

मी आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहिलें तों त्यांचे डोळे भरून आले होते. काय बोलावें हें मला सुचेना. इतक्यांत प्रेमा पुस्तक मिटून म्हणाली,

“ आक्का, तुमचं आपलं प्रत्येक साध्या गोष्टींतसुद्धां कांहीं तरी गूढ असतं. कशावरून तुम्ही असं म्हणतां सांगा ना ? ”

आक्का तिच्याकडे भेदक दृष्टीनें पहात राहिल्या. जणूं काय आपल्या मनांत जे विचार थैमान घालीत आहेत ते ऐकण्यास ही पोर लायक आहे कीं नाहीं हेंच त्या निरखून पहात होत्या !

आक्कांच्या सदा गांभीर्यानें व्यापलेल्या मुद्रेला आणि वारंवार उच्चारल्या जाणाऱ्या गूढ उद्गारांना कांहींतरी तसेंच कारण असावें असें मला नेहमीं वाटत असे. तथापि तें विचारण्याचें धैर्य मात्र मला कधींच होत नसे. प्रेमानें बोलणें काढलें तेव्हां आपल्याहि फारां दिवसांच्या जिज्ञासेची पूर्तता होईल असें वाटून मीं तिला अडथळा केला नाहीं. माझी ही मूक संमति पाहून प्रेमालाहि स्फुरण आलें. तिनें फारच आग्रह धरला तेव्हां आक्का एकदाच्या कारण सांगायला कबूल झाल्या.

“ सांगेन बरं पमे ! तुला म्हणून मुद्दाम सांगेन. कारण त्यापासून तुला पुढील आयुष्यांत उपयोगीं पडेल असं कांहींतरी शिकण्यासारखं आढळेल. ”

“ मग सांगाच तर. आत्तांच सांगा. ”

“ अग पण जेवणं तरी होऊं देशील कीं नाहीं ? ”

मीं वरपांगी मुलीला दटावल्यासारखें केलें.

“ जेवणं होऊं दे. परकी मंडळी घरोघर जाऊं दे. मग सावकाश सांगेन. मी सांगणार ती कृत्रिम कादंबरी नाहीं. खरीखुरीं घडलेली गोष्ट आहे बरं बाळ. ”

आक्कांचा स्वर कंपित झाला होता. डोळयांच्या कडांशीं आलेले अश्रु त्यांनीं दंडाला पुसले.

× × ×

कोंकणांतील एका आडवळणाच्या खेडेगांवीं माझा जन्म झाला होता. माझ्या भावाच्या पाठीवर पुष्कळ भावंडें जाऊन नंतर मी वांचलें असल्यामुळें आईबापांची मी फार लाडकी होतें. मी म्हणेन तो हट्ट पुरविला जात असे. लहानपणीं माझ्या मनाविरुद्ध कोणीहि ' ब्र ' उच्चारीत नसे. त्यामुळें कोणाचा हुकूम ऐकण्याऐवजीं सर्वांवर हुकमत चालविण्याची संवय मला जडली होती.

आपलें धन चोरीस जाऊं नये म्हणून मनुष्य ज्याप्रमाणें तें बँकेंत ठेवून अगर दुसऱ्याजवळ देऊन निर्धास्त होऊन बसतो, त्याप्रमाणें नवसासायासानें जगलेल्या मजवर काळाची वक्रदृष्टि जाऊं नये म्हणून माझ्या आईबापांनीं माझें अगदीं बाळपणीं लग्न करून मला परकी करून टाकिली होती. ज्या वेळीं आमचा विवाह झाला त्या वेळीं लग्न म्हणजे एक मौज यापलीकडे त्याचा विशेष अर्थ कळण्यासारखें आमचें वय नव्हतें.

उभयपक्षीं वडील माणसांच्या इच्छा व आकांक्षाच आमच्या लग्नाच्या मुळाशीं होत्या. लग्नानंतर सासरची सर्व मंडळी आपल्या गांवीं गेली आणि मी आमच्या खेडेगांवींच राहिलें. आमचें खेडेगांव अगदीं आडवळणाचें जेथें पुरुषांनाहि शिक्षणाचे संस्कार घडणें दुरापास्त तेथें स्त्रियांना कोठलें ? आमची आई थोडेंसें पोथी वाचण्यापुरतें शिकली होती. त्याचें कोणाला कौतुक वाटण्या-ऐवजीं गांवांतील स्त्रियांना तो एक चर्चेचा विषय वाटत असे. आपल्या मुलीचा असा उपहास होऊं नये अशा हेतूनें कीं काय मला शिक्षणाच्या संस्कारा-पासून अलिप्त ठेवण्यांत आलें होतें. पुष्कळ मोठी होईतोंपर्यंत शिक्षण म्हणून कांहीं आहे आणि त्याची जरूरी असते ही गोष्ट मला माहीतहि नव्हती.

अशा परिस्थितींत मी वाढत असतां ज्यांच्याशीं माझें जीवित संलग्न झालें होतें ते माझे पति शिक्षणाचा मार्ग भराभर आक्रमण करीत होते. त्यांनीं दुय्यम शिक्षण उत्तम तऱ्हेनें पूर्ण करून मेडिकल कोर्स घेतला होता, व त्यां-तहि ते उत्तम तऱ्हेनें प्रावीण्य संपादीत होते. तो तिकडचा अत्यंत आवडीचा विषय होता. मामंजींचा विचार कायद्याचा कोर्स घ्यावा असा होता. त्याविरुद्ध जाऊन हा आवडीचा कोर्स घेतला होता.

याप्रमाणें विवाहग्रंथीनें बद्ध झालेलीं आम्ही दोघें अगदीं परस्परविरोधी वातावरणांत वाढत होतों. शिक्षण म्हणून कांहीं आहे आणि त्याची बायकां-

नाहि आवश्यकता आहे ही गोष्ट अद्यापि माझ्या गांवींहि नव्हती. परंतु लौकरच तो काळ पालटला.

एके दिवशीं पोष्टानें माझ्या नांवें बरींचशीं वाचनीय पुस्तकें आलीं; आणि 'मनोरंजन'हि माझ्या नांवें सुरू झालें. मला लिहितांवाचतां तरी येत असेल अशा समजुतीनें तिकडून पुस्तकें पाठविणें झालें होतें. परंतु चित्रें पाहण्यापलीकडे मला त्यांचा कांहींच उपयोग करून घेतां येईना. त्या वेळीं भावानें मला इतके हिणविलें, चिडविलें कीं ईर्षेनें मला शिकावेंसें वाटूं लागलें. त्याच वेळीं भावाजवळ मी शिकण्यास प्रारंभ केला.

त्यानंतर दिवाळसणाला म्हणून मुद्दाम आग्रहानें बोलाविलें असतां तिकडून माझी परीक्षा घेण्यांत आली. त्यावेळीं साधारण वाचनां येण्याइतपत तरी माझी प्रगति झाली होती म्हणून बरें; नाहींतर माझ्याविषयीं फारच वाईट मत झालें असतें. शिक्षण वाढविण्याविषयीं मला एक व्याख्यानच ऐकविलें.

स्वतःच्या ज्या महत्त्वाकांक्षा होत्या, त्याप्रमाणें आदर्श स्त्री हाण्याची पात्रता कधींकाळीं तरी माझ्यांत येईल किंवा नाहीं याविषयीं मला शंकाच वाटली. मी निमूटपणें सर्व ऐकून घेतलें.

यानंतर एका वर्षानें शिक्षण संपून एका संस्थानांत नोकरी लागली, आणि मी सासरीं गेलें. मामंजी आणि सासूबाई हीं दोघेंही पूर्वींच निवर्तलीं होतीं. थोरले दीर घरीं शेतीभातीची व्यवस्था पहात होते. त्या दूरच्या प्रदेशीं आम्हीं दोघेंच एकाकी होतों. अजूनपर्यंत जेथें जन्म झाला त्या मायेच्या माणसांतच मी वाढलें होतें. त्या मला महाराष्ट्रापासून इतक्या दूर भिन्न भाषेच्या प्रदेशांत आलेलें अगदीं आवडत नसे. पुरुषांना व्यवसाय पुष्कळ, करमणुकीचीं साधनेंहि पुष्कळ आणि भाषाभिन्नतेची अडचण दूर करावयाला राजभाषा सदा तत्पर. त्यामुळें त्यांचें कुठें कांहींच अडत नसतें.

परंतु माझी फार कुचंबणा होई. त्यामुळें मी ती नोकरी सोडून पुणें मुंबईकडे स्वतंत्र दवाखाना काढून रहाण्यास विनवीत असें.

एके दिवशीं अशीच त्रासून मी म्हणालें,

"हद्दपार केलेल्या माणसांत अन् आमच्यांत कांहीं अंतर आहे का ?"

यावर हंसून म्हणायचें--

" हद्दपार करणें म्हणजे काय याची तुला कल्पनाच नाहीं तर! हद्दपार केलेल्या माणसांना तुझ्यासारखा रहायला असा बंगला, गाडी, हाताखालीं असे चार नोकरचाकर मिळते तर सर्वांनींच हद्दपार होण्याची इच्छा केली असती. "

" पुरे झालं. " कृत्रिम कोपानें मी म्हणालें.

" आपला सर्व वेळ बाहेर मजेंत जातो म्हणून सुचतात या गोष्टी. माझ्या-सारखं एकटं रहाण्याची पाळी येती, मग कळलं असतं सुख. बाग नी बंगला असलीं म्हणून काय झालं ? एकटं कैद्यासारखंच कीं नाहीं ? "

" एकटं कशानं ? बाग आहे, कुत्रा आहे. पोपट आहे पण एवढं कशाला ? वाचायला पुस्तकं नाहींत ? वाचीत बसावं. वाचनासारखी करमणूक तर दुसऱ्या कशांत नाहीं. शिवाय इकडील भाषा शिकण्याचा प्रयत्न करावा. एकटे-पणांत करण्यासारखे, शिकण्यासारखे उद्योग पुष्कळच आहेत. शिकायला कांहीं नको आणि वेळ जात नाहीं म्हणून उगाच ओरड ? "

" आतां काय शिकणार मी ? "

" मनांत असलं तर पुष्कळ शिकतां येईल. "

" मग सांगावं तरी एकदां. "

" एकदां का ? अनेकदां सांगितलं आहे. इंग्रजी शिकायला प्रारंभ कर. इक-डची भाषा शीक. स्त्रियांच्या आजाराची व त्यांवरील उपचारांची माहिती करून घे. म्हणजे तुला इकडील स्त्रियांच्या उपयोगीं पडतां येईल. बायकांना पुरुषांकडून रोगचिकित्सा करवून घेणं अवघड वाटतं. स्त्रीचिकित्सकाच्या अभावीं त्यांना आपलीं दुःखं निमूटपणेंच सोसावीं लागतात. अशा स्त्रियांचीं दुःखं तुला अंशतः कमी करतां आलीं तर किती बरें फायदा होईल! वेळेचा सद्व्यय होऊन आपल्या हातून पुण्य झाल्याचं समाधान नाहीं का लाभणार ? पण तें मनांत आलं पाहिजे ना ? "

" मनांत येऊन उपयोग काय ? आतां एवढ्या मोठेपणीं मला कांहीं आलं तर पाहिजे--"

वेळ मारून नेण्यासाठीं कांहीं तरी उत्तर द्यायचें म्हणून दिलें, परंतु स्वतः अतिशय गंभीरतेनें म्हटलें--

" बायकांत म्हण आहेना ? न करत्याचा वार शनिवार. तसंच आहे हें.

शिकणारीं सारीं माणसं कुक्कुबाळंच असावीं लागतात नाहीं का ? आमच्या कॉलेजमधले बहुतेक विद्यार्थी पितृपदाला पोचलेले होते ! शिकण्याला वयाची अडचण नसते. खरी अडचण असते ती पूर्वसंस्काराची. बाळपणीं झालेले संस्कार समूळ नष्ट होत नाहींत हेंच खरं. ”

हा टोमणा माझ्या मर्मी लागला. मला फार दुःख झालें हें दिसत असूनसुद्धां तिकडे आज लक्षच द्यायचें नाहीं असा जणूं बेतच केला होता ! असा दृढनिश्चय करण्याचें कारण नुकतीच एक केस स्त्रीचिकित्सकाच्या अभावीं दगावली होती. स्वतांला खात्रीपूर्वक वाटत होतें कीं वेळींच उपचार झाले असते तर ती बाई अकालीं मृत्यूच्या दाढेखालीं चिरडली गेली नसती. अशा वेळीं माझा उपयोग व्हावा अशी स्वतांची फार इच्छा होती. याबद्दल अनेकदां मला उपदेश करायचा असे. परंतु दुर्दैवानें तो मनावर घेण्याची सुबुद्धि मला त्या वेळीं झाली नाहीं.

“ तुला वयाची अडचण भासते. परंतु तीच तुझ्या जागीं एखादी अनाथ स्त्री असती तर आपल्या अडचणींसाठीं केवढ्याहि मोठेपणीं कोणताहि उद्योग शिकली असती. पोटासाठीं तिला शिकणं भागच पडलं असतं. ”

“ मग झालं तर, माझा कांहीं पोटाचा प्रश्न नाहीं. ”

मी मोठ्या तोऱ्यानें उत्तर दिलें. असें बाष्कळ उत्तर दिल्याचें मला अझूनहि वाईट वाटतें; पण तेव्हां तें सहज तोंडीं आलें.

“ पोटाचा प्रश्न नाहीं म्हणूनच सांगतों; अशांच्या हातूनच निरपेक्ष परोपकार घडूं शकेल. ”

“ पण माणसाला ज्यांत आवड नाहीं असा विषय बळें लादून काय होणार ?—”

“ हें मात्र खरं. आम्हांला हें कबूल आहे. मग आवडीचे उद्योग तरी शोधून काढावेत; वेळ जात नाहीं म्हणून आमच्या भोंवतीं कुरकुर कां ? साधनं अनुकूल असलीं म्हणजे उपयोग करून घेण्याची इच्छा होत नसते, हेच खरं. तेंच प्रतिकूल परिस्थितींत एखादी अनाथ स्त्रीसुद्धां वाट काढूं पाहील—”

आजचें संभाषण कधीं संपेलसें मला झालें होतें. पुन्हां पुन्हां अनाथ स्त्रीच्या कर्तृत्वाबद्दल काढलेले उद्गार ऐकून मला कसेसेंच वाटलें. स्वतःच्या मुखानें ही आगामी धोक्याची सूचना देव देत आहे हें मला तेव्हां कळतें तर?

माझें बाळपण आणि प्रौढपणहि कशा परिस्थितींत गेलें होतें हें सांगितलेंच आहे. देवानें मला सुंदर रूप दिलें होतें. या दैवी देणगीवरच अशा स्थळीं माझी निवड झालेली होती. सौंदर्याच्या जोरावरच माझा संसार सुखाचा होईल असें मला वाटत असे. कारण, ' ही रूपराणी नवऱ्याला अगदीं मुठींत ठेवील ' असे उद्‌गार मी माहेरीं असतांना सर्वांच्या तोंडून ऐकत आलें होतें. त्यामुळेंच स्वतः माझीसुद्धां तशीच दृढ समजूत होती. तथापि इकडे बरोबर गेल्यावर कांहीं महिन्यांनीं तो भ्रम कांहींसा कमी झाला. सौंदर्याच्या कोंदणांत शिक्षण-कलाकौशल्यादि रत्नें जडवलेलीं असलीं तरच त्या सौंदर्याला शोभा येते. सौंदर्य हें सुवर्ण कल्पिलें तर शिक्षण, कलाकौशल्य हीं रत्नें होत. वासरहित विलायती फुलांचें रंगामुळें कितीहि कौतुक केलें तरी तें जवळ हवेंसें, डोक्यांत माळावेंसें वाटत नाहीं. उलट सुवासिक लहानसें पुष्प आपल्या सुगंधानें दुसऱ्याला जवळ करतें. अशासारखी विचारसरणी स्वतांची होती. हे विचार स्वतां वारंवार व्यक्त करीत असत. परंतु माझ्या डोळ्यांवर कसलें मोहपटल आलें होतें नकळे. मी त्यापासून योग्य तो बोध घेतला नाहीं.

पतीच्या आवडीच्या विषयांत पत्नीनें तादात्म्य पावावें, दोघांच्या आवडीनिवडी सारख्याच असाव्यात, अशी स्वतःची इच्छा. आणि माझी इच्छा उत्तमोत्तम वस्त्रालंकार घालून समाजांत मिरवावें, मैत्रिणींना दिपवावें अशी होती. इकडे महाराष्ट्रीय लोकांपासून दूर आल्यामुळें ती साधनें असूनहि माझ्या त्या इच्छेची पूर्तता होत नसे. म्हणून मी ती नोकरी सोडून महाराष्ट्रांत स्थायिक होण्यासाठीं हट्ट धरीत असे. आम्हां पतिपत्नींच्या आवडीत इतकें अंतर असल्यामुळें साहजिकच तिकडचें हृदय एक प्रकारें अतृप्त राहिल्यास नवल काय ? तरीसुद्धां मला अतिशय प्रेमानें व आदरानें वागवीत. शक्य तितकी माझ्याविषयीं काळजी घेत.

मला सोबत अन् शिक्षण मिळावें म्हणून एखादी सुशिक्षित स्त्री जमल्यास ठेवून घेण्याचाहि विचार होता. इतक्या आस्थेनें वागवीत म्हणूनच मला तिकडच्या अतृप्त हृदयाचा विचार करण्याचा सुविचार सुचला नाहीं. माझ्या वर्तनाबद्दल तीव्र नापसंती दर्शविली गेली असती तर कदाचित् मला तो विचार वेळींच सुचला असता. पण आपले विचार सक्तीनें दुसऱ्यावर लादण्याचा

अरेरावीपणा तिकडच्या स्वभावांत नसल्यामुळें माझ्या आळसाला आळा बसला नाहीं.

याप्रमाणें परस्परविरोधी विचारांची पतिपत्नी आम्ही एका घरांत सलोख्यानें नांदत होतों. स्वतःचें हृदय काय अतृप्त असेल तेवढेंच. मी तर सौख्यसागरांत पोहत होतें.

\+ × +

एके दिवशीं दोन प्रहरीं आम्ही दिवाणखान्यांत विश्रांति घेत असतां कोणी 'सीरिअस पेशन्ट' आल्याची वर्दी आली. आधीं 'पेशन्ट' म्हटला कीं भूकतहान सर्व नाहींशी व्हायची. मग तो 'सीरिअस' असल्यावर काय ? लगेच पोशाक चढविला आणि निघाले. मी खिडकींतून पाहिलें तो आजाऱ्याला डोलींतून आणिलें असून इतर माणसांशिवाय एक तरुण स्त्रीहि बरोबर आली होती. तिनें तोंडावरून बुरखा घेतला होता. फक्त मेंदीनें रंगविलेलीं रक्तगौर पावलेंच तेवढीं अनाच्छादित असल्यामुळें दृष्टीस पडत होतीं. तेवढीं पावलेंसुद्धां तिच्या मोहक सौंदर्याची साक्ष पटवायला समर्थ होतीं.

संध्याकाळीं घरीं आल्यावर त्या आजाऱ्याची माहिती मी मुद्दाम विचारली. तेव्हां अगदीं कळवळून म्हणायचें--

"मी कितीहि शिकस्त केली तरी म्हातारा वांचणें शक्य नाहीं. म्हाताऱ्याच्या मरणाचें दुःख नाहीं; परंतु ती पोर मात्र बुडणार याचें वाईट वाटतें. ती अठरा वर्षांची मुलगी त्याची चौथी बायको आहे !"

हें ऐकून मलासुद्धां फार वाईट वाटलें. त्या मुलीच्या अनुकंपनीय स्थितीबद्दल मी कळकळीनें उद्गार काढले आणि म्हातारपणीं लग्न केल्याबद्दल म्हाताऱ्यास आणि अशास मुलगी दिल्याबद्दल तिच्या आईबापांस सडकून दोषहि दिला. शेवटीं तो म्हातारा तेथें असेतोंपर्यंत तिला त्याच्याजवळ राहूं देण्याबद्दल स्वतांजवळ विनंति केली. वास्तविक माझ्या विनंतीची कांहींच जरूरी नव्हती; तिला ठेवण्याची व्यवस्था आधींच झालेली होती.

केस 'होपलेस' असूनहि तिकडून रोग्याची फारच काळजी घेतली जात असे. त्याची तरुण पत्नीहि त्याच्या 'कॉट' जवळ बसून असे. कधीं कधीं ती माझ्याजवळहि थोडा वेळ येऊन बसत असे. अद्यापि मला तिची भाषा जरी

बोलतां येत नसे तरी बोललेलें समजत असे. तिचें नांव मणिगौरी असें होतें. मी तिला गौरीच म्हणत असें.

" या म्हाताऱ्या नवऱ्याशिवाय जगांत आपल्या मायेचें कोणी नाहीं. नवरा वांचला तरच आपली धडगत आहे. कसेंहि करून माझ्या पतीचे प्राण वांचवा. नाहींतर बरोबर आलेले भाऊबंद संपत्तीवर आपणांस कधीं तुटून पडतां येईल याची वाट पहात लांडग्यांसारखे टपलेलेच आहेत. " या आशयाच्या तिच्या करुण उद्गारांनीं माझें हृदय कळवळून आलें. तिकडून म्हाताऱ्याला वांचविण्यासाठीं शिकस्त करणें चाललेंच होतें. मीही तिला माझ्याकडून होण्यासारखें साह्य करण्याचें आश्वासन मोठ्या औदार्ययुक्त शब्दांनीं दिलें.

मृत्यु हुकमी नसल्यामुळें जरा थोडें जडभारी वाटतांच त्याला निमंत्रण करण्याचा प्रघात बायकांत आहे; परंतु आमंत्रण करतांच तो जर पुढें उभा राहता तर त्याला कधींच कोणीं हांक मारली नसती. तसेंच क्षणिक भावनेच्या भरांत कोणालाहि मनापासून साह्य करूं इच्छिणाऱ्याचें आहे. असे उद्गार काढतांना आपण आपणांस शब्दांनीं गुंतवून ठेवीत आहों, एखादी जबाबदारी घेत आहों, किंवा बुडत्याच्या मनांत नसती निष्फळ आशा उत्पन्न करून ठेवीत आहों याची जाणीवच नसते. या नियमाला मीसुद्धां अपवाद नव्हतें. तिला अभिवचन देतांना मलासुद्धां माझ्या शब्दांचा अर्थ मुळींच कळलेला नव्हता. तेव्हां त्यांची सत्यता पहाण्याची वेळ कधीं काळीं येईल अशी जाणीव कोठून असणार ?

एका आठवड्याच्या आंतच म्हाताऱ्यानें राम म्हटल्यामुळें बिचारी पोर अनाथ झाली. तिनें म्हटल्याप्रमाणें त्या टपलेल्या लांडग्यांच्या तांड्याबरोबरच तिला जावें लागलें. तिच्या शोचनीय स्थितीची आठवण काढून आम्ही वारंवार दुःख करीत असूं. असे तीनचार महिने गेल्यानंतर एके दिवशीं मी बागेंत हिंडून मोगरीच्या कळ्या तोडीत असतां एक मलिन वस्त्राची कृश स्त्री कंपाउंडाच्या फाटकाशीं उभी राहून आंत जाऊं देण्याविषयीं देवडीवाल्याची विनवणी करीत होती. परंतु तो तिला आंत सोडीत नव्हता. माझें तिकडे लक्ष जातांच तिनें आपल्या तोंडावरील बुरखा मागें सारून केविलवाण्या मुद्रेनें मजकडे पाहिलें. तिचे डोळे अश्रूंनीं डबडबलेले होते. तिच्यांतील



स्थित्यंतरामुळें ओळख पटायला जरी वेळ लागला तरी लौकरच ती गौरी आहे हें मीं ओळखलें व आंत येण्याविषयीं तिला मी खूण केली.

आंत आल्यावर ती मनसोक्त रडली. तिला आजोबा शोभणाऱ्या म्हाताऱ्याच्या विरहामुळें तो रडत होती काय? नव्हे, त्याच्या मृत्यूमुळें तिचा संरक्षक नाहींसा झाला होता; तिच्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन तिच्या दूरच्या जवळच्या नातेवाईकांनीं तिच्या हालअपेष्टा मांडल्यामुळें ती कळवळून रडत होती. मला आतां थोडथोडें गुजराथी समजूं लागलें होतें. त्यामुळें मला तिची सर्व हकीकत समजून घेतां आली.

मोठ्या अगत्यानें मीं तिच्या स्नान-जेवणाची व्यवस्था केली. दुपारीं घरीं आल्यावर मी तिची हकीकत कानांवर घातली, तेव्हां म्हणायचें, " खरोखर दयेला कोणी जर पात्र असतील तर त्या अशा अनाथ मुलीच. या अधिक महिन्यांत कोकिळाव्रत आणि दीपदानासारखीं निष्फळ व्रतें करण्याऐवजीं अशा अनाथ विधवांना कांहीं मदत केली तर तें अधिक पुण्यप्रद होईल. तिला कांहीं तरी दिल्याशिवाय पाठवूं नकोस. "

हा विचार मलाहि पटला. दोन जुनेरीं, चार चोळ्या-जाकिटं तिला देण्याचा माझाहि विचार होताच. स्वतः इतकें सांगितल्यावर पांच रुपयेहि देण्याचें मीं ठरविलें. परंतु—

संध्याकाळ झाली तरी परत जाण्याचें नांव गौरी काढीना. मला सोबतीची जरूर होती व तिला आश्रयाची जरूर होती. तिची मला कींवहि आली होती. तरी मनुष्यस्वभाव काय चमत्कारिक आहे पहा. ती आपण होऊन राहिली तें मला जरा चमत्कारिकच वाटलें. दिवेलावणी झाल्यावर मीं तिला औपचारिकपणें म्हटलें—

" गौरी, आज आतां तूं जाऊं नकोस. दोन दिवस तूं आपली माझ्याजवळच रहा. "

तिनें कृतज्ञतादर्शक मुद्रेनें माझ्याकडे पाहिलें आणि ती कामाला लागली. संध्याकाळीं घरीं आल्यावर मला विचारलें—

" काय, तुमची गौरी गेली नाहीं वाटतं? तिला कायमचीच ठेवून घेण्याचा विचार केला आहे कीं काय? "

" नाहीं गेली म्हणून काय झालं? राहील दोन दिवस आपल्याकडे. तितकी मला सोबत तरी होईल. "

" खरंच, छान कंपॅनिअन होईल तुला. "

एकामागून एक असे पांचसहा दिवस गेले. तरी गौरी परत जाण्याचें नांव काढीना. घरांतल्या माणसाप्रमाणें आपुलकीनें ती सर्व गृहव्यवस्था पाही. मला तर ती कामाला हात लावूं देईना. माझ्या वेणीफणीपासून तों तिकडच्या टेबलावरील व कपाटांतील पुस्तक-बाटल्यांपर्यंत ती काळजी घेई. असें वागण्यांत आम्हांला भारभूत वाटूं नये, आम्ही संतुष्ट असावें असाच तिचा हेतु असावा. त्याप्रमाणें तिकडूनहि तिच्या कामाबद्दल प्रसन्नता दाखविली जाई. परंतु मला मात्र तिनें घेतलेली ही स्वतंत्रता आवडली नाहीं. तिचा आगंतुकपणा व आतां अधिक दिवस राहून दाखविलेला लोंचटपणा मला असह्य वाटून तिचा राग येऊं लागला.

केवळ दयेनें प्रेरित होऊन तिला मीं एक दिवस ठेवून घेतलें तों ती माझ्या चांगुलपणाचा फायदा घेऊन कायमचेंच राहूं पहाते हें मला खपेना. तिला घालवून देण्यास काय युक्ति करावी हेंहि मला सुचेना. कांहीं तरी कठोरपणें तिला तोडून बोलण्याचा विचार मनांत आणला तरी त्याची अमंलबजावणी करवत नसे. तिची केविलवाणी असाह्यतादर्शक मुद्रा पाहिली कीं तो विचार पुढेंच ढकलावा लागे.

तिला स्वतंत्रतेनें घरांत वावरतांना पाहून मीच तिला आग्रहानें ठेवून घेतलें असा समज झाला होता. तिच्या प्रत्येक कामाची, टापटिपीची आणि तत्परतेची वाखाणणी करायला होई. ती आल्यापासून तिकडच्या वागणुकींत एक प्रकारची प्रसन्नता आली होती. निदान मलातरी तसें वाटत होतें. आणि तेंच मला असह्य झालें होतें.

अशा द्विधा मनःस्थितींत तिला घालवून देण्यासाठीं काय युक्ति योजावी या विचारांत एके दिवशीं मी असतां तिकडून मला म्हटलें,

" ह्या अनाथ मुलीला तूं आश्रय दिलास हें फार चांगलं केलंस. तुला सोबत होईल. शिवाय तिच्याजवळ तुला बरंच शिकतांहि येईल. तिला हिंदीसुद्धां येतं. काल ती 'सरस्वती'चा अंक वाचीत होती. "

मी मनांत चरकलें, संतापलेंहि. स्वरांत शक्य तितकी रुक्षता आणून तुटक-पणें मीं उत्तर केलें,

" माझ्या घरांत माझी सत्ता आहे. अशा आगंतुक पाहुणीला ठेवणें न ठेवणें माझ्या मर्जीवर अवलंबून राहील. "

" जसं आपल्या मर्जीस येईल तसंच करा. आम्ही आपल्या अधिकारांत ढवळाढवळ करूं इच्छित नाहीं. "

हें विनोदाचें उत्तरसुद्धां मला आवडलें नाहीं. स्वतः असें कांहीं म्हटलें कीं मला तिचा संताप येई, आणि तिला एकटीलाच पाहिली म्हणजे तिची कींव येई. अशा परस्परविरोधी विचारांच्या वावटळींत सांपडल्यामुळें माझ्या स्वभा-वाचा मोकळेपणा जाऊन तो चिडखोर व संशयी बनत चालला होता. वेळीं अवेळीं माझ्या रागाचा प्रयोग गौरीवर होई. तिचें आमच्या घरीं रहाणें मला आवडत नाहीं हें मी अनेक तऱ्हांनीं तिला भासवीं व तिनेंहि तें ताडलें असावें.

*　　　*　　　*

एके दिवशीं दोनप्रहरीं मी थोडी झोंपेच्या गुंगींत असतां स्वतःच्या दिवाण-खान्यांतील बोलण्याच्या आवाजानें मी जागी झालें. बोलणें मला स्पष्ट समजलें नाहीं. कोणी हळूहळू कांहीं तरी बोलत होतें. स्वतः अत्यंत मृदु स्वरांत उच्चारलेले शब्द मात्र मी ऐकले.

" तूं अगदीं मनांत कांहीं आणूं नको. घर तुझंच समजून रहा–"

पुढचें वाक्य मला समजलें नाहीं. एवढ्या अगत्यानें कोणाला आश्वासन देणें चाललें आहे ? एकाद्या रोग्याला काय ? गौरीला तर नसेल ? शंका येण्याचा अवकाश. मी चटकन् उठून दिवाणखान्याकडे वळलें, तों लगबगीनें गौरी बाहेर पडतांना दिसली. माझ्या अंगाचा नुसता भडका उडाला. जोरानें पाय आपटीत मी दिवाणखान्यांत शिरलें. कांहीं तरी वाचन चाललेलें होतें तें थांबवून बोल-ण्याच्या उद्देशानें माझ्याकडे पाहिलें. परंतु बोलण्यास बिलकूल अवकाश न देतां जोरानें मींच प्रश्न केला—

" आतां इथं कोण आलं होतं ? "

" कोणी नाहीं. "

" कोणी नाहीं ? " संतापातिशयानें मीं म्हटलें, " मग आतांच बाहेर गेली ती कोण ? "

" हं. ती होय ? ती आपली गौरी. मला वाटलं बाहेरचं कोणी आलं म्हणून विचारतेस . "

" ती आपली गौरी इथं कशाला आली होती ? एवढं मायेनं कसलं आश्वासन देणं चाललं होतं ? "

" अरे वाः ! अगदीं उलट तपासणी चालवली आहे–" परंतु माझ्या डोळ्यांतील अश्रु पाहून म्हटलें " हें काय ? थट्टासुद्धां समजत नाहीं ? "

" समजते. पुरती समजते. बोलणीं मानभावाचीं अन् करणी कसाबाची मला चांगली समजली बरं. शस्त्रविद्येंत निपुणच आहांत पण माझा असा केसानं गळा कापायचा नव्हता. अन् ती सटवी ! काय मेली द्वाड तरी ! इकडे यायला लाज नाहीं वाटली तिला ? "

" शी. शी. हें तूं काय बडबडतेस ? जरा ऐकून तरी घेशील का उगाच—"

" आणखी काय ऐकायचं उरलं आहे ? त्या सटवीला ' आपलंच घर समजून रहा ' म्हणून विनवणी चालली होती ती या कानांनीं नीट ऐकली बरं. "

इतकं मी उसळून बोललें तरी अगदीं शांतपणें उत्तर दिलें,

" सगळा समजुतीचा घोंटाळा. आडून ऐकण्याचा हा परिणाम ! ती बिचारी म्हणत होती ' मला एकादी नोकरी लावून द्या, कोणाचीं मुलं सांभाळायची किंवा आजाऱ्याची शुश्रूषा करायची. तुमच्यावर भार टाकून मी किती दिवस रहावं ? ' तेव्हां तिला म्हटलं ' आम्हांलाहि जरूरीच आहे. सोबतीसाठीं कोणाला तरी ठेवण्याच्या विचारांतच होतों. तेव्हां संकोच न धरतां तूं रहा. ' "

" मला तिची सोबतहि नको अन् एवढे उपकारहि नकोत. तिला ठेवली तर मी माहेरीं निघून जाईन. "

" तें कां ? तिला ठेवायची ती काय आमच्यासाठीं ? तुझीच कुरकुर होती करमत नाहीं म्हणून. तूंच तिला ठेवून घेतलंस. बरं, ती तुला भारभूत झाली आहे असेंहि नाहीं. घरांत ती किती खपते ? प्रत्येक व्यवस्था तीच बघते आहे. एवढ्या श्रमांबद्दल तूं पोटाला दोन वेळां काय घालीत असशील तेवढेंच. "

" हो. तेवढंच बरं. आपण करतां आहां ना माया ? मला आतां तेवढंसुद्धां करायचं नाहीं. "

मी अगदीं निक्षून सांगितलें. अविश्वास आणि असूया या विकारांनीं मला

इतकें ग्रासलें होतें कीं सहानुभूति, औदार्य इत्यादि कोमल विचारांना माझ्या मनांत अवकाशच उरला नव्हता. अविचारानें मी बोलतच होतें.

“ दूध पाजून साप पोसायला मी दूधखुळी नाहीं. सारीं सोंगं मला कळतात. मेलीनं काय मोहिनी घातली आहे कुणास ठाऊक ? ”

माझी एवढी बडबड चालली असतांना स्वतः मुळींच उत्तर केलें नाहीं. अगदीं खिन्नपणें ऐकून घेतलें. एखाद्या सच्छील माणसाच्या शीलाविषयीं शंका घेतली असतां त्याला जसें दुःख होईल तशी दुःखी मुद्रा झाली. गौरीहि आपलें गाठोडें बांधून अश्रु ढाळीत एकीकडे बसली होती. घरांत सर्वत्र उदासीनता भरून राहिली होती. कोणीच कोणाशीं बोललें नाहीं. सर्वानींच धुसफुसत राहण्यापेक्षां कांहींतरी तोड काढून दुरावलेलें गृहसौख्य पुन्हां घरांत कसें नांदवावें या विचारांत स्वतःचे डोकें गुंतलें आहे हें मला तेव्हां कळलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं गौरी माझा साश्रु नयनांनीं निरोप घेऊन घरांतून गेली ही मला इष्टापत्तिच वाटली. स्वतः सलोख्यानें वागूं लागल्यामुळें एका आठवड्या-पूर्वीं आमच्या घरांत मोठें वादळ झालें होतें ही गोष्ट आम्ही–बाह्यतः तरी–आठवणीआड करून पूर्ववत् वागूं लागलों. स्वतःची वृत्तिहि उल्हासित दिसे. मीहि आपण होऊन गुजराथी बोलण्यास शिकण्याची खटपट करूं लागलें. प्रत्यक्ष वस्तुपाठानें मी शिक्षण घेत असल्यामुळें तें मला सोपें झालें होतें या कामीं शिक्षकाची भूमिका प्रसंगानुसार घरांतील नोकरचाकरांकडे असे. चांगलें बोलतां येऊं लागल्यावर स्वतःस चकित करण्याचा माझा बेत होता !

* * *

आणखी सहा महिने गेले.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. वसंतऋतूला प्रारंभ झालेला होता. त्या दिवशीं पौर्णिमा असल्यामुळें जिकडे तिकडे स्वच्छ चांदणें पडलें होतें. जणुं काय उष्म्याचे दिवस असल्यामुळें शालूपैठण्या नकोशा वाटून सृष्टिदेवीनें तलम चंदेरी पातळच परिधान केलें आहे ! अशा प्रशांत वेळीं मी नदीच्या कांठानें फिरून परत येत होतें..आम्रमंजरीच्या गोड सुगंधानें सर्व वातावरण दरवळून गेलें होतें. वाऱ्याच्या झुळकीबरोबर सायली मोगऱ्यांच्या सुवासिक फुलांचाहि परिमळ पसरून वृत्तीला प्रसन्नता आणीत होता. मधूनच कोकिळ “ कुहू कुहू ” शब्दानें आपलें अस्तित्व भासवीत होता. शुष्क झालेल्या नदीच्या पात्रांत

रुपेरी रेघ चमकत होती. तें मनोहर दृश्य पाहून मला आनंद झाला. माझ्या प्रसन्नतेंत भर घालण्याकरितांच कीं काय पलीकडून गाण्याचे सूर ऐकूं येत होते चांदण्यांत फेर धरून मुली गात होत्या—

पपैया तो पियु पियु करे बोले मधुराशा मोर
कृष्णजीवन क्यारे आवशो व्हाला नंद–किशोर
नंदकिशोर क्यारे आवशो रे जोउ मारा व्हालानी वाट !
वेलेरां वळजो विठला सुनी मथुरानी वाट !
सुना जमुनाना घाट.
कृष्णजीवन क्यारे आवशो—

माझ्या आयुष्यांतील आनंदाचा तो शेवटचा दिवस ठरणार असल्यामुळें कीं काय सर्व सृष्टीनें माझ्या प्रसन्नतेंत भर टाकण्याकरितां जणूं काय अहमहमिका चालविली होती. उल्हासाच्या भरांत गीत ऐकत मी हॉस्पिटलजवळ कधीं आलें तें मला कळलेंसुद्धां नाहीं. परंतु त्याच गीताचे सूर रुग्णालयाच्या एका खोलीच्या खिडकींतून हळूहळू निघालेले ऐकूं येऊं लागले. सुरांच्या ओढीनेंच मी हॉस्पिटलच्या आवारांत शिरलें. बरोबरच्या बाईला बंगल्यावर पुढें पाठवून कोण गात आहे तें पहाण्यास मी त्या दिशेकडे वळलें. रोगी ठेवण्याच्या एका खोलींत कोणी तरी स्त्री कंपित स्वरानें गुणगुणत होती. खोलींतील विद्युद्दीप घालविलेला होता. दारासमोर पडदा उभा करून आडोसा केलेला होता. त्याच्या आडून मी हळूच डोकावून पाहिलें तों खिडकीजवळच्या कॉटवर जरा खिडकीकडे वळून एक कृश स्त्री निजली होती. तिच्या तोंडावर छातीपर्यंत चंद्रप्रकाश पडला होता. तिचे डोळे चंद्राकडे लागले होते आणि चंद्राची दृष्टि त्या चंद्राननेवर खिळली होती. जणूं काय मोठ्या चौरस आरशांत चंद्राचें प्रतिबिंब पडावें त्याप्रमाणें खिडकींतून आलेल्या चंद्रप्रकाशांत त्या स्त्रीचें मुखमंडल तळपत होतें. ती कंपित स्वरानें गुणगुणत होती. मधूनच डोळे पुशीत होती; आणि आपला कृश हात वर आकाशाकडे करून कांहींतरी बोलत होती. परंतु बोल उमटण्याऐवजीं हुंदकेच हवेंत आदळत होते. तें मोहक परंतु करुण दृश्य पाहून माझें हृदय विरघळून गेलें. त्या दुःखाकष्टी जीवाचें दुःख निवारतां आलें तर निवारावें असा विचारसुद्धां माझ्या मनांत आला. तिचें सांत्वन करायला मी पुढें सरणार इतक्यांत ती अगदीं

करुणकंपित आवाजानें गाऊं लागली. तें गाणें मला आठवत नाहीं. पण त्याचा अर्थ असा होता.

" सगळ्याला सीमा आहे. परंतु हिंदु विधवेचें दुःख मात्र असीम आहे, दुर्गंधाचें साम्राज्य नांदविणाऱ्या उकिरड्याचासुद्धां काळ पालटतो. उकिरडा झाडूनलोटून त्यावर लग्नमंडप उभारला जातो, विजेची रोषनाई करून तो प्रकाशमान केला जातो आणि तेथें सनईचे कर्णमधुर सूर निघतात. परंतु गरीब बिचाऱ्या हिंदु विधवांचा काळ मात्र या जन्मीं पालटत नाहीं. "

" हाय हाय, देवा, माझा काळ या जन्मीं कधींच पालटणार नाहीं काय? कृष्णचंद्र ! तुम्ही मला—"

इतकें गाऊन व बोलून ती बिचारी स्फुंदून रडूं लागली. मी आंत जाण्याच्या बेतांत होतें, इतक्यांत एक व्यक्ति शेजारच्या खोलीमधून झपाट्यानें पुढें आली आणि तिनें मृदु स्वरानें उच्चारलेले पुढील उद्गार तप्त तैलाप्रमाणें माझ्या कानांत शिरले—

" गौरी ! लाडके ! "

थरथर कांपत ती स्त्री उठून बसली. तिचा कृश हात स्वतः आपल्या हातीं घेऊन म्हटलें,

" गौरी, काळ पालटून टाकणें हें तर सर्वस्वीं तुझ्याच हातीं आहे. लाडके ! स्वाधीनच्या गोष्टीसाठीं तूं आपल्या जिवाचे इतके हाल करून घेतलेस ना ? एका शब्दानें माझ्यावर अनुग्रह—"

माझ्या सुखाच्या संसारांत शिरकाव करूं पहाणाऱ्या या अनिष्ट ग्रहावर पायांतील पुणेरी जोड्याचा चांगलाच अनुग्रह करण्याच्या उद्देशानें मी रागानें आंत शिरलें. परंतु माझा प्रसाद स्वीकारायला ती शुद्धींत होती कुठें ? कृपणाचें धन त्याप्रमाणें विधवेचें हृदय ! तें एकांतांत आपल्याशींच उघडें झालें होतें. तिकडच्या बोलण्यावरून आणि माझ्या आविर्भावावरून तें दोघांनाहि दिसल्याबद्दल तिची खात्री झाली. तापानें अन् हृत्तापानें ती अशक्त झालेली दिसतच होती. मला पाहतांच ती मूर्च्छा येऊन पडली. माझ्या साह्याची अपेक्षा न करितां तिला सांवरून नीट बिछान्यावर निजविलें आणि आव्हान-घंटी वाजवून नोकर आल्यावर जरूर तें साहित्य मागवून स्वतःच तिला



"ਜੈਸੇ ਨਾਲ ਸਰਕਾਰ ਰਾਕਸੀਂ ਦੇ ਨਾ ਮੁਸਕਣੀਂ ਨਜ਼ਰਾਨ ਵਾਲੀਂ ਅਤੇ ਜਾਵਕੇ।"

ती भ्रमांत बडबडत होती—

" नको, ताईचं सुख हिरावून घेणं नको. कुठं चंद्र अन् कुठं कुमुदिनी ! तरी आकाशांतल्या चंद्रावर पंकमग्न कुमुदिनी प्रेम करतेच कीं नाहीं ? तसंच मी करीन. मला एवढं उच्च स्थान देऊं केलं यांतच माझा गौरव झाला. जन्माचं सार्थक झालं. आतां मी सुखानं मरेन. बा मृत्यो, आतां खुशाल ये, मला घेऊन जा. "

रागाचें पार पाणी करणारा तिचा तो करुणविलाप ऐकून माझ्या मनांतली अढी जरी कमी झाली नाहीं तरी रागाचें दमन करण्याइतका विवेक मात्र करतां आला. स्वतःच्या डोळ्यांतून झिरपणारे अश्रु व तत्परतेनें चालविलेली तिची शुश्रूषा पहात मी स्वस्थ बसलें. बसल्या जागींच माझी शक्ति, माझें त्राण फार काय प्राणसुद्धां नाहींसे झाल्यासारखें मला वाटलें. अशा स्थितींत तेथें बसणें मला असह्य झालें. मी हळूच उठून चालूं लागलें. तें पाहून स्वतः शिपायाला हांक मारून माझ्याबरोबर जाण्यास व आपण येईतोपर्यंत बंगल्या-वर बसण्यास बजावलें.

ज्यांनीं आपल्या हृदयसिंहासनावरून मला लोटून दिलें त्यांच्या शिपायाचें साह्य तरी मला कशाला ?. पण त्याला बरोबर देण्यांत स्वतःचें दूरदर्शित्व होतें. घरीं जाण्याचा मार्ग नदीकांठानेंच होता. कदाचित् मी आपल्या जिवाचें कांहीं बरेंवाईट करीन अशा शंकेनें त्याला तसें बजावलें असावें. खरेंच, अशा अपमानित स्थितींत मला तोच मार्ग सुचणें साहजिक नव्हतें का ?

घरीं गेल्यावर मला तिथली एकूणएक वस्तु विषासारखी वाटूं लागली. माझा दिवाणखाना, तेथील पलंग—त्याला तर स्पर्श करूं नये असें वाटूं लागलें. मी तेथेंच जमिनीवर गतगोष्टी आठवीत आणि अश्रूंनीं जमीन भिजवीत पडलें. बरीच रात्र लोटली. माझा तशा स्थितींतच किंचित् डोळा लागला होता. मी स्वप्न पहात होतें. दुथडी भरून वहाणाऱ्या नदींत सहज पाय घसरून मी पडलें आणि गटंगळ्या खाऊं लागलें. नुकतीच जागेपणीं मी जीविताला अगदीं विटलें होतें. क्षणांत हजारदां मीं मृत्यूला आव्हान केलें होतें. परंतु स्वप्नांत बुडण्याचा देखावा पाहून मी भीतीनें मला वांचविण्यासाठीं ओरडूं लागलें. आधारासाठीं कांहीं हातीं लागेल का म्हणून सभोंवतीं हातानें चाचपूं लागलें. इतक्यांत कोणीतरी आलें व मला अलगत धरून बुडतांना वांचविलें. भीतीचा

भर थोडा ओसरतांच डोळे उघडून पहातें तों मी आपल्या पलंगावर असून स्वतः जवळच बसून कपाळावरील घडीवर कोलन-वॉटर शिंपडीत होते.

मग मला भासच झाला तर! परंतु किती तो वस्तुस्थितिनिदर्शक होता! खरोखर माझी बुडूं पहाणारी संसारनौका सांवरणारें यांच्याशिवाय दुसरें कोण असणार? परंतु माझ्या जागीं हृदयांत दुसरीला स्थान देणाऱ्या यांच्या हातांचा आश्रय मीं पूर्ववत् घ्यावा काय? मी भांबावून गेलें. माझें मन स्वतः-कडून उपचार करून घ्यायला तयार नव्हतें. मी हात झिडकारून उठण्याचा प्रयत्न करूं लागलें. पण शरीरांत त्राण बिलकूल नव्हतें. माझ्या निष्फळ प्रयत्नाचा प्रतिकार करून म्हणाले,

" नको. त्रास करून घेऊं नको. स्वस्थ पड. डोकं किती तापलं आहे?"

मी रडूं लागलें. माझें मृदुपणें सांत्वन करीत म्हणाले,

" सुशिले, माझ्या अपराधाची तूं मला क्षमा नाहीं का करणार? मी चुकलों. कसा विकारवश झालों नकळे—"

एक शब्दसुद्धां बोलूं नये असें मला वाटलें. माझे हुंदके सुरूच होते. माझी परोपरीनें समजूत घालणें चाललें होतें.

" ती अननुभवी अल्लड पोर, या स्वार्थी जगांत आश्रयाच्या अभावीं पोटा-साठीं भटकत असतां कुठें तरी आडमार्गाला लागेल म्हणून तिला स्वावलंबी करून स्वकष्टानें पोट भरण्याचा मार्ग दाखविला. आजाऱ्यांची सेवाशुश्रूषा करून ती पोटाला मिळविते. वास्तविक तूंच तिला मदत करायला पाहिजे होती. पण तुझी तशी इच्छा नसल्यामुळें ती मला करावी लागली. यांत मी स्वतः कांहीं झीज सोसली आहे असें मुळींच नव्हे."

" आडमार्गापासून वांचवायला स्वतःच आडमार्गाला नेणं हाच एक उपाय आहे नाहीं का? अन् म्हणूनच एवढं पुण्यकृत्य इतके दिवस लपवून ठेवण्याची प्रतारणा करावी लागली!"

मीं त्वेषानें बोलत होतें. मला थोपटून शांत करीत स्वतः उत्तर दिलें—

" सर्व ऐकून घे. मगच दोष दे. तूं तिला घराच्या बाहेर घालविलेंस म्हणून मी तिला दवाखान्यांत ठेवून घेतलें. यांत माझा हेतु काय हें मी सांगितलेंच आहे. ज्या गुणांची मला आवड आहे, जे गुण हवेहवेसे मला

वाटतात, जे तुझ्यांत असावेत असें मला वाटतें ते तिच्यांत आहेत. माझ्या आवडींचे विषय शिकण्याची ती हौस बाळगते. एकदां दाखविलेलें सांगितलेलें लक्षपूर्वक शिकते आणि त्याप्रमाणें आजाऱ्यांची व्यवस्था, शुश्रूषा उत्तम करते. या तिच्या गुणांमुळें तिच्याविषयीं अनुकंपा किंवा आदरयुक्त प्रे-कौतुक म्हण पाहिजे तर–मला वाटतें. यांत विकाराचा अंश होता म्हणायला अजूनहि मी तयार नाहीं. असें असून आज असें कसें घडलें ? याचें उत्तर मनुष्य हा स्खलनशील प्राणी आहे. तिनें एकांतांत आपण होऊन आपलें हृदय उघडें केलें त्या वेळीं विवेकाचें स्थान विकारानें बळकावलें; आणि असा अविचार घडला. मी मोकळ्या मनानें माझा अपराध कबूल केला. आतां एकदां मला क्षमा करणार नाहींस का ? ”

मीं कांहींच उत्तर केलें नाहीं. माझ्यापेक्षां तिच्यांत गुण अधिक आहेत म्हणून माझ्यापेक्षां ती अधिक आवडली हें तात्पर्य काढून तें मीं मनाला पुष्कळच लावून घेतलें. अशा स्थितींत तेथें रहाणें मला असह्य झालें. पहांटे उठून मीं आपली जाण्याची तयारी केली. दागदागिने किंवा पैसे वगैरे विशेषसें मीं कांहींच बरोबर घेतलें नाहीं. अगदींच अवतार बघून माहेरच्या माणसांनीं दचकूं नये म्हणून रोज अंगावर होते ते जिन्नस राहूं दिले व पेटींत दोनतीन लुगडीं घेतलीं. पुन्हां माझीं पावलें या घरास लागणार नाहींत असें जर मला स्वप्न पडतें तर मीं तीं बाहेरच कां काढलीं असतीं ? परंतु स्वप्नाची सूचना मानली असती असें तरी कशावरून ? कारण जाण्याचा बेत रहित करण्याविषयीं परोपरीनें माझी विनवणी चालली असतांना ती झिडकारून मी निघालें होतें. आतां वाटतें कीं त्या वेळीं स्वतः इतकें पडतें घेतलें असतां मी टाकून जायला नको होतें. एक वेळच्या चुकीची क्षमा करून पुढील अधःपात टाळायला हवे होतें. पण त्या वेळीं हा विचार रुचला नाहीं. त्या वेळीं एकच वेड डोक्यांत होतें. आणि तें म्हणजे कळत नकळत जर अशी चूक कोणीं स्त्रीनें केली असती तर पुरुष क्षमा करूं शकले असते काय ? नाहींच. मग मी निदान थोडीशी शिक्षा तरी कां करूं नये? माझ्याशिवाय क्षणभर चैन न पडणाऱ्यांना माझ्या जाण्यानें चांगलीच अद्दल घडेल अशी माझी वेडी समजूत !

किल्ल्याच्या भिंतींची एकादी वीट जरी खिळखिळी झाली तरी शहाणा किल्लेदार तिकडे दुर्लक्ष करणार नाहीं, ही साधी गोष्ट एखाद्या लहान मुलालाहि

समजेल. पण प्रत्यक्ष प्रेमदुर्गाचा एक कोंपराच कमकुवत झाला असतांना तो सताड मोकळा टाकून-नव्हे शत्रूच्या स्वाधीन करून मी निघून गेलें.

* * *

आगाऊ सूचना न देतां एकाएकीं मला आलेली पाहून दादा नी वहिनी चकित झालीं. तिच्या एकुलत्या एक अरुणाच्या वाढदिवसाला नी उष्टावणाला इतकें आग्रहाचें आमंत्रण असून आम्ही गेलों नाहीं नी आज एकटीच आलें यावरून कांहीं तरी विपरीत प्रकार आहे हें तिनें ताडलेंच.

" पूर्वेचा सूर्य आज पश्चिमेस कसा उगवला ? " असा तिनें प्रश्न केलाच. मनांतलें दुःख मनांत दडपून कृत्रिम हास्यानें व कांहीं तरी उत्तरानें मला तो प्रसंग साजरा करावा लागला. नंतर अगदीं रडकुंडीस येऊन मी म्हणालें,

" आई बाबा गेले म्हणून माझा माहेरावरचा अधिकार नाहींसा झाला असें समजूं नकोस वहिनी. "

माझा कंपित स्वर ऐकून तीं दोघें स्तब्ध झालीं.

एक वर्ष लोटलें. या अवधींत प्रथम प्रथम बरींच पण नंतर तीनचार पत्रें निघून येण्याविषयीं आलीं. सुरवातीला तीं बरींच आर्जवयुक्त होतीं. उत्तरोत्तर तो भाग कमी होत गेला. पहिलें पत्र आलें तेव्हां अशींच आणखी दोनचार आल्यानंतर स्वतः येईपर्यंत न जाण्याचें मीं ठरविलें. उत्तरोत्तर पत्रांतील आर्द्रता कमी होत चालली होती. इकडे घरांतील स्निग्ध वातावरणहि रुक्ष होत चाललें. तेव्हां हळूहळू घरीं जाण्याचे विचार माझ्या डोक्यांत येऊं लागले. अशीच मी जाण्यासंबंधीं विचार करीत बसलें असतां पुष्कळ दिवसांनीं एक पत्र आलें. जाण्याच्या प्रश्नाची वासलात त्यामुळें आपोआपच लागली. पत्रांतील महत्त्वाच्या ओळी अशा होत्याः—

" तुझीं आणि माझीं मतें व आवडी अगदीं भिन्न असतां केवळ विवाहग्रंथीनें बद्ध झाल्यामुळें मी तुझ्यावर प्रेम करीत आलों होतों. माझें प्रेम व माझी नेहमींची वागणूक कांहीं लक्षांत न घेतां चमत्कारिक परिस्थितीमुळें व क्षणिक विकारवशतेमुळें घडलेल्या एका चुकीला मात्र नसतें महत्त्व तूं दिलें आहेस. एका वर्षाच्या दीर्घावधीनंतरहि तुझ्या त्या मतांत बदल झाला नाहीं. यापुढें तुझें आणि माझें पटेल असें वाटत नाहीं. तूं अगदीं तुटे तों ताणलें आहेस. तुझ्या आवडी निराळ्या, माझ्या निराळ्या. एकमेकांचीं मतें

एकमेकांवर सक्तीनें लादून लौकिक दृष्टया पतिपत्नीच्या नात्यानें एकत्र रहाणें ही विवाहाच्या पावित्र्याची शुद्ध विटंबना आहे. जेथें अंतःकरणाचें ऐक्य घडलें नाहीं तो विवाह म्हणजे निव्वळ फसवणूक होय. यापुढें अशा भ्रमांत मी राहूं इच्छित नाहीं. लौकरच मी गौरीबरोबर पुनर्विवाह करणार आहें. या गोष्टीला संस्थानी वातावरण अनुकूल असणार नाहीं. कारितां मला महाराष्ट्रांतच यावें लागेल यापुढें दरमहा तुला पन्नास रुपये पाठविण्यांत येतील. ”

पत्र वाचून माझी काय स्थिति झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी ! केव्हांहि गेलें तरी मी माझ्या हक्काच्या घरीं जाणार ही माझी आशा समूळ नष्ट झाली ! जिला मूठभर अन्न व माझ्या घरांत आश्रय मिळणें हें केवळ माझ्या दयेवर अवलंबून होतें व जिला ती दया दाखवायला मी कबूल नव्हतें. तिच्याच दयेवर माझें-त्या एक वेळच्या माझ्या घरांत-पाऊल टाकणें अवलंबून रहाणार ! काय ही दैवाची विचित्र घटना !

“ आपण लग्नाला हरकत करूं. फिर्याद करून दागिने मिळवूं ” असें दादावहिनी माझें समाधान करीत होतीं. परंतु माझें दुःख मलाच ठावें !

तिकडेहि कांहीं आनंदाच्या योजना चालल्याच असतील; परंतु मनुष्यांनीं योजलेले सर्वच बेत सिद्धीस जाते तर सृष्टीचा सूत्रधार कोणी तरी आहे आणि तो आपल्या मर्जीनुसार सूत्रें हालवून मानवी बाहुलीं नाचवितो हा सिद्धान्त तीव्रतेनें मानवी मनाला कसा पटला असता ?

एका आठवड्याच्या आंतच स्वतः अत्यवस्थ असल्याबद्दल खुद्द गौरीची तार मला आली. आम्ही गेलों. बोटाला ‘ सेप्टिक ’ झालें होतें आणि तें भराभर इतकें विकोपास गेलें होतें. गौरीनें जिवापाड शुश्रूषा केली आणि आम्ही गेल्यावर शक्य तीं साधनें जमवून उपचार केले; पण यश आलें नाहीं ! !

आक्कांचे हुंदके अनावर झाले. त्यांना बोलवेना. क्षणभर थांबून त्या पुढें सांगूं लागल्या--

पुढचें वर्णन काय करूं ? पायांखालचा आधार सरकला आणि काळोखाच्या खोल दरींत फेंकली गेल्यासारखें मला झालें. कोठेंहि अन् कसेहि असले तरी ते माझे होते. माझ्या रूपसामर्थ्यानें अथवा कसेंहि मीं त्यांचें हृदय परत मजकडे ओढून आणलें असतें. पण आतां ? आतां मला सतीच्या चालीची वाण

तीव्रतेनें जाणवली ! गौरीच्या शोकालासुद्धां सीमा नव्हती ! पण तिच्याशीं सहानुभूतीनें वागायला आम्ही कोणीच तयार नव्हतों.

भाऊजी तांतडीनें धांवून आले. दादाची रजा थोडी असल्यानें तो अधिक रजा घेऊन परत येण्यासाठीं पुण्यास गेला. त्या अवधींत भाऊजींनीं सर्व फर्निचर, दवाखाना आणि इतर सामानसुमान विकून पैसा उभा केला. या कामीं माझें अस्तित्व त्यांनीं जमेसच धरलें नाहीं.

दादा आला तेव्हां घर चक्क झालेलें होतें. आपली बहीण स्वतःच्या आततायीपणामुळें साफ बुडाली हें त्याला स्पष्ट दिसून आलें. त्यानें भाऊजींना विचारलें—

" ताईची काय व्यवस्था केली ? "

" व्यवस्था काय करायची ? आम्ही असतां तिला अन्नवस्त्राची ददात पडेल काय ? "

दादालाच त्यांनीं त्याच्यावरील जबाबदारीची जाणीव करून दिली. तो म्हणाला, " एवढ्या साऱ्या ऐश्वर्याची ती मालकीण असतां असली भाषा कां ? "

भाऊजी हेटाळणीनें हंसले.

" खरेंच; टेबलें अन् खुर्च्या, बाटल्या नी बरण्या, चाकूकात्र्या, मोठेंच ऐश्वर्य ! अहो विचारतो कोण या अडगळीला ? चोरबाजारांत यांची काय किंमत आली असती ? चोरबाजार दाखवायला स्वतःची पिशवी मात्र सैल करावी लागली असती खरी. "

" पण तुम्ही एवढी तसदी कां घेतली ? तिचें तिनें पाहून घेतलें असतें. शिवाय या बाईचासुद्धां विचार करायला पाहिजे होता. तिच्याशीं ते लग्न करणार होते. "

" असेल, पण माझा काय संबंध ? नवऱ्यानें टाकलेल्या निपुत्रिक विधवेचा आणि विवाहसंस्काराशिवाय अशा जवळ केलेल्यांचा पुरुषाच्या इस्टेटीवर किती हक्क पोंचतो हें भाऊराव ! तुम्हांला मी सांगायला नको. माझा भाऊ केव्हां जातो अन् आपण इस्टेट केव्हां गोळा करतों अशी तुम्ही अन् तुमची बहीण वाटच पहात होतां काय ? "

इतके फूत्कार सोडून त्यांनीं डोळे चोळायला सुरवात केली. मला त्या

दांभिकतेच्या देखाव्याची शिसारी आली! स्वतांच्या मनाची, मतांची किंवा प्रकृतीची माझ्याकडून काळजी घेतली गेली नाहीं. आणि आतां त्यांच्या पश्चात् माझ्यासाठीं अशा वेळीं अशा तऱ्हेची चर्चा केली जावी हें मला कसेंसेंच वाटलें. रडत रडत परंतु निश्चयानें मी म्हणालें,

" दादा! कोणत्या प्रसंगीं काय ही भाषा? अरे, आपण एकाच आईच्या पोटीं समावलों ना? तीं मी आतां तुझ्यासारख्या पाठच्या भावाच्या ताटीं समावणार नाहीं का रे?"

माझें बोलणें ऐकून दादा आणि गौरी ढसढसा रडूं लागलीं. पण भाऊजींचें एकसंधी फत्तरी हृदय द्रवलें नाहीं! त्यांना तें बरेंच वाटलें.

दोनप्रहरीं गौरी हळूच माझ्याजवळ आली आणि अगदीं कळवळून म्हणाली " ताई! आपण दोघी बहिणीसारख्या एकत्र राहूं. मला चांगली विद्या शिकविली आहे. तिच्यावर आपलें दोघींचें सहज चालेल."

मला सहानुभूतीची गरज असतांना आणि नात्याच्या माणसांची सहानुभूतीची भावना संपुष्टांत आली असतांना ती बिचारी इतक्या काकुळतीनें बोलली. पण मनुष्यस्वभाव काय आहे पहा. मला तिचा अत्यंत तिटकारा वाटला. माझ्या सर्वस्वाची आहुति घेऊन मला अशा स्थितींत आणणारी हीच चांडाळीण, अशा वेळीं माझा अपमान करीत आहे असें वाटून मी अशा कठोर दृष्टीनें तिच्याकडे बघितलें कीं त्या तीव्र नजरेनें मी तिला जणूं काय--

" भिकारडे! पतीची पतराज चालूं न देणारी मी. तुझ्या दयेला भीक घालीन काय?" असेंच विचारीत आहेंसें वाटलें असावें. तिनें पुन्हां माझ्यापुढें येण्याचें धाडस केलें नाहीं.

आतां माझ्यापुढें दोन मार्ग होते. भाऊजींकडे जावें कीं दादाकडे? हिंदु विधवेला जे जे हक्क असतात--अन्न आणि वस्त्र--ते द्यायला भाऊजी तयार होते. पण तेवढी व्यवस्था करायला दादानेंहि नाखुषी दाखविली नव्हती. मी दादाबरोबरच जाण्याचें ठरविलें. भाऊजींना बरेंच झालें; पण दादा मात्र पेंचांत आला होता.

गृहराज्ञीपुढें या योजनेबद्दल जाब देणें त्याला भाग पडणार होतें. दीर्घकालाच्या सहवासामुळें वहिनी कंटाळली होती. परंतु कधींतरी मी आपल्या घरीं जाईन या आशेवर तिनें चालवून घेतलें होतें. परंतु आतां ती आशा नष्ट

झाल्यामुळें ती काय अकांडतांडव करील या विचाराच्या पेचांत दादा सांपडणें साहजिकच होतें.

तथापि त्यानें मला बरोबर आणलेंच.

लौकरच दादाची भीति निरर्थक होती असें दिसून आलें. कारण कांहीं दिवसांनीं वहिनींनें स्वयंपाकघराचें संपूर्ण स्वराज्यच माझ्या स्वाधीन केलें !

* * *

पद्मेच्या प्रतापानें आक्कांची ही कहाणी ऐकायला मिळाली. तींत घेण्यासारखीं कांहीं तत्त्वें असल्यामुळें ती मी वाचकांपुढें ठेवीत आहें.

# अमूर्त मोकिंदा.

" आ: आः आः "

एक काळासांवळाच पण धिप्पाड मुलगा मान उंच करून वरीलप्रमाणें आवाज काढीत होता. त्याच्यासभोंवतीं त्या खेड्यांतील पांच सहा मुलें जमलेलीं होतीं. त्या सर्वांच्या माना व हात उंचावलेले असून तोंडानें " आः आः लक्का लक्का आः " असे उद्गार तो मोठा मुलगा काढीत होता. इतक्यांत एक सुंदर डौलदार पांढरें शुभ्र कबुतर गिरक्या घेत खालीं आलें व सर्वांनीं अंजलि उंच केलेल्या असतांहि नेमकें त्या मोठ्या मुलाच्याच अंजलींत तें येऊन बसलें! त्याच्या त्या काळ्यासांवळ्या हातांत डौलानें छाती पुढें काढून बसलेलें तें पांढरें शुभ्र कबुतर फार शोभून दिसत होतें. क्षणभर त्याच्याकडे टक लावून पाहिल्यावर त्यानें तें हृदयाशीं धरिलें. नंतर त्यानें त्याचें मुख कुरवाळून त्याला आपल्या गालाशीं लाविलें. दुसऱ्या मुलानेंहि आपल्या कबुतराला तसेंच केलें. इतर मुलांनीं आनंदानें टाळ्या वाजवून व बोलून किलबिलाट करून सोडला!

नंतर त्यानें तें हातांतील कबुतर एका विशिष्ट दिशेस धरलें; त्याची चोंच समोर सरळ रेषेंत धरली व त्यास आपल्या डोक्याभोंवतीं तीनदां फिरवून त्यानें तें उंच हवेंत झोंकून दिलें. त्याच वेळेस दुसऱ्या मुलानेंहि तशीच कृति करून आपलें पांखरूं वर भिरकावलें व पुन्हां वर नजरा लावून तीं मुलें आपापल्या पांखरांस उत्तेजक शब्दांत उंच उडण्यास सांगूं लागलीं.

ती एक शर्यत होती. कोणाचें कबुतर सर्वांत उंच जाऊन अगोदर परत येतें हें पहाण्याची पैज लागली होती. आधीं आलें त्या मोठ्या मुलाचेंच. परंतु दुसरा अट्टाहासानें म्हणत होता ' माझेंच आधीं आलें. ' झालें. आनंदाचा खेळ संपला व बोलाचालीवर आणि त्यापुढें हातघाईवर प्रकरण आलें. मारामारींत अर्थात् त्या मोठ्या दांडग्या मुलाचा विजय होऊन दुसऱ्यास बराच मार बसला व तो रडत रडत आपल्या घरीं निघून गेला.

गिरजाबाईकडे—त्या मोठ्या मुलाच्या आईकडे—बऱ्याचशा शिव्यांच्या

आहेरासह मारामारीची तक्रार आली. आणि ती मिटवितां मिठवितां त्या बिचारीला पुरेवाट झाली !

× × ×

चोंच खालीं वांकवून व डोळे एकमेकांवर रोखून दोन कोंबडे आपापल्या शरीरास लांबट आकार देऊन एकमेकांवर तुटून पडण्याच्या पवित्र्यानें समोरासमोर उभे होते. त्यांच्या मानेवरील तुरळक पिसें पिंजारलेलीं होतीं. मानेच्या उघड्या पडलेल्या भागांतून व तोंडावरून रक्ताचे ओघळ वहात असलेले दिसत होते. क्षणभर पवित्रा योग्य असल्याचें अजमावून त्वेषानें ते एकमेकांवर तुटून पडले. एकमेकांवर चंचुप्रहार करून व पिसें उपटून एकमेकांना चीत करण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत होते. त्यांची ती प्राणघातक चुरस चालली असतांना त्यांचे मालक व इतर तमासगीर मुलें टाळ्या वाजवून व लढण्यास उत्तेजन देणारे उद्गार काढून आपापला आनंद व्यक्त करीत होतीं. या दंगलींत येणारे जाणारेहि सामील होऊन क्षणभर मनाची करमणूक करून घेत होते. इतक्यांत एकाचा कोंबडा रक्तबंबाळ होऊन पडला. तरीहि प्रतिस्पर्ध्यावर चालून जाण्यासाठीं धडपडून उठण्याचा तो प्रयत्न करीत होताच. तें पाहून त्याच्या मालकानें त्यास शाबासकी देऊन उचलून घेतलें व ती झुंज संपली.

झुंज संपल्याचें जाहीर करण्याकरितां कीं विजयी वीरांचें अभिनंदन करण्याकरितां न कळे, प्रेक्षकांनीं टाळ्या वाजविल्या. स्थिर असलेली प्रेक्षक मंडळी आपापल्या ठिकाणीं पांगली. त्या गर्दीतून मोठ्या कष्टानें तीन चार बायका डोक्यावर घागरी घेऊन पाणी आणण्यासाठीं नदीकडे चालल्या होत्या. त्यांतील एक आपल्या मैत्रिणीस म्हणाली—

" गिरजाबाईच्या पोरानं अक्षी उच्छाद मांडलाय बगा. तो सयाजीचा कोंबडा अगदीं अर्धमेला केलाय. आपून उनाडक्या करतो अन् आमच्या पोरास्नी नादीं लावतो. त्यांना घेऊन नदीवर जा, फुलपांखरं धर, त्यांच्या पायाला दोरा बांध, नाहींतर कुणाच्या तरी झाडावर हल्ला चढव, असं सारखं चालिवलंय बगा. "

दुसरी म्हणाली—

" अगदीं खरं. आमच्या परड्यांतल्या काकड्या अक्षी फुलामागल्या

कोंवळ्या, पण सगळी भुतावळ जमवून त्यानं कधीं नाहींशा केल्या तें कळूं दिलं नाहीं."

तिसरी म्हणाली–

"असलं द्वाड कार्टं असण्यापरीस नसलेलं बरं. कबुतरं काय उडवतं अन् कोंबडे काय झुंजवतंय. एक एक तऱ्हाच आपली. गिरजाबाईला कसं खपतं म्हणतें मी ?"

"कसं खपतं ? आईबापांच्या लाडामुळंच तर झालंय सारं हें. पाटील होते तेव्हां बघितलं नाहीं ? बदाम वाटून धारोष्ण दुधांतून त्याला पाजीत अन् तालमींत बैटकान् जोरजोडी न् कुस्ती कराया लावीत."

"अन् आतां पाटील न्हाइत म्हणून काय झालंय ? आतां पण एक्या गईचं दूध घालतात हो गिरजाबाई त्याला."

"तरीच. उगाच नाहीं इतका दांडगेश्वर झालाय तो. परवां काय झालं, आमच्या गणप्याचे दोन्ही हात एका हातांत धरून ठेवल त्यानं ते कांहीं गणप्याला सुटले नाहींत. अजून हात दुखतात त्याचे."

"पण एवढं दांडगं असून तरी काय उपयोग ? आतांच्या काळांत कुठं तरवार गाजवाया जायाचं नाहीं कांहीं. थोडं लिहिणंपुसणं असलं तरच आतांच्या काळीं उपयोग. फुडं बघा अशा गुणानं भीक मागण्याची पाळी नाहीं आली तर—"

"कांहीं नाहीं येत. तसं म्हटलं तर थोडं लिहिणंपुसणं शिकलाय जणूं. अन् गांवांतल्या पोरांशीं मारामारी करतों हा नाहीं का उपयोग ? त्यावरच भरील पोट. नाहीं तर आई आहे ना ? ती पोशील. बाप तर म्हणत असायचा 'गांवाला भारी होईल असा मुलगा तयार करीन.' गांवाला वचक बसायला पाहिजे."

पहिली म्हणाली––

"बापाची इच्छा फळास आलीच हाये. खराच पोराचा वचकच बसतो बघ. परड्यांत फळंफुलं कांहीं न्हायचं नाहीं. शेतांत कणसं, ऊस धड न्हायच न्हाइत. कीं घरांतून बाहेर गेलेलीं पोरं मार खाल्ल्याबिगर घरीं परतायचीं न्हाइत. दिवटा उपजलाय बाळ."

पाणी घेऊन त्या सर्वजणी जेव्हां परत आल्या तेव्हां वाटेवर मुलांची गर्दी

नव्हती. त्या आपापल्या घरीं पोचल्या तेव्हां आपल्या मागील दारीं कांहीं तरी गडबड होत आहे असें पुतळाबाईस वाटलें. तिनें हळूच दार उघडून पाहिलें तों मघांचा टवाळ मुलगा आपल्या साथीदारांसह परड्यांतील पपईच्या झाडाखालीं हजर !

एक मुलगा गुडघे व हात टेंकून बुंध्याशीं ओणवला होता. आणि त्याच्या पाठीवर तो टवाळ मुलगा उभा राहून दोन काठ्या एकीला एक बांधून लांब केलेल्या काठीनें पिकून रसरशीत झालेली पपई पाडण्याचा प्रयत्न करीत होता. पुतळाबाईनें पुढें येऊन त्याच्या तोंडांत द्यायला व वरून धपकन् पपई पडायला एकच गांठ पडली ! अनपेक्षित रीतीनें कानशिलावर झणझणीत तडाखा बसल्यामुळें त्या मुलाला डोळयांसमोर असंख्य ठिणग्या उडून चमकल्याचा भास झाला. इकडे रसरशीत पपई उंचावरून खालीं पडून फुटल्यामुळें तिच्या असंख्य बिया झाडाभोंवतीं पसरल्या. ठिणग्या चमकून दिपलेले डोळे उघडून तो पहातो तों सभोंवतीं काळया बिया पसरलेल्या. विस्तवावर पाणी पडल्यानंतर त्याचें मूळचें तेज लोपून त्याचें रूपान्तर जसें कोळशांत होतें, तद्वतच पपई खाण्याच्या त्याच्या आशेवर अशा रीतीनें पाणी पडून क्षणापूर्वी चमकलेल्या ठिणग्यांचेंच जणुं काळया बियांत रूपांतर झालें !

त्या बाईनें त्याचा कान धरून ठेविला, ती संधि साधून बाकीचीं मुलें पळून गेलीं. सर्वांवरील रागाचें उट्टें त्याच्यावर निघेल इतक्या बेतानें त्याचा कान पिरगळून तिनें त्याला ताकीद देऊन सोडून दिलें, व तोंडसुख घेत तिनें आपला मोर्चा गिरजाबाईच्या घराकडे वळविला.

पुतळाबाईच्या तोंडून अमंगल शिव्यांचा वर्षाव आपल्या एकुलत्या एक पोरावर होत असतांना गिरजाबाईला मूग गिळून स्वस्थ बसणें भागच होतें. मुलाचे गुण ती जाणून होती. आपलाच दाम खोटा मग दुसऱ्याला दोष देऊन काय उपयोग ?

परंतु पुतळाबाईपुढें झालेल्या पराजयाचें उट्टें मात्र मुलावर तोंडसुख घेऊन व त्याचें श्रीमुख रंगवून तिनें चांगलेंच काढलें. मुलगा आधींच मार खाऊन आला होता. ज्या मुलांवर आपण मात करून त्यांचा पुढारीपणा प्राप्त करून घेतला, त्यांच्याच देखत एका बाईच्या हातचा मार खावा लागल्याचें शल्य आधींच त्याच्या मनांत सलत होतें. त्यांत त्याच बाईनें आईसमोर

कागाळी आणून पुन्हां मार बसविला या गोष्टीचा त्याला अतिशय संताप आला. त्या मुलांच्या देखतच पुतळाबाईचा नक्षा उतरून आपलें श्रेष्ठत्व त्यांच्या मनावर ठसविण्याचा त्यानें निश्चय केला.

* * *

आतांपर्यंत वाचकांच्या परिचयाचा झालेला पाटलाचा मुलगा १५।१६ वर्षांच्या वयाचा होता. मूळची शरीरप्रकृति निकोप. लहानपणापासून खाणेंपिणें चांगलें व तालमींतील मेहनत आणि खेडेगांवांतील उत्तम हवापाणी, इतक्या अनुकूल गोष्टींमुळें त्याची वाढ चांगली झाली होती. त्याच्या वास्तविक वयापेक्षां तो बराच मोठा दिसत असे. दिसण्यांत तो मोठा सुंदर नव्हता किंवा त्याची रहाणीहि मोठी स्वच्छतेची व टापटिपीची नव्हती. तरी त्याचें हाडपेर चांगलें असून शरीराचा बांधा मजबूत व प्रमाणबद्ध होता. उघड्या सृष्टीशीं अष्टौप्रहर खेळत बागडत असल्यामुळें निसर्गानें अर्पण केलेलें तेज त्याच्या काळ्यासांवळ्या मुद्रेवर विलसत होतें. विशेषतः त्याचे टपोरे डोळे फारच सुंदर व तेजस्वी होते. एकादा मौल्यवान् रत्नाचा खडा आपल्याभोंवतीं प्रकाशाचा झोत फेंकीत असतो, त्याप्रमाणें त्याच्या डोळ्यांतील बाहुल्या ज्या दिशेस फिरत त्या दिशेस तिरपा प्रकाश पडल्यासारखें दिसे. या डोळ्यांमुळें तो एकदां कोणाच्या दृष्टीस पडला तर सहसा त्याचें विस्मरण होत नसे.

त्याचे वडील तांदळवाडीचे पाटील असतांना त्यांनीं पुष्कळ ओरड करून आपल्या खेड्यांत एक प्राथमिक शाळा मागून घेतली होती. तेथें तीन इयत्ता शिकण्याची सोय असून एकच शिक्षक ती चालवीत असे. त्या शाळेंतील संपूर्ण शिक्षण पाटलांनीं आपल्या मुलाकडून करविलें होतें. परंतु पुढें पाटील वारल्यामुळें त्याच्या पुढील शिक्षणाची आपोआपच वासलात लागली. लिहिण्यावाचण्याची अशा रीतीनें फारकत झाल्यामुळें व त्याचा सर्व वेळ उनाडक्या करण्यांत जात असल्यामुळें आतां तो जवळ जवळ नुसता सहीचा मालक बनला होता. हाच क्रम पुढें चालता तर पुढेंमागें तो आंगठ्यावर आला असता.

मागें कांहींच व्यवधान नसल्यामुळें, जसा एखादा दावें नसलेला खोंड सैरावैरा उड्या मारीत असतो व आपल्या झपाट्यांत कोणी सांपडून जायबंदी होईल याची किंवा आपणच धडका देत कोठें तरी पडून आपला पाय मोडून

घऊं याची त्याला पर्वा नसते, तद्वतच या मुलाचें वागणें होतें. खावें, प्यावें, लोकांच्या परड्यांतील किंवा शेतांतील वस्तु चोराव्या आणि त्यांची नासधूस करावी, हा त्याचा क्रम होता. यामुळें गांवांतील सर्व लोकांना तो अप्रिय होऊन बसला होता. खुद्द आईचा एकुलता एक मुलगा, पण तिलाहि तो अप्रिय झाला होता. दिवसांतून त्याच्या कागाळ्या तिला इतक्या ऐकाव्या लागत कीं त्यामुळें नको जगणें असें तिला होऊन जाई. दांडगाईविषयीं प्रसिद्धि पावलेल्या कृष्णानें तरी इतक्या कागाळ्या घरीं आणून आपल्या आईला सतावून सोडलें असेल कीं नाहीं याबद्दल तिला शंका वाटत असे. परंतु कोणाला न आवडणारा तो मुलगा गांवांतील मुलांना मात्र फार प्रिय असे. ते नेहमीं त्याच्या मागें मागें हिंडून त्याचें सांगणें तत्परतेनें मानीत.

× + ×

" तुझें नांव काय ? "

" अमूर्ता. "

" बापाचें नांव काय ? "

" मोर्किंदा. "

" वय ? "

" सोळा वर्षांचं.

" धंदा ? "

" कांहींबी नाहीं. "

" धंदा कांहीं नाहीं ? "

आश्चर्यानें प्रश्न विचारला गेला.

" उद्योग कांहींच करीत नाहींस ? मग काय करीत असतोस ? "

कोर्टाच्या एका टोंकाकडून ध्वनि निघाला—" चोऱ्या, मारामाऱ्या हाच धंदा. दुसरा धंदा काय असणार बेरडाचा ? "

पट्टेवाल्यानें त्या दिशेस तोंड करून हातानें कोर्टाची शांतता न बिघडविण्याविषयीं सूचना केली.

" म्हणजे सांगण्याचा मुद्दा असा कीं आमच्या अशीलाचें लहान वय असल्यामुळें घरीं शेती आहे, परंतु स्वतः करीत नाहीं. "

आरोपीच्या वकीलानें माहिती पुरविली.

इकडे प्रश्नोत्तरें चाललीं असतांना न्यायाधीश आरोपीला निरखून पाहण्यांत दंग झाले होते. त्याचा मोहक बांधा, गोटीसारखें शरीर व विशेषतः त्याचे ते डोळे पाहून त्यांच्या मनावर एक प्रकारचा विलक्षण अनुकूल परिणाम झाला होता.

कथेच्या पहिल्या भागांत ज्याचें वर्णन आलें आहे तोच हा ' अमूर्ता मोर्किदा ' हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

पोळ्याच्या दिवशीं खोंडांची सांठमारी त्यानें लावली होती. त्या वेळीं एका मुलास इजा झाली आणि आधींच जळफळणाऱ्या गांवकऱ्यांनीं भर देऊन त्या मुलाच्या बापास त्याच्यावर खटला भरण्यास भाग पाडलें. अशा रीतीनें ' अमूर्ता ' आरोपी म्हणून मॅजिस्ट्रेट रावसाहेब देशमुख यांजपुढें उभा राहिला होता.

येथें रावसाहेब देशमुख यांच्यासंबंधानें थोडीशी माहिती देणें इष्ट आहे. रावसाहेब जरी सरकारी नोकर होते तरी देशहिताची त्यांना फार कळकळ असे. खेडोपाडीं फिरावें लागत असल्यामुळें त्यांना ' गांवगाड्याची ' चांगलीच माहिती झाली. त्यांना शेतकऱ्यांबद्दल फार सहानुभूति वाटे, व ते त्यांच्याशीं मिळून मिसळून व प्रेमळपणानें वागत. इतर अधिकाऱ्यांप्रमाणें अधिकाराच्या गर्वानें व तुसडेपणानें वागत नसत. ' एवढा मोठा अधिकारी, पण किती शांत आणि दयाळु ! ' अशा तऱ्हेचे उद्गार त्यांच्या पाठीमागें गांवांतील लोक त्यांच्यासंबंधानें काढीत असत. हिंदुस्थानची सर्वांगीण सुधारणा व्हावयास खेड्यांतील परिस्थिति सुधारणें फार महत्त्वाचें आहे, असें त्यांचें मत होतें. हें काम खेड्यांतीलच सुशिक्षित व कर्तबगार लोकांनीं केलें पाहिजे असें त्यांस वाटत असे, व अशीं माणसें आढळतांच ते त्यांस अशा कामीं प्रवृत्त करीत व उत्तेजन देत.

अदृष्टाचा लागाबांधा काय असेल तो असो, पण एवढें खरें कीं अमूर्ताला पाहतांच रावसाहेबांचा त्याच्याबद्दल चांगला ग्रह झाला. अशा तेजस्वी तरुणाला शिक्षा करून बदमाष लोकांच्या संगतींत टाकून बिघडविण्यापेक्षां योग्य मार्ग दाखविल्यास त्याच्याकडून खेडीं सुधारण्याचें काम चांगलें होईल असें त्यांस वाटलें. त्यांच्यापुढें चार दिवस केस चालून शेवटीं निकालाचा दिवस उजाडला !

तांदळवाडीचे लोक आतां या उनाड पोराला शिक्षा होऊन कांहीं दिवस तरी गांव त्रासांतून मुक्त होईल, या आशेनें निकाल ऐकावयास आले होते. परंतु काय आश्चर्य ! आरोपीचें तरुण वय, व पहिलाच गुन्हा ही परिस्थिति लक्षांत घेऊन न्यायाधीशानें त्यास समज देऊन निर्दोषी म्हणून सोडून दिलें ! केसचा निकाल ऐकून गांवकऱ्यांची निराशा झाली. त्यांना आश्चर्य वाटलें ! त्यांच्यापेक्षांहि खुद्द आरोपीला अधिक आश्चर्य वाटलें ! ! निकाल देतांना न्यायमूर्तीनीं भाषण करून ' तुझ्यासारख्या तडफदार तरुणांनीं अशा हलक्या उद्योगांत वेळ घालविण्यापेक्षां ज्ञान मिळवून लोकांची स्थिति सुधारण्याचें ठरविलें तर हवें तेवढें उत्कृष्ट कार्य त्यांच्याकडून होईल ' या आशयाचा जो उपदेश केला त्याचा परिणाम त्याच्यावर विशेष झाला !

अपराध न करतांहि अपशब्द ऐकण्याची त्यास संवय होती. अपराध करून न्यायासनासमोर आल्यावर शिक्षा मिळण्याची खात्री असतां अशा तऱ्हेनें सुटका झालेली पाहून तो भांबावून गेला.

घरीं गेल्यावर आनंद, दुःख आणि उद्वेगादि विविध विकारांचें दडपण असह्य होऊन रडत रडत त्याची आई म्हणाली,

" चांगलं केलंस बाबा, मान्यांचं कूळ उजळलंस. अरे, टांगलेल्या तरवारीपुढं ताठ मानेनं जाऊन मान्यांनीं आपल्या माना कापूं दिल्या, पण वांकविल्या नाहींत, अन् तूं त्याच कुळांत जल्मून अशी मानहानी करून घेतलीस ? बरं तें असूं दे आतां. चल अगोदर माझ्याबरोबर. ज्या दयाळू महात्म्यानं तुला सोडलं त्यांच्या पायांवर डोकं ठेवायला चल. "

लहान बालकासारखा तो आईच्या मागून चालूं लागला. रावसाहेबांच्या शिपायानें एक बाई आणि मुलगा आल्याची वर्दी दिली आणि त्या दोघांस रावसाहेबापुढें नेण्यांत आलें.

" ठिव, रावसाहेबांच्या पायांवर डोकं ठिव. "

मुलाला पुढें लोटून संतापानें त्याला अपशब्द बोलत आणि आपल्या कुळाचा बडेजाव रावसाहेबांना ऐकवीत हुंदके देत ती उभी राहिली. मुलाच्या अवगुणापायीं आपणास आज गोषा टाकून बाहेर यावें लागलें याचें तिला दुःख होत होतें.



प्रथम काय बोलावें हें रावसाहेबांना सुचेना. आरोपीच्या नांवाचा जो अपभ्रंश झालेला होता त्याप्रमाणें त्यास संबोधावें किंवा नुसतें " अमृता " म्हणावें याचा ते क्षणभर विचार करीत होते. इतक्यांत त्यानें त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें. त्यास वर उठवीत ते म्हणाले,

" अमृतराव ! ऊठ, इथें बैस. "



" ठिव, रावसाहेबांच्या पायांवर डोकं ठिव. "

कारण अकारण अपशब्द ऐकण्याची ज्यास संवय त्या " अमूर्तास " आपलें नांव असें गौरवपूर्वक उच्चारलें गेलेलें आजच प्रथम ऐकूं आलें आणि विशेषतः जे आपणास पांचपन्नास फटक्यांची किंवा चार सहा महिन्यांच्या कारागृहवासाची शिक्षा देऊं शकले असते अशा रावसाहेबांच्या तोंडून तें उच्चारलेलें ऐकून त्यास आश्चर्य वाटलें ! उपकाराच्या ओझ्यानें आधींच दडपलेलें त्याचें हृदय गहिंवरून गेलें ! अश्रु ढाळीत तो बैठकीच्या कडेला जमिनीवर बसला. रावसाहेब म्हणाले—

" बाई ! पूर्वजांचा बडेजाव आणि कुळाचा अभिमान सांगून मोठेपणा येत नसतो. तुमच्या थोर कुळास साजेसाच तुमचा मुलगा शरीरकाठीनें मजबूत आहे. जन्मतांच तो इतका सुदृढ नसेल. मेहनत घेऊन तुम्हीं त्याला तसा वाढविला असेल. त्याच्या प्रकृतीची व खाण्यापिण्याची काळजी घेतली असेल. त्याप्रमाणेंच त्याच्या मानसिक वाढीची आणि प्रवृत्तीची काळजी घेतली गेली असती तर हाच मुलगा खात्रीनें फार चांगला निपजला असता. त्याच्या अंगीं जो निधडेपणा आहे तो दोष नसून गुणच आहे. हल्लींच्या काळीं नेभळट मेषपात्रांची गरज नसून तेजस्वी वृत्तीच्या तरुणांची आहे. याच वृत्तीला चांगलें वळण लावलें असतें-शिक्षण असतें-तर हाच मुलगा कांहीं निराळाच झाला असता. परंतु तो त्याचा दोष नाहीं तसा तुमचाही नाहीं. तुम्ही गोषांत असतां; कर्ता पुरुष माणूस कोणी नाहीं, तेव्हां असें होणें साहजिकच आहे; पण अजूनही गोष्ट सर्वस्वीं हातांतून गेली नाहीं. अजूनहि प्रयत्न केला तर त्याला शिक्षण संपादन करतां येईल. "

" कशाचं रावसाहेब आमच्या पोरांना लिहिणंपुसणं ? आमच्या पोरांचा जल्म बघा असाच जायाचा. घरधन्यांनीं तो मास्तर आणून गांवांत शाळा काढली; पण तोच मास्तर-त्यांच्या पोरास शिकिवतोय.का बघा ? तो म्हणतो, पुढें यत्ता नाहीं अन् तुमच्या पोरांना कशाला हवं लिहिणंपुसणं ? तुम्ही कोंबड्या-बदकं पाळावीं अन् गुरं वळून शेतांत नांगर धरावा. तुम्हांला लिहिणं येयाचं नाहीं. "

" या माणसांची कुवतच तेवढी. या शिक्षकांना जर व्यापक दृष्टि असती तर ज्ञानाचा प्रसार खात्रीनें अधिक झाला असता. पण तसें नसलें म्हणून शिक्षणाचा मार्ग अजिबात बंद झाला असें नाहीं. "

त्यांना मध्येंच थांबवून बाई म्हणाली—

" गांवांत तेवढीच शाळा, शेजारच्या गांवांत जावं तर लहान पोरांबरोबर बसाया त्याला लाज वाटते. मास्तर अन् पोरं अशी हिणवतात. अन् गांव सारं हिडीसफिडीस करितं—"

" बाई, जरा ऐकून घ्या. शाळा आणि शिक्षक हें शिक्षण मिळविण्याच्या अनेक साधनांपैकीं एक आहे. पण तें अंतरलें म्हणजे शिक्षण संपादण्याचा मार्गच खुंटला असें नाहीं. ह्या नाहीं दुसऱ्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

" शिक्षण म्हणजे ज्ञान. तें शाळेशिवाय इतर साधनांनींहि मिळवितां येतें. तें साध्य करून देणारे गुरुजी म्हणजे उत्तम ग्रंथ. हे गुरुजी वाटेल तेथें, वाटेल तेव्हां व वाटेल तें ज्ञान सुलभ करून देतात. हे कधीं रागावत नाहींत. कधीं उपहास करीत नाहींत. लहान-मोठा म्हणत नाहींत, कीं लिंगभेद, जातिभेद मानीत नाहींत. जे कोणी त्यांचें शिष्यत्व पत्करतात त्यांवर ते अनुग्रह करतात. म्हणजे सांगण्याचा मुद्दा असा कीं वाचनाची गोडी लागली पाहिजे. वाचनानें ज्ञान वाढेल, जगांत काय चाललें आहे तें कळेल, त्यांत आपण किती मागें आहोंत व जगाबरोबर यावयाला आपणांस काय केलें पाहिजे तें सारें कळेल; पण ज्ञान मिळविण्याचे श्रम केले पाहिजेत व चांगलें होण्याचा निश्चय केला पाहिजे."

एवढा थोर पुरुष नुसता उपकारच करून राहिला नाहीं तर आपणांस पुढील मार्गाची रूपरेखाहि दाखवीत आहे या उपकारानें दोघांचींहि मनें भाराक्रान्त झालीं होतीं. कृतज्ञतेनें दोघेंहि अश्रु ढाळीत होतीं. हुंदके देत गिरजाबाई म्हणाली,

" रावसाहेब, आपण फार थोर आहांत. पण एवढा मोठा झाल्यावर त्याला इद्या कशी येईल? मागं तो शिकला होता—"

" होय ना? मग न यायला काय झालें? प्रयत्न केला तर, त्याच्या मनानें शिकायचेंच असा निश्चय केला तर खात्रीनें आलेंच पाहिजे. आणि मोठ्या वयाचं म्हणतां. पण मोठ्या वयांत व अनेक अडचणी सोसून, पूर्वी आणि आतांहि, शिकून थोर पदास पोंचलेलीं माणसें होतीं आणि आहेत. रामशास्त्री प्रभुणे यांची गोष्ट तुम्हांस माहीत आहे का? नसल्यास सांगतों.

पेशवाईच्या काळीं हा एक थोर निःस्पृह न्यायाधीश होऊन गेला; पण तो जन्मतः न्यायाधीश नव्हता. तर याच्याएवढा किंवा यापेक्षांहि मोठा असतांना पेशव्यांच्या पदरीं राम्या शागीर्द होता. एकदां पेशव्यांच्या हातांवर पाणी ओतीत असतां धार चुकली. तेव्हां ते म्हणाले, 'राम्या, लक्ष कोठें आहे ?' रामाला खोटें बोलणें माहीत नव्हतें. तो म्हणाला, 'आपल्या भिकबाळीच्या मोत्यांकडे पहात होतों.' पेशवे म्हणाले 'अशीं पाणीदार मोत्यें ठोंब्या शागीर्दाला मिळत नसतात.' झालें. रामा जो तेथून निघाला तो काशीस जाऊन एवढ्या मोठ्या वयांत अध्ययन करून विद्वान् न्यायाधीश झाला. त्याचे कानांतच नव्हे तर गळयांतहि मोत्यांचे कंठे पडले. इतकेंच नव्हे तर त्याच पेशव्यांच्या वंशजाला "तुमच्या पापाला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं" असें निःस्पृहपणें सांगण्याइतकी त्याची योग्यता झाली.

"अमेरिकेंत तर अगदीं रानटी व बुद्धिहीन मानलेल्या नीग्रो गुलाम जातींत असा एक मुलगा जन्मास आला कीं स्वावलंबनाची कांस धरून त्यानें शिक्षण मिळविलें. ज्ञानप्राप्ति झाल्यावर त्यानें तें आपल्या गुलामबंधूंसाठीं सुलभ केलें. त्याचें नांव बुकर टी. वॉशिंग्टन. त्याचें हें चरित्र अमृतराव, मीं तुला देतों. तें तूं अवश्य वाच. शिवाय दुसरींहि चांगलीं पुस्तकें देतों, तीं सुद्धां वाच. तीं तुला चांगल्या शिक्षकाप्रमाणें उन्नतीचा मार्ग दाखवितील."

इतकें बोलून त्यांनीं घंटा वाजविली. ती ऐकून आलेल्या शिपायाजवळ पुस्तकांची यादी लिहून देऊन तीं घरांतून आणायला सांगितलें. नंतर बाई-कडे वळून ते म्हणाले,

"समजलांत बाई ! शिकण्याची इच्छा आपली आपल्याला झाली पाहिजे. दुसऱ्यानें शिकविलें नाहीं म्हणून मी शिकलों नाहीं या म्हणण्यांत अर्थ नाहीं. "जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला." हें तर तुम्हांस माहीतच असेल. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं जो स्वावलंबनाची कांस धरतो तो पुढें आलाच पाहिजे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाहीं. मींसुद्धां या जागेवर एकदम आरूढ झालों असें नाहीं. वारानें जेवून, शिकवण्या पत्करून व पैशाच्या अभावीं दुसऱ्या मुलांच्या पुस्तकांवरून किंवा त्यांच्या पुस्तकांतील ते ते भाग उतरून घेऊन मीं अभ्यास केला आहे.

तेंव्हां येणार नाहीं असें न म्हणतां निश्चयानें उद्योगास लागा म्हणजे सर्व कांहीं येईल. ”

रावसाहेब थांबल्याबरोबर बाई पुढें झाली आणि जमिनीवर डोकें टेकून हुंदके देत देत त्यांचे आभार मानूं लागली.

“ तुमच्या दयेनं मला माझा मुलगा अब्रूनिशीं परत मिळाला. तुमचे उपकार कशानंहि फिटणार नाहींत. ”

“ छे ! छे ! यांत माझे उपकार कसले ? उलट अशा मुलाला निढोव-लेल्या बेरडांच्या संगतींत ठेवून त्याच्या जन्माचें मातेरें करण्याचें पाप माझ्या हातून घडलें नाहीं हे ईश्वराचे उपकारच आहेत माझ्यावर. बरं जा आतां तुम्ही. अमृतराव, हीं पुस्तकें घ्या व अशींच दुसरीं चांगलीं पुस्तकें वाचून ज्ञानसंपन्न व्हा व दुसऱ्यांनाहि शिकवा. ”

असें म्हणून रावसाहेबांनीं वासुदेव गोविंद आपटे यांचीं, बालसन्मित्र मालेचीं व इतर कांहीं उत्कृष्ट पुस्तकें आणि ओकांच्या बालबोधाच्या कांहीं वर्षांचीं एकत्र बांधिलेलीं पुस्तकें त्याला दिलीं आणि त्यांस निरोप दिला.

* * *

बिचारा अमूर्ता ! स्वप्नांतून जागें झाल्यासारखें त्यास वाटलें ! गेलीं हीं वर्षं स्वप्नांत किंवा झोपेंतच आपण घालविलीं, तीं फुकट गेलीं. तीं आतां कधींच परत येणार नाहींत. आपल्या आयुष्यांतलीं तीं अमूल्य वर्षें होतीं असें वाटून त्यास पश्चात्ताप झाला व त्याच्या परिवर्तनास सुरुवात झाली.

इतक्या दिवसांत कोणीहि त्याला इतक्या शांतपणें आणि अशा कळकळीनें उपदेश केलेला नव्हता. प्रत्येकजण त्याला हिडीसफिडीस करीत असे. ज्यांना स्वतःचें नाक स्वच्छ ठेवण्याची अक्कल नाहीं अशांनीं आपणास हिडीस-फिडीस करावें आणि जो अधिकारी आहे त्यानें आपणास अशा चांगल्या तऱ्हेनें वागवावें याचें त्यास नवल वाटत असे.

रावसाहेबांच्या बोलण्याचा त्याजवर विशेषच परिणाम झाला होता. आतां यापुढें लोकांच्या मनांतील आपल्याविषयींच्या तिरस्काराची जागा आदरानें व्यापून जाईल अशा तऱ्हेनें वागण्याचा त्यानें मनांत संकल्प केला. वाचनाची गोडी लागेल व सहज समजतील व उत्तम परिणाम करतील अशींच निवडक

पुस्तकें रावसाहेबांनीं त्यास दिलीं होतीं. तीं वाचण्याचें त्यास वेडच लागलें. बालबोधांतील निरनिराळ्या व्यक्तींचीं चरित्रें वाचून उद्योगानें व निश्चयानें हलक्या व निर्धन स्थितींतूनहि माणसें कशीं वर येऊं शकतात हें त्याच्या मनावर ठसलें व आपणहि असेंच मोठें व्हावें अशी महत्त्वाकांक्षा त्याच्या मनांत जागृत झाली. इतर पुस्तकांच्या वाचनानेंहि त्याच्या मनावर चांगले संस्कार घडले. आपट्यांचीं पुस्तकें वाचून प्राचीन व अर्वाचीन इतिहास गोष्टींच्या रूपानें त्यास समजला. केळूसकरांच्या लहान शिवचरित्राच्या वाचनानें एकीचें व संघशक्तीचें महत्त्व त्यास कळून आलें. परंतु सर्वांत बुकर टी. वॉशिंग्टनच्या चारित्राचा त्याच्यावर फारच परिणाम झाला !

पुढील चार पांच वर्षांत त्याच्या वाचनाचा व्यासंग फारच वाढला व त्याची दृष्टि विशाल होऊन आपल्या समाजाकरितां, आपल्या गांवाकरितां आपल्याला काय करतां येईल असे विचार तो करूं लागला. याच संधीस ' विष्णुशर्म्याची कामगिरी ' हें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें पुस्तक त्याच्या वाचनांत आलें. त्यामुळें त्याला विविध मार्ग दिसूं लागले व ते कृतींत आणण्यास त्यानें हळूहळू सुरुवात केली. प्रथम त्यानें रात्रींची शाळा काढून शाळा सोडलेल्या मुलांस व प्रौढ इसमांस आपलें ज्ञान वाढविण्यास शिकविलें. नंतर वाचनालयाची गरज भासूं लागतांच एक वाचनालय स्थापन केलें.

त्याच्या या उपक्रमाकडे प्रथम उपहासानें, नंतर साशंकतेनें गांवकरी पहात होते; परंतु यामुळें आपलीं मुलें सुधारत असलेलीं पाहून त्यांनाहि शेवटीं तो उपक्रम आवडला.

पुढें त्याचें लक्ष गांवसुधारणेकडे लागलें. गांवांतील आरोग्य सुधारणें, शेतीच्या उत्पन्नास जोड म्हणून दुय्यम धंदे सुरू करणें हीं कामें त्यानें हातीं घेतलीं.

आतां " तो " व " अमूर्ता " हे शब्द टाकून " अमृतराव " असा त्यांचा बहुमानपूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे.

अमृतरावांनीं शेतीसुधारणेकडेहि लक्ष पोंचविलें. शेतीला खतांचा उपयोग कसा होतो ? कोणत्या पिकांना कोणतें खत घालावें ? सुधारलेले नांगर व आऊतें वापरण्यापासून काय फायदे होतात ? थोड्या श्रमांत व खर्चांत अधिक

पीक कसें काढावें ? पाण्याची टंचाई कशी दूर करावी ? इत्यादि प्रश्न सोडविले गेल्यामुळें त्या गांवच्या शेतीची फारच सुधारणा झाली !

थोडक्याच वर्षांत गांवांत सहकारी पतपेढी, ग्रामपंचायत, आयुर्वेदिक दवाखाना वगैरे संस्था स्थापन झाल्या. परंतु नुसत्या स्थापन होऊन न राहतां अमृतरावांच्या चिकाटीच्या स्वार्थनिरपेक्ष वृत्तीमुळें व उद्योगामुळें त्या नमुनेदार संस्था होऊन गांवाला फार हितकारक झाल्या. यामुळें सरकारांत त्यांचें नांव बऱ्याच प्रामुख्यानें झळकूं लागलें. अशा लोकोपयोगी कामांमुळें कलेक्टरसाहेबांनीं त्यांची शिफारस केल्यामुळें त्यांस ' रावसाहेब ' ही पदवी मिळाली.

त्यांच्या आमंत्रणावरून एके दिवशीं त्यांच्या मळयांत कलेक्टरसाहेबांची स्वारी आली आणि तेथील एकंदर बागाईत, पिकें, जनावरें आणि पांखरें पाहून त्यांनीं उद्गार काढले कीं ' जर येथें शेतकीप्रदर्शन भरविलें तर तुमच्या एकट्याच्याच मळयांतील ह्या विविध जिन्नसा प्रदर्शनामध्यें मांडायला पुरेशा होतील. ''

हे थट्टेचे उद्गार होते. परंतु अमृतरावांनीं त्यांचा उपयोग करून खरोखरच आपल्या गांवीं एक प्रदर्शन भरविण्याचें ठरविलें.

प्रदर्शन पाहण्यासाठीं आजूबाजूच्या खेड्यांतील असंख्य लोक आणि मोठमोठे सरकारी अधिकारीहि आले होते. तेथील केळींची, टोमॅटोची आणि इतर फळाफुलांची लागवड, जनावरांतील उत्तम जातिवंत वळूपासून केलेली गुरांची पैदास, लेगहॉर्न कोंबड्यापासून केलेल्या निपजेचें पोल्ट्रीफार्म इत्यादि विषय सर्वतोमुखीं झाले होते.

असा स्तुत्य उपक्रम केल्याबद्दल रावसाहेब अमृतराव मुकुंदराव माने यांस एक सुवर्णपदक बक्षीस देण्याचें सरकारी रीत्या जाहीर झालें. तो समारंभ नवीनच बदलून आलेल्या प्रान्तसाहेबांच्या हातून होण्याचें ठरलें.

पदक अर्पण करतांना या गृहस्थांस आपण कोठें तरी पाहिलें असावें असें प्रान्तांस वाटलें. विशेषतः त्यांचे तेजःपुंज डोळे आपल्या परिचयाचे असल्याचा त्यांना पुनःपुनः भास होऊं लागला !

समारंभ संपल्यावर प्रान्तसाहेबांनीं रावसाहेब अमृतराव मुकुंदराव यांना आपल्या गाडींतूनच चहाकरितां आपल्या घरीं नेलें. बोलतां बोलतां त्यांनीं

' आपणांस मीं कोठेंतरी पाहिल्यासारखें वाटतें ' असे सहज उद्गार काढले. तें ऐकून रावसाहेब पुढें होऊन सद्गदित स्वरानें म्हणाले—

" होय, रावसाहेब. आपली शंका बरोबर आहे. ज्याला आपण कांहीं वर्षांपूर्वी शिक्षेपासून वांचविलें व उन्नतीचा मार्ग दाखविला तोच हा आपला ' अमूर्ता मोकिंदा ' आपल्या आशीर्वादानें एका तपाच्या तपश्चर्येनंतर या पदवीला आला आहे ! "

ज्ञानवल्लीच्या योगानें अमूर्त ' अमूर्ता 'चा मूर्तिमंत ' अमृतराव ' बनलेला पाहून रावसाहेबांस किती धन्यता वाटली असेल ! !

# पद्मेला मिळालेलें फळ.

( श्री. सौ. मालतीबाई दांडेकर यांच्या 'मिळवती बायको' या गोष्टीचा उत्तरार्ध. बक्षीस मिळालेली गोष्ट. )

दुसरे दिवशीं पद्मेनें आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. कमलाकरांना आपल्या पत्नीच्या सरलत्वाची साक्ष अशा रीतीनें पटल्यामुळें फार आनंद झाला. आतां खरोखर आपला संसार सुखाचा होईल; आपण आपल्या पत्नीच्या गरजा व आवडी तर्कानें जाणून त्यांची पूर्तता करून तिला आश्चर्यचकित करीत जाऊं, आपले शंभर रुपये बंद झाले व त्यामुळें हाल होतात असें तिला कदापि भासूं देणार नाहीं, इत्यादि मनोराज्य ते मनांत करीत होते.

आईसाहेब मात्र सुनेच्या राजीनाम्यानें खरोखर फार आश्चर्यचकित झाल्या. शिकलीसवरलेली बायको पण नवऱ्याच्या मर्जीखातर हूं कीं चूं न करतां शंभर रुपयांवर लाथ मारून घरांत माशा मारीत राहिली. नवऱ्याची इच्छा झाली म्हणून काय झालें? घातपात करून नव्हे तर स्वतःच्या श्रमानें मिळणारे हक्काचे शंभर रुपये हातचे दवडायचे म्हणजे काय झालें? वाटीभर दूध लवंडलें तर जीवाला चुटपुट लागते. अन् हे तर छन् छन् वाजणारे शंभर रुपये हातचे दवडले! कमाचे तरी असे काय हाल होत होते? नोकरीच्या वेळांत बायको बाहेर असली तरी बाकीच्या वेळांत आहेच घरांत. अन् मी तर आपली जाणारच होतें घरीं.

त्यांनीं सुनेच्या जागीं आपणास कल्पून पाहिलें. तेव्हां आपण अगदीं बाळबोध घराण्यांत जन्म काढलेली जुन्या चालीची बायको खरी. पण आपण कांहीं अशी हक्काच्या शंभर रुपयांवर लाथ मारली नसती असें त्यांची मनोदेवता त्यांना सांगूं लागली. हल्लींचीं पोरं काय, पोरी काय नेभळटच सारीं. पाणीदारपणा कसा तो नाहींच त्यांच्यांत! परंतु आपले विचार व्यक्त करून मुलांनीं शंभराचें मोल देऊन विकत घेतलेलें सुख त्यांनीं बिघडविलें नाहीं.

मुलाच्या काटकसरीच्या संसारांत आपलें ओझें होऊं नये म्हणून त्या घरीं गेल्या.

आपला संसार सुखाचा करण्यासाठीं पद्मा जिवापाड झटत होती. पतीला सुख कशानें होईल हेंच तिचें अहोरात्र पहाणें असे. आपली इच्छा, आवड यांना तिनें शंभर रुपयांबरोबरच तिलांजली दिली होती. पतीची इच्छा तीच आपली इच्छा असें मानून ती वागत होती. जणूं काय आपल्याला निराळें अस्तित्व नाहींच. सकाळीं उठल्याबरोबर मोरीवर तोंड धुण्याचें साहित्य तयार. तोंड पुसतांक्षणींच सुंदर चहा तयार. दररोज आलटूनपालटून केलेल्या भाज्या, आमटी, चटणींचें सावें पण सुग्रास उनउन्हीत जेवण वेळेवर तयार. आंचवून बाहेर आल्याबरोबर टेबलावर विडा-वेलदोडे तयार. याप्रमाणेंच संध्याकाळच्या चहा-जेवणाचें. सगळें काम कसें यंत्रासारखें सुरळीत व सुसूत्र. कमलाकर मनांत म्हणत,

" मोलाच्या नी घरच्या कामाची तुलना कशी होईल ? घरचें तें घरचेंच ! हेंच पहाना, हींच धोतरं पूर्वी कशीं धुतलीं जात होतीं, अन् आतां कशीं आहेत ? घराची देखरेख करायला स्वतः मालकीण असली म्हणजे मोलकरीण-सुद्धां कशीं चांगलीं कामं करते ! अन् खर्च तरी किती थोडक्यांत भागतो ! गृहिणीनें गृहसंसारांत मन घालून तो सुसूत्र चालविल्यामुळें कमलाकरांना शेंकडा दहा ऐवजीं वीस रुपयांच्या कपातीची कात्री लागली तरी फारशी ओढा-ताण जाणवली नाहीं. आणि या गोष्टीचें ते मनांतल्या मनांत फारच आश्चर्य करीत होते.

बायको शंभर रुपये कमवून आणीत होती, पण घरांत तितकीच उधळपट्टी होत होती. आतां शंभर कमी झाले हें नुकसान झालें नसून उलट उधळपट्टी होण्याची थांबली हा फायदाच झाला असें त्यांना वाटूं लागलें. पूर्वी केव्हांहि पहावें तर पत्नी आपली पेपर तपासण्यांत किंवा शाळेचें लेखी काम करण्यांत अथवा उद्यांच्या अध्यापनाची तयारी करण्यांत हमखास गढलेली. आणि आतां केव्हांहि पहावें तों ओचेपदर खोंचून आपल्यासाठीं ती कांहीं ना कांहीं करीत असलेली दिसे. पूर्वी शाळेच्या कामाखालीं तिला बोलायला फुरसत नसे. आणि आतां प्रत्येक गोष्टीची ती स्वतः विचारपूस करते, काळजी घेते. मध्यंतरीं

तिला जो स्वावलंबनाचा अहंभाव जडूं लागला होता तो वेळींच नष्ट झाला हें बरें झालें. खरोखर आतां आपण किती पण सुखी झालों !

कसलीशी आकस्मिक सुट्टी मिळाल्यामुळें दुपारच्या सुट्टीआधीं ते घरीं आले, तों आपली पत्नी साबण लावून धोतर, टॉवेल, शर्ट वगैरे आपलीं व तिचीं स्वतःचीं धुणीं धूत आहे असें त्यांना दिसलें. मोरींतच एका बाजूला खरकट्या भांड्यांची रास पडली होती. चूलपोतेरेंहि अद्याप व्हायचेंच होतें. कमलाकर चमकून म्हणाले,

" हें काय ? आज तूंशी धुणीं धुतेस ? मोलकरीण आली नाहीं वाटतं ? "

पद्मा हंसली व उत्तरली, " नाहीं, आपल्याला पाणीबिणी हवं आहे का कांहीं ? आत्तां मी आंवरतें हें सारं नी मग चहा करतें, चालेल ना ? "

ती हंसली, कमलाकर हंसले आणि दोघेंहि आपापल्या उद्योगास लागलीं. धुणीं, भांडीं, केरपोतेरें करून पद्मेनें स्टोह पेटवून छानसा शिरा व चहा केला. कमलाकरांना तो ऊन ऊन शिरा फारच गोड लागला. ते म्हणाले,

" फारच छान लागतो हा शिरा. नेहमींसारखा पांचट नाहीं लागत. "

ती हंसली. अर्धीअधिक बशी संपल्यावर त्यांच्या लक्षांत आलें कीं, आपली पत्नी नुसती स्वस्थ बसली आहे आणि आपण एकटेच खात आहोंत ! त्यांनीं तिचा हात धरला तोंच ती ' अग आई ग ! ' करून विव्हळली. ते चमकून म्हणाले,

" काय झालं ? तूं खात कां नाहींस असं मी विचारीत होतों. हाताला कांहीं झालं आहे का ? बघूं "

" कांहीं नाहीं. असूं द्या, खाईन मग. "

" मग कधीं ? आमचं झाल्यावर एकट्यानें खाण्यांत काय मजा आहे ? ये, बरोबरच खाऊं ! पाहिजे तर आम्ही भरवतों ! "

त्यांनीं पुन्हां तिचा हात धरला. ती पुन्हां विव्हळली. कमलाकरांनीं हातांतला घांस बशींत ठेवला. आणि तिला जवळ ओढून ते तिच्या हाताचें निरीक्षण करूं लागले. उजव्या हाताला मनगटाजवळ तापलेल्या भांड्याचा चटका लागून तांबडा पट्टा उठला होता व तर्जनीच्या आणि करांगुलीच्या मुळाशीं तळहाताला तांबडे फोड आले होते व आंगठा चिरला होता. पत्नीच्या प्रति-

काराला न जुमानतां त्यांनीं बारकाईनें पाहिलें तर दोन्ही तळहात टोंचल्या-सारखे लाल लाल दिसत होते. तिचे हात मृदुपणें हातांत धरून ते म्हणाले,

" पदम ! खरं सांग, हें सारं काय झालंय हाताला ? "

आपले हात सोडवून घेऊन मानेला हिसडा देत पद्मा हंसत म्हणाली,

" कांहीं नाहीं, जा गडे ! "

" असं काय ? सांग ना ? हे तर दळणाचे घट्टे दिसतात. दळलंबिळलंस कीं काय कांहीं ? "

" फार नाहीं; शिऱ्यासाठीं थोडा ओलवलेल्या गव्हाचा रवा काढला. संवय नसल्यामुळं आले फोड. संवय झाल्यावर नाहीं यायचे ! "

" म्हणजे ? दळणाची संवय करून घेणार आहेस कीं काय ? आणि हे बारीक बारीक काय ? "

" तें किनई मला ठाऊक नव्हतं, कोळशाच्या राखेनं भांडीं घांसलीं त्यामुळं हातांना झालंय असं. "

" म्हणजे तूं रोज भांडीं घांसतेस कीं काय ? "

पद्मा हंसली.

" अन् धुणींसुद्धां घरींच धुतेस ? "

ती पुन्हां हंसली.

" पदम, बोल ना ? सारीं कामं तूं घरींच करतेस ? "

होकारार्थी मान हालवीत ती हंसत म्हणाली,

" काय झालं केलं म्हणून ? सारा वेळ मग कसा घालवायचा ? "

त्यांनाहि प्रश्न पडला. खरंच, एकटीनें सारा वेळ कसा घालवायचा ? तरी ते म्हणाले,

" तुझ्यासारख्या स्त्रीनें असे उद्गार काढावे म्हणजे आश्चर्य आहे; कां बरं, वाचनालेखनासारखे व्यवसाय वेळ जायला नाहींत वाटतं ? "

" आहेत, अन् तेहि करतें सवडीनं. "

" तेहि करतेस अन् हेहि करतेस ? पण सांगितला कुणीं तुला हा उप-द्व्याप ? "

" परिस्थिति. परिस्थिति नको का पाह्यला ? गेल्या महिन्यापासून एकदम

वीस रुपये कमी झाले. अवघ्या ऐशीं रुपयांत दोघांचा खर्च पूर्वीसारखा चालवून घरीं काय पाठवायचं बरं ? " चकित दृष्टीनें व प्रश्नार्थक मुद्रेनें ते तिजकडे पहात राहिले. पत्नीनें स्वतःच्या शंभरांचा उल्लेख मुद्दाम केला नाहीं हें त्यांना जाणवलें. ती पुढें म्हणाली,

" पहात काय राह्यचं असं ? चहा निवतो गडे, तेवढा आधीं पिऊन टाकायचा. "

असें बोलून दोन कपांत तिनें चहा ओतला व एक त्यांच्या हातांत देऊन दुसरा तिनें घेतला. कमलाकरांच्या डोक्यांत विचारचक्र सुरू झालें.

पद्मेनें राजिनामा दिला तेव्हांच खऱ्या गृहसौख्यास प्रारंभ झाला असें ते मानीत होते. परंतु तेव्हांपासूनच खरें गृहसौख्य दुरावत चाललें हें त्यांना आतां कळून आलें. आपण आपल्या सुखासाठीं एका सुशिक्षित स्त्रीच्या मानसिक सौख्याचा पतिपदाच्या जोरावर खून केला ! जिला दोन नोकर राबविण्याचें सामर्थ्य तिला केरपोतेऱ्यावारीं आपण राबायला लावण्यास कारण झालों. त्यांच्या हृदयाला अस्वस्थतेच्या यातना होऊं लागल्या. विचार ! विचार ! अतिविचारानें त्यांचें डोकें दुखूं लागलें. ती डोकेंदुखी दुसऱ्या दिवशींहि टिकली. ऑफिसांतून ते नेहमींपेक्षां लौकरच परत आले. त्या वेळीं त्यांची पत्नी स्टोव्हवर चहा करीत पाठमोरी बसली होती व जवळच एक मैत्रीण बसली होती. ही पुण्याची मैत्रीण पद्मेच्या रिकाम्या जागेवर तिची नेमणूक होऊन आलेली होती. त्यांचें मनमोकळें संभाषण सुरू होतें. बोलण्याच्या व स्टोव्हच्या नादांत त्यांना कमलाकरांची चाहूल लागली नाहीं, परंतु निःसंकोचपणें व स्टोव्हच्या आवाजांतून ऐकायला यावें म्हणून मुद्दाम मोठ्यानें चाललेलें संभाषण मात्र कमलाकरांच्या कानीं पडत होतें. मैत्रीण म्हणाली,

" म्हणजे हें काय बाई ? मला वाटलं तीन महिन्यांची मॅटर्निटी लीव्ह तूं घेतली असशील. पण पहातें तर शंभर रुपयांची नोकरी उगाच सोडून तूं मोलकरणीची कळा पत्करलीस ! "

" उगाच कशी ? पत्नीचं कर्तव्य पतिसेवा हेंच मुख्य आहे अन् तेंच मी करतें. "

" ही गांधारीची दीक्षा तूं कधींपासून घेतलीस पद्मे ? अलीकडे गडकऱ्यांच्या सिंधूला गुरु केलंस वाटतं ? "

पद्मा हंसली, " तसं कां म्हणेनास ? तिकडे आवडत नाहीं तें नाहीं केलं ! "

" म्हणजे ? भाऊजींना का आवडत नाहीं ? "

पद्मेनें होकारार्थी मान हलविली.

" अन् हें मात्र आवडतं ? आश्चर्यच आहे ! "

" अग आवडतं कसलं ? मी हीं कामं करतें हें कालपर्यंत ठाऊकच नव्हतं मुळीं. समजल्यावर करूं देणार नाहींत म्हणून मी गुपचूप करीत होतें. "

" मोठी शहाणीच कीं नाहीं तूं ? यालाच म्हणत असतील पतिपत्नींचं ऐक्य ! आपली बायको भांडी घासते का काय करते याची दाद नसणाऱ्या नवऱ्याचीहि धन्यच म्हणायची ! "

" धन्य कसली न् काय कसली ! पण असं बघ; प्राप्ति किती कमी झाली ? ते शंभर अन् इकडचे वीस. एकशें वीस रुपये खाडकन् कमी झाले. मग खर्च होता तसाच ठेवून कसं चालेल सांग पाहूं. प्राप्तींत भर घालणं नाहीं आवडत तिकडे, मग काय करायचं ? आहे त्यांतच शक्य त्या खर्चाच्या बाबी कमी करून काटकसर केली. "

" वा ! म्हणजे ह्या का बाबी कमी करायच्या ? "

" मग कोणत्या ? तूंच सांग. आम्ही दोघं दोन वेळां चहा घेतों अन् दोन वेळां जेवतों. रात्रीं दूध घेत होतों, तें माझं कमी करून तिकडचं तेवढं ठेवलं आहे. डोक्याचं काम करायचं असतं तेव्हां नको का तेवढं ? "

आपल्या डोक्यावर घणाचे घाव पडत आहेत असें कमलाकरांना वाटलें. पद्मा पुढें म्हणाली,

" कपडेलत्ते हे मोजकेच लागतात अन् स्वतः धुतल्यामुळं पुष्कळ दिवस टिकतील. उधळपट्टी अशी नाहींच कशांत. मग याशिवाय कोणता खर्च कमी करणार ? मागें मात्र उधळपट्टी करून मी एकशेंऐशीं रुपयांचा शालू अन् पंचवीस रुपयांचा ब्लाऊझ उगाच विकत घेतला आहे खरा. तेव्हां नव्हतीच एवढी अक्कल. पोरकटपणानं घेतला तो. पण तो काजळी शालू अन् वादळी ब्लाऊझ घेतल्यापासूनच तिकडच्या मनांत किल्मिष आलं न् घरांत वादळ सुरू झालं. तो शालू अन् ब्लाऊझ आतां जर कोणी विकत घेईल तर त्या किंमतींत आमच्या दोघांचे दोन तीन वर्षं पुरतील इतके कपडे सहज होतील.'

मैत्रीण मान वेळीत म्हणाली,

" अहाहा ! काय पण आजीबाई बोलते आहे ! लग्न झाल्यावर बायका नेभळट होतात म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं एकूण. कॉलेजांत असतांना एवढ्या तेवढ्यासाठीं वादविवाद करून शेवटीं आपलं तें खरं करून घेणारी तूंच का ती ? लग्न केल्यानं स्वत्व जाऊन जर एवढं अकालीं वैराग्य येत असेल तर आपल्याला नको तें असलं लग्न ! "

पद्मा व ती मनसोक्त हंसल्या. चहा प्यालेले बशीपेले दूर ठेवीत पद्मा म्हणाली,

" त्यागांत मोठं सुख असतं हें लग्न झाल्याशिवाय कळायचं नाहीं सुमा ! तिकडच्या इच्छेला मान देऊन मी माझ्या इच्छा दूर सारल्या तेव्हां वाईट वाटल्याशिवाय का राहिलं ? वाईट हें वाटणारच; परंतु त्यावर जय मिळवून त्यांना सुखी केलं अन् त्यांच्या सुखानं सुखी झालें. ही त्यागवृत्ति म्हणजेच पत्नीधर्म ! "

" पुरे झालं बाई हें तुझं पत्नीधर्माचं पुराण. तुझ्या तिकडल्या स्वारीलाच सांग तें ! "

" बरं राहूं दे. खरं सांगतें आतां हें बघ; मी तरी काय जन्मभर नोकरी करणार होतें ? तूर्त व्याप नाहीं मागं तोंवर केली असती. पुढं वाढता संसार झाल्यावर काय करणार होतें ? आमचीं मुलं आम्हांहून सवाई व्हावीं असं वाटणारच आम्हांला. अन् तसं व्हायला पैसा लागेल पुढं. तो आतांपासून संग्रहीं टाकला असता. पण ज्याचं ते पुढचं पाहायला समर्थ असतां मला कशाला हवा हा व्याप ! बायको म्हणजे सांगितल्या कामाची न् घातल्या अन्नाची. जेव्हां लाजाहोम होतो तेव्हां त्यांतच तिच्या आशाआकांक्षांचा होम होत असतो. आनंदोत्सव चालू असतांही डोळ्यांतून पाणी येतं तें त्यामुळंच येत असतं बरं ! "

बोलतां बोलतां पद्मेचा स्वर सद्गदित झाला. डोळ्यांतून आंसवें गळूं लागलीं. सुमतीचे डोळेहि भरून आले. स्टोव्ह आतां विझलेला असल्यामुळें पत्नीचा सद्गदित आवाज कमलाकरांना स्पष्ट ऐकूं येत होता. दुधारी सुरी कोणी काळ-जांत खुपशीत आहे असें त्यांना वाटलें.

" अरेरे, सुशिक्षित पत्नीची हांव धरली; पण तिच्या मनाची जाणीव

ठेवली नाहीं ! एका कर्तबगार स्त्रीचें मन मारून तिला आपल्या सुखासाठीं आपण निव्वळ निर्जीव यंत्र केलें ना ? आपलीं समता, स्वातंत्र्यादि जिव्हाग्रीं नेहमीं नाचणारीं मोठमोठीं तत्त्वें कोठें गेलीं ? जबाबदारी नसतांना बोलणें अन् जबाबदारी पडल्यावर प्रत्यक्ष वागणें यांत किती हें अंतर ! ''

मैत्रिणीला पोंचवून पद्मा घरांत येऊन पहाते तों कमलाकर अस्वस्थ पडलेले. तिनें दचकून जवळ जाऊन कपाळाला हात लावून पाहिलें तों तें अगदीं कढत होतें. रात्रीं त्यांना बराच ताप भरला. कमलाकरांचें हें दुखणें दिवसेंदिवस वाढतच गेलें. एकदां भरलेला ताप आठ दिवस झाले तरी उतरलाच नाहीं. ती घाबरून गेली. तिनें सासूसासऱ्यांना तार करून बोलाविलें. सर्वांच्या अविश्रांत श्रमानें शेवटीं चाळीसाव्या दिवशीं दुखणें उतरणीला लागलें.

परंतु शक्तिपात इतका भयंकर झाला होता व ' लंग्ज ' तर इतके अधू झाले होते कीं तिळाएवढी कसर राहिली तर दुखणें क्षयावर जाईल व कायमच्या पश्चात्तापाला कारण होईल असें डॉक्टरांचें निक्षून सांगणें होतें आणि अर्थोत्पादनसामर्थ्य अंगीं येण्यास सहा महिन्यांइतका काळ लागेल याबद्दल तर कोणाचेंच दुमत नव्हतें. आतांपर्यंत निरानिराळया नळया, ब्यागा, सिरम, ऑक्सिजन, औषधें, डॉक्टरांचीं बिलें इत्यादि महत्त्वाच्या बाबींखालीं जे दोन चार ठोकळ डाग होते ते केव्हांच पार होऊन गेले होते आणि यापुढें डॉक्टरांच्या महत्त्वाच्या सल्ल्याप्रमाणें वागल्याशिवाय तर गत्यंतर नव्हतें व तसें वागायचें म्हटलें म्हणजे पैशाची गरज फार मोठी होती. ती कशी भागवावी हा एक पद्मेपुढें प्रश्न होता. तिनें सासूच्या सल्ल्यानें अलीकडे दोन शिकवण्या धरल्या होत्या. लक्ष सारें पतीच्या प्रकृतीकडे असतांहि वेळांत वेळ करून दोन तासांत ती त्या उरकून येत असे; परंतु गरजेच्या मानानें अवघी वीस रुपयांची मदत म्हणजे ' दर्यामें खसखस ' होती. तिनें सासूची व आपल्या मैत्रिणीची सल्ला घेतली. तेव्हां मैत्रीण म्हणाली—

" पद्मे, तुझी हरकत नसेल तर तूं आपली ही नोकरी पुन्हां सांभाळ कशी ! मला बाई इथली हवा मानवत नाहीं. अन् मी आलें ती तरी काय ? तुला बाळंतपणासाठीं रजा हवी असेल असं समजून आलें हो. मला इथं अगदीं करमत नाहीं तेव्हां तुझी जागा तूं घे. अशी कावरीबावरी काय पहा-

तेस ? तूं गांधारी आहेस हें ठाऊक आहे आम्हांला. पण नवऱ्याच्या जिवासाठीं कांहीं दिवस पत्कर अन् दे पुढं सोडून समजलं ? ”

“ खरंच सूनबाई, सुमाताई म्हणते तें खरं आहे. आमचा जीव पुष्कळ तळमळतो. पण आमच्यासारख्या अशिक्षित बायकांचा कांहीं उपयोग आहे का ! तेव्हां कमासाठींच तुला पुन्हां नोकरी करायला हवी. ( सुमाकडे वळून ) किती दगदग झाली आहे या दीड महिन्यांत तिला ? तिच्या तरी प्रकृतीकडे नको का बघायला ? तेवढंच तिला मोकळ्यांत गेल्यासारखं होईल. आम्ही करूं कमाचं औषधपाणी ती येईस्तंवर. ”

* * *

चार सहा दिवस काम केल्यावर पतीचा गैरसमज घालविण्याच्या उद्देशानें पद्मा म्हणाली, “ गडे, रागावूं नये; कांहींच इलाज नव्हता म्हणून मीं हें पत्करलं. पण इकडे बरं वाटल्यावर देईन सोडून. ”

मृदुपणें तिच्या केंसावरून बोटें फिरवीत ते म्हणाले.

“ नको नको, तसं केलंस तर मला बरं वाटायचं नाहीं. माझं मागचं वागणं निव्वळ अरेरावीपणाचं होतं. चार कोंवळ्या मनांवर चांगले संस्कार करण्याचं सामर्थ्य तुझ्यांत असतांना केरपोतेऱ्याचे सोपस्कार तुला मीं करायला लावले. ”

तिनें तोंडावर ठेवलेला हात काढून मृदुपणें हातांत धरून ते म्हणाले,

“ खरोखर सगळ्याच स्त्रियांचं चूल हेंच कर्तव्यक्षेत्र धरून चालणं चूक आहे. ज्या तुझ्यासारख्या विशेष कर्तबगार स्त्रिया असतील त्यांच्या कर्तृत्वाला वाव न देतां ‘ तुमचं शहाणपण चुलीपुढेंच चालवा ’ असं नवरेपणाच्या जोरावर सांगितलं असतां बायकोच्या मानसिक सौख्याची कशी गळचेपी होते व गृहसौख्य कसं नष्ट होत जातं हें मी आतां प्रत्यक्षच अनुभवलं आहे, आणि त्या पश्चात्तापानेंच हा एवढा त्रास आपल्याला झाला. पदम, माझ्या चुकीची तूं मला क्षमा करशील ना ? यापुढें—”

“ पुरे गडे, ”

डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळत असतां ती हंसली व म्हणाली,

# बांडगूळ.

फळें मधुर खावया असति नित्य मेवे तसे,
हिरेजडित सुंदरीं कनक-पंजरींही वसे—
अहर्निश, तथापि तो शुक मनांत दु:खें झुरे,
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे !

दोन प्रहरच्या सुट्टीनंतर शाळा भरली तेव्हां सातवीच्या वर्गांत वरील कवितेचें विवरण चाललें होतें. शाळेसमोरील मोठ्या भव्य वाड्याच्या वरच्या मजल्यावरील सुसज्जित शय्येवर पडून एक नवबाला अश्रुमोचन करीत होती. उच्च स्वरानें म्हटल्या जाणाऱ्या त्या कवितेकडे व मुलांना समजावून दिल्या जाणाऱ्या तिच्या अर्थाकडे तशा स्थितींतहि तिचें चित्त वेधलें आणि शय्येवर उठून बसून तिनें दोन्ही हातांनीं आपल्या कोमल कपोलांवर ताडकन् मारून घेतलें आणि स्फुंदत स्फुंदत ती म्हणाली,

“ कशासाठीं ? कशासाठीं हें सुंदर रूप देवा मला दिलंस ? ह्या सोनेरी पिंजऱ्यांत कायमचं अडकून पडण्यासाठींच काय ? त्यापेक्षां देवा, तूं मला कुरूप कां नाहीं केलंस ? पोपटाचा डौलदार बांधा, सुंदर रंगरूप अन् गोड आवाज, हींच त्याच्या बंधनाला कारण होतात; तसंच माझं हें रूप माझ्या ह्या बंदिवासाला कारण झालं आहे. देवा, देवा, जर एवढी अवकृपा तूं केली नसतीस तर बाबांच्या शेवटच्या भेटीला मी अंतरलें नसतें.

“ बाबा, बाबा ! किती हो तुम्ही माझी आठवण काढीत असाल ? आई, तूं माझी किती आतुरतेनं वाट बघत असशील ! हाय हाय ! बाबा, आई, मी प्रत्यक्ष तुमची मुलगी असतां परक्यांची सत्ता मजवर चालावी ना ?”

तिनें धाडकन् पलंगावर आपलें आंग टाकून दिलें आणि आरक्त अंजलींत आपलें सुकुमार मुखकमल झांकून ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

“ वैनीसाब, आश्शी जिवाला किती शीन करून घ्याल ? ” तिच्या तैनातींतील तरुण मुलीनें आंत येऊन हळुवारपणें तिच्या केंसांवरून हात फिरवीत म्हटलें.

" वैनीसाब, उठा चला, वाड्यांत जायचंय हळदकुंकवाला. मासाबांनीं येनीफनी कराया सांगितलय. ही वगा पिवळी काचोळी अन् अंजिरी शालू काढलाय. फितवी कंच्या रंगाची काडूं ? "

" साखरे, तूं तरी नको ग मला छळूंस ! "

अगदीं केविलवाण्या स्वरानें ती म्हणाली.

"प्रत्यक्ष माझे बाबा मृत्युशय्येवर पडले असतांना व ते माझ्या भेटीची इच्छा करीत असतांना तिथं जायचं सोडून नटून थटून मिरवायला जावं म्हणतेस ? साखरे, तुलाहि दयामाया कांहीं नाहीं का ग ? "

आपले डोळे पुशीत साखरी म्हणाली, " असं कसं म्हनतां जी वैनीसाब. मला जरी दुष्काळांत आईबापांनीं बालपणीं इथं इकली, तरी आईबापाचं सुख किती न्यारं असतं हें लोकांचं बगून मला का कळत नाई ? पण मी काय करूं ? हुकमाची ताबेदार. आपुन जलदी केली नाई तर आपल्या बराबर माजंबी कांडात निगल. "

साखरीनें वस्तुस्थितीची जाणीव करून देतांच तिचें अंग थरारलें. शहारे आल्यासारखें करून ती म्हणाली,

" काय ग हा जुलूम तरी ? हृदय आंतून जळत असतांना वरून शालू-शेल्यांनीं नटायचं ! काय ही दांभिकता ! राहूं दे तो शालू. माझी धुतलेली चंद्रकळाच आण, अन् ती सोनेरी कांठाची पांढरी चोळी, हं चालेल ती फितवी, आण बाई. "

तिनें आपल्या मतानें अगदीं साधा पोषाख निवडला होता; परंतु तोच तिच्या उमलत्या सौंदर्याला फारच शोभून दिसत होता. केंसकुंकूं नीट करून ती जेव्हां सासूबाईंना नमस्कार करायला गेली तेव्हां त्या खेंकसून म्हणाल्या,

" बाप कांहीं मेला नाहीं आजच काळं जुनेरं नेसायला. बळेंच दैना दवडते सटवी; जिथं तिथं बोभाटा व्हायला हवा ना सासूचा ? हं ! काय ग साखरे, अंजिरी शालू दिला होता ना काढून ? "

" जी " एवढाच उद्गार काढून तिनें तिला हातीं धरून तिच्या खोलींत नेलें आणि पूर्वीचें लुगडें बदलायला लावून अंजिरी शालू नेसायला दिला. इतक्यांत दुसरी दासी तबकांत दागदागिने घेऊन आली. त्यांत नथ, पैंजण, तांतले तोडे, वांकी हे मुख्य होते.

नाकांत वेसण, पायांत बेड्या व हातांत कड्या अशीं बहुमोलाचीं परंतु अगदीं बंदिवानाचींच भूषणें आपणांस घातलीं जात आहेत असेंच तीस वाटलें. दोन्ही तळहातांनीं डोळ्यांतील अश्रु निपटून ती तयार झाली. तिचें सुकुमार मुखकमल रडून रडून किंचित् फुगीर झालें होतें. तोंडावरचा तजेला जाऊन तें पिवळट दिसत होतें. रुमझुम नाद करीत ती खालीं जाऊन पडदे सोडलेल्या बग्गींत बसली. साखरी तिच्यासमोर आंत बसली व दुसरी दासी गुलाबी, हिरवें पातळ व पुरणाच्या पाटल्या आणि निळ्या मण्यांचे चांदीच्या तोंडाचे वाळे घालून बग्गीच्या मागें उभी राहिली.

अशा रीतीनें रत्नप्रभेची स्वारी हळदीकुंकवाला राजवाड्यांत चालली असतांना समोरच्या शाळेंतून नुकत्याच सुटलेल्या आनंदी मुली त्या काळ्या कुळकुळीत डौलदार गाडीकडे चकित दृष्टीनें पहात तिच्या भाग्याचा हेवा करीत हंसत चालल्या होत्या. त्यांच्या विस्मयाचा विषय झालेली त्या भव्य वाड्याची ती भावी मालकीण-आईसाहेबांची सून-रत्नप्रभा पड्याआड रडत आहे असें त्यांच्या स्वप्नीं तरी असेल काय ? राजवाड्यासमोर गाडी उभी रहातांच साखरी आणि गुलाबी यांनीं चटकन् खालीं उतरून गाडीच्या दाराशीं गोषा धरला, त्यांतून रत्नप्रभा आंत गेली. राजवाड्याच्या दुसऱ्या मजल्यावर एका भव्य व सुसज्जित दिवाणखान्यांत तांबड्या मखमलीनें मढविलेल्या रुप्याच्या कोचावर राणीसाहेब बसल्या होत्या. त्यांच्यापुढें जाऊन दोन्ही हातांत पदराचें टोक धरून तिनें त्यांना खालीं वांकून त्रिवार नमस्कार केला. त्याचप्रमाणें त्यांच्या बाजूस बसलेल्या मानकरणींनाहि केल्यानंतर वांकलेल्या स्थितींतच स्वतः भोंवतीं फिरून इतर स्त्रियांसाठीं म्हणून तीनचार नमस्कार करून ती जरा बाजूला बसली.

तिला उद्देशून राणीसाहेब म्हणाल्या,

" काय धाकट्या सूनबाई ! ठीक आहे ना ? "

होकारार्थी मान हलवून व लववून रत्नप्रभेनें शुष्कपणें स्मित केलें. जवळच बसलेल्या एका बाईकडे वळून राणीसाहेब हंसत म्हणाल्या,

" कांहीं गडबड आहे वाटतं ? तोंडावर पिवळेपणा आलेला दिसतो. "

तिनें उत्तर केलें, " छे, कसलं ? अझून सोहळा तरी झाला आहे का ? "

" नाहीं ? कां ? "

आमच्या दिवाणसाहेब ( थोरल्या वन्सं या अर्थी ) माहीतच आहेत आपल्याला. त्या म्हणतात सोन्याचं जानवं आणि रुप्याचा पलंग आणल्याशिवाय सोहळाच नाहीं करायचा. ''

" म्हणजे ? "

" बिचाऱ्यांच्या ऐपतीबाहेर अट ! "

" मग ? "

" आहेच ती गुलाबी, त्यांचं ठीक चाललंय. "

" बिचारी ! "

हळूहळू चाललेलीं तीं प्रश्नोत्तरें ऐकून बिचाऱ्या रत्नप्रभेला मरणप्राय दुःख झालें. आपल्या वैवाहिक जीवनाची जाहीरपणें चर्चा होऊन लोकांनीं आपली कींव करण्यासारखी स्थिति असावी याचें तिला वाईट वाटलें. तेथून उठून जाणें तिला शक्यच नव्हतें व त्यांत मिसळणें तर त्याहून नव्हतें. त्यामुळें समवयस्क स्त्रियांमध्यें सहजपणें चाललेलें संभाषण तिच्या जखमी हृदयावर मिठाच्या पाण्यासारखें झोंबत असतांहि निमूटपणें तें ऐकत रहाणें तिला भाग झालें.

—२—

रत्नप्रभेचा जन्म कोंकणांतील चांगल्या खाऊनपिऊन सुखी अशा घराण्यांत झाला होता. परंतु ईश्वरानें दिलेल्या अलौकिक रूपसंपदेमुळें राजघराण्याशीं निकट संबंध असलेल्या थोर घराण्यांत ती विवाहशृंखलेनें बद्ध झाली होती. आपल्या मुलीनें काढलेल्या या सुदैवाबद्दल तिच्या आईबापांना प्रथम फारच आनंद झाला. परंतु कांहीं काळानंतर त्या थोर घराण्यांतील क्षुद्रहृदयी माणसांनीं काढलेलीं मोठमोठीं फर्मानें मान्य करणें आवांक्याबाहेरचें झाल्यामुळें मुलीचा होत असलेला छळ व तिला माहेरीं जाण्यास केलेली कायमची बंदी यांयोगें त्यांना पुढें अपार दुःख झालें. रत्नप्रभा ही त्यांची एकुलती एक लाडकी कन्या होती. एकच एक अपत्य अंतकाळीं तरी भेटावें असें कोणाला नाहीं वाटणार ? बाजीरावांनीं तिचा अगदीं ध्यास धरला होता. पत्रें झालीं, तारा झाल्या, शेवटीं मुलीला आणायला पाठविलेला मनुष्यहि जेव्हां एकटाच परत आला तेव्हां अपत्यदर्शनाची त्यांची अंतिम आशा संपुष्टांत आली. आईबापांना पराकाष्ठेचें वाईट वाटलें. म्हाताऱ्याची आतां आशा नाहीं हें समों-

वतालच्या मंडळींना कळून चुकलें. शेवटची घडी जवळ आली तरी शेवटची व्यवस्था म्हातारा कसा करीत नाहीं याचें आप्तस्वकीयांना आश्चर्य वाटूं लागलें.

बाजीरावांच्या मनांत आपलीं सारीं झाडेंमाडें, जमीनजुमला जें कांहीं असेल तें आपल्या मुलीला द्यावयाचें होतें. पोटची पोर असून तिला कांहीं न देतां, कधीं ज्यांच्याशीं आपले सलोख्याचे संबंध नाहींत अशा दूरच्या भाऊबंदांना कष्टानें कसलेली जमीन व कमविलेली इस्टेट देणें हा त्यांच्या दृष्टीनें शुद्ध कायदेशीर जुलूम होता. परंतु मुलीच्या सासरकरांच्या अरेरावी वर्तनामुळें ही योजनाहि पत्नीच्या व मुलीच्या दृष्टीनें कितपत हितावह होईल याची शंकाच होती.

मुलीला आणावयास पाठविलेला जासूद रिकामा परत आलेला, व यमाचा जासूद तर निकडीनें दारांत येऊन उभा. अशा वेळीं काय करायचें ? बाजीरावांच्या मनाला तळमळ लागून राहिली. त्यांनीं सभोंवतालच्या मंडळीकडे पाहून म्हटलें,

" काय करावं ? रतन आली नाहीं....आली असती तर तुम्हां सर्वांच्या साक्षीनं बक्षीसपत्र करून टाकलं असतं, आतां नाहीं का करतां येणार ? "

" बाजीराव, वेड तर नाहीं लागलं तुम्हांला ? अहो, पोरीच्या सासरीं काय कमी आहे ? चांगली राजघराण्यांत पडली आहे न् तिची कींव करतां, पण वहिनींचा कांहीं विचार ? "

" हो, बक्षीसपत्र असलं तरी नवऱ्याला घ्यायला अधिकार आहेच. दिल्या दोन तोंडांत अन् घेतलं हिसकावून ! अहे काय त्यांत ? पण नुकसान कोणाचं होईल ? "

" वहिनींचं अन् दुसरं कोणाचं ? "

" अहो, कशाला एकत्र लक्ष्मीचे तुकडे करण्याचा विचार करतां ? आहे तें सारं वहिनींचं अन् रतनचंच आहे. वडील भावजय आम्ही आईसारखीच समजतों ! "

" अन् रतन तरी काय परकी आहे ? "

" कोण म्हणतो ? "

आप्तस्वकीयांचा बुद्धिवाद पिंडाभोंवतीं जमलेल्या कावळ्यांच्या कावकावीसारखा त्यांना कर्णकर्कश वाटला. मृतमांस खाण्यासाठीं टपलेलीं गिधाडें

जशीं न बोलावतां आपल्या चंचू पाजळून व पंख फडफडावून पुढें सरसावतात तसे हे आप्तस्वकीय आपली तृष्णा व जिव्हास्त्रें पाजळून पुढें सरसावले आहेत. फरक इतकाच कीं तीं गिधाडें निर्बुद्ध असल्यामुळें मृतमांस भक्षण करतात आणि हे सुबुद्ध असल्यामुळें आपलें सजीव हृदय बोचून खात आहेत, असें त्यांना वाटलें. शुद्ध तर होतीच, पण बुद्धिहि अजून त्यांना सोडून गेली नव्हती. शक्ति मात्र दर क्षणाला झपाट्यानें कमी होत होती. त्यामुळें इच्छा नसतांहि अप्रिय गोष्टी ऐकणें भाग पडून अंतकाळच्या वेदनांत आणखी भर पडत होती. अप्रिय वातावरणानें त्यांचा जीव गुदमरूं लागला. आजाऱ्याचा जीव घाबरत आहे या सबबीवर सभोंवतालची गर्दी डॉक्टरनें कमी केली. शान्तता व उपचार होतांच आजाऱ्याला जरा स्थैर्य आलें.

मुलीला इस्टेट देणगीदाखल लिहून ठेवण्यांत अर्थ नाहीं. तसेंच बायकोच्या ताब्यांत ती राहील असें मानण्यांतहि अर्थ नाहीं. अशानें मालकिणीचा मान जाऊन मोलकरणीची कळा मात्र तीस येईल. त्यापेक्षां एखादा मुलगा तिनें दत्तक घेतला तर सर्व सूत्रें तिच्या हातीं राहून त्याच्यावर तिचा पुढेंहि दाब राहील. अशा पोक्त विचारानें बाजीरावांनीं तसें मृत्युपत्र करवून घेतलें. त्यावर डॉक्टर, वकील व सभ्य गृहस्थ इत्यादि महत्त्वाच्या व्यक्तींच्या कायदेशीर दृष्टया सह्यासाक्षी झाल्या; आपण आपल्यावरील मोठी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली या जाणिवेनें समाधान पावून म्हाताऱ्यानें आपली जीवितयात्रा संपविली.

म्हाताऱ्याची इस्टेट खिरापतीसारखी वांटून खाण्याचे भाऊबंदांचे बेत मृत्युपत्राच्या वाचनानें हाणून पडल्यामुळें मृत म्हाताऱ्यावर आपलेच दांत-ओंठ खाण्यापलीकडे त्यांच्या हातीं कांहींच उरलें नाहीं ! तरी योग्य वेळीं मृत्युपत्रांत उल्लेखिलेल्या मुलाला विधिपूर्वक माईच्या मांडीवर दत्तक देण्याची आपल्यावरील जबाबदारी त्यांनीं पार पाडली. मुलगा संवयीशिवाय आई-बापांवेगळा राहूं शकत नसल्यामुळें व माई आपल्याच दुःखांत चूर असल्या-मुळें संवय लागेतोंपर्यंत मुलाचे आईबाप त्याच्या व्यवस्थेला व माईच्या सोब-तीला येणें अपरिहार्यच होतें !

– ३ –

बाजीरावांची निधनवार्ता व मृत्युपत्राची हकीगत रत्नपुरीं एकदमच सम-

जर्ला. रत्नप्रभेच्या दुःखाला व तिच्या सासूबाईच्या रागाला सीमा उरली नाहीं. व्याह्यानें आपल्या सुनेच्या तोंडाला पानें पुसलीं ही गोष्ट त्यांना भयंकर अपमानास्पद वाटली. बापाच्या मृत्यूमुळें मुलीला काय वाटत असेल याची तादृश पर्वा न करतां ' त्याच्या उलटया काळजाच्या कसाब करणीचा ' सडकून निषेध करून त्याचा चांगलाच उद्धार त्यांनीं केला; आणि व्याह्याचें कृत्य यापेक्षांहि कडक पारिपत्यास योग्य असतांहि यापलीकडे त्याचें कांहीं वांकडें करणें दुर्दैवानें आपल्या हातीं नसल्यामुळें अर्थातच आपला शिक्षादंड त्यांनीं सुनेकडे वळविला !

रत्नप्रभेला आधींच सुख फार होतें ! त्यांत ही आणखी भर पडली. तिनें मोठें धैर्य करून आपणास आईकडे पाठविण्याची विनंति केली. परंतु मोठ्या मुलूखमैदान गर्जनेनें तिचा पार धुव्वा उडविण्यांत आला. तिला जीवित असार वाटूं लागलें. ईश्वरानें आपल्या आईचा आधार काढून नेण्यापेक्षां आपणासच नेऊन या खडतर आयुष्यक्रमाचा अंत कां नाहीं केला ? सासूचा जाच व नवऱ्याची उपेक्षा अशा स्थितींत जीवित कसें कंठायचें याचा नैराश्यपूर्ण विचार तिच्या डोक्यांत थैमान घालूं लागला. रडून रडून तिचे कपोल निस्तेज झाले होते. डोळे खोल गेले होते, व त्यांभोंवतीं कृष्णवलयें पसरलीं होतीं. ओंठावरचा रक्तिमा नाहींसा होऊन ते फिकट दिसत होते. लांबसडक काळाभोर केशभार स्नेहाभावीं गुंतून धूसर झाला होता. दुःखद विचारांच्या अतिरेकानें तिला मूर्च्छा येऊन तिची दुःखानें खचलेली फिकट, कृश देहलता चटईवर अस्ताव्यस्त पडली होती. ' जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें ' या उक्तीप्रमाणें तशा स्थितींतहि ती सुंदर दिसत होती ! तसें नसतें तर कधीं डोळा उचलून तिला न पाहणारे बाळासाहेब–तिचा पति–अनिमिष नेत्रांनीं तिच्याकडे पहात कसे राहिले असते ?

राजवाड्यांतूनच नेमणूक असल्यामुळें रत्नप्रभेच्या तैनातीला दोन दासी स्वतंत्र गाडी, मेणा इत्यादि सर्व कांहीं होतें. परंतु घरांतल्या माणसांनीं तिची किंमत कवडीमोल केल्यामुळें व खुद्द नवऱ्यानेंच दासीला मालकिणीचें पद बहाल केल्यामुळें दासीजन तिला जुमानीनासा झाल्यास नवल काय ? या वेळीं तिच्याजवळ कोणीहि नव्हतें.

बाळासाहेबांची विषयी दृष्टि तिच्या मुग्धसौंदर्याचें पान करण्यांत गुंतली असल्यामुळें पत्नीला दर्शन देऊन आपण तिचा बहुमान केला असतांहि योग्य उत्थापन देऊन तिनें आपला इतमाम राखला नाहीं या गोष्टीची जाणीव त्यांना झाली नाहीं, परंतु ती होतांच त्यांना आतिशय अपमान झाल्यासारखें वाटलें. बेमुर्वतखोर बायकोला चांगलाच धडा शिकविण्याच्या उद्देशानें ते आंत आले व त्वेषानें त्यांनीं तिच्या कमरेंत लाथ हाणली. तथापि ‘ आपला पाय दुखावला असेल ’ असें म्हणून आदब राखायला ती शुद्धीवर कुठें होती? पण बाळासाहेब मात्र लौकरच शुद्धीवर आले.

आपल्या लत्ताप्रहाराला मुळींच न जुमानणाऱ्या पत्नीकडे त्यांनीं वांकून पाहिलें तेव्हां ती बेशुद्ध आहे ही वस्तुस्थिति त्यांच्या ध्यानीं आली. हें सुकुमार सौंदर्यपुष्प आपण उपेक्षेनें धुळीस मिळाविलें, ज्या घरांत दासोजनसुद्धां आनंदानें नांदत आहेत त्याच घराची स्वामिनी मात्र अशी दुःखानें खचून चटईवर लोळत आहे! अरेरे! आपल्या आईचा आपल्या या सुकुमार पत्नीवर दांत कां असावा? व तिच्या सांगण्यावरून आपण हिची निष्कारण हेळसांड कां करावी?

मनाच्या ह्या प्रश्नांना त्यांना उत्तर देतां येईना. असलें निरागस निष्पाप सौंदर्यपुष्प आपल्या हक्काचें असतां दुर्गतीच्या कर्दमांत आपण कां डुंबावें? आणि या गोष्टीला आईचा विरोध नसून पहिल्या गोष्टीला कां असावा? आजपर्यंत हा साधा विचार आपल्या मनाला कसा शिवला नाहीं याचें त्यांना आश्चर्य वाटूं लागलें. मनाची पकड सुविचारानें घेतल्यामुळें आपोआपच इन्द्रियांतला तामसीपणा गारठून गेला. प्रहार करायला शिवाशिवलेले त्यांचे हातपाय तिच्या शुश्रूषेला लागले, आणि त्या दिवसापासून तिच्या दुर्भाग्याला ओहोटी लागली.

वाईटांतून चांगलें उद्भवतें तें असें!

— ४ —

आपल्याकडून मोठी सावधगिरी करून बाजीरावांनीं पत्नीची सुव्यवस्था लावली खरी, परंतु लागली मात्र नाहीं. दत्तकपुत्र लहान म्हणून त्याचे आईबाप त्याच्याबरोबरच वास्तव्य करूं लागले. माई आपल्याच दुःखांत चूर असल्यामुळें मुलाला वळण लावणें, व्यवस्था पाहणें इत्यादि कामें त्यांच्या

ातून पार पडणें अशक्यच होतें. अर्थात् तीं कामें त्याच्या जन्मदात्यांनीं आपणांकडे घेतल्यामुळें आपल्यावरची जबाबदारी तितकी कमी करणाऱ्यांचे माईना उपकारच वाटले ! माईंची मनःस्थिति जाणून मुलाच्या आईबापांनीं त्यांना कसलीच तसदी पडूं नये अशी चांगलीच खबरदारी घेतली. मुलाचें घरांतील व शाळेंतील शिक्षण, शेतीभाती व सावसावकारीची व्यवस्था, देणें-घेणें, फार काय माईचें खाणेंपिणें व वागणेंसवरणें या सर्व गोष्टींकडे तेच लक्ष पुरवीत. त्यामुळें आपलेंच दुःख उराशीं कवटाळून बसायला त्यांना मुबलक वेळ सांपडे. याप्रमाणें कोणतीहि जबाबदारी अगर व्यवसाय मन विरंगुळायला नसल्यामुळें पुष्कळ दिवस माई त्याच स्थितींत रहात होत्या.

परंतु सृष्टिक्रमाप्रमाणें कोणताहि काळ सारखा टिकून रहात नाहीं. दीर्घ-काळच्या निद्रेतून जागृति यावी त्याप्रमाणें माईना झालें. त्या चकित दृष्टीनें सभोंवार पाहूं लागल्या; त्यांना काय दिसलें ?

एखाद्या आम्रवृक्षावर वाढलेलें बांडगूळ मात्र भरारून वाढावें, परंतु मूळ वृक्ष मात्र खुरटून वठूं लागावा, त्याप्रमाणें आपण लावलेलें दत्तकाचें कलम झपाट्यानें वाढीस लागलें आहे, परंतु आपण मात्र नामशेष होण्याच्या पंथास लागलेल्या आहोंत असें त्यांना दिसून आलें. वाढलेल्या कलमाचें मूळ झाड कोणतें व कलमी शाखा कोणती हें ज्याप्रमाणें पुढें कळेनासें होतें तसेंच मूळ घर यांचें कीं आपलें, आपण यांना आणलें कीं यांच्या घरांत आपण आश्रयाला आलों याची त्यांना भ्रान्त पडली !

ते आंबेफणसांचे दिवस होते. पडवीमध्यें कलमी आंब्यांच्या करंड्या भरून शिवण्याचा उद्योग कांहीं गडी करीत होते. हलके हलके माई तेथें गेल्य आणि म्हणाल्या,

" पाठवायचे आंबे ना हे ? चांगले नेहमींसारखेच निवडून घेतले आहेत ना बजाबा ? "

" व्हय, नेमी परमानंच ! "

" अन् मुरंब्यासाठीं त्या विहिरीवरच्या आंब्याचे काढले ना ? "

" व्हय. "

" कोण जाणार आहे घेऊन ? "

" न्हाई कोन, तेच येनार हाइत. "

" कोण रत्नाबाई ? का बाळासाहेब ? पत्र आलं का ? कधीं आलं ?" माईच्या अशक्त दुर्बल हृदयाला तो आनंदाचा आवेग झेंपला नाहीं. खालीं बसून त्या उत्तराच्या अपेक्षेनें अधीरपणें त्याच्याकडे पाहूं लागल्या. माईंची स्थिति त्याच्या लक्षांत आली. तो काचत काचत म्हणाला,

" मालकाच मामा येणार हाइत, त्येंच्यासाठीं या करंड्या ! "

" रत्नाबाईच्या पाठवल्या ? "

" थोरल धनी गेल्यापासनं रत्नाबाईकड काइबी पाठवीत नाई "

" कां बरं ? इतक्या वर्षांत का आंबेफणस पिकलेच नाहींत ? "

" पिकल मोप, पर सार इकल, मालकाच्या बापास्नी सांगितलं पर ते म्हनतात पाटवायची काई जरूर नाइ. "

माई मटकन् खालींच बसल्या. त्यांचें डोकें गरगर फिरूं लागलें. आपल्या मालकीचे आंबे आपल्या एकुलत्या एक लेकीला पाठविण्याच्या बाबतींत बंदी करणारा हा कोण मोठा ?

दुपारीं जेवणानंतर त्यांनीं दत्तकपुत्रास हांक मारून विचारलें,

" विश्वासराव, रत्नाबाईच्या सासरीं पाठवले का आंबे ? "

" नाहीं. "

" कां ? "

विश्वासरावांनीं तिकडूनच जाणाऱ्या आपल्या जनकाकडे पाहिलें. पुत्राला माईंच्या खोलींत पाहून त्यांना विस्मय वाटलाच होता. त्याच्या दृष्टिक्षेपाबरोबर ते त्वरेनें तेथें आले. त्यांनाहि माईनीं तोच प्रश्न केला. त्यावर हंसत हंसत बेडरपणें ते म्हणाले,

" कशाला पाठवायचे ? त्यांच्या घरीं काय कमी आहे ? राजाच्या घरीं मोत्यें पाठवलीं तरी त्यांची किंमत मातीच व्हायची ! अहो, त्यांना आपल्या ह्या आंब्यांची किंमत काय ? टाका म्हणतील घोड्यापुढें ! झालं, नुकसान आपलं गरीबाचं ? "

" इतकीं वर्षं पाठवीत आहों—"

त्यांना पुढें बोलूं न देतां मध्येंच ते म्हणाले,

" इतक्या वर्षांची गोष्ट वेगळी अन् आतांची वेगळी. "

" म्हणजे ? "

" म्हणजे काय ? आमच्या मुलाच्या हिताला आम्हांला जपलं पाहिजे. "

'आ' वासून माई पह्यातच राहिल्या. क्षणभर त्यांची हालचालच थांबली. नंतर त्यांनीं खाटेवर आंग टाकून दिलें. नुकत्याच कोठें उठूं फिरूं लागलेल्या माईंना हा आघात पुन्हां बरेच दिवस आंथरुणाला खिळवायला कारण झाला.

त्यानंतर बऱ्याच दिवसांची गोष्ट. एके दिवशीं त्या तुळशीकट्टयाजवळ बसल्या होत्या. तेथें शेजारची बाई आपल्या मुलाला घेऊन आली. त्याला पाहून माई म्हणाल्या,

" कां ग ? पोर इतकं कशानं वाळलं ? "

" त्याला गवर आला होता, आतां आंव झाली आहे. "

" मग औषध नाहीं करीत ? "

" करतें तर वैद्याचं, पण गुण नाहीं. दह्याच्या मलईत शंखजिरं अन् गोळी द्यायची म्हणाले. पण दह्याची मलई कुठनं आणूं ? आमच्या घरीं का दुभतं आहे ? "

" आमच्याकडून न्यावीस कीं नाहीं ? आमच्याकडे पुष्कळ असेल. "

हलक्या आवाजांत ती बाई म्हणाली, " पण देणार कोण ? तुम्हीं पडल्या-पासून ताकाचा थेंब कांहीं ह्या घरांतून कोणाला मिळाला नाहीं माई ! "

" चल, मी देतें. "

असें म्हणून माई दुभत्याच्या खोलींत गेल्या व विरजणावरची साय काढूं लागल्या. दुभत्याच्या खोलीचें दार उघडे पाहून दत्तकाची जननी तेथें धांवून आली व अधिकारवाणीनें विचारूं लागली,

" हें काय करतां ? "

" तिला दह्याची मलई देतें औषधाला; तिचं पोर आंवेनं कसं झालंय पहा '."

" पाह्यलं, म्हणे ' मलई देतें औषधाला. ' मलई कांहीं फुकट येत नाहीं. ठेवा खालीं; वा: ! दुपारीं मी साय विरजली होती तुपासाठीं, तर तीच वांटीत सुटल्या लोकांना. ताकपाणी असतं तर एक असो. ही साय ! तुम्हांला काय ? झाल लेंकीकड, पण आम्हांला आमच्या मुलाचं हित पाहिलं पाहिजे. "

ती परकी बाई या धुमधडाक्यानें, एखाद्या ज्वालाग्राहीच्या स्फोटानें एखादा पदार्थ दूर फेंकला जावा त्याप्रमाणें, चटकन् चालती झाली. आणि माई ? त्यांना डोक्यावर जणूं अग्निवर्षाव होत आहे असें वाटलें. त्यांचे अश्रु सुकून

गेले, रक्त जळून गेलें, आणि एखादें निर्जीव सुकलें पान वावटळीच्या हेलकाव्यानें हवेंत गिरक्या घेऊन दूर जाऊन पडतें त्याप्रमाणें कोलमडत, कांपत त्या अंथरुणावर येऊन पडल्या. बराच वेळ त्या भ्रान्तचित्त होत्या. नंतर हळू हळू त्यांचें विचारचक्र सुरू झालें.

दत्तकपुत्र आणि त्याचे आईबाप यांनीं चटसारें आपलें घर आंवरून आपणास दिल्या अन्नाची धनीण करून ठेविलें आहे. जो प्रश्न मृत्युशय्येवर असतांना मोठया दूरदृष्टीनें व कसोशीनें आपल्या पतीनें सोडविला होता तो याप्रमाणें विफल झाला आहे असें त्यांना दिसून आलें. ज्याच्यावर आपला दाब राहील, आपल्या अनुग्रहाबद्दल जो सदैव आपला ऋणी राहील अशी अंतकाळीं पतीची कल्पना त्याच्याच अनुग्रहार्चा अपेक्षा करीत काळ कंठणें आपल्या भाळीं आलें या विचाराचें दुःख असह्य वाटून त्यांनीं आपल्या कपाळावर हात मारून घेतला. ज्याच्याबद्दल आपणास आंतड्याची ओढ नाहीं, हृदयाला ओलावा नाहीं त्याला आपलें अगत्य न वाटणें साहजिकच होतें. परंतु ज्या पदावर आपण त्याची स्थापना केली त्याबद्दल माणुसकीला धरून निदान त्यानें कृतज्ञ तरी असायला पाहिजे होतें ! कशा कश्शावर आपली सत्ता राहिली नाहीं. हातानें उचलून कांहीं घेईन कीं कुणाला देईन म्हटलें तर ती सत्ता नाहीं. हाय हाय ! स्वतांच्याच घरांत मालकिणीला मोलकरणीची कळा यावी ना ? जिथें आपल्या नुसत्या नजरेनें चार माणसें वाकत होतीं तिथें आपणासच दुसऱ्याच्या इच्छेच्या तालावर चालावें लागावें ! जिथें फुलें वेंचलीं तेथें गोंवऱ्या वेंचण्याची पाळी यावी ? हायरे देवा ! यापरता दैवदुर्विलास तो कोणता ? ”

दुःखानें माईचें हृदय फुटण्याच्या बेतास आलें. आपलें दारुण दुःख मुलीला सांगून हलकें करावें व तिचाहि दुःखभार अंशतः कमी करावा याकरितां ताबडतोब मुलीकडे जावें अशी त्यांना प्रबळ इच्छा झाली. ज्या दिवशीं आपल्या सौभाग्याचा आधार गेला त्याच दिवशीं आपण खऱ्या निराधार झालों. आतां हें सर्व सोडून जगांतील आपला एकच आधार अशी मुलगी, तिच्याकडेच सांत्वनाच्या शब्दासाठीं धांव घ्यावी असें वाटणें साहजिकच होतें. परंतु आपण दुःखी असतां विहिणीकडून वास्तपुस्तहि झाली नाहीं; कीं तिनें आपल्या

भेटीला मुलीलाहि पाठविलें नाहीं; अशा स्थितींत निमंत्रणाशिवाय आपल्या पायीं चालून जाणें कितपत योग्य होईल याचा त्यांना विचार पडला.

परंतु दैवानें-किंवा रत्नप्रभेच्या दुर्दैवानें तो विचार दीर्घकाल टिकला नाहीं. विहिणीकडून शुभ किंवा अशुभ वार्तेसाठींच पत्रव्यवहार होत असे. आजपर्यंत एकदांच-रत्नप्रभेचा सोहळा करण्यासाठींच-फर्मानवजा पत्र आलें होतें. त्यावर बऱ्याच वर्षांनीं आज पुन्हां पत्र आलें होतें. माईंना वाटलें, मुलीला पुत्रप्राप्ति झाली असेल. कारण अकारण पत्र लिहिण्याचें प्रयोजन विहिणीला पडणेंच शक्य नव्हतें. त्यांनीं मोठ्या अधीरतेनें पत्र वाचावयास घेतलें. परंतु त्यांत पौत्रप्राप्तीचा शुभ संदेश नसून जामात-निधनाची अशुभवार्ता होती!

बिचाऱ्या माई! दुःखानें खचून गेल्या. अपत्यप्रेमापुढें मानापमानाचा प्रश्न त्यांना गौण वाटला. दागिन्यांचा डबा व थोडीं चांदीचीं भांडीं, ज्यावर दत्तकाचा डोळा अद्यापि फिरला नव्हता, असा एवढाच जिवाभावाचा कुणगा एका लहानशा गांठोड्यांत बांधून त्यांनीं रत्नपुरीं प्रयाण केलें. पुष्कळ वर्षांनीं शेवटीं अशा स्थितींत मुलीची भेट झाली याचें माईना वाईट वाटलें. आतांशा बाळासाहेब तिच्याशीं प्रेमानें वागूं लागले होते हें ऐकून तर त्यांचें दुःख द्विगुणित झालें.

रत्नप्रभेच्या सासूनें दुःखाच्या पहिल्या झटक्यांतच काय तें मौन स्वीकारलें होतें. नंतर इतके दिवस दबून राहिलेल्या तिच्या क्रोधानें जोरानें पेट घेतला; आणि त्याचें पर्यवसान एकाच वाड्यांत दोन मुदपाकखान्यांत दोघींचा निरनिराळा स्वयंपाक होऊं लागण्यांत झालें!

— ५ —

"ऐकलंस का रतन?"

माई अगदीं रडकुंडीस येऊन बोलत होत्या.

"काय तें?"

"आज वाड्यांतून ती कोणशी केसरी दासी गुलाबीकडे आली होती."

"बरं, मग?"

"ती म्हणत होती, तुझी सासू—"

रत्नप्रभेनें प्रश्नार्थक मुद्रेनें नुसतें आईकडे पाहिलें.

"तुझी सासू दत्तक घेणार आहे म्हणे. तसा तिनें अर्ज केला आहे."

माईना वाटलें होतें, ही बातमी ऐकून मुलीला पराकाष्ठेचें दुःख होईल. परंतु तसें कांहीं न होतां तिनें थंडपणानें उत्तर केलें.

" घेईनात बापड्या. "

" घेईनात काय ? "

" दत्तक. "

" अग वेडे, तिनं दत्तक घेतला तर तुझी गत काय ? तूं काय जन्माची दुःखी अन् परस्वाधीन राहणार ? "

मुलीनें थोडीशी हातांची चाळवाचाळव केली आणि आईकडे खिन्नपणें पाहिलें. जणूं काय आजपर्यंत आपण जें दुःख भोगीत आलों आहों त्यापेक्षां अधिक तें आणखी काय असणार आहे, असाच त्या दृष्टीचा अर्थ होता.

माई पुढें हलक्या आवाजांत म्हणाल्या,

" तिचं काय आतां ? दस गेले पांच राहिले म्हटलं तरी आणखी पांच पंचवीस वर्षं पुरेलच तुझ्या जन्माला ! त्यापुढें आणखी तिच्या दत्तकाचा कांच पुरणार. मिळून सुखाची घडी अशी नाहींच तुला जन्मांत ! "

" हं " रत्नप्रभेनें उद्‌गार काढला. त्याचा अर्थ जणुं काय ' दैव आपलं ' असाच होता. निदान माईनीं तरी तसाच केला. त्या म्हणाल्या,

" असं दैवाला दोष देत बसून कसं चालेल बाळ ? "

" त्याशिवाय आपल्या हातीं काय आहे ? "

खिन्नपणें रत्नप्रभा म्हणाली.

" असं हरीवर हवाला टाकून काय होणार ? प्रयत्न केला पाहिजे. "

रत्नप्रभा आईकडे करुण दृष्टीनें पहात राहिली. लांबत चाललेल्या अप्रिय संभाषणप्रसंगांतून तिनें आपणाला मुक्त करावें, यासाठीं थोडक्यांत ती म्हणाली,

" कशासाठीं अन् काय प्रयत्न करणार ? जाऊं दे तें. "

उठत असलेल्या मुलीचा कृश हात धरून तिला खालीं बसवीत माई म्हणाल्या, " जाऊं दे कसं ? तुला आपलं हित कळत नाहीं. पण मला कसं बघवेल ? तिला तूं हरकत केली पाहिजे. खरं म्हणजे तिनं दत्तक घ्यायचा नाहीं. दत्तक तूं घ्यायचा—"

" काय मी ? "

आश्चर्यानें चमकून ती थोडी दूर सरली, आणि चकित दृष्टीनें आईकडे पाहूं लागली. आपली आई शुद्धींत नसावी असेंच तिला वाटलें. कारण ती आली तेव्हां दत्तकामुळें आपली झालेली दुर्दशा तिनें इतक्या विशदपणें मुलीला सांगितली होती कीं, ती करुण कहाणी ऐकून दत्तकाच्या नांवाचा तिला तिटकारा वाटूं लागला होता. असली त्रासदायक उपाधि आपल्यामागें लावण्याची गोष्ट आपली आई काढील अशी कल्पना तिच्या स्वप्नांतहि आली नसती. ती प्रत्यक्ष तिच्या आईनें उच्चारली असतां ती शुद्धींत नसेल असें तिला वाटल्यास आश्चर्य काय ? आईनें होकारार्थी मान हालविली तें पाहून ती कंपित स्वरानें म्हणाली, " आई ! "

" रतन ! समजलें मी, पण बाळ, जन्मभर तूं लोकांच्या ओंजळीनेंच पाणी पिणार काय ? पोरी, सात नवसांनीं झालेली एकुलती एक तूं. तुझ्या सुखासाठीं कोण धडपड केली, पण तुला कधींच सुख लागलं नाहीं. दुःखासाठींच माझी बाळ जन्मास आली काय ? "

बोलतां बोलतां त्यांचा स्वर सद्गदित झाला, आणि एखाद्या आंतून ओल्या असलेल्या जखमेला कोणी धक्का लावला असतां जशा खोल तीव्र वेदना होतात तसें रत्नप्रभेला झालें.

तिला दुःखाचा मोठा हुंदका आला. वेगानें पडणारे अश्रु लपविण्यासाठीं तिनें आईच्या कुशींत आपलें तोंड लपविलें. एकमेकींना कवटाळून त्या किती वेळ तरी रडत होत्या. अशा तऱ्हेनें पुष्कळ वेळ गेल्यानंतर त्यांचीं हृदयें कांहींशीं हलकीं झालीं. माई आत्यंतिक मृदु स्वरानें म्हणाल्या,

" बये, तूं स्वस्थ रहा. मी स्वतः राणीसाहेबांना भेटून त्यांना नीट समजावून सांगेन. "

" आई, कशाला हा उपद्व्याप ? तैनात तोडून घेतली म्हणजे झालं, आपल्याला असं काय लागणार ? "

" तैनात ही आहेच. पण असं बघ, तिनं दत्तक घेतला तर त्याच्या हातींच सारीं सत्ता नाहीं का जाणार ? तोच तूं दत्तक घेतलास तर तिचा वडिलकीचा मान कायमच राहील. शिवाय राणीसाहेबांना मुलगा नाहीं. कदाचित् पुढें मागें त्यांनाहि दत्तक-दैव आपलं, बाळासाहेब असते तर त्यांनाच राजयोग आला असता. " आपलें अंग शहारल्यासारखें करून रत्नप्रभा म्हणाली,

" आई, कशाला बरं ही नसत्याची उठाठेव ? अन् आजची भ्रांत तिथं उद्याचं तरी कुणीं पाहिलं ? "

मुलीचा निराशावाद माईंना रुचला नाहीं. त्यांच्या दूरदृष्टीला त्यांची मुलगी राजमातेच्या वैभवानें नांदणें शक्य आहे असें दिसत होतें.

मनुष्यस्वभावाची हीच गंमत असते. स्वतःच्या घराची व्यवस्था नीट राखण्याची पात्रता जरी नसली, तरी गांवच्या कारभाराची उठाठेव करण्याची हांव मात्र बहुतेकांना असते. दुधानें तोंड पोळलें असतां ताक फुंकून प्यावें म्हणतात. परंतु हीं पुराणांतलीं वांगीं पुराणांतच रहातात. माईहि याला अपवाद नव्हत्या. दत्तकाच्या बाबतींत त्यांना नुकताच कटु अनुभव आला होता तरी मुलीनें दत्तक घ्यावा असें त्यांना मनापासून वाटत होतें. याकरितां जारीनें खटपटीस लागून मुलीचें मन त्या जोरानें वळवीत होत्या. आपली गोष्ट बिघडली याचें कारण त्यांच्या मतें असें होतें कीं,

आपलें कोणी पहाणारें नव्हतें. परिस्थितीमुळें आपलें स्वतःचें आपल्या कारभाराकडे दुर्लक्ष झालें. तसें मुलीच्या बाबतींत होणार नाहीं.

जबर किंमत देऊन आपण नुकताच अनुभव विकत घेतला आहे. त्याचा उपयोग करून मुलीचें खडतर झालेलें आयुष्य यापुढें तरी शक्य तितकें सुखावह होईल असें आपणास करतां येईल.

मुलीचें मन वळवून अगदीं गुप्त रीतीनें त्यांनीं राणीसाहेबांची भेट घेतली; आणि विहिणींच्या ऐवजीं मुलीला दत्तकाची परवानगी मिळणें किती इष्ट आहे, तें मुद्देसूद रीतीनें त्यांच्यापुढें मांडून त्यांना पटवून दिलें. सुशील रत्नप्रभेला वाईट रीतीनें वागविलें जात आहे हें ठाऊक असल्यामुळें आधींच राणीसाहेबांना तिच्याविषयीं सहानुभूति वाटत असे. त्यांत तिच्यावर अकालीं ओढवलेल्या वैधव्यामुळें अनुकंपेची भर पडली; आणि माईंनीं आंतड्याच्या कळवळ्यानें तिच्या पुढील खडतर आयुष्याचें जें हृदयद्रावक चित्र रेखाटलें त्यामुळें द्रवून तिच्याविषयीं अवश्य विचार करण्याचें त्यांनीं कबूल केलें.

शेवटीं राणीसाहेबांच्या वजनानें म्हणा किंवा कायद्याच्याच आधारानें म्हणा, दरबारकडे आलेल्या सासूसुनांच्या अर्जांपैकीं रत्नप्रभेच्या अर्जाला मंजुरी मिळून सासूचा अर्ज फेटाळला गेला.

माईच्या महत्त्वाकांक्षी मनाला मोठें समाधान वाटलें. आपण मोठें कर्तृत्व

करून दाखवूं, असें करूं, तसें करूं असें मनोराज्य त्यांच्या अंतर्यामांत चाललें होतें. जणुं काय बाह्य मनांतले विचारसुद्धां कोणाला कळतील आणि त्यांना दृष्ट होईल असें वाटून मुलीशींसुद्धां त्यांचा उच्चार करायला त्या भीत होत्या. परंतु काळाच्या काकदृष्टींतून कांहींसुद्धां दडून राहूं शकत नाहीं, हा साधा विचार न सुचण्याइतकें अज्ञान पाहून दैव मात्र विकट हास्य करीत होतें!

एके रात्रीं जेवणानंतर दूध प्याल्यावर रत्नप्रभेला अस्वस्थता वाटूं लागली. आणि ती क्रमाक्रमानें वाढत गेली.

ती हकीकत कळतांच तिच्या सासूबाई समाचारास आल्या आणि सुनेचें वाढतें दुखणें पाहून मोठ्या अगत्यानें औषधोपचाराची व्यवस्था त्यांनीं करविली. परंतु रत्नप्रभेची प्रकृति जास्तच विकोपास गेली. 'आग, पोटांत आग होते' असें एकच वाक्य कष्टानें व केविलवाणीनें ती बोलत होती.

शेवटीं तिच्या वेदना इतक्या वाढल्या कीं तिचे ते होत असलेले हाल पाहून असे हाल सोसण्यापेक्षां देवानें तिला त्यांतून एकदम मुक्त तरी करावें अशी नकळतच माईनीं प्रार्थना केली, आणि ती देवानें ऐकलीहि. पहाट होण्यापूर्वीं रत्नप्रभेचें प्राणोत्क्रमण झालें! माईची बुद्धि बहिरून गेली. झालें काय हें कळायला त्यांच्या बुद्धीला बराच ताण पडला. शेवटीं मुलीच्या काळवंडलेल्या शवाकडे पाहून त्या जोरानें ओरडल्या—

"विष घातलंग बाई माझ्या बाळीला विष!" लगेच त्यांना एका खोलींत कोंडण्यांत आलें.

— ६ —

त्यांना जेव्हां जागृति आली तेव्हां वाड्यांतील नेहमींच्या भागांत आपण नसून बाहेरच्या भागांत आहोंत असें त्यांना आढळून आलें. आपण बाहेर कशा, याची संगति त्यांना लागेना. त्यांनीं डोक्यावरून हात फिरविला; कावऱ्याबावऱ्या नजरेनें सभोंवार पाहिलें. नंतर कष्टानें उठून त्या आंत जाऊं लागल्या. तेव्हां दारावरील पहारेकरी त्यांना हटकून म्हणाला,

"कुठं चाललां? आंत जायचं नाहीं, दिसत नाहीं का सरकारी सील!" माईनीं सभोंवार पाहिलें. नेहमींचे दरवाजे बंद असून कुलपांवर सीलें होतीं.

"हाय हाय रत्नाबाई! मला म्हातारीला सोडून कुठंग गेलीस? माईनीं हंबरडा फोडला.

" त्या गेल्या देवाकड, तुम्हीं जा आतां आपल्या घराला." पहारेकरी बेगुमानपणें म्हणाला.

प्राणाधिक कन्या, घरदार व बरोबर आणलेला जिवाभावाचा कुणगा या सर्वांना आपण एकदमच अंतरलों या जाणिवेनें माईच्या डोक्यावर जणुं वज्राघात झाला; त्यांच्या डोळ्यासमोर काजवे चमकूं लागले, डोकें गरगरूं लागलें व त्यांनीं एकदम धरणीवर आंग टाकलें !

# परिमार्जन.

एका सिंगल कॉटवर एक चिमुकली मुलगी निजली होती, व एक पारशी डॉक्टर तिच्या छातीची परीक्षा करीत होते. परीक्षा करण्याकरितां अंगावरलें पांघरूण काढलें असल्यामुळेंच तिचा अस्थिपंजरवत् देह दृष्टोत्पत्तीस येऊन तिच्या रुग्णावस्थेची यथार्थ कल्पना करतां येणें शक्य झालें होतें. नाही तर ती लठ्ठ दुलई तिच्यावर घातली असतांना नुसती मुद्राच पाहून ती लहान मुलगी इतकी आजारी असेल अशी कल्पना तज्ज्ञाशिवाय इतरांस येणें कठिण होतें. कारण तिचे डोळे फार तेजस्वी होते, आणि ते फार चपळतेनें सभोंवार फिरत असत. तिचे गाल जरा फुगीर असून आरक्त दिसत. त्यामुळें वास्तविक दर क्षणास शरीरांतील रक्ताचा सांठा कमी होत असतां कोणत्याही स्न्हेच्या विकारलहरींचें उत्तेजन मिळतांच तिच्या कपोलांवर लाली चढवून तो फसवा राग दुष्ट माणसाप्रमाणें तिच्या वडील बहिणीची दिशाभूल करीत होता!

कित्येक महिने औषधोपचार करूनहि गुण न आल्यानें तिनें आज मोठ्या डॉक्टरला आणलें होतें. तपासणी चालू असतां रुग्ण मुलीचे डोळे डॉक्टरवर स्थिर झाले होते, आणि तिच्या बहिणीचे डोळे एखाद्या भयभीत हरिणीप्रमाणें बहिणीच्या छातीवरून डॉक्टरच्या मुद्रेवर आळीपाळीनें फिरत होते. डॉक्टरांची मुद्रा मात्र निर्विकार होती. परीक्षा संपतांच ते आपल्याशींच पुटपुटले, "पुअर गर्ल!" नंतर त्यांनीं यथाविधि हस्तप्रक्षालन केलें आणि तें करीत असतां त्या तरुण मुलीस उद्देशून ते म्हणाले,

"तमे दवा त लइ केले. पन दवाशी हवाची असर ज्यास्ती हाय. समझ्या? दवा नाय गुन करेल इतका हवा करेल. तेला हवावर घेऊन जा. हवाफेर करा, समझ्या? एटला दिवस तुमाला कोनी डॉक्टरनी नाय सांगितला?"

तरुणीला या मिश्र भाषेचा अर्थबोध व्हायला थोडा वेळ लागला तरी बहिणीला वांचविण्याला कठिण कां होईना पण कांहीं उपाय आहे या जाणिवेनें

तिला हायसें वाटलें. ती अडखळत अडखळत म्हणाली, "हवेवर नेल्यानं बरं वाटेल?"

"हां." त्यांनीं होकारार्थी मान हालविली.

"कुठली हवा बरी पडेल? आमच्या कोंकणांत नेलं तर चालेल का?"

"नो, नो. कोंकनची हवा तद्दन खराब. तेमा मॉइश्चर ऱ्हाते. ते सिवा दुसरी कोईबी जग्या घेऊन जाव. माथेरान, पांचगनी, देवलाली कोईबी ठेकाने जाव. पन ड्राय प्लेसपर जाव. समझ्या?" आपली हॅट उचलून डॉक्टर चालूं लागले. तरुणी त्यांची बॅग घेऊन दाराशीं गेली. बॅग व टांगाभाडें गाडीवाल्याच्या स्वाधीन करून डॉक्टरची फी तिनें त्यांच्या स्वाधीन केली. ती निष्काळजीपणानें पॅन्टच्या खिशांत कोंबून ते चटकन् गाडींत जाऊन बसले.

बिचारी तरुणी! ती एक उत्कृष्ट लेखिका होती. आपल्या काव्य–कथांतील नायकनायिकांना तिनें अनेकदां उंच हवेच्या ठिकाणीं नेऊन सहजपणें आरोग्य-प्राप्ति करून दिली होती, परंतु आईनें मरतांना स्वतःची अमूल्य ठेव म्हणून विश्वासानें स्वाधीन केलेल्या लाडक्या बहिणीला मात्र प्रत्यक्ष हवेवर नेणें तिला कठिण होऊन बसलें होतें! या आपल्या सामर्थ्यहीनतेबद्दल विचार करीत तो उभी असतां, "ताई, ए ताई ग" अशी त्या रुग्ण मुलींची कोमल परंतु केविलवाणी हांक तिच्या कानीं आली. तेव्हां दचकून ती तिच्या कॉट-जवळ धांवत आली, आणि तिचे केंस मागें सारीत अत्यंत वात्सल्यपूर्ण स्वरानें म्हणाली, "काय पाहिजे माझ्या बाळाला? दूध देऊं का थोडं? का मुसंबीं घेतेस बेबी?

बेबी तोंड वाईट करून म्हणाली,

"कांहीं नको. दुधाचान् साऱ्याचा अगदीं कंटाळा आला आहे. पण ताई, डॉक्टर काय म्हणाले ग?"

मृदुपणें तिला थोपटीत व कृत्रिम हास्य करित ती म्हणाली,

"डॉक्टर म्हणाले, बेबीला बाहेर गांवीं न्या; म्हणजे बेबी लौकर बरी होईल. आमची बेबी आतां बरी होणार, पुन्हां शाळेंत जाऊं लागणार, अन् शिकून मोठी डॉक्टरीण होणार, बरं का."

बहिणीचा हा अकालविनोद बेबीला फारसा मानवला नाहीं. ओंठांना ना-पसंती दाखविणारी मुरड देऊन ती म्हणाली,

" बाहेर गांवीं जायचं म्हणाले ? "

" हो, कां बरं ? "

" नाहीं, मलासुद्धां या खोलीचा न् खाटेचा कंटाळा आलाय अगदीं. कुठं तरी नव्या ठिकाणीं जावं असं मलासुद्धां वाटतं. "

तिला कुरवाळीत ती म्हणाली, " हो का ? मग खरंच जाऊं हं बाहेर-गांवीं. मग बेबीला माझ्या अगदीं लौकर छान बरं वाटेल. "

रोजच्या एकच दिनक्रमाला कंटाळलेल्या बेबीला बाहेर गांवीं जायला मिळेल ह्या आनंददायक आमिषानें थोडा हुरूप आला. थोडें दूध घेऊन ती झोंपीं गेली.

इन्दिरेला-तिच्या बहिणीला-मात्र रात्रभर झोंप आली नाहीं. बहिणीला हवेवर कसें नेतां येईल ही एकच एक विवंचना तिचे हृदयाला लागून राहिली होती. बापाच्या मृत्यूनंतर मिळालेले विम्याचे पैसे गृहसंसारास, स्वतःचें शिक्षण व आईचा आजार व मृत्यु यांत केव्हांच पार झाले होते कोणाचा आधार नाहीं अशा स्थितींत शिक्षकिणीची नोकरी हें एकच उपजीविकेचें साधन तिंला होतें. पण लहान मुलीला आजारी टाकून अलीकडे तिला नोकरीवर नियमानें जाणें अशक्य झालें होतें. याचाहि परिणाम आर्थिक परिस्थितीवर होऊन तिच्या चिन्तेंत भर टाकीत होता.

लहानपणापासून वाचन-लेखनाची तिला आवड होती. फावल्या वेळीं केवळ हौसेनें ती लेखनव्यवसाय करी. तिच्या लिखाणांत जिवंतपणा असल्या-मुळें ही लहानगी लेखिका वाङ्मयक्षेत्रांत चांगलीच चमकून तिनें रसिकांचें लक्ष आपणाकडे वेधून घेतलें. तिच्याविषयीं कुतूहलयुक्त जिज्ञासा लोकांत जागृत झाली. तिच्या गोष्टी ज्यांत प्रकाशित होत त्या नियतकालिकाच्या संपादका-कडे तिच्याविषयीं चौकशी होऊं लागली. परंतु तिला गर्वानें गांठूं नये या स्तुत्य उद्देशानें त्यांनीं तिला त्या गोष्टीची आजपर्यंत जाणीव होऊं दिली नाहीं! खालावलेल्या परिस्थितीमुळें समव्यवसायी व इतर मंडळींचा परिचय होणें दुरापास्तच होतें. यामुळें बिचारी इन्दिरा स्वतःबद्दलच्या लोकमताविषयीं अज्ञात व आपलें तुटपुंजें लिखाण प्रसिद्ध करीत असल्याबद्दल उलट संपाद-कांचे उपकार मानीत राहिली होती. त्या उपकारांची अंशतः फेड म्हणूनच कीं काय तिनें नुकतीच एक छोटीशी स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहून

संपादकांच्या स्वाधीन केली होती. सदरहू कथानकाची किंमत वाङ्मयांत काय होईल याची जाणीव संपादकांना होती. तथापि तसें न दाखवितां केवळ एका होतकरू मुलीला उत्तेजन देण्याकरितां व स्त्रीदाक्षिण्यामुळें हें साधारण प्रतीचें लेखन आपल्या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध करण्याचें आपण कबूल केलें असेंच ते दर्शवीत.

आपल्या लिखाणास मोबदला मिळावा व त्यायोगें आपल्या हलाखीच्या परिस्थितींत आपल्याला कांहीं मदत व्हावी असें तीस वाटत असूनहि भीड, भय व आत्मविश्वासाचा अभाव यांमुळें संपादकाजवळ कांहीं मागण्याचें धैर्य तिला झालें नव्हतें. परंतु बहिणीच्या अत्यवस्थ स्थितींत हवापालट हा एकच उपाय उरल्यामुळें तिनें त्यांजकडे द्रव्यसहाय्य मागण्याचें ठरविलें. ती जेव्हां संपादकमहाशयांच्या ऑफिसांत गेली तेव्हां त्यांनीं तिची त्वरित भेट घेतली. त्यांना वाटलें एखादें नवीन लिखाण प्रसिद्धीसाठीं आणलें असेल. परंतु तिच्या आगमनाचा उद्देश जेव्हां त्यांना कळला तेव्हां ते हंसून म्हणाले,

"तुम्हांला काय वाटतं ? आपण कोण बड्या साहित्यसम्राज्ञी आहांत असेंच ना ? अहो, विचारतो कोण तुमच्या या साधारण लेखांना ! उगाच आपलं होतकरू आहांत, द्यावं उत्तेजन म्हटलं लेखांना स्थळ देऊन, तर तुमची आपली भलतीच कल्पना होत चालली स्वतःबद्दल ! घेऊन जा आपलं तें बाड. आम्हांला त्याची जरूर नाहीं !"

बिचारी इंदिरा ! हे अपमानास्पद उद्गार ऐकून त्वेषानें लाल झाली. अशा एखाद्या कथाप्रसंगांत नायिकेच्या तोंडीं तिनें समर्पक उत्तरें उपयोजिलीं असतीं; परंतु प्रत्यक्ष स्वतःवरच्या या प्रसंगीं दारुण निराशेमुळें व भिडस्त स्वभावामुळें तिचे ओंठ थरथर कांपूं लागले. ती कांहींच उत्तर देऊं शकली नाहीं.

* * *

"ताई ! कधीं जायचं आपल्याला ? मिळाले पैसे ?"

आपली बहीण संपादकाकडे द्रव्यसहाय्य मागण्यास गेली होती हें बेबीला माहीत होतें. ती आल्यावर क्षीण स्वरांत तिनें बहिणीला वरील प्रश्न केला. प्रश्न विचारतांना तिच्या मुद्रेवरील उत्कट उत्सुकता पाहून इंदिरेला तीक्ष्ण शस्त्र बोंचल्यासारखें वाटलें. आपली विव्हळता लपवून ती म्हणाली,

"मिळाले नाहींत अजून; पण लौकरच मिळतील."

मृत्यूशीं झगडणारा तो असहाय जीव आपल्यावर विश्वास ठेवून असतां त्याची अशी वंचना करतांना इंदिरेला कमालीचें दुःख होत होतें. परंतु एखाद्या आकस्मिक आनंदाच्या आघातानें किंवा निराशेच्या धक्क्यानें तिच्या प्राणावर बेतेल ही डॉक्टरांची महत्त्वाची सूचना लक्षांत असल्यामुळेंच तिला तिची अशी फसवणूक करावी लागत होती.

" ताई, माझा तुला त्रास होतो का ग ? "

" मुळींच नाहीं. कुणीं सांगितलं तुला ? "

" आई म्हणाली, ताईला त्रास देऊं नको. तूं माझ्याकडे ये. "

इंदिरा मनांत चरकली. परंतु तसें न दाखवितां म्हणाली, " कांहींतरी स्वप्न पडलं असेल तुला. त्याचा विचार करूं नये. "

" पण मला खरंच आईकडे जावंसं वाटतं. "

" हें काय ? माझा कंटाळा आला का तुला ? "

बोलतां बोलतां इंदिरेचा स्वर सद्गदित झाला. कमालीच्या प्रयत्नानें अश्रु आवरून तिनें बहिणीची समजूत घातली. परंतु तिच्या हृदयाचा सारखा थरकांप होत होता. अगतिकपणाचें दुःख तिला अधिकच जाणवूं लागलें. त्या रात्रीं तिला झोंप लागली नाहीं.

आणखी कांहीं दिवस गेले. पैसा मिळविण्याच्या प्रयत्नाला यश न आल्यामुळें डॉक्टरांनीं सांगितलेला हवा पालटण्याचा शेवटचा उपाय करून पहाणें शक्य झालें नाहीं. त्यामुळें बेबीची प्रकृति अधिकच विकोपास जाऊन तिनें या नश्वर जगाचा निरोप घेतला. बिचारी इंदिरा ! निराशानलांत होरपळत असतां दैवानें अथांग दुःखसागरांत लोटून दिल्यासारखें तिला वाटलें.

\+ × +

दुसऱ्या दिवशीं एक तरुण चाळीचे मजले चढून इंदिरेचा पत्ता विचारीत तिच्या घरीं आला. इंदिरा शोकमग्न असतांहि तिनें त्याची चौकशी केली. तो आपला परिचय करून देतांना म्हणाला,

" मी ' स्वस्तिक ' मासिकाचा व्यवस्थापक— "

त्याला पुरतें बोलूंहि न देतां कडवटपणानें इंदिरा म्हणाली,

" मला त्या मासिकाशीं अन् संपादकव्यवस्थापकांशीं कांहीं कर्तव्य नाहीं."



“मला त्या मासिकाशीं अन् संपादकव्यवस्थापकांशीं कांहीं कर्तव्य नाहीं.”



" आपल्याला पैशाची जरूर होती ना ? परवां मामांशीं असं बोलतांना मीं ऐकलं होतं आपल्याला; म्हणून-- "

वेगानें ओघळणारे अश्रु टिपीत सद्गदित स्वरानें ती म्हणाली,

" होती, पण आतां ती संपली. "

" मित्रभावानें आपणांस थोडी मदत करावी म्हणून मी हे थोडे पैसे-- ".

" नको, दोनचार दिवसांपूर्वी शत्रूनें केलेली मदतसुद्धां मीं स्वीकारली असती. "

" म्हणजे कांहीं विशेष होतं वाटतं ? "

इंदिरेचे अश्रु अनावर झाले. हुंदक्याशिवाय तिच्याकडून कांहींच उत्तर येईना. गोंधळलेल्या मनःस्थितींत तो तरुण उठला आणि म्हणाला,

" झाली तर कांहीं मदत करावी म्हणून आलों होतों. पण माझ्याकडून आपल्याला त्रासच झाला. "

मोठ्या शिकस्तीनें दुःख आवरून थोड्या वेळानें ती म्हणाली,

" तसं कांहीं नाहीं. जिच्यासाठीं पैशाची जरूर होती ती माझी बहीण कालच मला सोडून गेली. वेळींच मदत मिळाली असती तर कदाचित् तिला वांचवितां आलं असतं. "

अरेरे ! फारच वाईट गोष्ट झाली. मला वेळेवर आपल्या उपयोगीं पडतां आलं असतं तर फार बरं झालं असतं. या बाबतींत मामांशीं माझा किती तरी वाद झाला. शेवटीं मतभेद कायम राहून कडाक्याचें भांडण झालें; आणि कामावरून व घरांतूनहि त्यांनीं मला घालवून दिलें. "

" आं ? माझ्यासाठीं तुम्हांला इतका त्रास झाला ना ? "

या वेळीं तिनें त्या तरुणाकडे निरखून पाहिलें. तो सुंदर व तेजस्वी दिसत होता. सरलत्व आणि औदार्यबुद्धि हे भाव त्याच्या मुद्रेवर प्रतिबिंबित झालेले दिसत होते. तो विनयानें म्हणाला,

" तसं कांहीं नाहीं. न्यायासाठीं भांडणं हें माझं कर्तव्यच होतं. "

प्रत्यक्ष परिचय नसतां आपल्यासाठीं मामाशीं भांडून स्वतःचं नुकसान न्यायासाठीं करून घेणाऱ्या त्या तरुणाच्या सुशीलपणाबद्दल इंदिरेला आदर वाटला. प्रथमच तुसडेपणानें बोलल्याबद्दल आतां तिला थोडा खेदहि वाटला. परंतु ती कांहींच बोलली नाहीं. तरुणानें तिचा निरोप घेतला.

इंदिरेला त्या भयाण खोलींत आतां करमेना. तिला अगदीं एकटें एकटें वाटूं लागलें. बहिणीच्या शुश्रूषेंत जाणारा वेळ आतां तिच्या आठवणी काढून शोक करण्यांत जाऊं लागला. याचा परिणाम तिच्या प्रकृतीवर वाईट होईल; तेव्हां तिनें थारेपालट करावा अशी डॉक्टरांनीं आग्रहाची सूचना केली. कंटाळल्यामुळें तिनेंहि ती मान्य केली. पगार हातीं येतांच महिन्याची रजा घेऊन ती कोंकणांत मैत्रिणीकडे जावयास निघाली.

आगबोटींत ती दुसऱ्या वर्गातील बाकावर एका कोंपऱ्यांत बसली होती. थोड्याच वेळांत तेथील सर्व जागा प्रतिष्ठित प्रवाशांनीं व्यापून टाकली; आणि

दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ज्या संपादक महाशयांचें मुखावलोकनहि ती करू इच्छित नव्हती, ते श्रीयुत महाशब्दे त्या मंडळाच्या अग्रभागीं होते ! सर्व मंडळी आपणाकडे पाहून कुजबुजत आहेत हें इंदिरेच्या लक्षांत येऊन तिला अस्वस्थता वाटूं लागली. ती समुद्राकडे तोंड करून बसली. इतक्यांत मंडळींतील दोन स्त्रिया तिच्याकडे येऊन म्हणाल्या,

" आपलंच नांव इंदिराबाई शहाणे काय ? आम्हांला महाशब्यांनीं सांगितलं. "

इंदिरा गोंधळली. हा शनि अद्याप कां आपल्या पाठीस लागला आहे. याला हा उपद्व्याप सांगितला कोणीं, असें तीस वाटलें. शिष्टाचारार्थ स्मित करून तिने होकारार्थी मान हालविली.

" आपल्या भेटीनं किती पण आम्हांला आनंद झाला ! "

दुसरी म्हणाली, " आपले लेख आम्ही नेहमीं वाचतों. आम्हां सगळ्यांना ते फार आवडतात. "

पहिली म्हणाली, " अन् नुकत्याच सुरू झालेल्या कादंबरीचीं प्रसिद्ध झालेलीं दोन प्रकरणं किती पण छान आहेत ! "

इंदिरेच्या तोंडावरील दुःखाचे पटल क्षणभर दूर झालें. स्वतःची स्तुति ऐकून तिची मुद्रा लज्जेनें लाल झाली. हळूहळू संपादकांशिवाय सर्व मंडळी तिच्याभोंवतीं जमली. प्रत्येकानें तिच्या आकस्मिक भेटीबद्दल आनंद व्यक्त करून लेखनाबद्दल गौरवयुक्त उद्गार काढले.

महाशब्यांचे सहानुभूतिशून्य वर्तन कोणीकडे व या प्रतिष्ठित मंडळींचें गौरवयुक्त अभिनंदन कोणीकडे ? इंदिरा त्या आनंदी वातावरणांत आपलें दुःख व महाशब्यांचे अस्तित्व क्षणभर विसरली. जिची आपण नेहमीं उपेक्षा करीत असूं तरी आपल्यामुळेंच जिची प्रसिद्धि झाली त्या इंदिरेचा आपल्यासमक्ष सर्वांनीं गौरव करावा, परंतु आपल्या अस्तित्वाचा मात्र मंडळींना विसर पडावा या जाणिवेनें महाशब्यांची मुद्रा मोठी प्रेक्षणीय झाली होती ! ते आपण होऊन म्हणाले, " काय ? साहित्यसंमेलनालाच ना ? "

" नाही. मी दापोलीला जाणार आहें. "

" कां ? आपल्यासारख्यांनीं अशा संमेलनाला तर अवश्य हजर राहिलं पाहिजे. "

इंदिरा यावर कांहींच बोलली नाहीं.

*  *  *

मैत्रिणीच्या सहवासांत इंदिरेच्या दुःखाची तीव्रता बरीच कमी झाली. परंतु तिच्या मनाला आतां निराळाच चिंतनविषय मिळाला. कां कोणास ठाऊक, तिला संपादकाच्या भाच्याची, त्या तरुणाची, वारंवार अकारण आठवण होऊं लागली. त्यानें तिच्याकरितां स्वतःवर आपत्ति ओढवून घेतली होती. विनाकारण आपल्यासाठीं त्याला त्रास झाला. त्याचे हे एकपरी उपकारच झाले आपणावर. आपण त्याची उतराई कशी होणार ? इत्यादि विचार तिच्या मनांत नेहमीं येत. त्याच्याविषयीं तिच्या मनांत आदरभाव उत्पन्न झाला, तथापि यांपैकीं आपल्या मैत्रिणीला तिनें कांहींच सांगितलें नाहीं.

हां हां म्हणतां सुट्टीचे दिवस संपत आले. इंदिरा जाण्याची घाई करीत होती व मैत्रीण तो दिवस पुढें ढकलीत होती. " दुसऱ्या दिवशीं पोचतां येतें, मग आठ दिवस आधीं घाई कां ? " असें तिचें म्हणणें होते. परंतु इतक्यांत ' तुकाराम ' व ' जयंती ' बुडाल्यामुळें जिकडे तिकडे मोठी खळबळ उडाली व इंदिरेनें बोटीनें जाण्याऐवजीं मोटारनें जावें असें ठरलें. " मोटार लॉरीनें-सुद्धां नको. त्यांतहि धोका असतो. तूं लहानशा टूरिंग कारनेंच जा. व पुढें दिवसगत झाले तरी सगळा प्रवास आगगाडीनेंच कर, अन् पोचल्याबरोबर तार कर. " तिची मैत्रीण कळवळ्यानें सुचवीत होती.

" म्हणजे मी हरवेन बिरवेन वाटतं वाटेंत ? " इंदिरा हंसून म्हणाली.

" हरवायची गोष्ट नाहीं ग. पण चिंता लागून रहाते. " मैत्रिणीच्या पतीनें टूरिंगकारची फ्रन्टसीट शोधण्याची शिकस्त केली. परंतु तशी जागा मिळाली नाहीं. एक चार सीटची टूरिंगकार होती, पण तिची फ्रन्टसीट आधींच अडविलेली होती. सुदैवानें तींतून एक स्त्री–उतारूहि प्रवास करणार असल्यामुळें इंदिरेनेंहि त्याच गाडीनें जावें असें ठरलें.

फ्रन्टसीटवरचा उतारू येऊन स्थानापन्न होतांच मोटार निघाली व इन्दिरेला एकाएकीं अस्वस्थता वाटूं लागली. फ्रन्टसीटवर श्रीयुत महाशब्दे बसले होते.

" हा शनीसारखा पाठीस कां लागला आहे ? जिथें जावं तिथें हा आपला हजर ! आहे काय हें चिन्ह ! "

इन्दिरेला मनांत या योगायोगाबद्दल सखेदाश्चर्य वाटूं लागलें. सुखाचा व जलद प्रवास व्हावा म्हणून मुद्दाम मंडळींनीं लहान मोटार पत्करली होती. परंतु थोडासा मार्ग आक्रमिल्यानंतर ती अगदीं खिळखिळी आहे हें त्यांना कळून आलें. दारें तर वारंवार उघडत त्यामुळें तीं हातांनीं धरून ठेवावीं लागत. प्रथम ती भरवेगानें निघाल्यामुळें बरोबरीच्या गाड्यांच्या पुढें गेली होती. परंतु पुन्हां पुन्हां पंक्चर होऊन ती बरीच मागें पडली. पंक्चर झालें कीं दुरुस्त करावें, उघडणारीं दारें पुन्हां पुन्हां लावावीं, अशा रीतीनें त्यांचा प्रवास चालला असतां मोटार एकदम थरारली व वाट सोडून बाजूच्या दगडांच्या ढिगांवरून जोरानें धडपडत जाऊन बाजूच्या झाडांना खरचटत फांद्या मोडीत पुढें चालली. घाबरल्यामुळें हातानें धरून ठेवलेलें दार इंदिरेच्या हातून सुटून उघडलें व तोल जाऊन ती पलीकडे फेंकली गेली; आणि मोटारचा वेग कमी होत आला होता तो पूर्ण थांबण्यापूर्वीच ती उपडी होऊन पडली.

इंदिरा जेव्हां शुद्धीवर आली, तेव्हां सभोंवार कांहीं लोक उभे आहेत असें तेला दिसलें. ही मंडळी खालून आलेल्या लॉरींतील होती. अपघात झालेला देसल्यामुळें थांबून चौकशीसाठीं ती आली होती. सुदैवानें इंदिरेला भयंकर स्वरूपाची इजा झाली नव्हती. तरी फेकली गेल्यामुळें सर्वांग ठेंचाळलें गलेंच होतें. माणसांचा घोळका पाहून ती हळूहळू उठून उभी राहिली आणि पलीकडे अस्ताव्यस्त पडलेल्या सहप्रवाशांजवळ गेली. ती सारी मंडळी बेशुद्ध असून त्यांची स्थिति पाहून इंदिरेच्या आंगावर कांटा उभा राहिला. ज्या महाशब्यांच्या अवजड शरीराला मऊ गाद्यागिरद्यासुद्धां खुपत असत, ज्यांच्या पायांना घरांतील जमिनीचासुद्धां स्पर्श क्वचित् होत असे, त्यांचें सर्वांग रक्तानें माखून धुळींत लोळत अस्ताव्यस्त पडलें होतें. सर्वांत त्यांनाच विशेष इजा झालेली दिसत होती. बेशुद्ध मंडळीसह आपणांस नेण्याविषयीं इंदिरेनें मोटारवाल्यास विनंति केली. पण पोलिसचौकशीच्या चक्रांत सांपडून त्रास होईल या भीतीनें परंतु बाह्यतः जागा नाहीं या सबबीनें त्यानें ती नाकारली.

“ या बेशुद्ध मंडळींना उपचारासाठीं लौकर हॉस्पिटलमध्यें पाठविणें कसें अगत्याचें आहे व याकरितां तुम्हांपैकीं कोणीतरी चारपांच जण उतरून त्यांना जगा करून द्या. ” अशी उतारूंचीहि तिनें प्रार्थना केली. परंतु वरील भया-

मुळेंच त्यांनीं ती अमान्य केली. मात्र मोटारवाल्यानें आपला पाण्याचा डबा व उतारूंपैकीं पुष्कळांनीं आपापल्याजवळील खाद्यपेय पदार्थ खुषीनें तिला दिले, व आम्ही कऱ्हाडला पोंचतांच पोलिसला वर्दी देऊन तुम्हांला मदत पाठवून जरूर व्यवस्था करूं, असें त्या मंडळींनीं तिला आश्वासन दिलें आणि ती मोटार निघून गेली.

बिचारी इंदिरा! मिळालेल्या पाण्यानें बेशुद्ध मंडळींस शुद्धीवर आणण्याचे उपचार करूं लागली. फ्रंटसीटवर बसल्यामुळें पुढील कांचेच्या झडपांनीं, महाशब्द्यांना विशेषच इजा झाली होती. रक्तस्रावहि फारच झाल्यामुळें त्यांना पुन्हां पुन्हां ग्लानि येत होती. काय करावें, एवढीं मोठमोठीं माणसें, ज्यांना स्वतः होऊन जागचें हालणें अशक्य झालें, त्यांच्या जखमा कशा स्वच्छ कराव्या, काय उपचार करावे हें तिला सुचेना. महाशब्द्यांसारखा एवढा कर्तृत्ववान् पुरुष पण अशा आसन्नमरण स्थितींत पृथ्वीच्या अंकावर लोळत होता! ज्यास कांटा बोंचला असतां विलक्षण अगत्यानें व्यवस्था व्हावी, त्यास प्राणांतिक जखमा झाल्या असतांना कांहीं साह्य मिळूं नये, व अशा स्थितींत त्याची शुश्रूषा करण्याचें आपल्या भाळीं यावें या विलक्षण योगायोगाचें तशा स्थितींतहि तिला आश्चर्य वाटलें. एवढ्यासाठींच का हा उपग्रह सर्व प्रवासांत आपल्या राशीस लागला होता?

आणखीहि कांहीं मोटारी आल्या व गेल्या. परंतु इंदिरेची विनंति मान्य करून कोणीहि त्यांना नेलें नाहीं. खाद्यपेय पदार्थांचा पुरवठा मात्र त्यांनीं केला. परंतु सर्वांनीं मदत पाठविण्याचें कबूल केलें असूनहि ती अद्याप आली नाहीं. अशा भयाण परिस्थितींत जागेपणीं रात्र कशी घालवायची या विचारानें इंदिरेच्या अंगावर कांटा उभा रहात होता. काय हें संकट! कोणत्या कुवेळीं प्रवासास निघण्याची दुर्बुद्धि आपणास झाली! ती स्वतःला दोष देत बसली असतां महाशब्दे विशेष तऱ्हेनें घर घर करीत आहेत असें तिला आढळलें. तिचें जात्याच दयाळु अंतःकरण द्रवलें. त्यांच्याजवळ जाऊन तिनें थोडें पाणी त्यांच्या तोंडांत घातलें. त्यांच्या बांधतां येण्यासारख्या जखमा ओल्या कापडाच्या पट्ट्यांनीं बांधल्या. गेलेल्या मोटारींतील माणसांनीं दिलेलीं फळें तिनें त्यांस खावयास घातलीं. अशा रीतीनें पूर्वग्रह बाजूला ठेवून तिनें त्यांची अर्धाअधिक तास चांगली मनापासून सेवा-शुश्रूषा केली.

महाशब्‍यांना वाटलें, आपण लहान बालक झालों आहोंत आणि आपली आई आपणास वात्सल्यानें थोपटीत आहे, व तिच्या प्रेमळ स्पर्शानें आपलें अंतःकरण मृदु बनत आहे ! महाशब्‍यांचें अंतःकरण जात्या दुष्ट नव्हतें. पुष्कळ वर्षे धंदा केल्यामुळें निरनिराळया प्रसंगांनीं धंदेवाईकाचा कठोरपणा त्यांच्यांत येऊन मूळच्या कंजूषपणानें भलतीच दिशा लागली होती. या प्रसंगानें धंद्यामुळें आलेला कठोरपणा व संपत्तीचा मद किंचित् ओसरला. त्यांना नवी दृष्टि आली.

आज जर ही बाई नसती तर आपली धडगत नव्हती. आपली संपत्ति व तिनें साध्य होणारीं सुखसाधनें सर्व तिकडे आपल्या घरींच राहिलीं असतां या आडरानांत आपलें जीवित इच्या दयेवर अवलंबून होतें. आपणास तहान लागून घशाला कोरड पडली, घरघर लागली, त्या वेळेस हिनें जर साधें पाणी आपल्या तोंडांत घातलें नसतें तर हजारों रुपये किंमतीची आपली इस्टेट तिकडे असतांहि घोटभर पाण्यासाठीं आपला प्राण गेला असता ! आपलें इतकें वय झालें, जगांतील उत्तम सुखैश्वर्याचा आपण उपभोग घेतला तरी अजूनहि आपणास जगावेंसें वाटतें; आपणास वांचविणाऱ्यास काय वाटेल तें देऊं करावें असें वाटण्याइतकें आपणांस आपल्या जिवाचें मोल वाटतें आणि या मुलीच्या बहिणीच्या जीविताच्या प्रश्नाच्या वेळीं आपण तिला न्याय्य देणेंसुद्धां दिलें नाहीं. नुकत्याच उगवलेल्या त्या कोमल कळी-सारख्या लहान मुलीला किती जगावेंसें वाटलें असेल व आपल्या निष्ठुर वर्तनानें तिची आबाळ होऊन अकालीं जगाचा निरोप घेतांना तिला किती दुःख झालें असेल ! अरेरे, पैशाच्या धुंदीनें साध्या माणुसकीला सुद्धां आपण किती पारखे झालों होतों !

मागें श्रीकांतनें-त्यांच्या भाच्यानें-त्यांची कानउघाडणी केलीच होती. सदर प्रसंगीं इंदिरेच्या थोर अंतःकरणाची अशा तऱ्हेनें साक्ष पटून तिला दिलेल्या त्रासाबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला. श्रीकांतबद्दलहि त्यांना वाईट वाटलें. शरीराला आत्यंतिक वेदना होत होत्या. कोठून कांहीं मदत येईल कीं त्यापूर्वींच आपला अंत होईल याचा भरंवसा नव्हता. बहिणीनें मृत्युसमयीं आपल्या स्वाधीन केलेल्या तिच्या मुलाला देशोधडीस लावलें. आतां आपला अंत होऊन आपण परलोकीं गेलों आणि तेथें लाडक्या मुलाबद्दल बहिणीनें विचारिलें तर काय

जाब देणार ? त्यांचें त्यांनाच आपण किती दुष्ट, कठोर आहोंत असें वाटूं लागलें.

आपल्या अन्यायीपणाचें परिमार्जन करण्याच्या बुद्धीनें त्यांनीं लेखन-साहित्याची चौकशी केली. इतर माणसें शुद्धीवर आलीं होतीं; परंतु त्या कोणाजवळहि लेखनसाहित्य मिळालें नाहीं. तेव्हां त्यांनीं मंडळीजवळ निरवा-निरवीचा संदेश सांगितला.

" आपल्या इस्टेटीपैकीं तीनचतुर्थांश हिस्सा आपला भाचा श्रीकांत यास व एकचतुर्थांश आपली अशा स्थितींत मनोभावें सेवा करणाऱ्या इंदिराबाईस मिळावा. " असें ते त्या आपल्यासारख्याच आसन्नमरण सहप्रवाशांना निरवून सांगत होते. जणूं काय ते ट्रस्टी म्हणून इस्टेटीच्या वांटणीच्या वेळेस हजरच रहाणार आहेत !

इंदिरेनें महाशब्द्यांकडे दृष्टि टाकली तो त्यांच्या डोळयांतून अश्रु ओघळत होते. भावनांच्या आवेशामुळें त्यांच्या जखमांतून रक्त वाहूं लागलें. ते पुन्हां निपचित पडले. सूर्यनारायणहि आपला एक एक नेत्र मिटूं लागला. आतां ही काळरात्र अशा अत्यवस्थ सोबत्यासह कशी घालवायची याची इंदिरेला चिंता पडली होती. इतक्यांत मोटारचा आवाज आला व मोटारच्या झगझगींत दिव्यानें ती भयाण जागा प्रकाशमान् झाली.

कऱ्हाडहून सरकारी मदत आली होती. आपल्या अनुयायांसह पोलिस ऑफिसर व डॉक्टर त्यांना न्यावयास आले होते. सर्वांना ते घेऊन गेले.

दुसऱ्या दिवशीं महाशब्दे जेव्हां शुद्धीवर आले तेव्हां अधिकाऱ्यांना सांगून आधीं त्यांनीं आपलें वारसपत्र तयार करविलें, व श्रीकांतचे नांवें ऑफिसांत तार पाठविण्यास सांगितलें.

इंदिरेला भेटून गेल्यानंतर श्रीकांत जेव्हां एका आठवड्यानें पुनः तिच्या घरीं आला तेव्हां ती एकाएकीं गांवाला गेल्याचें कळून त्याला फार आश्चर्य वाटलें. प्रयत्न करूनहि तिचा पत्ता त्यास कळला नाहीं कीं तिचा एखादा लेख कोठें वाचनांत आला नाहीं; त्यामुळें एखादें अत्यंत परिचयाचें निकटवर्ति माणूस अंतरल्यासारखी त्यास हुरहुर लागून राहिली होती. अशा वेळीं मामा अत्यवस्थ असल्याची तार तिच्याकडून त्यास मिळाली तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें. तो त्वरित कऱ्हाडास आला. अधिकाऱ्यांनीं ठेवून घेतल्यामुळें इंदिरा

अद्यापि तेथेंच होती. तिच्या अविश्रांत शुश्रूषेमुळेंच महाशब्यांना आराम पडत आहे असें त्यांचें मत होतें. पुढें तर खुद्द आजारीच तिला जाऊं देईना. महाशब्यांची सुटका होईतों इंदिरा व श्रीकांत तेथेंच होतीं.

श्रीकांताच्या मनांत इंदिरेबद्दल अत्यंत आदर उत्पन्न झाला. सहवासानें एकमेकांचे गुण एकमेकांस कळून त्यांची आदरयुक्त भावना वाढत जाऊन क्रमानें तिचें प्रेमांत रूपांतर झालें. इंदिरा व श्रीकांत यांची परस्परांबद्दलची वृत्ति, सूक्ष्मदृष्टि महाशब्यांच्या नजरेंतून फार दिवस सुटणें शक्य नव्हतें. त्यांच्याहि डोळ्यांत गेल्या परिस्थितीनें अंजन पडून कांहीं योजना डोक्यांत घोळतच होत्या.

मुंबईस परत आल्यावर त्यांनीं इंदिरेस तिच्या खोलींत एकाकी आयुष्य कंठण्यास जाऊं न देतां तिचा हात श्रीकांताच्या हातीं दिला; आणि आपण विश्रांति घेण्याचें ठरवून धंद्याची सर्व व्यवस्था श्रीकांतवर सोंपविली.

अशा रीतीनें कांहीं आठवड्यांपूर्वी योग्य हक्काच्या मागणीसाठीं क्षुल्लक रकमेची याचना करीत असतां धुडकावून लावलेल्या मुलीला आपल्या संपत्तीच्या चवथ्या हिश्शाचीच नव्हे तर सर्व संपत्तीची स्वामिनी करून तिजबद्दल केलेल्या अन्यायाचें त्यांनीं अंशतः तरी परिमार्जन केलें असें कोण म्हणणार नाहीं ?

## ( पुरवणी. )

# मिळवती बायको.

लेखिका---सौ. मालतीबाई दांडेकर.

कमलाकर आज फारच आनंदांत होता. टेबलावरचा एक नोटपेपर उचलून तो पन्नासदां वाचण्यांत तो अगदीं गर्क झाला होता तें गिचमीड अक्षर त्याच्या वडिलांचें होतें. यापूर्वी वडिलांचें प्रत्येक पत्र एकदां झर्रकन् वाचून फेकून देण्याची त्याची वहिवाट होती. कारण पैशाची टंचाई, एखाद्या कुरूप मुलीबद्दल अवास्तव वर्णन, त्याच्या उधळपट्टीबद्दल कानउघाडणी किंवा अशाच तऱ्हेचा त्याला अत्यंत अप्रिय वाटणारा मजकूर त्यांत असे. मग एकदां वाचून तें पत्र फाडून टाकायचें नाहीं तर त्याची काय पूजा करायची?

कमलाकर नोकरी लागून तीन वर्षे होत आलीं तरी अद्यापि अविवाहितच होता. कारण अनेक कारणांवरून जुळत असलेलें लग्नदेखील मोडून जात होतें. कमलाकराच्या आपल्या पत्नीबद्दल दोनच अपेक्षा होत्या. एक ती सर्वांगसुंदर पाहिजे व दुसरी ती बी. ए. झालेली पाहिजे. आईसाहेबांना वाटे-सुनबाई खालमानेची अन् बाळबोध वळणाची हवी अन् जनुभाऊंनीं तर ठरवलेंच होतें कीं टिप्पण जमलें न् हुंडा खूप आला तरच लग्न ठरवायचें! तेव्हां या सर्वांच्या पसंतीचा कपिलाषष्ठीचा योग एकाही मुलीच्या बाबतींत जमला नव्हता, यांत कुणाचा काय दोष? शेवटीं कंटाळून गेल्यामुळें कमलाकरानें मनांतून-"एक दोन इयत्ता इंग्रजी झालेली देखील पुरे अन् साधारण कां असेना? चालेल-" असें ठरवून टाकलें होतें. कारण वडील जमदग्नीचा अवतार! सांगणाराच त्यांच्या क्रोधानलांत दग्धप्राय व्हावयाचा! आईसाहेबांनीं देखील आपला हेका सोडण्याचें ठरवलें. अशा रीतीनें कमलाकराचें लग्न ही अशक्य अशी वाटणारी गोष्ट शक्य दिसूं लागली.

त्याला बऱ्याच मुली सांगून आल्या. पण सुशिक्षित हें उपपद चिकटवण्याजोगी त्यांत एकही नव्हती. त्या तशाच गेल्या आणि कमलाकराचा उदासीन एकाकीपणा व निराशा वाढत चालली. अशा परिस्थितींत त्याला बी. ए.

बायको मिळण्याच्या आशेचा किरण दिसतांच इतका आनंद व्हावा हें साहजिकच होतें.

" रामभाऊ कावळे यांची मुलगी पद्मा ही बी. ए. झालेली आहे, टिप्पणही तेहत्तीस गुण जमतात, दिसायला चांगली आणि सशक्त आहे. हुंडा सारा आठशेंच देणार आहेत, पण बाकी सारें जमतें आहे, म्हणून मीहि एवढें ओढून धरीत नाहीं. हें स्थळ आम्ही ठरवायचें ना ? तुझें उत्तर आलें कीं मुहूर्त ठरवून टाकणार आहें. पद्मेचा फोटो सोबत धाडला आहे. इ० इ०..." याच चार ओळी तो वरचेवर वाचीत होता; वडिलांबद्दल त्याला एकाएकीं कितीतरी आदरबुद्धि वाटूं लागली. फोटो तर त्यानें खोलींत लावूनच टाकला !

* * *

पद्मा-कमलाकर यांचें लग्न होऊन महिना होत आला. नूतनपरिणित पत्नीला घेऊन कमलाकर लहानपुराला आला व नव उल्हासानें त्यांच्या सुशिक्षित संसाराला सुरवात झाली.

" पाहिलं का ? " हातांतला कागद कमलाकराच्या डोळ्यांसमोर धरीत पद्मेनें त्याला आनंदाची वार्ता सांगितली—

" पर्वांच मीं इथली हेडमास्तरणीची रिकामी जागा मला मिळावी म्हणून अर्ज केला होता ना—त्याचं उत्तर आलं आहे. नेमणूक केल्याबद्दल ! सध्यां नव्वद पगार मिळेल. किती बरं झालं नाहीं ? "

" तर ! बरं म्हंजे—माझे एकशेंदहा न् तुझे नव्वद, दोनशं कांहीं कमी पडायचे नाहींत आपल्या दोघांना सध्यां. पण तुला घरचं सारं न् नोकरी झेपेल का ? " कमलाकरानें शंका प्रदर्शित केली.

" इश्श् ! दहाला तुम्ही जेवून ऑफिसांत गेलांत कीं मी रिकामीच असतें कीं संध्याकाळपर्यंत ? तो वेळ अनायासें सार्थकीं लागतो आहे ह्याचंच मला समाधान वाटतंय्—"

त्या उत्तरांत अंतःकरणपूर्वक समाधानाचा अंश आढळून कमलाकर आनंदित झाला.

\+ + +

"छन् छन् छन्-" ह्या आवाजाबरोबरच एक दोन तीन वगैरे आकड्यांचेंही

उच्चार ऐकूं येऊं लागले. कमलाकरानें मुद्दाम खोलींत जाऊन पाहिलें. रुपये मोजण्यांत पद्मा गर्क झाली होती. दहा दहा रुपयांची एकेक अशा नऊ चळथी करून तिनें त्याकडे पाहात म्हटलें–" हें पाहून किती आनंद होईल! हा पहिला पगार!"

"खरोखरच तुझा हा पहिला पगार पाहून मलाही फार आनंद झाला आहे" अनपेक्षित उत्तरानें,चमकून मागें पाहून लाजून पद्मा म्हणाली, "केव्हां यायचं झालं? मी आपली माझ्या नादांतच होतें. पहिली कमाई या दृष्टीनें या नव्वद रुपयांचें महत्त्व नाहीं का? मला तर कितीतरी आनंद झाला आहे."

"अग, महत्त्व म्हणजे काय? तुला नुसतंच महत्त्व वाटतं; मला तर बरो-बरीनं कौतुकही वाटतं आहे. हे पैसे तुला बक्षीस. घरांत घ्यायचे नाहींत ते. तुझ्या आवडीच्या वस्तु घे त्या पैशांत–अंऽ?" सप्रेम नजरनें कमलाकरानें सांगितलें.

पद्मेच्या नेत्रांतही आनंदमिश्र प्रेम खेळूं लागलें. तिला स्वत:बद्दल धन्यता वाटूं लागली.

× + ×

"आतां हा पाहून त्यांना किती आनंद वाटेल?" पद्मा विचारांत गुंग झाली होती. समोरच एक काळा सोनेरी बुट्टयांचा शालू होता. त्यावर नील-वर्ण बनारसी खणाचा सुंदर ब्लाऊज होता. थोडक्याच वेळांत "हं असं करावं..." असें म्हणून पद्मा उठली. तिनें साबण लावून स्वच्छ तोंड धुतलें. त्यावर पावडरचा हलका हात फिरवला. केस फॅशनेबल तऱ्हेने फुगे पाडून तिनें पिळाचें चक्कर घातलें! नंतर बारीक कुंकुमतिलक रेखून तिनें तो शालू व ब्लाऊज परिधान केला. तिच्या मूळच्याच गौरतनूला तो काळा शालू अप्रातिम खुलून दिसत होता. वरचेवर ती दारांत जाऊन पाही न् निराश होऊन परत येई.

कमलाकर थोड्या वेळांत आले. त्यांचें पत्नीकडे लक्ष्यही गेलें नाहीं. विम-नस्क स्थितींत ते आरामखुर्चीवर पडून राहिले. "पेन्शनींत एकदम काढल्यानें पैशाची ओढाताण होत आहे. सुनबाईचे नव्वद न् तुझे मिळून दोनशें रुपये तुला मिळतात–तेव्हां पन्नास तरी इकडे धाडीत जा" असे वडिलांचें आज्ञापत्र नुकतेंच त्यांना आलें होतें व मानासिक व्यग्रतेस तेंच कारण होतें.

" काय होतंय आज ? डोकं का दुखतंय ?... " मृदु वीणारव ऐकून त्यांनीं वर पाहिलें. तो काळा शालू पाहून त्यांच्या खिन्नतेंत आणखी भरच पडली. एकशेंऐशीं रुपयांचा तो शालू! आपल्याला तो एवढ्यांतच घेणें शक्य नव्हतें; पण पुढे घेऊं म्हणून आपण आश्वासन दिलें होतें. पण आपल्याला न विचारतां आधींच पद्मेनें आपला दोन महिन्यांचा पगार देऊन शालू घ्यावा याचें त्यांना फारच वैषम्य वाटूं लागलें. तिला आवडीच्या वस्तु पुरविण्यास आपण समर्थ नसलों तरी तिनें स्वतः पैसे मिळवून पाहिजे त्या वस्तु घ्याव्या यांत कमलाकराला मोठीच मानहानि वाटूं लागली. काय हें ? तिनं नुस्तं विचारूं सुद्धां नये ! आपल्याबद्दल इतकी बेपर्वाई ?...पद्मेला काय कल्पना त्याच्या बिघडलेल्या मनाची ? तिनें मोठ्या उत्सुकतेनें विचारलें–" पण हा पाहिला का ? कसा काय दिसतो मला ? अं ऽ ?... "

" छान ! सुरेख-झकास दिसतो ! " निर्विकारी चेहऱ्यानें कमलाकर म्हणाला. पण त्या उत्तरांत भावनेचा ओलावा नव्हता किंवा मनोविकाराचें मिश्रण नव्हतें. कांहींतरी उत्तर द्यायलाच हवें म्हणून तो हें वाक्य बोलला होता. मनांतून त्याला राग आला होता पण तो दर्शविणें त्याला योग्य वाटत नव्हतें.

पद्मेला वाईट वाटलें. एकादी गोष्ट दुसऱ्यानें चांगली म्हणावी म्हणून हेतुपुरस्सर करावी न् लोकांनीं त्याबद्दल नाखुषीच दाखवावी म्हणजे मन जसें खट्टू होतें तसेंच झालें तिच्या बाबतींत. तिच्या चेहऱ्यावर उदासीनता आली. तिकडे कमलाकरानें मुद्दाम दुर्लक्ष केलें. तिच्या बेपर्वा वृत्तीला हें शासनच तो समजत होता.

दुसऱ्या महिन्यापासून त्यानें स्वतःच्या पगारांतले पन्नास निमूट वडिलांकडे धाडण्यास सुरवात केली.

\+ * +

तिचा पगार १० रुपयांनीं वाढला होता. व तिला कायम करण्यांत आलें होतें. ज्या दिवशीं हें वर्तमान तिनें आनंदानें कमलाकरापाशीं सांगितलें त्या दिवशींही तो अत्यंत सुन्न बसला होता. योगायोग असा कीं, त्याच दिवशीं इतरांबरोबर त्याच्या पगारांत शेंकडा ५ प्रमाणें कपात करण्यांत आली होती ! ! आतां त्यानें बायकोच्या आनंदांत भाग घ्यावा कीं तिनें त्याच्या

खिन्नपणांत भाग घ्यावा ? सूर्य हळूहळू अस्तास जात असतांना चन्द्रमा तेजस्वीपणानें चमकण्यास सुरवात होते. आपला उत्कर्षसूर्य मावळत आहे व त्याच वेळीं तिचा कीर्तिचंद्र जगाच्या आकाशांत प्रकाशित राहणार–ही कल्पना त्याला दुस्सह झाली. बायकोची वाहवा झालेली चांगली खरी, पण ती कोठ-पर्यंत ? लोक नवऱ्याहून बायकोलाच ज्यास्त मान देऊं लागले तर तें अगदीं लाजिरवाणें नव्हे का ? कमलाकराला लोकांनीं तर अगदीं भंडावून सोडलें.

" काय कमलाकर, तुमच्या मिसेस्‌ना दहा रुपये वाढले न् तुमचे ५ कमी झाले म्हणे–म्हणजे एकंदरींत यांत पांच रुपये तुमचा फायदाच झाला आहे " वगैरे वगैरे एक ना अनेक–! लोकांचीं तोंडें कोण आवरूं शकणार ?

शाळेबरोबर तिच्या पाठीमागचा व्याप भयंकरच वाढला. बक्षिससमारंभ, लॅन्टर्न लेक्चर्स, शाळेतर्फे होणारे हळदकुंकवादि प्रसंग, व्हिजिटर्सची व्यवस्था, सुताचा वर्ग, शिवणकला व शारीरिक खेळांकडे खर्च होणारा शाळेच्या वेळा-खेरीजचा वेळ, कलाकुसरीचीं प्रदर्शनें, खेळांचे सामने वगैरे वगैरेंत ती अगदीं दंग होती. तिला कामाची व अध्यापनाची खरीखुरी हौस होती आणि म्हणून बिगारीनें कामाची विल्हेवाट न लावतां ती सगळें तनमनधन अर्पण करून नोकरी बजावीत होती. गृहकृत्यांकरितां एक बाईच तिनें ठेविली होती. ' ठेवूं नको ' असें तरी कमलाकर सांगणार कसा ? आपल्या पैशांतून ती पैसे देणार होती ना ? हाच तर वरचढपणा त्याला सहन होईनासा झाला होता !

* + *

हवापालट करायला म्हणून कमलाकराची आई आली होती. बरेच दिवस ती आजारी होती म्हणून कमलाकरानेंच तिला बोलावून घेतलें होतें.

पहिल्यापहिल्यानें तर पद्मेला कुठें ठेवूं न् कुठें सांठवूं असें तिला होऊन गेलें. जिकडून तिकडून ' सुनबाई फारच गुणवान् आहे हं– ' अशीं गौरवपर वाक्यें ऐकून तिला आपल्या मुलाच्या भाग्याबद्दल धन्यधन्य वाटलें. वरचेवर ती मुलापाशीं सुनेचे गुणानुवाद वर्णन करूं लागली. समईतल्या जळत्या वातीला तेलाचा पुरवठा असला कीं ती जळत राहते. कमलाकराच्या मनांत उद्विग्नतेची ज्योत तेवत रहायला हें एक कारण मिळालें होतें. पण तोंड दाबून बुक्क्यांचा मार म्हणतात, तशापैकीं त्याला आईच्या स्तुतीला अनमानही

करणें अशक्य होतें. मनांतून मात्र आपण पत्नीहून हीन नालायक ही भावना तीव्रतेनें जाणवत होती.

* + *

" कमा–अजून बाजाची पेटी नाहीं घेतलीस तूं ? " कौतुकानें आई मुलाला विचारीत होती. ' सूनबाईला पेटी छान् येते–घे आतां–दोघजणं मिळवितां, काय झालं ? "

" हूं–घेऊं आतां सवड झाली म्हणजे आई. किनई मिळणारे पैसे लागतातच सारे, विम्याचे हप्ते आहेत, मासिकं घ्यायला हवीं, मित्र मैत्रिणी येणार, सगळं सगळं पैशाचं आहे–तुला वाटतंय शिल्लक राहते, पण नाहीं–तसं नाहीं–" मनमोकळेपणानें कमलाकर म्हणाले–' अन् शिवाय पायपेटीला अगदीं कमी म्हटलं तर शंभर तरी हवेत. उगीच रद्दी घेण्यांत काय अर्थ आहे ? "

" सुनबाईजवळ आहेत शंभर रुपये–मला म्हणाली ती—"

" होय का ? मला नव्हतं ठाऊक ! शिल्लक असली तर घ्यावी पेटी. मजजवळ नव्हते पैसे–म्हणून मागनं घेऊं म्हणालों मी–" त्याच्या चेहऱ्यावर व आवाजांत पूर्ववत् औदासीन्य खेळूं लागलें. आईसाहेबांच्या अंगीं सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा अभाव असल्यानें तें त्यांच्या ध्यानींमनींसुद्धां आलें नाहीं !

\+ + +

आईसाहेबांनींच हेक्यानें शेवटीं पेटी आणविली. तोंडानें मात्र त्या म्हणत " मुलीला हौस आहे–एकदां पोरांबाळांचा व्याप लागला कीं मुळींदेखील फावायचं नाहीं. आतां थोडासा सुटवंगपणा आहे, तंवर घेऊं दे हौस पुरवून–"

पद्मावतीला खरोखरच आनंद झाला. आपण श्रेष्ठ या भावनेनें नव्हे–पण कधींची पेटीची हौस पूर्ण झाली म्हणून. कमलाकर जास्तच चिडखोर बनत चालला. ती पेटी त्याच्या उद्विग्नतेचें मूळ बनली. पेटीचे सूर आपली निर्धनता ओरडून सांगत आहेत असेंच त्याला वाटे. त्याचें उरलेंसुरलें गृहसौख्य नष्ट होत चाललें. लोक म्हणत–"कमलाकर, तुम्ही फार भाग्यवान् ! कलावान् सुंदर, हुशार आणि मिळवती बायको तुम्हाला मिळाली आहे, पेटीहि वाजवतात म्हणे उत्तम. आम्हांला तरी ऐकवा एकदां त्यांचं वादन........ "

मनांतला संताप मनांतच आवरीत तो कष्टानें स्मितवदन करी आणि म्हणे, " हो हो, नेऊं कीं. तुम्हांला साऱ्यांना एकदां पार्टीच देऊं..." आंतून त्याचें

अंतःकरण ओसाड बनत होतें. कांहींतरी कसली तरी उणीव आहे अशी रुख त्याला लागे. उणीव काय त्याचें उत्तर मात्र त्याला सुचेना.

× + ×

हवापालट आईना मानवला नाहीं. हार्ट डिसीजचें त्यांना दुखणें होतें. आधूनमधून छाती धडधडूं लागे आणि त्या व्याकुळ होत.

एके दिवशी त्यांच्या छातींत जोरजोरानें धडधडूं लागलें. बरीच धां झाली आणि डॉक्टर वगैरे येऊन सर्व स्थिरस्थावर झालें. नंतर त्या म्हणा " कमा, मी जातें आपली. माझ्यापासून तुम्हांला निष्कारण त्रास ! उद्योगाचीं माणसं; सुनबाई तुझ्यासारखीच, एखाद दिवशीं दुपारींच म्हणतां कांहीं झालं तर हांक तर कुणाला मारायची ? बाई तीं बाई— तो गडीच—पण घरचं माणूस हवं..." चमत्कारिक नजरेनें कमलाकरानें प कडे पाहिलें पेपर तपासण्यांत ती गढून गेली होती.

" बरें आहे, करतों कांहीं तरी व्यवस्था " असें पुटपुटत तो ते उठला.

" मग तुला थोडे दिवस रजा घेतां येईल का ? बिनपगारी दे चालेल " त्यानें मनाचा निश्चय करून विचारिलें. " पद्मे, आई थोडेच दि राहील. तेवढ्यांत तूं थोडी काढ रजा—मी बघतों मिळाली तर—"

" पण आत्तां मिळणार नाहीं. " तांबड्या पेन्सिलीनें एका बुकांत करीत तिनें उत्तर दिलें. " परीक्षा जवळ आल्या आहेत न् मागमलेले अभ्य भरून काढलेच पाहिजेत. एकहि दिवस फुकट जाऊन उपयोगी नाहीं—न लाज आहे माझा— "

तो जास्त बोलला नाहीं. संतापातिरेकानें त्याच्या नेत्रांतून जणूं अ स्फुलिंग बाहेर पडूं लागले पण तिकडे पहायला तिला वेळ नव्हता.

+ + +

त्यानें एक आठवड्याची ' सिक ' रजा काढली. दुसरे दिवशीं त्या आईची तब्येत बरीच बिघडली. तिला जेवणापैकीं एकही जिन्नस आवड नाहीं. बोलूनचालून मोलाची बाई ! ती थोडीच नीटनेटकं सुग्रणपणानं न् ल पूर्वक करणार ? आपल्या सुनेनं करून घालावं अशी म्हातारीनं इच्छा ! र्शित केली.

" वेड आहे तुला आई! जन्मभर आमच्या नशिबीं हेंच अन्न आहे. मला मोठा पश्चात्ताप व्हायला लागला आहे एवढी नाकाहून मोतीं जड अशी शिकलेली मिळवती बायको कशाला करावी मीं? माझीच चूक आहे."

" काय झालं रे कमा, येवढं त्राग्यानं बोलायला? चांगले तुझ्या बरोबरीनें पैसे मिळविते आहे. मग तुझं काय बिघडलं?" आईसाहेबांनीं प्रश्न केला.

" आई, कसं सांगूं तुला म्हणजे माझं म्हणणं समजेल?" अंतःकरण-पूर्वक तळमळीनें कमलाकरपंत सांगूं लागले—" बायको शिकलेली असली म्हणजे तो मनुष्य फार सुखी अशी माझी कल्पना होती ती फार चूक होती! आतां ती आमची नाहीं. नोकरीची ताबेदार! माझ्याबद्दल कांहींच आदर नाहीं. कारण तिच्या दृष्टीनें माझी योग्यता खरंच कमी आहे तिच्याहून! अन् हीच गोष्ट रात्रंदिवस माझ्या हृदयाला शल्याप्रमाणें बोचत आहे. इतर अनेक कर्तव्यें मागें असल्याने गृहिणीचीं कर्तव्यें करायला तिला वेळच नाहीं. ऑफिसांतून मी दमून भागून येतों पण घरीं ती कधींच नसते. स्वयंपाकीणबाई देईल तसला पांचट चहा घ्यावा न् चालतं व्हावं! मी घेऊन यायला असमर्थ अशा जिन्नसा ती आपल्या पगारांतून आणते. माझा अपमानच नव्हे का हा? मशीन, पेटी वगैरे गोष्टी माझ्या अपमानाच्या साक्षीच आहेत."

आईचेही डोळे पाण्याने भरले. " बाळा मला वाटलं तूं सुखांत असशील–" तिचे हे प्रेमळ उद्गार ऐकून कमलाकरपंतांचे डोळेही डबडबले. साश्रुनयनांनीं ते म्हणाले– –

" आई तुझ्यापाशीं सांगून टाकतों. मनाचा कोंडमारा आतां सहन होत नाहीं. आई दोन शब्द बोलूं म्हटलं तर पेपर्स, नोटबुक्स, वह्या, बुकं वगैरेंपुढे सुचेल तर ना? न् वेळही पाहिजे. एकादा मास्तर सोबतीला आहे यापलीकडे आतां माझ्या भावना जातच नाहीत. काय करूं? बायको म्हणून लोकांचें जें प्रेममय सौख्य असतें, प्रत्येक गोष्टींत परस्पराबद्दल जी प्रेममय भावना असते तिची तिला जाणीवसुद्धां नाही. कर्तव्य, कर्तव्य! कर्तव्यापुढें प्रेमबीम सब झूट आहे. अजून मी तृषार्त आहें. मोकळेपणीं बोलणं-बसणं, विनोद, वादविवाद वगैरेंत समानशीलत्वाचं सुख मिळावं म्हणून माझा बी. ए. बायको करण्याचा अट्टाहास होता. त्याचा परिणाम असा होईल ही कल्पना देखील मला नव्हती. आतां वाटतं, एकादी अडाणी बायको असती तर बरं!

पति हेंच दैवत मानून तिनं मला जीवापाड सुख दिलं असतं...” उद्वेगभर त्यांनीं कपाळाला हात लावला आणि म्हटलं, “आई लोकांना दरमहा शं रुपये दिसतात पण नष्टवत् गृहसौख्य दिसतें का? माझं जरा डोकं दुख ताप आला–तरी तिला रजा मिळत नाहीं!!!”

“मग कमा,” त्याच्या पाठीवरून हात फिरवून, “अजुनी एखादी ह डाणी मुलगी बघून तुझा मोडकळलेला संसार दुरुस्त करशील का? दो दोन बायका असतात पुष्कळांना. हो–जिथं सुख नाही, तिथं पैशाला कां चाटायचं आहे?” आईसाहेबांनीं हळूच सुचवले.

“नको नको–असं भलतंसलतं मनांत आणूं नये, माझी चूक नीट कळलं मला...” सद्गदित स्वरांत एकदम तेथे येऊन पद्मा म्हणाली.

“तूं लौकर कशी आलीस?” त्यानें आश्चर्यानें विचारलें.

“म्हाताऱ्या माजी हेडमास्तरीण मेल्याची तार आली व माडेबाराल शाळेला सुट्टी देऊन आलें–न् क्षमा असावी–बाहेरून सारं बोलणं ऐकलं मी– पत्नीचं कर्तव्य जनताजनार्दनाची सेवा नसून पतिसेवा हेंच आहे हें मल नीट कळलं आज. आजपर्यंत नोकरीमुळं आपल्याकडे दुर्लक्ष झालं, आप ल्याला त्रास दिला, त्या नोकरीचा मी उद्यांच राजीनामा देणार आहे –पैशाल खरंच काय करायचं आहें–माझ्या चुकीची क्षमा...झालं गेलं विसरून उदा मनानं माझे अपराध पोटांत घ्यावे...” एवढे शब्द कसेबसे पद्मावतीनं उच्चारले

डोळयांतून अश्रु भराभरा ओघळत होते. आपण कितीही शाळेत प्रिय असलों तरी पतिसेवा केली नाहीं तर आपले जिणे व्यर्थ आहे या कल्पनेनें तिला फारच भीति वाटली.

“अग हें काय? डोळे पूस पाहूं आधीं! कमाला सुख द्यायचा प्रयत्न कर, तू शहाणी आहेस–पण कर्तव्याची दिशा चुकली होती तुझी–” आईसाहेब म्हणाल्या.

“तुझ्यासारखी सद्‌गुणखनी जवळ असतांना दुसरी अज्ञाणी बायको करीन ही भीति खरंच का तुला अजून वाटते आहे?” कमलाकरानें स्मितमुद्रेनें विचारलें.